04-09-2015 (असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही) A

ASS/ 10:30

09-04-2015 (असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही) A-1

AJIT/ AKN/ MMP/ 10:30

(सभापतीस्थानी तालिका सभापती श्री.रामनाथ मोते)

पृ.शी.: कोकणात झालेला अवकाळी पाऊस व गारपीट यामुळे आंबा व काजू पिकांचे झालेले नुकसान

मु.शी.: कोकणात झालेला अवकाळी पाऊस व गारपीट यामुळे आंबा व काजू पिकांचे झालेले नुकसान या विषयावर सर्वश्री सुनील तटकरे, धनंजय मुंडे, श्रीमती विद्या चव्हाण वि.प.स. यांनी उपस्थित केलेली अल्पकालीन चर्चा.

(चर्चा पुढे सुरु..)

श्री.सुनील तटकरे : सभापती महोदय, आम्ही काल कोकणातील महत्वाच्या विषयावर चर्चा उपस्थित केली होती. माननीय कृषी मंत्र्यांची तब्बेत बरी नसल्यामुळे त्यांनी सभागृहात उपस्थित राहिल पाहिजे असा आग्रह न धरता आम्ही चर्चा पुढे सुरु ठेवली. आम्हाला मंत्री महोदयांकडून उत्तर अपेक्षित आहे. या विषयावर काल सभागृह थांबविण्यात आले होते त्यावेळी असे ठरले होते की, माननीय कृषी मंत्र्यांच्या सोयीनुसार आज उत्तर देण्यात येईल. परंतु ते सभागृहात अजून आलेले नाहीत. सरकारला जर अशीच अनास्था दाखवावयाची असेल तर त्याला काही इलाज नाही. परंतु हे योग्य नाही. आम्हाला अजूनही वाटते की, या चर्चेला उत्तर माननीय कृषी मंत्री श्री.एकनाथराव खडसे यांनी दिले पाहिजे. ते सभागृहात येईपर्यंत आम्ही पाच मिनिटे थांबण्यास तयार आहोत.

श्री.गिरीष बापट : सभापती महोदय, माननीय मंत्री श्री.एकनाथराव खडसे हे विधान भवनात आलेले आहेत. ते कदाचित उद्वाहनामध्ये असतील. ते सभागृहात येतीलच.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

तालिका सभापती : या विषयावरील सन्माननीय सदस्यांची भाषणे झालेली आहेत. फक्त माननीय मंत्र्यांचे उत्तर बाकी आहे. एक विशेष बाब म्हणून सन्माननीय सदस्य श्री.हेमंत टकले यांना भाषण करण्यास परवानगी देण्यात येत आहे. त्यांनी त्यांच्या भाषणास सुरुवात करावी.

..2..

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.हेमंत टकले (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, कोकणात झालेला अवकाळी पाऊस व गारपिटीमुळे आंबा आणि काजू पिकाचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले या विषयावरील अल्पकालीन चर्चा सन्माननीय सदस्य श्री.सुनील तटकरे यांनी उपस्थित केली. या चर्चेमध्ये अनेक सन्माननीय सदस्यांनी तसेच कोकणातील सन्माननीय सदस्यांनी चर्चेमध्ये भाग घेतला.

सभापती महोदय, कोकणातील हापूस आंबा जगामध्ये एक नंबरचा मानला जातो आणि या आंब्याला जगामध्ये मोठ्या प्रमाणावर मागणी आहे. मागील वर्षी कोकणातील आंबा युरोपमध्ये निर्यात झाल्यावर त्या ठिकाणी करण्यात आलेल्या चाचण्यांमुळे तो स्वीकारण्यात आला नव्हता. युरोप देशामध्ये ज्या प्रक्रिया करण्यात आल्या त्याचा विपरीत परिणाम आंब्यावर झाल्याचे दिसून आले होते.

सभापती महोदय, राज्यातील एकूण पर्यावरणाचा विचार केला तर असे लक्षात येते की, ज्या प्रकारची तयारी आपल्या विभागामार्फत होण्याची आवश्यकता आहे, ती झालेली नाही. कारण कोकणातील लोकांचे उपजीविकेचे साधन आंबा आहे आणि इतर पिकांपेक्षा आंबा पिकाला मिळत असलेली किंमत यावर कोकणातील शेतकऱ्यांची आर्थिक घडी अवलंबून आहे. वातावरणातील बदलामुळे झालेले वादळ आणि गारपीट यामुळे संपूर्ण मोहर नष्ट होतो. अशा घटना घडल्या की, आपणास वर्तमानपत्रात बातम्या वाचावयास मिळतात की, यंदा आंब्याचे पीक 25-50 टक्क्यांनी घटणार आहे. वर्षभर मेहनत घेऊन आंबा आणि काजूच्या बागा लावल्या जातात आणि यातून मिळणाऱ्या उत्पन्नावर कोकणातील शेतकरी अवलंबून असतात. तेव्हा आपण वातावरणातील बदलाची योग्य ती दखल घेतली आहे का हा महत्वाचा प्रश्न आहे.

सभापती महोदय, या चर्चेमध्ये अनेक सन्माननीय सदस्यांनी भाग घेताना सांगितले की, कोकणातील कृषी विद्यापीठ अतिशय सतर्कतेने लक्ष घालून नव्या जाती निर्माण करणे, वातावरणातील बदलामुळे संभाव्य होणारे रोग लक्षात घेऊन त्यावर कोणत्या पद्धतीची उपचार पद्धती केली पाहिजे याबाबत संशोधन करून शेतकऱ्यांना मार्गदर्शन करणे अशा गोष्टी करते. परंतु या गोष्टी बागायतदार आणि शेतकऱ्यांपर्यंत योग्य प्रमाणात पोहोचतात की नाही अशा प्रकारची शंका निर्माण होते. ..3..

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.हेमंत टकले....

सभापती महोदय, या नुकसानीचे मोजमाप कसे करायचे हा एक प्रश्न आहे. सन्माननीय सदस्य श्री.सुनील तटकरे यांनी मागे एकदा प्रश्न विचारला होता की, रेल्वे लाईन्सच्या बाजूला असलेल्या आंबा बागांचे नुकसान झाले तर किती नुकसान भरपाई देण्यात येईल ? त्यावेळी माननीय कृषी मंत्र्यांनी उत्तर दिले होते की, अशाप्रकारे नुकसान झाले तर त्याची भरपाई देण्याची कोणतीही योजना शासनाच्या विचाराधीन नाही.

सभापती महोदय, राज्यातील विविध भागांमध्ये विविध फळबागा आहेत. जसे नाशिकमध्ये द्राक्ष, जळगावमध्ये केळी, कोकणामध्ये आंबा आणि काजूच्या बागा आहेत. अशा पिकांना विम्याची योजना लागू करुन शेतकऱ्यांना आधार देऊ शकतो काय, विम्याचे हप्ते भरल्यानंतर काय होईल ? हे पुन्हा एकदा नव्याने तपासून पाहण्याची गरज निर्माण झाली आहे. कोकण कृषी विद्यापीठाने संशोधन करुन ज्या काही शक्य असतील त्या सर्व उपाययोजना करायला पाहिजेत. आंबा बागायतदारांपैकी काही बागायतदार चांगले शिक्षित आहेत. ते स्वत:ही प्रयोग करीत असतात. तेव्हा कोकण कृषी विद्यापीठाने अशा प्रागतिक आंबा बागायतदारांशी समन्वय साधून आंबा पिकाचे नुकसान होऊ नये याची काळजी घेतली पाहिजते. आंबा पिकाच्या प्रारंभिक अवस्थेपासून ते फळ बाजारामध्ये विक्रीसाठी उपलब्ध होईपर्यंतचे सर्व टप्पे लक्षात घेऊन त्याप्रमाणे त्या त्यावेळेला उपाययोजना केली पाहिजे. आपण वेळेत उपाययोजना केली तर प्रतिबंधात्मक उपचार शक्य होणार आहे.

सभापती महोदय, कोकण तसा दुर्लक्षित भाग आहे. देशाला जे परकीय चलन मिळते त्यामध्ये कोकणातील आंबा पिकाचा मोठा वाटा आहे. परदेशात निर्यात होणारा आंबा निश्चित केलेल्या चाचण्यांवर यशस्वी झाला तर त्याच्या निर्यातीमध्ये कोणतीही अडचण येणार नाही. यामध्ये वाहतूक यंत्रणाही महत्वाची आहे. आंबा परदेशात वेळेवर उपलब्ध होणे हे देखील महत्वाचे आहे. एका टाईम टेबलवर चालणारा हा कार्यक्रम आहे.

सभापती महोदय, आंबा पिकाचे नुकसान झाल्यानंतर शेतकऱ्यांकडून नुकसान भरपाईची मागणी करण्यात येते. शेतकऱ्यांचे झालेले नुकसान आणि त्यांनी आंबा पिकासाठी घेतलेले कष्ट

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.हेमंत टकले...

याचा ताळमेळ आपण कधीच घालू शकणार नाही आणि शासनही तेवढी मदत करु शकणार नाही हे शेतकऱ्यांना देखील समजते. परंतु शासनाकडून मिळणाऱ्या तुटपुंजी मदतीपेक्षा एक भरीव मदत देण्याची निश्चितपणे आवश्यकता निर्माण झालेली आहे. आपण त्यादृष्टीने या विषयाकडे पाहिले तर आपण करीत असलेल्या उपाययोजना कुठेतरी कमी पडत आहेत असे आपल्या लक्षात येईल. त्यामुळे शेतकऱ्यांना न्याय मिळत नाही. शेतकऱ्यांचे नुकसान भरुन येत नाही. द्राक्षाची बाग उभी करावयाची असल्यास त्यासाठी साधारणत: तीन ते चार वर्षे लागतात आणि गारपिटीमुळे किंवा इतर नैसर्गिक आपत्तीमुळे त्या बागेचे संपूर्ण नुकसान झाले तर ती बाग पुन्हा उभी करण्यास तीन ते चार वर्षे लागतात.

सभापती महोदय, शेती आणि उद्योग हे दोन महत्वाचे घटक आहेत. उद्योगाला तातडीने मदत देण्यात येते, परंतु शेतीला सापत्न वागणूक दिली जाते. उद्योगांना मदत केली पाहिजे यामध्ये दुमत नाही. परंतु आपला देश हा कृषी प्रधान आहे. सन्माननीय सदस्य श्री.सुनील तटकरे यांनी त्यांच्या भाषणात उल्लेख केला होता की, फळबागांतून मोठ्या प्रमाणावर उत्पन्न मिळावे म्हणून तत्कालीन मुख्यमंत्री आदरणीय श्री.शरद पवार यांनी रोजगार हमी योजनेद्वारे फळबाग योजना आणली आणि ती योजना कोकणासाठी वरदान ठरली आहे. कोकणामध्ये रेल्वे गेल्यामुळे तेथील वाहतूक व्यवस्था काही प्रमाणात सुधारली आहे.

सभापती महोदय, कोकणातील आंबा उत्पादक शेतकऱ्यांचा मध्यस्थांमार्फत ग्राहकांशी संपर्क येतो आणि त्याबद्दल कोकणातील शेतकऱ्यांकडून वारंवार तक्रारी येत आहेत.

यानंतर श्री.बोर्डे...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.हेमंत टकले....

हे मध्यस्थ कदाचित परप्रांतीय असू शकतात. देशातील आंब्याचा हंगाम आणि त्याची उपलब्धता जानेवारी महिन्यापासून सुरु होते. जून-जुलै महिन्यापर्यंत वेगवेगळ्या ठिकाणचा आंबा बाजारामध्ये येतो. उत्तर प्रदेशातील आंबा तर हंगाम संपण्याच्या वेळी येत असतो. हे खरे आहे की, कोकणचा राजा हा 'हापूस' आंबा आहे. हापूस आंबा हा आंतरराष्ट्रीय पातळीवर मान्यता मिळालेले एक महत्त्वाचे फळ आहे. या दृष्टीने विचार करता हापूस आंबा हे महाराष्ट्राचे वैशिष्ट्य आहे. त्यामुळे या सगळ्या विषयाकडे गांभीर्याने बघितले पाहिजे. आंबा पीक उत्पादकांना नुकसान भरपाई देण्यासंदर्भात केवळ तात्पुरती उपाययोजना न करता, या संदर्भातील कायमस्वरूपी बंदोबस्तासाठी शासनाने काहीतरी धोरणात्मक पावले टाकण्याची गरज आहे. मी या ठिकाणी बोलताना प्रादेशिक वादामध्ये जात नाही. परंतु मला माननीय मंत्र्यांकडून हीच अपेक्षा आहे की, केळी पिकाच्या बाबतीत ते जेवढे संवदेनशील आहेत तेवढ्याच संवेदनशीलतेने त्यांनी कोकणातील काजू आणि आंबा पिकाकडे बघावे. एवढीच या निमित्ताने शासनास विनंती करतो व माझे भाषण संपवितो.

श्री.सुनील तटकरे : सभापती महोदय, अजूनपर्यंत माननीय मंत्री उत्तर देण्यासाठी सभागृहात आलेले नाही.

तालिका सभापती (श्री.रामनाथ मोते) : ठीक आहे. मी सभागृहाची बैठक 5 मिनिटांसाठी स्थगित करीत आहे.

(सभागृहाची बैठक सकाळी 10.41 ते 10.46 वाजेपर्यंत स्थगित झाली.)

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

(स्थगितीनंतर)

(सभापतीस्थानी तालिका सभापती श्री.रामनाथ मोते)

तालिका सभापती (श्री.रामनाथ मोते) : माननीय मंत्र्यांनी उत्तराला सुरुवात करावी.

श्री.एकनाथराव खडसे (मदत व पुनर्वसन मंत्री) : सभापती महोदय, आंबा पिकाच्या नुकसानीसंदर्भात नियम 97 अन्वये उपस्थित करण्यात आलेल्या अल्पकालीन चर्चेला उत्तर देण्यासाठी मी उभा आहे.

महोदय, आंबा आणि काजू पिकाचे उत्पादन, त्यांची निर्यात आणि प्रक्रियेच्या संदर्भात तसेच अलीकडच्या काळात आलेले वादळ, झालेली गारपीट आणि अवकाळी पावसामुळे पिकांचे झालेले नुकसान या संदर्भात ही चर्चा उपस्थित करण्यात आली होती. या चर्चेवर बोलताना सन्माननीय सदस्यांकडून प्रामुख्याने तीन-चार विषयांवर अधिक जोर देण्यात आला. त्यातील पहिली बाब म्हणजे आंबा आणि काजू पिकांचे अवकाळी पावसामुळे जे नुकसान झालेले आहे त्या ठिकाणी वाढीव नुकसान भरपाई द्यावी. मी सभागृहाच्या निदर्शनास आणून देतो की, राज्य सरकार आंबा पीक उत्पादकांना नुकसान भरपाईची रक्कम देत आहे. परंतु काजू पिकांच्या नुकसान भरपाई संदर्भातील पंचनामे अजून आलेले नाहीत. जर काजू पिकांचे नुकसान झाले असेल तर काजू पिकांच्या नुकसानीचे पंचनामे मागवून घेण्यात येतील. आंबा पिकाला जशी नुकसान भरपाई देण्यात येते त्याच धर्तीवर काजू पीक उत्पादकांना सुध्दा नुकसान भरपाई देण्यात येईल. माननीय मुख्यमंत्र्यांनी घोषणा केली होती की, अधिवेशन संपण्यापूर्वी या संदर्भात सुधारित स्वरुपाच्या मदतीचे रूप देता येईल काय, हे बघू. या ठिकाणी केवळ आंबा किंवा काजू पिकाचा विषय नाही. द्राक्ष, केळी, डाळिंब या पिकांच्या नुकसान भरपाईचा देखील विषय आहे. या पिकांना द्यावयाच्या नुकसान भरपाईबाबत केंद्र सरकारने राज्य सरकारला कळविले होते की, या पिकांच्या नुकसान भरपाईची मदत वाढवून देण्यात येईल. परंतु अद्यापपर्यंत त्यांनी मदत वाढवून दिलेली नाही. काल संध्याकाळी फळबागांच्या नुकसान भरपाईपोटी झालेल्या नुकसानीच्या दीड पट रक्कम नुकसान भरपाई म्हणून देण्यात येईल असे केंद्र सरकारने जाहीर केले आहे. त्यामुळे मंत्रिमंडळाच्या बैठकीत या बाबतीत चर्चा करून योग्य तो निर्णय अधिवेशन संपण्यापूर्वी जाहीर करण्यात येईल.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.एकनाथराव खडसे....

महोदय, आंबा प्रक्रियेच्या संदर्भात सांगू इच्छितो की, आंब्यावर प्रक्रिया करणे आणि निर्यातीच्या दृष्टिकोनातून कार्यवाही करणे आवश्यक आहे. आज या संदर्भात ज्या व्यवस्था अस्तित्वात आहेत त्या अत्यंत अपुऱ्या आहेत. मागच्या कालखंडात को-ऑपरेटिव्ह सेक्टरच्या माध्यमातून महामँगो महामंडळ निर्माण केले होते. परंतु ते दुर्दैवाने यशस्वी होऊ शकले नाही. आता अलीकडच्या कालखंडात आंब्याच्या नवीन नवीन जाती आलेल्या आहेत. मागच्या 15-20 वर्षांपूर्वीच्या आंब्याच्या जातींमध्ये आणि आताच्या आंब्याच्या जातींमध्ये फार मोठे अंतर आहे. आंब्याच्या सुधारित जाती परदेशामध्ये अधिक लोकप्रिय असल्याचे चित्र आहे. पूर्वी परदेशामध्ये आंबा निर्यात होत नव्हता. परंतु आता परदेशामध्ये आंब्याची निर्यात करण्यास सुरुवात केली आहे. आंब्याची निर्यात करीत असताना आंब्याच्या गुणवत्तेबाबतचा आग्रह परदेशातील व्यापाऱ्यांकडून सातत्याने होत असतो. आंबा पीक हे निर्यातीच्या निकषामध्ये बसते की नाही या बाबतची तपासणी करण्यासाठी इंडो-इस्त्रायल स्वरूपाचा संशोधन प्रकल्प सुरु करता येईल काय हे तपासण्यासाठी मी स्वत: येत्या 12 एप्रिल रोजी दापोलीला जात आहे. रत्नागिरी येथे आंबा पिकाचे उत्पादन मोठ्या प्रमाणावर होते. आपण नेहमीच विविध प्रकारचे संशोधन हे विद्यापीठामध्ये करतो. परंतु विद्यापीठाच्या बाहेर ज्या ठिकाणी आंबा पीक घेतले जाते अशा ठिकाणी संशोधन प्रक्रिया प्रकल्प असेल, प्रक्रिया उद्योग असेल किंवा अशाच प्रकारे अन्य उद्योगांवर सुध्दा जोर दिला पाहिजे. त्यामुळे सन्माननीय सदस्यांनी या संदर्भात जी सूचना केलेली आहे तिचा निश्चितपणे विचार करण्यात येईल. त्यामुळे दापोली ऐवजी रत्नागिरीला जागा उपलब्ध असेल तर त्या ठिकाणी संशोधन प्रक्रिया प्रकल्प सुरु करता येईल काय याचा अभ्यास करण्यात येईल. राज्य सरकारची या संदर्भात अशी भूमिका आहे की, या फळांना परदेशात निर्यात करण्यास प्रोत्साहन मिळाले पाहिजे.

नंतर श्री.कांबळे....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. एकनाथराव खडसे ....

प्रोत्साहन देताना फक्त आंब्याच्या पल्पपुरते मर्यादित न राहता, आंब्यापासून, काजूपासून उप पदार्थ काढता येतील का हेही पाहिले पाहिजे आणि असे करताना पॅकेज देता येईल का हेही पाहिले पाहिजे. पूर्वी तात्पुरत्या स्वरूपात काजूपासून वाईन तयार करण्याच्या प्रकल्पाला मान्यता दिली होती. विशेष करून कोकणात कोणी काजूपासून बिअर, वाईन तयार करण्याचे उद्योग सुरू करीत असतील तर त्यांना किमान 5 वर्षे एक्साईजमधून सूट देण्याच्या संदर्भात शासन निर्णय घेईल. शासनाला त्या संदर्भात आणखी सूट, सवलती देता येतील. आरकेव्हीवायमधून आंबा, काजू उत्पादकांना काही पैसा देता येऊ शकतो हे तपासावे लागेल. आरकेव्हीवायमधून पैसा मिळत नसेल किंवा कमी मिळत असेल तर नॅशनल हॉर्टिकल्चर मिशनच्या माध्यमातून काही प्रकल्पांना पैसा मिळेल का याबाबत पाहता येईल. सरकार तयार आहे. परंतु स्थानिक नागरिक पुढे आला पाहिजे. तुम्ही तुमच्या कल्पनेतील प्रस्ताव द्यावेत. प्रस्ताव सरकारच्या नियमात बसवावे, सरकारने सांगितले आहे तेच केले पाहिजे असे काही नाही. आंबा, काजू फळांच्या संदर्भात प्रकल्प तयार करायचे असतील, मात्र ते शासनाच्या निकषात, नियमात बसत नसतील तरी अशा प्रकल्पांना पायलट प्रोजेक्ट म्हणून तात्पुरत्या स्वरूपात शासन मान्यता देईल. सदर प्रकल्प योग्य आहेत की नाही याचे निष्कर्ष नंतर तपासून पाहता येतील. परंतु या संदर्भात स्थानिक लोकांनी पुढाकार घेण्याची आवश्यकता आहे.

सभापती महोदय, आंब्यावरील कीड, माशी, डिंक्या रोग असेल तर त्याच्या संदर्भात शासन त्या त्या ठिकाणी मोठ्या प्रमाणात औषधे पुरवित असते. शासन पंचायत समितीच्या माध्यमातून काही औषधे सबसिडीच्या माध्यमातून आजही देत आहे. आंब्यासाठी 22-3 असेल, फॉस्फरस असेल अशी अनेक औषधे पंचायत समितीच्या माध्यमातून सबसिडायज्ड रेटने पुरविण्यात येत आहेत. नव्याने रोग निर्माण झाले आहेत. रोग व्हायरल इन्फेक्शनमुळे आले आहेत. पूर्वी आंब्याचा मोहर एकत्र झाल्यानंतर क्षमता घटली म्हणून कापून फेकावा असे सांगितले जायचे. परंतु अलीकडच्या काळात आंबा फलोत्पादनाच्या आधीच बीज तयार झाल्यानंतरच गळायला लागला. त्यामुळे फलधारणा होत नाही असे नवीन चित्र दिसू लागले आहे. सदर बाबतीत नव्याने संशोधन केले पाहिजे असा आपला प्रयत्न आहे.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. एकनाथराव खडसे ....

सभापती महोदय टिकाऊ स्वरूपाची फळे निर्माण झाली पाहिजेत. महामँगोचा प्रयोग अयशस्वी झाला. दुर्दैवाने त्यावेळी प्रतिसाद मिळाला नाही. आदरणीय श्री. शरद पवार साहेबांनी त्यावेळी पुढाकार घेतला होता. राज्यात फलोत्पादनाच्या संदर्भात पुढाकार घेताना रोजगार हमी योजनेच्या माध्यमातून फळ लागवड आणि नंतर प्रक्रिया उद्योग करण्याच्या संदर्भातील महामँगो सारखे प्रकल्प लिंक केले होते. झाड लावेल त्याला पैसे देण्यात येत होते. रोजगार हमी योजनेत याचा समावेश करीत राज्यात मोठ्या प्रमाणात फळबागांची लागवड होऊ शकली. फळबागा वेगवेगळ्या क्षेत्रापर्यंत गेल्या. प्रक्रिया उद्योगांना चालना मिळाली. दुर्दैवाने अलीकडच्या काळात सरकार म्हणा किंवा नागरिक म्हणा ते उदासीन राहिले. उदासिनता दूर करून प्रक्रिया उद्योग वाढविण्याची गरज आहे. यासाठी शंभर टक्के सहकार्य करण्याची शासनाची तयारी आहे. परंतु आपण पुढाकार घ्यावा. अमुक एखादा प्रकल्प आम्हाला उभारायचा आहे असा प्रस्ताव आमच्यासमोर घेऊन या. प्रस्ताव नियमात नसला तरी पायलट प्रोजेक्ट म्हणून अशा प्रस्तावाला मान्यता देण्यात येईल. शासन स्वतःच्या तिजोरीतून काही खर्च त्यासाठी करण्यास तयार आहे. या संदर्भात केंद्र शासनाची भूमिका सकारात्मक आहे. उद्या किंवा परवा नुकसानीच्या संदर्भात घोषणा करणार आहोत. किती नुकसानभरपाई द्यावी यालाही काही मर्यादा आहेत. सातत्याने नुकसान होत आहे. त्यामुळे मंत्रिमंडळाच्या बैठकीत नुकसानभरपाईचा अंदाज चर्चेला घेण्यात येणार आहे. शासन कोकणातील फळपिकांना न्याय देणार आहे. आता काजूची बिअर, दारू, वाईन याची जगभरात वेगळी चव निर्माण होऊ लागली आहे, त्यास मान्यता मिळू लागली आहे. राज्यात असे प्रकल्प आले तर अधिक प्रयत्न करता येतील. सन्माननीय सदस्यांना आणखी काही माहिती पाहिजे असेल तर विचारावी.

श्री. सुनील तटकरे : सभापती महोदय, सभागृहाचे सन्माननीय नेते आणि कृषी मंत्री यांनी अतिशय समर्पक, सकारात्मक उत्तर दिले आहे त्याबद्दल मी त्यांचे अभिनंदन करतो. 2 बाबी महत्त्वाच्या आहेत. माननीय मंत्री 12 तारखेला कृषी विद्यापीठात जात आहेत. उद्या शक्य असेल तर अर्ध्या तसाचा वेळ देऊन या संदर्भात बैठक घेतली तर बरे होईल. आंबा निर्यात करण्यामध्ये अडचणी निर्माण झाल्या आहेत. वाशीला, लासलगावला प्रयोगशाळा आहे. सदर बाबतीत चर्चा ..3

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. सुनील तटकरे ....

झाली आहे. माननीय मंत्र्यांनी उद्या बैठक घेऊन त्यास आंबा उत्पादक शेतकऱ्यांच्या काही प्रतिनिधींना, मला, सन्माननीय सदस्या ॲड. हुस्नबानू खलिफे, सन्माननीय सदस्य श्री. भाई गिरकर यांना बोलवावे. जेणेकरून सविस्तर चर्चा करून 12 तारखेला निर्णय घेणे शक्य होईल.

सभापती महोदय, हा तत्कालीन गोष्टीसाठी नसून दूरगामी निर्णय आहे. शासन या संदर्भात सकारात्मक भूमिका दाखवित आहे. माननीय मंत्र्यांनी वेळ दिला तर बाजू मांडता येईल. माननीय मंत्र्यांना या संदर्भात 12 तारखेला योग्य निर्णय घेता येईल. यावर्षी अधिक निर्यात झाली तर आनंद आहे. पुढील वर्षापासून निर्यातीवर मोठ्या प्रमाणात भर देता येईल, या दृष्टीने विचार करता येईल.

सभापती महोदय, कोकण कृषी विद्यापीठाने इस्त्रायलच्या तंत्रज्ञांची मदत घेऊन 5 वर्षांपूर्वी काढणी पश्चात तंत्रज्ञानाच्या संदर्भात पोस्ट हार्वेस्टिंग कॉलेज स्थापन केले. ते 3 वर्षांपासून सुरू आहे. आता तेथून पदवी-पदविका घेऊन मुले बाहेर पडत आहेत. एका वेळी 30 मुलांची बॅच आहे. मुलांना वर्षाला 12 लाख रुपयांचे पॅकेज मिळत आहे. देशभरातील हे पहिले कॉलेज आहे. पोस्ट हार्वेस्टिंग अत्यंत आवश्यक आहे. देशात 60 हजार कोटी रुपयांचे अन्नधान्य वाया जाते. आपण काढणी पश्चात तंत्रज्ञानाच्या संदर्भात इस्त्रायलच्या जवळपासही पोहचलेलो नाही. देशातील पहिले कॉलेज बाळासाहेब सांवत कृषी विद्यापीठाच्या मार्फत रायगड जिल्ह्यातील रोहा येथे ते सुरू केले आहे. ते कॉलेज सक्षम करण्याची गरज आहे. शासनाने इमारतीच्या संदर्भात तरतुदी केल्या होत्या. गेल्या वर्षी नियतव्यय मिळविण्याचा माझ्याकडून प्रयत्न झाला. आपण तेथे जेव्हा जाल तेव्हा आढावा घ्यालच. आपण तत्संदर्भात तरतूद उपलब्ध करून द्यावी. आपण या संदर्भात उद्या बैठक घ्यावी. त्यातून 22 तारखेला एक चांगला निर्णय होईल. कोकणासाठी दूरगामी पध्दतीचा निर्णय लागू होईल.

सभापती महोदय, काजू, आंबा यांसाठी केंद्र सरकारच्या विविध योजना आहेत असा उल्लेख केला. आदरणीय श्री. शरद पवार साहेब देशाचे कृषी मंत्री असताना व राज्याचे मुख्यमंत्री असताना त्यांनी सर्व योजना राज्यात राबविण्याचा प्रयत्न केला. अलीकडच्या काळात शेतकऱ्यांचा प्रतिसाद मिळणेही गरजेचे आहे. आपले म्हणणे बरोबर आहे. आपणाला यासाठी समाजपरिवर्तन करण्याची गरज आहे, विचारधारा मजबूत करणे आवश्यक आहे. ..4

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. सुनील तटकरे ....

सभापती महोदय, ग्लोबल वॉर्मिंगमुळे शेतकरी अनेकदा संकटात येतात. शेतकरी कष्ट करतो पण नेमके पीक हातात घेण्याच्या वेळी अवकाळी पाऊस, गारपीट, वादळी वारा, फयाण यामुळे उद्ध्वस्त होतो. शासनाने त्या दृष्टीने सकारात्मक पाऊल टाकले आहे. माननीय मंत्र्यांनी सांगितले की, निकषात न बसणारे प्रस्ताव असले तरी पायलट प्रोजेक्ट म्हणून स्वीकारण्यात येतील. आपण एखादा प्रकल्प पायलट प्रोजेक्ट म्हणून यशस्वी केला तर त्याची व्याप्ती मोठी होऊ शकते. कोकणात आतापर्यंत कधीही सहकार रूजला नाही, त्या संदर्भात काहीही फारसे झाले नाही. कदाचित आमच्या सर्वांचा त्यामध्ये दोष असेल. पायलट प्रोजेक्ट यशस्वी केला तर कदाचित स्थानिक खाजगी उद्योजक, शेतकरी निश्चितपणे पुढाकार घेतील असे मला वाटते. मी 2 सूचना केल्या आहे, आपल्याकडून त्याबाबतीत उत्तर मिळावे. उद्या थोडा वेळा बैठक घेण्यात यावी, जेणेककरून या संदर्भात 12 तारखेला निर्णय घेऊ शकाल. सभापती महोदय, शासनाकडून पोस्ट हार्वेस्टिंग कॉलेजसाठी भरीव तरतूद करून घरच्या विद्यार्थ्यांना, शेतकऱ्यांना भविष्यात न्याय मिळण्याच्या दृष्टीने प्रयत्न व्हावे अशी अपेक्षा मी व्यक्त करतो.

ॲड. हुस्नबानू खलिफे : सभापती महोदय, माननीय मंत्र्यांच्या उत्तरातून मागील वर्षी स्थापन झालेल्या आंबा-काजू बोर्डबद्दल शासनाची भूमिका काय आहे हे स्पष्ट झालेले नाही.

श्री. भाई गिरकर : सभापती महोदय, देवगड हापूस हा श्रेष्ठ हापूस आहे. मी काल मांडले होते की, कातळ-कपारीमध्ये समुद्राच्या खाडीच्या बाजूला असल्यामुळे त्यामध्ये क्षार एकत्र येतात. कोकणात अनेक इतर आंबे आहेत. परंतु देवगडचा आंबा हा देवगडचाच आहे. दापोलीला जाण्यास 9 ते 10 तास लागतात.

(नंतर श्री. रोझेकर ....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.भाई गिरकर.....

तत्कालीन सरकारने गिर्ये येथे आंबा संशोधन उपकेंद्र सुरु करण्याचे घोषित केले होते, त्यासाठी हजारो एकर जमीन घेण्यात आली होती. परंतु, त्यानंतर त्याकडे पूर्णपणे दुर्लक्ष झाले. देवगड आणि त्या परिसरात आंब्यावर प्रक्रिया करण्याबाबत आणि अन्य संशोधन होणे अत्यंत गरजेचे आहे. या संदर्भात तातडीने निर्णय शासनाने करावा, अशी माझी विनंती आहे.

सभापती महोदय, देवगडचा आंबा केवळ दोन महिने टिकतो. ते नाशिवंत फळ आहे. त्यामुळे देवगड आणि त्या परिसरात कोल्ड स्टोअरेजची निर्मिती झाली तर त्याचा त्या भागातील आंबा उत्पादकांना चांगला फायदा मिळणार आहे. याही सूचनेचा शासनाने विचार करावा.

सभापती महोदय, कोल्हापूर, सांगली, सातारा, कराड येथून येणारी मळी विजयदुर्ग बंदरातून निर्यात केली जाते. रोज मळीचे 200 टँकर त्या बंदरात येतात, छोट्या बोटीत मळी ठेवली जाते आणि नंतर निर्यातीसाठी मोठ्या बोटींमध्ये पाठविली जाते. मळी बरोबरच आंब्याची निर्यातही विजयदुर्ग, देवगड बंदरातून झाली तर आंबा उत्पादकांना त्यांचा आंबा निर्यातीसाठी मुंबईला पाठविण्याची गरज भासणार नाही.

सभापती महोदय, उपरोक्त सर्व मुद्यांबाबत मंत्री महोदय सकारात्मक निर्णय घेणार आहेत का ?

श्री.एकनाथराव खडसे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी अतिशय चांगल्या सूचना केल्या आहेत.

सभापती महोदय, मघाशी सन्माननीय सदस्य श्री.भाई गिरकर यांनी आपल्या भाषणात व्हेपर हिट ट्रिटमेंट प्लँट रत्नागिरी आणि जामसंडे येथे सुरु करावा, अशा प्रकारचा एक विषय उपस्थित केला होता. मी या माध्यमातून सांगू इच्छितो की, जालना वगैरे ठिकाणी हे प्लँट बसविण्यात आले आहेत. त्याच धर्तीवर गोरेगाव येथे देखील प्लँटचे काम प्रगतीपथावर आहे. हापूस आंब्याकरिता 48 सेल्सिअस व 60 मिनिटांच्या हॉट वॉटर ट्रिटमेंटची शिफारस केली गेली आहे. तथापि, यामुळे आंब्याची गुणवत्ता खराब होत असल्याबाबतचा मुद्दा काही निर्यातदारांनी उपस्थित केला आहे. याबाबत अभ्यास करुन तत्काळ अहवाल सादर करण्याच्या सूचना कोकण कृषी विद्यापीठाला देण्यात आल्या आहेत.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.एकनाथराव खडसे.....

सभापती महोदय, राष्ट्रीय फलोत्पादन अभियानांतर्गत आंबा व काजू पिकांवर मूल्यवर्धिताव्दारे प्रक्रिया करण्यासाठी अर्थसहाय्य देण्याची योजना आहे. तसेच केंद्रीय अन्न मंत्रालयातर्फे प्रक्रिया उद्योगाकरिता अर्थसहाय्य दिले जाते. युरोपियन देशांना आंबा निर्यात करण्याकरिता दिनांक 1/1/2015 पासून राज्यात 'मँगोनेट' या ऑनलाईन कार्यपध्दतीची अंमलबजावणी करण्यात येत आहे. त्या भागातील 3777 आंबा बागायतदारांनी आणि कोकण विभागातील 3493 आंबा बागायतदारांनी यासाठी नोंदणी केलेली आहे. निर्यातीसाठी ते उत्सुक आहेत.

सभापती महोदय, आंब्याच्या संदर्भात अधिक संशोधन करणे, पोस्ट हार्वेस्टिंग संदर्भातील व्यवस्था करणे, यासाठी 'सेंटर ऑफ एक्सलन्स सेंटर' स्थापन करण्यास केंद्र सरकारने या वर्षी मान्यता दिली असून 3 कोटी रुपये एवढा निधी प्राथमिक स्वरुपात उपलब्ध करुन दिलेला आहे.

सभापती महोदय, माननीय केंद्रीय कृषी मंत्री श्री.राधामोहन सिंग यांच्या उपस्थितीत कोकणात आंबा आणि काजू उत्पादक शेतकऱ्यांचा मेळावा आयोजित करण्याचा शासनाचा मानस आहे. शेतकऱ्यांचे विविध प्रश्न, साठवण प्रक्रिया, केंद्र शासनाकडून अपेक्षित असलेली मदत या संदर्भात केंद्रीय कृषी मंत्री महोदयांच्या उपस्थितीत एक चर्चासत्र घेण्याचे आम्ही ठरविले आहे. केंद्रीय मंत्री महोदयांनीही यास मान्यता दिली आहे. याप्रमाणे आंबा आणि काजू उत्पादक शेतकऱ्यांचा मेळावा आगामी काळात आम्ही कोकणात घेऊ.

सभापती महोदय, आंबा आणि काजू बोर्डाच्या संदर्भात सन्माननीय सदस्यांनी प्रश्न उपस्थित केला आहे. हे बोर्ड स्थापन करण्याची सद्य:स्थिती काय आहे, ते यशस्वी का झाले नाही, त्यामध्ये कोणत्या त्रुटी आहेत, त्या त्रुटी कशा दूर करता येतील, या संदर्भातील विचार करुन आवश्यक असेल तर या बोर्डाचे पुनरुज्जीवन आपल्याला करता येईल.

सभापती महोदय, आंबा फळासाठी कुलिंग, चिलिंग या संदर्भातील व्यवस्था झाली पाहिजे, या मताचा मीही आहे.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.एकनाथराव खडसे.....

सभापती महोदय, विजयदुर्ग, देवगड येथून आंबा निर्यातीची व्यवस्था करता येईल किंवा कसे, हे तपासले जाईल.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी केलेल्या सूचनांचा नक्की विचार केला जाईल आणि आवश्यक असेल त्या बाबतीत लवकरात लवकर निर्णय घेता येईल.

श्री.सुनील तटकरे : सभापती महोदय, पोस्ट हार्वेस्टिंग विद्यालय अधिक सक्षम करण्यासाठी अधिक तरतुदीची आवश्यकता आहे, असा एक मुद्दा मी उपस्थित केला होता.

सभापती महोदय, उद्या मंत्री महोदयांनी आम्हाला बैठकीची वेळ द्यावी. जेणेकरुन 12 तारखेला कृषी विद्यापीठाला भेट देत असताना ते जे निर्णय घेणार आहेत त्यासाठी ही बैठक त्यांना उपयुक्त ठरेल. याबाबतीत मंत्री महोदयांनी खुलासा केला तर बरे होईल.

श्री.एकनाथराव खडसे : सभापती महोदय, पोस्ट हार्वेस्टिंग अभ्यासक्रम सुरु केल्याची माहिती मला नव्हती. परंतु, मी 12 तारखेला विद्यापीठाला भेट देणार आहे. त्यावेळी या सर्व विषयांचा आढावा घेणार आहे. अन्य विद्यापीठांनीही अशा प्रकारचा अभ्यासक्रम त्यांच्या विद्यापीठात सुरु करावा, अशा प्रकारच्या सूचना त्यांना दिल्या जातील.

तालिका सभापती : अल्पकालीन चर्चा आता संपली आहे.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

पृ.शी.: डॉ.विजय केळकर समितीचा अहवाल

मु.शी.: डॉ.विजय केळकर समितीचा अहवालासंबंधी सभापतींचा प्रस्ताव

(प्रस्ताव पुन्हा प्रस्तुत झाला.)

तालिका सभापती : अल्पकालीन चर्चेसाठी आपण सकाळी 10.00 ते 11.15 वाजेपर्यंतची वेळ निश्चित केली होती. त्यापूर्वीच ही चर्चा संपली असून आपल्याकडे अद्याप 10 मिनिटांचा अवधी आहे. सभागृहाची अनुमती असेल तर या उपलब्ध वेळेत आपण केळकर समितीच्या अहवालावरील चर्चा पुढे सुरु करू

आता सन्माननीय सदस्य ॲड.जयदेव गायकवाड यांनी आपले भाषण सुरु करावे.

ॲड.जयदेव गायकवाड (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, डॉ.विजय केळकर समितीच्या अहवालासंदर्भात आपण मांडलेल्या ठरावावर माझे विचार व्यक्त करण्यासाठी मी उभा आहे.

सभापती महोदय, खरे म्हणजे, माझ्या मनात एक उत्सुकता आहे. महाराष्ट्रामध्ये जनतेच्या विविध प्रश्नांसंबंधी अभ्यास करण्यासाठी आणि त्यावरील उत्तरे शोधण्यासाठी राज्य सरकारकडून वेगवेगळ्या समित्या स्थापन केल्या जातात. देशातील त्या त्या विषयातील तज्ज्ञ व्यक्तिंची निवड या समित्यांचे अध्यक्ष किंवा समिती सदस्य म्हणून केली जात असते. या व्यक्तिनी त्या त्या विषयात प्रचंड अभ्यास केलेला असतो, त्या क्षेत्राचा त्यांना प्रचंड अनुभव असतो आणि या अभ्यास आणि अनुभवाच्या बळावर ते त्या समितीला दिलेल्या विषयाच्या संदर्भात पुन्हा अभ्यास करून आपले अहवाल सरकारला सादर करीत असतात. या समित्यांसाठी शासन प्रचंड पैसा खर्च करीत असते आणि त्यांना आवश्यक सोयी-सुविधाही उपलब्ध करून देत असते. यापूर्वी अनुशेषा संदर्भात दांडेकर समिती, शेतकऱ्यांच्या प्रश्नासंबंधी स्वामीनाथन समिती, शेतकऱ्यांच्या आत्महत्यांच्या संदर्भात प्रा.नरेंद्र जाधव समिती, भुजंगराव कुलकर्णी समिती आणि आता समतोल विकासाच्या संदर्भात डॉ.विजय केळकर समिती, अशा प्रकारे विविध समित्या शासनाने गठीत केल्या आहेत. परंतु, या सर्व समित्यांनी संशोधन आणि अभ्यासाअंती सादर केलेल्या अहवालावर आणि सुचविलेल्या उपाययोजनांवर शासन पातळीवर नेमकी कोणती कार्यवाही झाली, असा प्रश्न आपल्याला पडतो.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ॲड.जयदेव गायकवाड.....

सभापती महोदय, आपल्याला कल्पना आहे की, काही समित्यांचे अहवाल कोल्ड स्टोअरेजमध्ये पाठविले जातात. परंतु, या अहवालांवर चर्चा मात्र झालेली आहे. अशाच प्रकारची चर्चा आज आपण केळकर समितीच्या अहवालावर करीत आहोत की काय, अशी शंका माझ्या मनात निर्माण झाली आहे.

सभापती महोदय, डॉ.विजय केळकर समितीच्या अहवालासंदर्भात दोन प्रकारच्या चर्चा आहेत. काल अनेक सन्माननीय सदस्यांनी असे सांगितले की, या समितीने प्रचंड काम केले आहे, ते त्या विषयातील तज्ज्ञ आहेत, त्यांनी अभ्यासपूर्ण अशा प्रकारचा अहवाल सरकारला सादर केला आहे. हा अहवाल सरकारने स्वीकारायचा की नाही, यासाठी आज आपण ही चर्चा करीत आहोत.

सभापती महोदय, कोणताही अहवाल हा परिपूर्ण नसतो आणि सर्वच प्रश्नांची 100 टक्के उत्तरे आपल्याला या अहवालांमधून मिळतील, अशीही अपेक्षा आपण ठेवणे योग्य नसते. ही तज्ज्ञ मंडळी या समित्यांच्या माध्यमातून प्रचंड अशा प्रकारचे काम करीत असतात, अभ्यास करीत असतात आणि अभ्यासपूर्ण अहवाल आपल्याला सादर करीत असतात. त्यामुळे या अहवालातील ज्या चांगल्या गोष्टी आहेत, महाराष्ट्राच्या प्रश्नाला तोंड देण्याच्या दृष्टीने, न्याय देण्याच्या दृष्टीने ज्या उपयोगी शिफारशी आहेत, त्या सरकारने स्वीकारल्या पाहिजेत, काही अंशत: स्वीकारल्या पाहिजेत. ज्या मौलिक सूचनांचा राज्याचे प्रश्न सोडविण्यासाठी उपयोग होणार आहे, अशा सूचनांचाही शासनाने विचार केला पाहिजे, त्या स्वीकारल्या पाहिजेत, असे मत मी या ठिकाणी नोंदवीत आहे.

सभापती महोदय, या समितीच्या विचारार्थ असलेले विषय हे शेतकऱ्यांच्या जीवनाशी निगडित आहेत.

यानंतर श्री.वि.खर्चे.....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ॲड.जयदेव गायकवाड...

विदर्भ व मराठवाड्यातील लोकांच्या जीवनाशी निगडीत जे प्रश्न आहेत, त्यामध्ये शेतीच्या सिंचनासाठी पाण्याच्या अनुशेषाचा प्रश्न आहे. हे दोन्ही विभाग आता मागे पडले आहेत. या विभागांना शासनाने कशा प्रकारे न्याय द्यावा. हा अनुशेष कशा प्रकारे भरुन काढावा व या विभागाचा विकास कसा करावा याचा मूलभूत विचार करण्याचे काम या समितीने केले आहे. आता आपण या विभागातील शेतकऱ्यांच्या मागासलेपणाचा विचार करीत आहोत. विदर्भ व मराठवाडा हे प्रदेश भौतिकदृष्ट्या सिंचनाबाबत मागे पडले आहेत. या मागासलेपणाची चर्चा करुन ते कसा दूर करता येईल याचा विचार करण्याची गरज निर्माण झाली आहे. मी मागासलेल्या समूहाचा कार्यकर्ता आहे. आंबेडकरी विचाराचा मी कार्यकर्ता आहे. त्यामुळे माझे असे मत आहे की, नैसर्गिकदृष्टया निर्माण झालेले भौतिक मागासलेपण असेल, निसर्गाच्या कोपामुळे निर्माण झालेले मागासलेपण असेल. केवळ शेतकऱ्यांच्या जीवनाशी निगडित हे मागासलेपण नसून या मागासलेपणामुळे या विभागातील तथाकथित सामाजिकदृष्ट्या येथील लोकांवर अतिशय अनिष्ट परिणाम पहावयास मिळत आहेत. विदर्भ व मराठवाड्याचे मागासलेपण सिंचनामुळे असेल, कारण त्या भागात आवश्यक तेवढा पाऊस पडत नाही, त्यामुळे शेतात पीक येत नाही, त्यामुळे तेथील शेतकरी हतबल होतो, कर्जबाजारी होतो व तो आत्महत्या करतो. हे मागासलेपण या टोकाला जाते की, त्या माणसाला जगण्याची उर्मी व इच्छा राहत नाही. म्हणून या भागातील मागासलेपण दूर झाले पाहिजे. शेतकरी आत्महत्या करीत असल्यामुळे इतर समुहांवर त्याचा काय परिणाम होतो याचा गंभीरपणे विचार करण्याची गरज आहे.

सभापती महोदय, याबाबत केळकर समितीने अत्यंत चांगल्या प्रकारे विचार केला आहे. मराठवाडा व विदर्भात पाण्याचे दुर्भिक्ष आहे. ते दुर्भिक्ष व तेथील मागासलेपण कमी करण्यासाठी काही सूचना करण्यात आल्या आहेत. त्याचा विचार करीत असताना जो अनुशेष निर्माण झाला त्याबाबत गणित करुन निधीचा अनुशेष आपल्या समोर मांडला आहे. या ठिकाणी निधीचा फार मोठा अनुशेष आहे. हा अनुशेष अतिशय कमी कालखंडात दूर करता येणार नाही. हा अनुशेष दूर करण्यासाठी निधीची टक्केवारी ठरवून दिली आहे. या विभागाला जास्त निधी कसा देता येईल याबाबत त्यांनी अहवालात काही सूचना केल्या आहेत. या भागात जास्त निधी देऊन तेथील प्रकल्प

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

पूर्ण करुन शेतकऱ्यांना पाणी उपलब्ध करुन दिले तर शेतकरी शेतीचा विकास करतील असे त्यांना अपेक्षित आहे. त्यामुळे याबाबत ज्या सूचना केल्या आहेत त्या शासनाने स्वीकारल्या पाहिजेत. मागासलेल्या भागांना व उर्वरित भागांना किती निधी दिला पाहिजे याबाबत त्यांनी रेश्यो तयार केला आहे. यासंदर्भात प्रचंड अनुभवी व तज्ज्ञ लोक आपणाकडे आहेत. त्यांच्या मताचा विचार करुन या समितीने निधीच्या संदर्भात 70:30 चा रेश्यो दिला आहे. हा रेश्यो लक्षात घेऊन मागासलेल्या विभागांच्या विकासासाठी हा निधी देता येईल किंवा नाही, हर निधी द्यावयाचा असेल तर त्याचा निर्णय ताबडतोब घेतला पाहिजे. हे सर्व प्रकरण शासन किती दिवस भिजत ठेवणार आहे. याबाबत शासनाने विचार करण्याची गरज निर्माण झाली आहे.

सभापती महोदय, डॉ.विजय केळकर समितीने अहवाल दिला आहे तो फक्त शेतकऱ्यांचे मागासलेपण दूर करण्यासाठी नसून त्या भागातील सर्वसामान्य जनतेच्या जीवनाशी निगडित असलेल्या प्रश्नांची सोडवणूक करण्याचा त्यांनी विचार केला आहे. विदर्भ व मराठवाड्यात अनुशेष आहे, तो लवकरात लवकर कसा दूर करता येईल व त्यांना इतरांबरोबर कसे आणता येईल याचा विचार होणे आवश्यक आहे.

सभापती महोदय, भारतीय राज्यघटनेत सर्वात मूलभूत विचार समानतेचा व सामाजिक न्यायाचा करण्यात आला आहे. डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी मानवाला केंद्रबिंदू ठेवून विचार केला आहे. तळागाळातील अस्पृश्य लोक इतरांपेक्षा सामाजिक, आर्थिक व राजकीयदृष्ट्या मागे पडले होते, त्यांना न्याय देण्यासाठी राज्यघटनेने राखीव जागा ठेवल्या आहेत. यामागे हेतू असा होता की, जो समाज मागे पडला त्यांना पुढे आणले पाहिजे. त्यांना आपल्या बरोबरीने जीवनात उभे केले पाहिजे. संरक्षित न्यायाच्या तत्वानुसार भेदभावाचे तत्व नको असे केळकर समितीच्या अहवालात अंतर्भूत आहे. विदर्भ व मराठवाडा सिंचनात मागे पडला आहे, त्यांना जास्त निधी देऊन पुढे आणले पाहिजे, अशा प्रकारची भूमिका भारतीय राज्यघटनेत असलेल्या मूलभूत तत्वानुसार घेण्यात आली आहे. सामाजिक न्यायाच्या तत्वाला ती अनुसरुन आहे. शेतकरी आत्महत्या करण्यास का प्रवृत्त होतो, त्याचे कारण त्याच्या शेतीत माल पिकत नाही. या विषयाच्या अनुषंगाने सभागृहात अनेक वेळा चर्चा केली आहे. शेतकऱ्यांना खऱ्या अर्थाने उभे करण्यासाठी या विभागांचा अनुशेष दूर

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ॲड.जयदेव गायकवाड...

करण्याचा प्रयत्न शासनाने करावा. वेळोवेळी याबाबत चर्चा केलेली आहे, याबाबत अनेक समित्या नियुक्त करण्यात आल्या होत्या, त्यांचे अहवाल आले आहेत. या अहवालात ज्या सकारात्मक बाबी आहेत, त्यांची तपासणी करुन त्यानुसार सरकारने कार्यवाही केली पाहिजे. माझी अशी सूचना आहे की, डॉ.विजय केळकर समितीने सिंचनाच्या संदर्भात जो अनुशेष काढला, ज्या योजना कार्यान्वित झाल्या नाहीत, त्यांची अंमलबजावणी ताबडतोब करुन त्या पूर्ण करण्याच्या दृष्टीने निधीची उपलब्धता करुन देणे आवश्यक आहे इतके बोलून मी माझे भाषण संपवितो.

...4...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

प्रा.अनिल सोले (नागपूर विभाग पदवीधर) : सभापती महोदय, आपण मला बोलण्याची संधी दिल्याबद्दल मी आपणाला धन्यवाद देतो. महाराष्ट्राच्या समतोल प्रादेशिक विकासाच्या प्रश्नांवर स्थापित उच्चस्तरीय समितीच्या अहवालावर आज सभागृहात चर्चा करण्यात येत आहे, त्यावर माझे विचार व्यक्त करण्यासाठी मी उभा आहे.

सभापती महोदय, विदर्भाचा विचार करीत असताना आपल्या असे लक्षात येते की, संयुक्त महाराष्ट्राच्या स्थापनेपासून विदर्भातील जनतेच्या मनात सतत अशी भावना होती आहे की, या राज्यात आमच्याकडे दुर्लक्ष तर होणार नाही ना, किंवा आमच्यावर अन्याय तर होणार नाही ना ? ही भावना मागील 60 वर्षाच्या कालखंडात मजबूत होत गेली आहे. असे या समितीच्या अहवालावरुन दिसून येते. 1 मे 1960 रोजी महाराष्ट्र राज्याची स्थापना झाली. महाराष्ट्राचे तत्कालीन नेते स्व.यशवंतराव चव्हाण यांनी विदर्भातील जनतेला व मुंबईच्या जनतेला आश्वासित केले होते. विदर्भातील जनतेला आश्वासन देताना ते असे म्हणाले होते की, विदर्भातील जनतेची पूर्ण काळजी घेतली जाईल व अधिकचा हिस्सा आपणाला दिला जाईल. परंतु 1967 मध्ये विदर्भातील जनतेत अशा पध्दतीची भावना दृढमूल व्हावयास लागली व 1960 नंतर छोट्या मोठ्या समित्या स्थापन करण्यात आल्या होत्या. याचा उद्रेक झाल्यामुळे वेगळ्या विदर्भाची मागणी समोर येऊ लागली आहे. त्यानंतर कै.वसंतदादा पाटील यांनी 1983 मध्ये दांडेकर समितीची स्थापना केली. या समितीला प्रादेशिक असमतोल सत्यशोधन समिती असे नाव देण्यात आले होते. या अहवालानुसार 9 महत्वाच्या क्षेत्रात 3186 कोटी रुपयांचा अनुशेष त्यांना आढळून आला होता. तो अनुशेष पूर्ण करण्यासाठी राज्याच्या विकास निधीतील 85 टक्के निधी खर्च करावा अशी शिफारस त्यांनी केली होती. या शिफारशीकडे गांभीर्याने लक्ष दिले गेले नाही. याचा परिणाम असा झाला की, कलम 371(2) नुसार प्रादेशिक विकास मंडळ स्थापन करण्याचा ठराव 26 जुलै 1984 मध्ये मांडण्यात आला व तो मंजूर झाला. त्या ठरावाच्या अंमलबजावणीकडे दुर्लक्ष झाले. त्या ठरावाच्या अंमलबजावणीसाठी दहा वर्षे लागली आहेत. दहा वर्षानंतर 1994 मध्ये वैधानिक विकास मंडळांची स्थापना करण्यात आली.

या नंतर श्री.बोरले..

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

प्रा.अनिल सोले.....

त्यांना निधीची उपलब्धता मिळण्याकरिता पुन्हा 20 वर्षे लागले. सन 2004 नंतर या निधीची उपलब्धता देखील निर्माण झाली. या सर्व समित्यांकडे पाहण्याचा जो दृष्टीकोन आहे त्यावरुन आपल्या असे लक्षात येते की, प्रत्येक 10-20 वर्षाच्या कालांतराने वेगळ्या विदर्भाची भावना आणि विदर्भावर होत असलेल्या अन्यायाची भावना वाढू नये आणि आम्ही तुमच्याकरिता काही तरी करीत आहोत अशा प्रकारची भावना निर्माण करण्याकरिता विविध समित्या स्थापन केल्या जातात. सन 1999-2000 मध्ये देखील श्री.भुजंगराव कुलकर्णी यांच्या नेतृत्वाखाली समिती स्थापन करण्यात आली होती. त्यानंतर सन 2005 मध्ये पुन्हा एक समिती स्थापन करण्यात आली होती. वेगवेळ्या कारणांनी अशा विविध समित्यांची स्थापना केली गेली आणि या दृष्टीकोनातून प्रयत्न करण्यात आले.

सभापती महोदय, केळकर समितीच्या अहवालाचे वाचन केल्यानंतर माझ्या असे लक्षात आले की, केळकर समितीच्या अहवालाची काही एक मात्र गरज नव्हती. त्यांनी ज्या सूचना व शिफारशी केलेल्या आहेत त्या सूचना व शिफारशीसाठी जरी हितसंबंधियांची बैठक घेतली असती तरी त्यांनी त्या केल्या असत्या. केळकर समितीने यातून अनेक गोष्टी निर्माण करण्याचा प्रयत्न केलेला आहे आणि यातून नवीन वादाला जन्म दिलेला आहे. तो म्हणजे, त्यांनी असे निर्माण केलेले आहे की, एकक, घटक, युनिट तालुका असले पाहिजे का जिल्हा असले पाहिजे, जिल्हा असला पाहिजे की रिजन असले पाहिजे, हा अव्यापाराशी व्यापार करण्याची काही एक आवश्यकता नव्हती, असे माझे मत आहे. म्हणजे त्यांच्या डोक्यात ही भावना आहे की, तालुका हा घटक असला पाहिजे.

सभापती महोदय, केळकर समितीच्या अहवालातील मुद्दा क्र.2.2.1- मापदंड यामध्ये असे नमूद केलेले आहे की, "मराठवाडा प्रदेशातील बऱ्याचशा हितसंबंधितांना, प्रादेशिक अर्थव्यवस्थेच्या विविध क्षेत्रातील विकासाची तूट (सर्वसाधारणपणे अनुशेष म्हणून निर्देशित) निश्चित करण्यासाठी प्रदेश हे त्यासाठीच्या मापदंडाचे युनिट म्हणून पसंती दिली आहे." हे मराठवाड्याच्या बाबतीत आहे. पुढे असे नमूद केलेले आहे की, "पुन्हा स्मरण करुन देता येईल की, विदर्भातील

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

प्रा.अनिल सोले.....

हितसंबंधितांनी, यासाठी जिल्हा या युनिटास पसंती दिली आहे आणि पुढील भागात नमूद केल्याप्रमाणे उर्वरित महाराष्ट्रासाठी तालुका हे युनिट मापदंडासाठी लावण्यात येत आहे." म्हणजे, जरी यांनी युनिट जिल्हा ठरविलेले असले तरी केळकर समितीच्या मनात सतत ही गोष्ट राहिलेली आहे की, तालुका हे युनिट असले पाहिजे.

तसेच, अहवालातील मुद्दा क्र.4.4.1 मध्ये असे नमूद केलेले आहे की, "समितीचे विचारार्थ विषय हे स्पष्टपणे संपूर्ण राज्य म्हणून विकासाचा स्तर लक्षात घेऊन प्रत्येक जिल्ह्याचा आणि शक्य असेल तेथे प्रत्येक तालुक्याचा विविध क्षेत्रांमधील, सापेक्ष, अनुशेषाच्या संदर्भात आहेत." म्हणजे तालुका युनिट हे त्यांच्या डोक्यात आहे. पुढे असे नमूद केलेले आहे की, "आमच्या पैकी काही जण, क्षेत्रीय विकासाच्या तुलनेकरिता तालुका हा घटक मानावा यासाठी प्रथमतः उत्साही होते. इतर काही जणांना फक्त तीन विभागांपुरतेच विश्लेषण व तुलना हवी होती. काही प्रदेशातील तालुके हे तुलनात्मक दृष्टया आकाराने मोठे आहेत. नवीन तालुके हे स्वतंत्रपणे फक्त महसूल विभागाकरिता कार्यरत आहेत." त्यानंतर पुढे असेही म्हटले आहे की, "केवळ विभागीय पातळीवर तुलना करुन अंदाजित केलेल्या अनुशेषापेक्षा जिल्ह्यांमध्ये तुलना करुन अंदाजित केलेल्या अनुशेषाच्या प्रमाणात 50 टक्के ते 60 टक्के वाढ आढळून आली. असे असूनही केवळ मागास विभागातच मागास जिल्ह्यांचा ठावठिकाणा लागणे आवश्यक नाही तर तो विकसित विभागातही लागला पाहिजे. त्याच प्रकारे वस्तुतः मागास तालुक्यांचा ठावठिकाणा फक्त मागास जिल्ह्यांमध्येच नव्हे तर विकसित जिल्ह्यांमध्येही लागला पाहिजे." याचा अर्थ केळकर समितीच्या डोक्यामध्ये सतत ही गोष्ट आहे की, तालुका स्तरावर तालुका घटक बनवून हे झाले पाहिजे. ज्याला मराठवाडा आणि विदर्भातील जनतेचा पूर्णपणे विरोध आहे. यातून केळकर समिती संपूर्ण महाराष्ट्रात एक नवीन वाद निर्माण करु इच्छिते की, प्रत्येक जिल्ह्यामध्ये त्यातील एक भाग असा निवडला जाणार आहे की, जो स्वतःला समजणार आहे की, या जिल्ह्यामध्ये देखील आमच्यावर अन्याय झालेला आहे आणि आम्हाला सतत मागास ठेवण्याचा प्रयत्न या जिल्ह्यांमध्ये देखील होत आहे. मला असे

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

प्रा.अनिल सोले.....

म्हणावयाचे आहे की, आपल्या कार्यकक्षेच्या बाहेर जाऊन विशेषत: या समितीचे नाव काय आहे ? "महाराष्ट्राच्या समतोल प्रादेशिक विकासाच्या प्रश्नांवरील उच्चस्तरीय समिती" असे या समितीचे नाव आहे. म्हणजे विभागांच्या प्रश्नांच्या संदर्भात नियुक्त करण्यात आलेली ही उच्चस्तरीय समिती आहे. यामध्ये जिल्ह्याजिल्ह्यांमध्ये जाऊन त्या जिल्ह्यातील तालुकातालुक्यांना हे सांगणे की, तुम्ही या जिल्ह्यात मागास आहात, तुमच्यावर या जिल्ह्यात अन्याय होत आहे. त्यासाठी दुसरा स्कोप होऊ शकला असता. त्याकरिता दुसरा विचार होऊ शकला असता. परंतु, यामध्ये तो विचार केलेला दिसत नाही. मला आणखी एक गोष्ट सभागृहाच्या निदर्शनास आणून द्यावयाची आहे. केळकर समितीच्या अहवालामध्ये आता पर्यंतच्या राजकीय नेतृत्वावर काही आक्षेप देखील आहेत. त्यांनी विभागीय विकासाच्या संदर्भात या राजकीय नेतृत्वाकडूनच हे सर्व आमच्या पेक्षा चांगल्या रितीने करु शकतील, अशी भूमिका मांडलेली आहे, मला हे अनाकलनीय आहे.

सभापती महोदय, केळकर समितीच्या अहवालातील मुद्दा क्र.4.5.4.1. मध्ये असे नमूद केलेले आहे की, "मागील दशकात, उलट कल दिसून आला आहे. गतिशीलता बदललेल्या अर्थव्यवस्थेला बसलेल्या किमान तीन धक्क्यांमुळे हे झाले होते. ते म्हणजे, एक कृषीतील अस्थैर्य/चंचलता, ज्याचा विशेषकरुन विदर्भावर नकारात्मक परिणाम झाला. दोन, वेगाने पुढे जाणाऱ्या सेवा क्षेत्रांसह उत्पादक क्रियाशील कार्यांमधील संरचनेतील बदल आणि तीन, प्रादेशिक नेतृत्वाच्या संदर्भात, सशक्त खात्यांचे असमान वितरण झालेल्या संमिश्र राजकारणाचा उदय यामध्ये, जलसिंचन, शेतकरी आपदग्रस्त व आत्महत्या, यांच्याशी संबंधित असणाऱ्या राजकीय व सार्वजनिक क्षेत्रातील मतभेद नक्षलवादाचा उदय तसेच, कुपोषण आणि प्रादेशातील राजकीय नेतृत्वाचा संभाव्य दुबळेपणा यांची भर पडली आहे आणि हे चित्र पूर्ण आहे. या सर्व गोष्टी, मागील दशकातील अपवाहनास कारणीभूत ठरल्या आहेत आणि नाराज राजकीय/आर्थिक स्थितीचा पुर्नउदय तसेच झालेले प्रत्यक्ष ज्ञान या गोष्टी या समितीची नियुक्ती करण्यास कारणीभूत ठरल्या आहेत." या समितीची नियुक्ती करण्यासाठी ज्या गोष्टी कारणाभूत ठरलेल्या आहेत त्याचा पाढा त्यांनी यामध्ये वाचलेला आहे. याचा अर्थ असा आहे की, आर्थिक, राजकीय, सामाजिक क्षेत्रात अशा प्रकारची जाणीव मागास क्षेत्रांमध्ये, मागास विभागांमध्ये निर्माण होते त्या त्या वेळेस अशा

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

प्रा.अनिल सोले.....

समित्यांचा उदय होतो, हे त्यांनी यातून सांगण्याचा प्रयत्न केलेला आहे. तसेच, अहवालातील समतोल प्रादेशिक विकासाकडे या प्रकरणात शेवटी असे नमूद केलेले आहे की, "अंतिमतः आम्ही जे सुचविले आहे ते असे की, आम्हाला सहभागी लोकशाहीचे महत्व, त्याचे मूल्य याची विशेषत्वाने जाणीव आहे, त्यामुळे आम्ही, जी अगदी नेहमीच अतिनिर्धारित पद्धतीच्या अग्रणी असते अशा आमच्या सूत्रबद्ध सम्यक रचनेच्या वापरावर जाणीवपूर्वक निर्बंध घालीत आहोत." म्हणजे यांना लोकशाहीची जाणीव आहे आणि त्यामुळे ते आपल्या सूत्रबद्ध शिस्तीबद्दल जाणीवपूर्वक निर्बंध घालत आहेत. पुढे असे नमूद केलेले आहे की, "सरधोपट संगणकीय निर्धारणाचा मार्ग टाळून आम्ही स्वाभाविकपणे व विचारपूर्वक हितसंबंधितांचा मार्ग मोकळा करुन दिला आहे, जेणे करुन, आमच्यापेक्षा ते अधिक चांगले परिणाम देऊ शकतील." लोकशाही रचनेत जनप्रतिनिधी म्हणजे हितसंबंधीय यांच्या आधारेच विकासाचे मार्ग प्रशस्त होणार आहेत. केळकर समितीच्या एकूण कार्यप्रणालीतील आपल्याला एक कन्फ्युजन आढळून येते आणि ते म्हणजे, त्यांना शेवटी म्हणावयाचे काय आहे आणि करावयाचे काय आहे ?

सभापती महोदय, मी एवढेच सांगू इच्छितो की, या अहवालामध्ये अनेक गोष्टींचा ऊहापोह करण्यात आलेला आहे. अनेक सन्माननीय सदस्यांनी त्या संदर्भात भाष्य केलेले आहे. त्यातील मुद्दे मी दोन मिनिटात आपल्यासमोर प्रस्तुत करु इच्छितो. वनक्षेत्र असलेल्या भागांसाठी ग्रिन बोनस, विदर्भातील खारपाणपट्टयाकरिता स्वतंत्र निधी, मालगुजारी तलावांकरिता स्वतंत्र निधी, मागास भागात उद्योगांकरिता विशेष सवलती, सिंदेवाही येथे कृषी विद्यापीठ, विदर्भात वन विद्यापीठ, आदिवासी रोजंदारांना प्राधान्य, पाणलोट क्षेत्र विकास मोहीम, कापूस व पशुधन विकास मोहीम, सूक्ष्म सिंचन प्रणाली बंधनकारक करणे,....

यानंतर श्री.भोगले.....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

प्रा.अनिल सोले.....

औरंगाबाद-जालना औद्योगिक पट्टा, खादी हातमाग वस्त्रोद्योगाला चालना, शिक्षणाचे सार्वत्रिकीकरण, कोकणाच्या विकासासाठी बंदरे जोड, कापूस आणि खाण अभियानाची स्थापना, युवकांच्या कौशल्य विकासाची योजना, गुजरातच्या धर्तीवर सौर धोरण, पायाभूत वैद्यकीय सुविधांसाठी वित्तीय तरतूद, वीज निर्मिती करणाऱ्या भागास स्वस्त दराने वीज पुरवठा, प्रादेशिक विकास महामंडळे सक्षम करणे आणि पर्यटन विभागाकरिता विदर्भात महामंडळ स्थापन करणे. यामध्ये विशेष काय सांगितले आहे? जर शासनाचे मत असेल की, केळकर समितीच्या शिफारशींमुळे हे कळले आहे, तर ते धादांत खोटे आहे. या सभागृहात आतापर्यंत अनेक माननीय सदस्यांनी वेगवेगळया माध्यमातून या संदर्भात विचारविमर्श केलेला आहे. ज्या ठिकाणी वीज निर्मिती होते त्या ठिकाणच्या शेतकऱ्यांना, नागरिकांना प्रदूषणाच्या समस्यांना तोंड द्यावे लागते.

सभापती महोदय, चंद्रपूर जिल्हयाचा उल्लेख अनेक माननीय सदस्यांनी केला आहे. चंद्रपूर जिल्हा या राज्यात वीज निर्मिती करण्यामध्ये अग्रणी असलेला आणि प्रदूषण झेलणारा जिल्हा आहे. चंद्रपूर जिल्हयात असे गंमतीने म्हटले जाते की, चंद्रपूरमध्ये अमेरिकन व्यक्तीला दोन दिवस ठेवले तर त्या दोन दिवसात तो आफ्रिकन झाल्याशिवाय राहणार नाही. ही वस्तुस्थिती आहे. दर तासाला घरातील धूळ साफ करावी लागते. केळकर समितीने अनेक शिफारशी केल्या आहेत. एवढ्या शिफारशी अहवालामध्ये करण्याची आवश्यकता नव्हती. केळकर समितीचा अहवाल स्वीकारण्याची काही गरज नाही, असे माझे स्पष्ट मत आहे. केळकर समितीने ज्या शिफारशी केल्या आहेत त्या विविध जनप्रतिनिधींनी अनेकदा वेगवेगळया विषयाच्या माध्यमातून सभागृहापुढे मांडलेल्या आहेत. केळकर समितीच्या अहवालातून वैदर्भिय जनतेला त्यांचे हित राखले जाईल, जोपासले जाईल असे कोणतेही ठोस आश्वासन मिळत नाही. वैदर्भिय जनता आजही वेगळे विदर्भ राज्य व्हावे या मताची आहे. या मतामध्ये परिवर्तन होणार नाही. म्हणून हा अहवाल स्वीकारु नये अशी विनंती करुन मी माझे भाषण संपवितो.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.राजेंद्र मुळक (नागपूर स्थानिक प्राधिकारी संस्था) : सभापती महोदय, केळकर समितीच्या अहवालावर माझे विचार मांडण्यासाठी मी याठिकाणी उभा आहे.

सभापती महोदय, दिनांक 31 मे, 2011 रोजीच्या शासन निर्णयान्वये केळकर समितीची स्थापना करण्यात आली होती. ही समिती स्थापन करण्यामागचे कारण मी सांगू इच्छितो. दांडेकर समिती आणि इंडिकेटर समितीने जे काही मापदंड निश्चित केले होते ते अंमलात न आल्यामुळे विदर्भ आणि मराठवाडयात मोठया प्रमाणात अनुशेष निर्माण झाला, या अनुशेषावर मात करण्यासाठी केळकर समिती नेमण्यात आली होती. या समितीचे टर्म्स अँड रेफरन्स काय होते, कोणत्या पध्दतीने अहवाल तयार करायचा होता हेही मी सभागृहाच्या निदर्शनास आणू इच्छितो. माननीय राज्यपालांच्या दिनांक 27 मे, 2009 व 19 मार्च, 2010 रोजीच्या निर्देशाप्रमाणे विदर्भ व मराठवाड्याचा अनुशेष व विकासाच्या खर्चाचा समान वितरणाच्या दृष्टीकोनातून विचार करून विकासातील क्षेत्रीय असमतोलाचा अंदाज घेण्याकरिता निर्देशांक ठरविणे हा पहिला टर्म्स अँड रेफरन्स होता. दुसरा टर्म्स अँड रेफरन्स उपलब्ध माहितीच्या आधारे अद्ययावत विभागीय असमतोल निश्चित करणे हा होता आणि तिसरा टर्म्स अँड रेफरन्स निश्चित होणारा असमतोल दूर करण्यासाठी उपाययोजना करणे हा होता. याशिवाय आणखीही टर्म्स अँड रेफरन्स होते.

सभापती महोदय, या अहवालाचा विचार करता वरीलपैकी एकही टर्म्स अँड रेफरन्सच्या संदर्भातील बाब अहवालामध्ये दिसून येत नाही. हा अहवाल तयार करीत असताना या समितीवर कोणाचा तरी दबाव होता. त्या दबावानुसार हा अहवाल तयार झाला आहे. इतिहासामध्ये डोकावले तर रामायण आणि महाभारताच्या काळापासून विदर्भ भारत देशातील स्वतंत्र आणि समृध्द राज्य होते असा उल्लेख आहे. 1903 मध्ये विदर्भाचा समावेश महाराष्ट्र प्रदेशामध्ये करण्यात आला व राज्याला मध्यप्रदेश आणि वऱ्हाड संबोधण्यात येऊन त्या राज्याची राजधानी नागपूर येथे निर्माण करण्यात आली. दिनांक 28.09.1953 रोजी वेगवेगळया भागात राहणाऱ्या मराठी भाषिकांच्या नेत्यांमध्ये करार झाला आणि त्या करारास 'नागपूर करार' असे संबोधण्यात आले. त्या नागपूर कराराप्रमाणे विदर्भाचा समावेश 1960 च्या द्विभाषिक राज्यामध्ये झाला. त्या द्विभाषिक राज्याची पुनर्रचना होऊन महाराष्ट्र आणि गुजरात अशी दोन राज्ये 1 मे, 1960 रोजी अस्तित्वात आली.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.राजेंद्र मुळक.....

सभापती महोदय, महाराष्ट्र राज्य अस्तित्वात आले त्यावेळी तत्कालीन मुख्यमंत्री स्व.यशवंतराव चव्हाण यांनी विदर्भातील जनतेला शब्द दिला होता. याचे कारण असे होते की, त्या काळात कॉ.ए.बी.बर्धन हे सभागृहाचे सदस्य होते. दिनांक 28.09.1953 च्या नागपूर करारातील कलमांचा नवीन बिलामध्ये समावेश करणारी दुरुस्ती त्यांनी सभागृहात मांडली होती, त्या वेळी असे उत्तर देण्यात आले की, "I wish to assure the people of Vidarbha that they need to have no apprehension that their legitimate interest will not be protected. On the other hand they will be zealously guarded and will be treated as sacred trust of the future Maharashtra Government and the terms of what is known as Nagpur Pact will be honoured wherever possible and something more will be done."

सभापती महोदय, या आश्वासनानुसार कॉ.ए.बी.बर्धन यांनी आपली दुरुस्ती मागे घेतली. महाराष्ट्र राज्य निर्माण झाल्यानंतर 1983 पर्यंत विदर्भ आणि मराठवाडयावर सातत्याने अन्याय होत गेला. निधीचे वाटप करीत असताना अन्याय, विविध विकास कामे करीत असताना अन्याय, विदर्भ आणि मराठवाडयातील मागासलेले भाग तसेच राहिले पाहिजेत या प्रकारचे धोरण त्या काळात राबविण्यात आले. त्यामुळे 1983 मध्ये दांडेकर समिती नेमण्यात आली. त्या दांडेकर समितीने राज्यातील विदर्भ आणि मराठवाडयाचा विकास कसा केला जाऊ शकतो या संदर्भात अहवाल सादर केला. त्या अहवालावर काहीच कामकाज झाले नाही. शेवटी इंडिकेटर समिती नेमण्यात आली. इंडिकेटर समितीने ठरवून दिलेल्या मापदंडावर काहीच कार्यवाही झाली नाही. शेवटी केळकर समिती स्थापन करण्यात आली.

सभापती महोदय, केळकर समितीने या राज्याचे चार तुकडे करुन देण्याचा प्रयत्न आपल्या अहवालातून केल्याचे दिसून येते. मी सिंचनाच्या संदर्भातील वस्तुस्थिती सभागृहासमोर मांडू इच्छितो. 1982 मध्ये विदर्भात 57.5 टक्के प्रती हेक्टर सिंचनाचा अनुशेष होता. 1994 मध्ये हा अनुशेष 57.8 टक्क्यावर गेला आणि 2011 मध्ये हे प्रमाण 60.53 टक्के झाले. म्हणजे अनुशेषामध्ये सातत्याने वाढ होत गेली. दुसरीकडे मराठवाडयात प्रती हेक्टर सिंचनाचा अनुशेष

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.राजेंद्र मुळक.....

1982 मध्ये 28.20 टक्के होता, तो 1994 मध्ये 30.80 टक्के झाला आणि 2011 मध्ये तो आणखी वाढला. उर्वरित महाराष्ट्राचा विचार केला तर 1982 मध्ये उर्वरित महाराष्ट्रामध्ये 14.75 टक्के प्रती हेक्टर सिंचनाचा अनुशेष होता. 1994 मध्ये तो 12.40 टक्क्यावर आला आणि 2011 मध्ये हे प्रमाण 11.59 टक्के इतके कमी झाले. एका बाजूला विदर्भ आणि मराठवाड्यातील अनुशेषाचे प्रमाण वाढत गेले आणि दुस-या बाजूला उर्वरित महाराष्ट्रातील अनुशेषाचे प्रमाण कमी होत गेले. ही परिस्थिती निर्माण केली गेली. आम्हाला अपेक्षित होते की, टर्म्स अँड रेफरन्सच्या माध्यमातून केळकर समितीचा अहवाल सादर होईल, परंतु तसे घडले नाही. या ठिकाणी असे सांगण्यात आले की, तालुका हा घटक मानून कार्यवाही करण्यात यावी. आम्ही अजिबात सहमत होणार नाही. जिल्हा हा घटक असेल तरच केळकर समितीचा अहवाल आम्ही मान्य करु अन्यथा आम्ही हा अहवाल मान्य करणार नाही. ज्यांच्याकरिता समित्या स्थापन करण्यात आल्या त्या भागांचा अनुशेष वाढत गेला आणि एका भागाचा अनुशेष कमी होत गेला. जी परिस्थिती सिंचन क्षेत्राची आहे तीच परिस्थिती रस्ते, कृषी पंप, शिक्षण आदी क्षेत्राची आहे. सातत्याने अनुशेष वाढविण्याचा प्रयत्न त्या काळात झालेला आहे.

नंतर एच.1...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.राजेंद्र मुळक...

सभापती महोदय, डॉ.केळकर समितीने अनेक सूचना केल्या आहेत. या सूचना वाचल्यानंतर अंगातील रक्त उसळून येते. एका भागाला अधिक मागास कसे ठेवता येऊ शकते हे त्यातून ध्वनित होते. काही मातब्बर मंडळींनी एकत्र येऊन विदर्भ व मराठवाड्याला आणखी कसे मागास ठेवता येईल या दृष्टीने नीती आखली होती. त्याचा आम्हाला खेद वाटतो. नागपूरचे माजी महापौर व सन्माननीय सदस्य श्री.अनिल सोले यांचे मी भाषण ऐकले. त्यांनी आपल्या भाषणात वेगळ्या विदर्भ राज्याचा उल्लेख केला. त्यांच्या पक्षाने स्वतंत्र विदर्भाची भूमिका घेतल्यामुळे त्यांच्या पक्षातील उमेदवार निवडून आले व त्यांनी सत्ता स्थापन केली म्हणून आज ते राज्यकर्ते झालेत. त्यामुळे डॉ.केळकर समितीचा अहवाल स्वीकारायचा किंवा नाही ही आता त्यांच्यावर जबाबदारी आलेली आहे. येणाऱ्या काळामध्ये विदर्भावर अधिक अन्याय होऊ शकतो याचे उदाहरण डॉ.विजय केळकर समितीचा अहवाल आहे. दांडेकर समिती, इंडिकेटर समिती आपल्या राज्यात होऊन गेली. आम्हाला डॉ.केळकर समितीच्या माध्यमातून न्याय मिळेल अशी अपेक्षा होती. ज्या समितीला टर्म्स ऑफ रेफरन्सशी काही देणे घेणे नव्हते तर मग अशी समिती स्थापन का केली ? या समितीला कोणत्या मापदंडामध्ये काम केले पाहिजे हे सांगून देखील समितीने त्या अनुसार अहवाल तयार केला नाही ही खेदाची गोष्ट आहे. मला असे वाटते की, हा अहवाल खरोखरच कचऱ्याच्या डब्यामध्ये टाकून दिला पाहिजे. आपले राज्य हे पुरोगामी आहे. आता आपण 21 व्या शतकात आहोत. सध्याचे युग हे टेक्नॉलॉजीचे आहे, आय.टी.चे आहे. त्यामुळे आता नवनवीन योजना येत असून नवनवीन प्रदेशांमध्ये वाढ होत आहे. असे असताना आपण अशा प्रकारचे अहवाल स्वीकारायला लागलो तर मुळातच मागास असलेला भाग अजून मागास होईल व तसा प्रयत्न या अहवालाच्या माध्यमातून निर्माण झालेला आहे.

मी माननीय राज्यपालांना धन्यवाद देऊ इच्छितो. त्यांच्या निदेशामुळेच विभागीय निधी मिळण्यास सुरुवात झाली. माननीय राज्यपालांनी निदेश दिले नसते तर विदर्भ आणि मराठवाड्यातील नेत्यांना, राज्यकर्त्यांना तेथील भागांचा विकास करण्यासाठी कटोरा घेऊन फिरावे लागले असते. माननीय राज्यपालांनी निदेश दिल्यामुळे किमान निधीचे वाटप तरी झाले आणि

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.राजेंद्र मुळक....

त्यामुळे आम्हाला लोकांसमोर काही तरी बोलता आले. पण डॉ.केळकर समितीच्या अहवालातून तर सर्वच मिटवून टाकले आहे. त्यामुळे मी विदर्भ आणि मराठवाड्याच्या जनतेच्यावतीने शासनाला विनंती करतो की, हा अहवाल आपण स्वीकारू नये. या अहवालातील एकही मुद्दा आपण स्वीकारू नये. या सरकारच्या माध्यमातून हा अहवाल स्वीकारला गेला तर विदर्भ आणि मराठवाड्यामध्ये जो आक्रोश निर्माण होईल त्याचा सामना शासनाला करावा लागेल हे मी आताच सांगत आहे. सन्माननीय सदस्या श्रीमती शोभाताई फडणवीस, सन्माननीय सदस्य श्री.अनिल सोले यांनी यावर आपले विचार व्यक्त केले आहेत. दोन्ही सदनातील सत्ताधारी पक्षातील सन्माननीय सदस्यांनी या अहवालासंबंधातील आपले मत प्रखरपणे मांडलेले आहे. त्यामुळे हा अहवाल स्वीकारण्यात येऊ नये अशा प्रकारचे प्रतिपादन करतो आणि माझे भाषण पूर्ण करतो. जय हिंद, जय भारत.

.....

..3

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.महादेव जानकर (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, महाराष्ट्राच्या समतोल प्रादेशिक विकासाच्या प्रश्नावरील डॉ.केळकर समितीच्या अहवालावर चर्चा होत आहे.

विदर्भ आणि मराठवाड्यावर अन्याय झालेला आहे. त्याप्रमाणेच उर्वरित महाराष्ट्रातील काही तालुक्यांवर देखील अन्याय झालेला आहे. समिती नेमणे म्हणजे व्हेस्ट ऑफ टाईम आणि व्हेस्ट ऑफ एनर्जी आहे. आज आपण फार मोठी भाषा करीत आहोत. चर्चा करण्यापेक्षा, समिती नेमण्यापेक्षा आणि एक एक तालुका कन्सीडर केला असता तर महाराष्ट्रातील व्यवस्थेवर ही वेळ आली नसती. याला जबाबदार नोकरशहा आहेत की, राजकारणी आहेत या चर्चेच्या विषयात मी जाणार नाही. विदर्भाचा विकास झाला पाहिजे, मराठवाड्याचा विकास झाला पाहिजे याचा अर्थ पश्चिम महाराष्ट्रातील तालुक्यांवर अन्याय झाला पाहिजे असा होता कामा नये.

सभापती महोदय, उर्वरित महाराष्ट्रामध्ये खानदेश प्रदेश येतो, सातारा, सांगली, कोल्हापूर, नगर हे जिल्हे येतात. या जिल्ह्यातील तालुक्यांतील अवस्था ही विदर्भ आणि मराठवाड्यापेक्षाही अत्यंत खराब आहे. आपण तालुक्याला विरोध केला आणि जिल्हा हा केंद्रबिंदू मानला तर विकास फक्त कराड आणि बारामतीचा होईल. विकास फक्त सांगली जिल्ह्याचा होईल आणि दुष्काळी तालुके आहे त्याच स्थितीमध्ये राहतील. तेव्हा याचा देखील या सभागृहाने विचार करावा.

डॉ.केळकर समितीच्या फायदा तोट्याचा अभ्यास करण्याचा आम्ही प्रयत्न करू. विदर्भात खनिज संपत्ती जास्त आहे. इलेक्ट्रिसिटी, कोळसा यातून जमा होणारा टॅक्स महाराष्ट्राला मिळतो. यातील 90 टक्के निधी विदर्भासाठी दिला तर त्या भागाची प्रगती होऊ शकते. पश्चिम महाराष्ट्रात साखर उद्योग आहेत. साखर उद्योगांनी दुष्काळी तालुके दत्तक घेतले, आपल्या सर्व आमदार, खासदार आणि आय.ए.एस.अधिकाऱ्यांनी आपला एक महिन्याचा पगार दिला तर डॉ.केळकर समिती नेमण्याची गरज भासणार नाही. पुन्हा पुन्हा त्याच विषयावर चर्चा करण्याची गरज पडणार नाही. तेव्हा या दृष्टीने आपण विचार करावा अशी मी विनंती करतो आणि आपली रजा घेतो. जय हिंद, जय महाराष्ट्र.

.....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

प्रा.जोगेंद्र कवाडे (नामनियुक्त) : सभापती महोदय, डॉ.केळकर समितीचा अहवाल म्हणजे विदर्भ आणि मराठवाड्याची थट्टा, मस्करी केल्यासारखे आहे. विरोधाभासाने ओतप्रोत भरलेला असा हा अहवाल आहे. डॉ.विजय केळकर समितीमध्ये 14 सदस्य होते. या समितीने प्रचंड मेहनत आणि कष्ट करून 571 पानांचा अहवाल सादर केला आहे. शासनाने या समितीवर प्रचंड खर्चकरून खोदा पहाड और चूहा भी नहीं निकला अशी या अहवालाची अवस्था झाली आहे. सरकारने हा अहवाल फक्त टेबल डाऊन केला आहे. सरकारने तो अहवाल स्वीकारलाही नाही आणि नाकारलाही नाही. नरो वा कुंजरोवा अशी अवस्था या अहवालाची झाली आहे. आमचे मित्र सन्माननीय सदस्य श्री.राजेंद्र मुळक यांनी अत्यंत महत्त्वाची गोष्ट सांगितली आहे. या समितीने टर्म्स ऑफ रेफरन्सचे उल्लंघन केले आहे. ज्या मुद्यांवर समितीने अध्ययन करून अहवाल द्यावा असे सांगितले होते ते सोडून बाकी सर्व केले आहे. या समितीने टर्म्स ऑफ रेफरन्स सोडून बाकीच्या सर्व भानगडी केल्या आहेत. त्यामुळे हा अहवाल डस्टबीनमध्ये फेकण्याच्या लायकीचा आहे अशी धारणा आमच्या मित्रांची झाली ती निश्चितच विचार करण्यासारखी आहे.

यानंतर श्री.जुन्नरे....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

प्रा.जोगेंद्र कवाडे.....

केळकर समितीच्या अहवालाने महाराष्ट्रामध्ये भांडणे लावण्याचे काम केले आहे. विदर्भ, मराठवाडा आणि उर्वरित महाराष्ट्र असे तीन घटक मिळून महाराष्ट्र राज्य निर्माण झाले असून या तिन्ही प्रदेशामध्ये केळकर समितीने भांडणे लावण्याचा प्रयत्न केलेला आहे.

सभापती महोदय, यासंदर्भात राज्यपाल महोदयांचे आभार जितके मानावे तितके ते थोडे आहेत. असमतोल दूर करण्यासाठी दांडेकर समिती, इंडिकेटर समिती, भुजंगराव समिती निर्माण झाली. दांडेकर समितीने आर्थिक अनुशेषाच्या संदर्भात मापदंडाच्या ज्या बाबी सांगितल्या त्यासंदर्भात प्रामाणिकपणे विचार झाला असता तर केळकर समिती निर्माण करण्याची गरज उरली नसती. परंतु तसे झाले नाही. मराठवाडयाच्या संदर्भात आमच्या मित्राने दुखणे सांगितले आहे. परंतु मराठवाडयापेक्षा विदर्भाचे दुखणे थोडे वेगळे आहे. आम्ही मराठवाडयाच्या दु:खाशी सहमत आहोत. मराठवाडयाचा विकास झाला पाहिजे, त्यांना सर्व काही मिळाले पाहिजे त्यांचा औद्योगिक, शैक्षणिक, सांस्कृतिक, शेतीचा, सिंचनाचा विकास झाला पाहिजे अशी आमचीही भावना आहे. परंतु ज्या ठिकाणी विदर्भाचा मुद्दा येतो तेव्हा त्या संदर्भात वेगळा विचार करणे नितांत आवश्यक होते. विदर्भ, मराठवाडा आणि उर्वरित महाराष्ट्र मिळून महाराष्ट्र राज्याची निर्मिती झाली. द्विभाषिक राज्यामध्ये गुजरात राज्य निर्माण झाले. भाषावार प्रांतरचनेचे सूत्र असे होते की, एका राज्याची एक भाषा असली पाहिजे. एकाच भाषेचे एक राज्य असले पाहिजे असे सूत्र नव्हते. एका राज्याची एक भाषा असली पाहिजे असे सूत्र होते. परंतु आम्ही एकाच भाषेचे एकच राज्य असले पाहिजे अशी गल्लत केली.

सभापती महोदय, नुकतेच तेलंगणा राज्य निर्माण झाले. तेलगू भाषा बोलणारा तेलंगणा आणि उर्वरित आंध्रप्रदेश. आंध्रप्रदेश हा विशाल प्रदेश आहे. या दोन्ही राज्याची भाषा सारखीच आहे. विदर्भ ओलांडले तर दिल्ली-ओरिसा आणि बिहार पर्यंत हिंदी भाषा बोलली जाते. हिंदी भाषा प्रदेशाची जर 7-7,8-8 राज्य होऊ शकतात तर मराठी भाषा बोलणारी दोन राज्य का होऊ शकत नाहीत ? खरे म्हणजे हे समजण्यामध्येच चूक झालेली आहे.

सभापती महोदय, विदर्भाचा अनुशेष कशा कशात नाही ? विदर्भामध्ये आज सगळे काही आहे. आज विदर्भ महाराष्ट्राला विजेच्या माध्यमातून पोसतो आहे. चंद्रपूर जिल्हा संपूर्ण

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

प्रा.जोगेंद्र कवाडे.....

महाराष्ट्राचा अन्याय सहन करीत आहे, प्रदूषण सहन करीत आहे. विदर्भ वीज निर्माण करतो परंतु विदर्भ अंधारात आणि संपूर्ण महाराष्ट्र उजेडात अशी परिस्थिती आहे. सिंचनाचा अनुशेष कशा कशात आहे ? फाजल अली कमिशन 1953 सालामध्ये निर्माण झाले होते व त्यांनी सुध्दा अशाच प्रकारची शिफारस केली होती.

सभापती महोदय, सर्वात महत्वाची बाब अशी आहे की, भाषावार प्रांतरचनेचा विचार झाला तेव्हा डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी शिफारस केली होती की, "विदर्भासाठी वेगळे राज्य देणे उचित राहील." छोटी राज्ये प्रशासनाच्या दृष्टिकोनातून, विकासाच्या दृष्टिकोनातून योग्य असतात असा विचार त्या काळामध्ये स्टेट अँड मायनॉरिटीमध्ये त्यांनी मांडला होता. फाजल अली कमिशनने सुध्दा हाच मुद्दा मांडला होता. महाराष्ट्रामध्ये जेव्हापासून विदर्भ विलीन झाला तेव्हा पासून विदर्भाची दयनीय अवस्था झाली आहे, तेव्हापासून विदर्भाचा पदोपदी अपमान आणि विदर्भाची अस्मितता पायाखाली तुडवण्याचा प्रयत्न केला गेला, तेव्हा पासून विदर्भातील जनतेला न्याय मिळत नाही. विदर्भ विकासापासून वंचित आहे, जलसिंचन, रोजगार, शेतीचाही अनुशेष आहे. विदर्भात सांस्कृतिक क्षेत्राचा फार मोठा अनुशेष आहे. सांस्कृतिक क्षेत्रामध्ये पुणे-मुंबई संपूर्ण देशभर गाजतात. परंतु विदर्भातील कलावंताचा मात्र कोठेही उल्लेख होताना दिसत नाही. विदर्भातील कलेचे कोणतेही क्षेत्र असेल मग ते चित्रकला असेल, संगीतकला असेल,नाटयकला असेल या सर्व क्षेत्रामध्ये विदर्भाची उपेक्षा करण्यात आलेली आहे.

सभापती महोदय, विदर्भातील सर्व क्षेत्रामध्ये बॅकलॉग आहे. विदर्भ आणि मराठवाडयामध्ये मोठया प्रमाणात कापूस पिकवला जातो. कापसाला पांढरे सोने म्हटले जाते. केळकर समितीची भूमिका अतिशय असंवेदनशील आहे. केळकर समितीने आपल्या अहवालात म्हटले आहे की, "विदर्भ व मराठवाडयात सिंचन सुविधांच्या अभावी शेतीत पुरेसे उत्पादन होत नसल्यामुळे कर्जबाजारीपणा वाढून शेकडो शेतकरी आत्महत्या करीत आहेत." हे कारण केळकर समितीला पुरेसे वाटत नाही. मराठवाडयातील आणि विदर्भातील शेतकरी आत्महत्या कशाकरिता करतात हे सारी दुनिया जानते परंतु केळकर समितीला याची जाणीव होऊ नये यापेक्षा आमचे दुर्दैव तरी काय ? केळकर समिती पुढे असे म्हणते की, "विदर्भातील कृषी क्षेत्रातील पिछेहाट, शेतकऱ्यांच्या

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

प्रा.जोगेंद्र कवाडे.....

आत्महत्या आणि आदिवासी क्षेत्रातील हिंसाचार ही असंतोषाची कारणे नाहीत." मग विदर्भ आणि मराठवाडयाची असंतोषाची कारणे नेमकी कोणती आहेत ? खरे म्हणजे केळकर समितीने आपल्या चष्म्याचा नंबर बदलावयास पाहिजे होता.

सभापती महोदय, महाराष्ट्रात सर्वात जास्त कुपोषण विदर्भातील मेळघाटमध्ये आहे. विदर्भ सोडला तर उर्वरित महाराष्ट्रामध्ये कुपोषण अत्यल्प आहे. कुपोषणामुळे सर्वात जास्त आदिवासी बालकांच्या हत्या अमरावती जिल्हयातील मेळघाटमध्ये तसेच गडचिरोली, चंद्रपूर जिल्हयात होत आहेत. आदिवासी आईच्या पोटाला भाकर नाही म्हणून छातीमध्ये दूध नाही. छातीमध्ये दूध नसल्यामुळे आई लेकराला दूध पाजू शकत नाही. आईच्या कडेवर आमचे आदिवासी लेकरु उपासमारीने तडफडून तडफडून मरुन जात आहे, अशी आमच्या विदर्भातील कुपोषणाची अवस्था आहे. असे असताना या केळकर समितीला विदर्भातील कुपोषण दिसत नाही ?

सभापती महोदय, केळकर समितीने राज्यामध्ये 5 लाख कोटी रुपयांचा अनुशेष असल्याचा उल्लेख केला आहे. आपल्या राज्य सरकारने 3 लाख कोटी रुपयांचे कर्ज घेतले आहे. "तिजोरीचा खडखडाट ऐकून जाग आली उंदराला, मुख्यमंत्री अर्थ मंत्र्यांना म्हणतात चलते क्या खंडाला." अशा प्रकारची अवस्था आज आमच्या महाराष्ट्राची झाली आहे. महाराष्ट्र शासनाने 3 लाख कोटी रुपयांचे कर्ज कोणासाठी घेतले ? जे कर्ज महाराष्ट्रासाठी घेतले त्याच्या व्याजाचा भुर्दंड विदर्भ आणि मराठवाडा सहन करतो आहे. या पैशामुळे उर्वरित महाराष्ट्राचा विकास झाला. कर्ज महाराष्ट्रासाठी, विकास उर्वरित महाराष्ट्राचा आणि विदर्भ व मराठवाडा कर्जाचा भूर्दंड सहन करीत आहे. विदर्भ व मराठवाडा हे कर्जाच्या व्याजाचे भागीदार आहेत परंतु आम्ही विकासाचे भागीदार नाहीत ही अत्यंत अन्यायकारक बाब आहे. त्यामुळे ही बाब केळकर समितीच्या लक्षात का येत नाही हे आम्हाला तरी काही समजत नाही.

सभापती महोदय, पुराणात विदर्भाचा उल्लेख आहे. विदर्भाला इतिहास आहे. वर्धा जिल्हयाला गांधीजींचा जिल्हा म्हटले जाते.

यानंतर श्री. अजित....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

प्रा.जोगेंद्र कवाडे....

वर्धा जिल्हयातील आर्वी तालुक्यात कौंडण्यपूर तीर्थक्षेत्र आहे. भगवान श्रीकृष्णाने कौंडण्यपूरच्या रुक्मिणीला वृंदावन येथे पळवून नेले होते असा उल्लेख पुराणामध्ये आहे. रुक्मिणी ही विदर्भ कन्या आहे. श्रीकृष्णाने रुक्मिणीला पळवून नेले आणि महाराष्ट्र विदर्भातील विकास पळवून नेत आहे.

सभापती महोदय, विदर्भातील बुलढाणा जिल्ह्यात लोणार सरोवर आहे. उल्का पडून ते सरोवर निर्माण झालेले आहे. ते खाऱ्या पाण्याचे सरोवर आहे. देशात ते सरोवर प्रसिद्ध आहे. या प्राचीन लोणार सरोवराचा काय विकास झाला ? बुलढाणा जिल्ह्यातील सिंदखेड राजा हे जिजाऊंचे जन्म गाव आहे. ज्या जिजाऊने महाराष्ट्राला, देशाला छत्रपती शिवाजी महाराजांसारखा वीर, कर्तबगार राजा दिला. असे अनेक वलय असलेल्या विदर्भाला आतापर्यंत काय मिळाले आहे ?

सभापती महोदय, आम्ही विदर्भाचे वैभव महाराष्ट्रामध्ये विलीन केले. विदर्भ महाराष्ट्रामध्ये सामील झाला त्यावेळी लोकांच्या मनात शंका होती. तेव्हा माननीय यशवंतराव चव्हाण यांनी विदर्भातील जनतेला आश्वास्त केले होते की, आपण घाबरण्याचे काही कारण नाही, चटणी भाकर असेल तर आपण मिळून खाऊ आणि तूप रोटी मिळाली तर प्रथम तुम्हाला देऊ आणि आम्ही नंतर खाऊ. परंतु माननीय यशवंतराव चव्हाण यांच्या आश्वासनाचे पालन राज्यातील सत्ताधारी पक्षाकडून झालेले नाही याचे आम्हाला दु:ख होते. म्हातारी मेल्याचे दु:ख नाही पण काळ सोकावतो अशी परिस्थिती आहे.

सभापती महोदय, माननीय राज्यपालांच्या निर्देशानुसार डॉ.विजय केळकर समिती नियुक्त करण्यात आली. परंतु या केळकर समितीने माननीय राज्यपालांच्या सूचनांचे उल्लंघन केलेले आहे. त्यामुळे केळकर समितीला आरोपीच्या पिंजऱ्यात उभे करुन जाब विचारला पाहिजे. या ठिकाणी सन्माननीय सदस्य प्रा.अनिल सोले आणि श्री.महादेव जानकर यांनी सांगितले की, आपण येथे अनेक विषयांवर चर्चा करीत असताना केळकर समिती नेमण्याची काय आवश्यकता आहे ? केळकर समितीने विदर्भाच्या पदरात निराशा टाकली आहे. आज विदर्भाला वसाहतीचे स्वरुप प्राप्त झाले आहे. विदर्भ् आणि मराठवाड्याला 371(2) अनुसार थोडा तरी न्याय मिळत आहे. परंतु वैधानिक विकास मंडळ हा तात्पुरता इलाज झाला. वेगळा विदर्भ झाल्याशिवाय विदर्भातील जनतेला स्वाभिमानाने आणि इज्जतीने जगता येणार नाही. आम्ही स्वयंभू विकास करु शकतो. आम्हाला

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

प्रा.जोगेंद्र कवाडे....

कोणाच्याही मदतीची आवश्यकता नाही. विदर्भाला स्वतःचा स्वाभिमान कायम ठेवायचा असेल तर स्वतंत्र विदर्भाशिवाय पर्याय नाही. विदर्भ इकॉनॉमिकली व्हायबल नाही असे सांगण्यात येते. परंतु महाराष्ट्र राज्य इकॉनॉमिकली व्हायबल आहे काय ? केंद्राकडून मिळणाऱ्या निधीवर राज्य चालते. केळकर समितीने आपल्या अहवालात वेगळ्या विदर्भाचा उल्लेख केलेला नाही. वेगळे राज्य, मोफत वीज आणि पाणी देण्याची शिफारस समितीने केलेली नाही. मग कशाकरिता ही समिती नेमली ? मी आता जो शब्द वापरणार आहे तो कदाचित असंसदीय असेल, झक मारण्याकरिता समिती नेमली काय ? तो शब्द योग्य नसेल तर तो कामकाजातून काढून टाकावा.

सभापती महोदय, नागपूर करारानुसार विदर्भ महाराष्ट्रात सामील झाला. There was an Agreement between Maharashtra and Vidarbha. आपण्‌ास लॉ ऑफ कान्ट्रॅक्ट माहीत असेल. आपण करारातील एकाही कलमाचे पालन केले नाही तर तो ब्रीच ऑफ कॉन्ट्रॅक्ट होतो. मागील 60-62 वर्षात प्रत्येक कलमाचे पालन झालेले नाही. हा ब्रीच ऑफ कॉन्ट्रॅक्ट असल्यामुळे विदर्भाच्या विकासासाठी स्वतंत्र विदर्भाशिवाय दुसरा मार्ग नाही. आमच्या मराठवाड्यातील मित्रांना जे पाहिजे ते आपण द्यावे. (अडथळा) वेगळ्या विदर्भाशिवाय दुसरा कोणताही पर्याय नाही. शासनाने केळकर समितीचा अहवाल बासनात गुंडाळून ठेवावा, तो कचऱ्याच्या टोपलीत टाकावा. सरकारने केळकर समितीचा अहवाल कदापि मान्य करु नये अशी मागणी करुन मी माझे भाषण पूर्ण करतो. जय भीम !

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, या सदनामध्ये केळकर समितीच्या अहवालावर चर्चा सुरु आहे. केळकर समितीने महाराष्ट्राकरिता अहवाल दिलेला आहे त्यामध्ये विदर्भ देखील आहे. प्रादेशिक भागाबद्दल भावना तीव्र होणे मी समजू शकतो. मी देखील तशा भावना व्यक्त केलेल्या आहेत. परंतु आता मी सरकारमध्ये असल्यामुळे मला तशा भावना मांडता येत नाही, हा नंतरचा भाग आहे. परंतु या ठिकाणी केळकर समितीच्या अहवालावर बोलत असताना वेगळ्या विदर्भाचा उल्लेख करण्यात आला. 105 हुताम्यांच्या बलिदानातून अखंड महाराष्ट्र निर्माण झालेला आहे. त्यामध्ये विदर्भाचा देखील समावेश आहे. विदर्भाच्या अनुशेषाबाबत, विदर्भामध्ये असलेल्या नैसर्गिक गोष्टींबाबत जरूर चर्चा व्हावी. दांडेकर समितीने दिलेल्या अहवालावर नेमण्यात आलेल्या समितीचा मी अध्यक्ष होतो आणि मी दांडेकर समितीचा अहवाल खोडून काढला होता. मी या अहवाला संदर्भात माझे मत व्यक्त करीत नाही. परंतु या ठिकाणी केळकर समितीचा अहवालावर बोलत असताना वारंवार वेगळ्या विदर्भाचा उल्लेख करण्यात आला. ज्यांना वेगळा विदर्भ पाहिजे असेल त्यांना मी अत्यंत नम्रपणे सांगतो की, हे संयुक्त महाराष्ट्राचे सदन आहे. या सदनामध्ये स्वतंत्र विदर्भ आणि जय विदर्भ अशी भूमिका मांडता येणार नाही, असा निर्णय माननीय सभापतींनी दिलेला आहे. ज्यांना वेगळ्या विदर्भाची मागणी करायची असेल तर त्यांनी ती सभागृहाच्या बाहेर करावी. परंतु त्यांना येथे वेगळ्या विदर्भाची भूमिका मांडता येणार नाही. आम्ही 105 हुताम्यांचा अवमान सहन करणार नाही.

(विरोधी पक्षातील अनेक सन्माननीय सदस्य जागेवर उभे राहून एकाचवेळी बोलण्याचा प्रयत्न करीत असतात.)

तालिका सभापती : मी सन्माननीय सदस्यांना सांगू इच्छितो की, मी आपणास बोलण्याची संधी देईन, परंतु कृपया आपण खाली बसावे.

श्री.माणिकराव ठाकरे : सभापती महोदय, माझा पॉईन्ट ऑफ ऑर्डर आहे.....

यानंतर श्री.बोर्डे...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.धनंजय मुंडे : सभापती महोदय, आपण सन्माननीय मंत्री श्री.दिवाकर रावते यांना औचित्याचा मुद्दा मांडण्याची परवानगी दिली होती. वास्तविक पाहता या सभागृहात डॉ.केळकर समितीच्या अहवालावर सर्वांगीण चर्चा होत असताना आणि सन्माननीय सदस्य या अहवालावरील चर्चेच्या अनुषंगाने आपापले विचार मांडत असताना जर कोणी वेगळ्या विदर्भाच्या विषयी बोलले असेल तर त्या बाबत शासनाने निवेदन केले पाहिजे. शासन जे काही निवेदन करेल ते आम्ही मान्य करु त्या बाबतीत आमची काही हरकत राहणार नाही. परंतु या ठिकाणी माननीय श्री.दिवाकर रावते साहेबांनी औचित्याच्या मुद्याच्या माध्यमातून वेगळ्या विदर्भ राज्याच्या बाबतीत भूमिका मांडणाऱ्यांनी संयुक्त महाराष्ट्रासाठी 105 जणांनी दिलेले हौतात्म्य लक्षात ठेवावे असे सांगितले. मी त्यांना विचारु इच्छितो की, आपण ज्या पक्षासोबत सरकारमध्ये सहभागी झालेला आहात त्या पक्षाने लोकसभा आणि विधानसभेच्या निवडणुकीत वेगळे विदर्भ राज्य देण्याची भूमिका मांडली होती. आजही सरकारमधील एका पक्षाची भूमिका वेगळ्या विदर्भ राज्याची आहे. वेगळ्या विदर्भ राज्याबाबत सन्मानीय सदस्यांनी मागणी केल्यानंतर माननीय मंत्री श्री.दिवाकर रावते हे आमची कानउघाडणी करीत असतील तर, आमची विनंती एवढीच आहे की, अशाच प्रकारची कानउघाडणी त्यांनी सरकारमधील त्यांच्या मित्र पक्षाची करावी. महोदय, केळकर समितीच्या अहवालावरील चर्चा प्रादेशिक अनुशेषाच्या असमतोलाच्या संदर्भात व्हावी अशी....

तालिका सभापती (श्री.रामनाथ मोते) : मी सन्माननीय विरोधी पक्ष नेत्यांना सांगतो की, आपण आता या चर्चेला वेगळे वळण देऊ नये. ही चर्चा केळकर समितीच्या अहवालावर होत आहे, हे ध्यानात घ्यावे.

श्री.धनंजय मुंडे : महोदय, विरोधी पक्ष या नात्याने हा विषय आम्हाला वेगळ्या माध्यमातून आणावयाचा असता तर....

तालिका सभापती : मी सन्माननीय विरोधी पक्ष नेत्यांना सांगतो की, आपण इतर विषयावर बोलू नये. मी आपल्याला केळकर समितीच्या अहवालावर बोलण्यास अनुमती दिलेली आहे.

डॉ.नीलम गोऱ्हे : सभापती महोदय,...

तालिका सभापती : सन्माननीय सदस्या श्रीमती नीलमताई गोऱ्हे, कृपया आपण खाली बसावे. मी कोणालाही बोलण्याची संधी देणार नाही. ..2..

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.माणिकराव ठाकरे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य प्रा.जोगेंद्र कवाडेजी यांनी आपल्या भाषणात वेगळ्या विदर्भ राज्याच्या संदर्भात उल्लेख केला. अशा प्रकारचा उल्लेख करण्याचा त्यांना पूर्ण अधिकार आहे. भारतीय जनता पक्षाचे सन्माननीय सदस्य प्रा.अनिल सोले यांनी सुध्दा वेगळ्या विदर्भ राज्याची भावना व्यक्त केली. या ठिकाणी माननीय मंत्री श्री.दिवाकर रावते हे शासन म्हणून बसलेले आहेत. माननीय मंत्री श्री.दिवाकर रावते यांची या विषयी जी भूमिका आहे त्या बाबत माननीय मुख्यमंत्र्यांची काय भूमिका आहे, ती या सभागृहात स्पष्ट केली पाहिजे. डॉ.केळकर यांनी अहवालाच्या माध्यमातून ज्या बाबी नमूद केल्या आहेत त्यातून वेगळ्या विदर्भ राज्याची भावना सन्माननीय सदस्यांकडून प्रकट झाली आहे. या बाबतची नोंद सभागृहाने घेतली पाहिजे. त्यामुळे माझी मागणी आहे की, या विषयी माननीय मुख्यमंत्र्यांनी स्पष्टीकरण केले पाहिजे. एकाच सरकारमध्ये असलेल्या एका पक्षाचे एक मत आणि दुसऱ्या पक्षाचे दुसरे मत असेल तर राज्य कसे चालणार ?

तालिका सभापती : मी सभागृहाच्या निदर्शनास आणून देतो की, मी आता सन्माननीय सदस्यांना केळकर समितीच्या अहवालाव्यतिरिक्त इतर कोणत्याही मुद्यावर बोलण्याची परवानगी देणार नाही. या चर्चेला उत्तर देताना सन्माननीय सदस्यांच्या सर्व मुद्यांना उत्तरे मिळतील, एवढेच आता सांगतो. आता सन्माननीय विरोधी पक्ष नेत्यांनी केळकर समितीच्या अहवालावर आपले विचार व्यक्त करावेत.

(विरोधी पक्षाचे काही सन्माननीय सदस्य उभे राहून एकाच वेळी बोलतात.)

श्री.धनंजय मुंडे : महोदय, अतिशय गंभीर अशा विषयावर सभागृहात चर्चा होत आहे. केळकर समितीच्या अहवालावर सभागृहात चर्चा होत असताना सत्ताधारी पक्षाच्या एक सन्माननीय सदस्यांनी वेगळ्या विदर्भाच्या बाबत मागणी केली. तद्नंतर सन्माननीय सदस्य प्रा.जोगेंद्र कवाडे यांनी तीच भूमिका मांडल्यानंतर सन्माननीय मंत्री श्री.दिवाकर रावते यांनी अखंड महाराष्ट्राच्या बाबतीत औचित्याचा मुद्दा मांडला.

तालिका सभापती : मी आपल्या निदर्शनास आणून देतो की, हा मुद्दा दोन्ही बाजूने आला होता. मी पुन्हा एकदा सांगतो की, कृपा करुन या चर्चेला वेगळे वळण देऊ नका.

प्रा.जोगेंद्र कवाडे : सभापती महोदय, माझा हरकतीचा मुद्दा आहे....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

तालिका सभापती : सन्माननीय सदस्य प्रा.जोगेंद्र कवाडे सर, आपल्याला ही चर्चा होऊ द्यावयाची आहे की नाही ? आपण हरकतीच्या मुद्यावर बोलताना भाषण करु लागलात तर ते योग्य होणार नाही. मी या विषयावर आता कोणालाही बोलण्यास परवानगी देणार नाही. मी सन्माननीय सदस्य प्रा.जोगेंद्र कवाडे यांना सांगतो की, आपण कृपया खाली बसावे. मी आपल्याला बोलण्याची परवानगी दिलेली नाही.

डॉ.नीलम गोऱ्हे : सभापती महोदय, माझे म्हणणे एवढेच आहे की,....

तालिका सभापती : सन्माननीय सदस्या श्रीमती नीलमताई गोऱ्हे, आपण कृपया खाली बसावे. सन्माननीय विरोधी पक्ष नेत्यांनी आता केळकर समितीच्या अहवालावर आपले भाषण सुरु करावे.

श्री.कपिल पाटील : सभापती महोदय, माझी हरकत आहे. मी आपल्या निदर्शनास....

तालिका सभापती : मी आपल्याला परवानगी देणार नाही. मला वाटते आपण नको त्या विषयावर बोलू नये.

श्री.कपिल पाटील : महोदय, आपल्याला माझी हरकत ऐकून घ्यावी लागेल.

तालिका सभापती: सन्माननीय सदस्य श्री.कपिल पाटील, आपण मला दम देऊ नका. आपण व्यवस्थित बोलावे. कृपया आपण अरेरावीच्या भाषेत बोलू नये.

श्री.कपिल पाटील : महोदय, मी आपल्याला दम देत नाही. मी आपल्याला विनंती करीत आहे. मी सभागृहातील कामकाजाचे नियम सांगत होतो. सभागृहामध्ये कोणत्याही सन्माननीय सदस्यांनी हरकत व्यक्त केली तर ती माननीय पीठासीन अधिकाऱ्यांनी वा सभागृहाने ऐकायला पाहिजे. एखादा नियम सभागृहाच्या निदर्शनास आणून देणे म्हणजे दमदाटी नाही.

तालिका सभापती : सभागृहाचे कामकाज हे नियमाने चालते, दमदाटीने चालत नाही. ठीक आहे. आपल्याला काय सांगावयाचे आहे ते लवकर सांगा.

श्री.कपिल पाटील : सभापती महोदय, माझी हरकत अशी आहे की, या सभागृहात आपापली मते मांडण्याचा प्रत्येक सदस्याला अधिकार आहे. माननीय मंत्री श्री.दिवाकर रावते यांनी जो शब्दप्रयोग केला त्याला माझी हरकत आहे. माननीय श्री.दिवाकर रावते यांनी औचित्याच्या

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.कपिल पाटील....

मुद्याच्या माध्यमातून सांगितले की, ज्यांना स्वतंत्र विदर्भ राज्य हवे आहे त्यांनी या सभागृहातून चालते व्हावे. हे वाक्य अत्यंत आक्षेपार्ह आहे. महोदय, हे सभागृह नियमाने आणि संविधानाने चालते. त्यातल्या त्यात मी कधीही दमबाजी करीत नाही. मी नेहमी नियम सांगत असतो. पण जर नियम निदर्शनास आणून देणे म्हणजे दमबाजी वाटत असेल तर त्याला माझा इलाज नाही. संविधानाने प्रत्येकाला बोलण्याचे पूर्ण स्वातंत्र्य दिले आहे. परंतु या सर्वोच्च सभागृहात सन्माननीय सदस्यांना बोलण्याचे स्वातंत्र्य नसेल तर ते योग्य नाही. सन्माननीय सदस्यांनी जो मुद्दा मांडला त्या मुद्याविषयी मी कदाचित सहमत नसेल. परंतु त्यांना आपला मुद्दा मांडण्याचा पूर्ण अधिकार आहे. कोणी कोणते मत मांडले पाहिजे हे सांगण्याचा अधिकार राज्य सरकारला नाही. एकाच सरकारमध्ये या विषयी दोन मते असतील तर त्या बाबतची भूमिका स्पष्ट झाली पाहिजे. माननीय मुख्यमंत्र्यांचे किंवा सरकारमधील एका प्रमुख पक्षाचे वेगळ्या विदर्भ राज्याच्या बाजूने मत असेल आणि त्या मताशी माननीय मंत्री श्री.दिवाकर रावते हे असहमत असतील तर त्यांनी सरकारमधून बाहेर पडावे, एवढेच मला म्हणायचे आहे.

(विरोधी पक्षाचे अनेक सन्माननीय सदस्य वेलमध्ये येऊन एकाच वेळी बोलतात.)

तालिका सभापती : मी सन्माननीय सदस्यांना सांगतो की, कृपया आपण आपापल्या जागेवर जाऊन बसावे. आपल्याला केळकर समितीच्या अहवालावरील चर्चा पूर्ण करावयाची आहे की नाही ? मी सन्माननीय विरोधी पक्ष नेते श्री.धनंजय मुंडे यांना बोलण्याची अनुमती दिलेली आहे. त्यांनी आता केवळ केळकर समितीच्या अहवालाच्या अनुषंगानेच आपले विचार व्यक्त करावेत.

नंतर श्री.कांबळे....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

(गोंधळ)

श्री. धनंजय मुंडे (विरोधी पक्ष नेता) : सभापती महोदय, परवापासून केळकर समितीच्या अहवालावर सदनात चर्चा होत आहे. संविधानाच्या अनुच्छेदानुसार अखंड महाराष्ट्राचा असमतोल ठरविण्यासाठी केळकर समितीची स्थापना केली. पूर्वीही अखंड महाराष्ट्राचा असतोल ठरविण्यासाठी व दूर करण्यासाठी अनेक समित्या गठीत झाल्या. दांडेकर समितीची, निर्देशांक समितीची स्थापना झाली आणि त्यानंतर केळकर समितीची सुध्दा स्थापना झाली. सदनात अखंड महाराष्ट्राच्या प्रत्येक प्रदेशातून, प्रादेशिक भागातून सन्माननीय सदस्य येथे आले आहेत. केळकर समितीसारख्या असमतोल विकास ठरविणाऱ्या समितीच्या अहवालात आपल्या भागाची व्यथा, अडचणी समाविष्ट झाल्या नसतील, सारासार विचार केला नसेल तर हे स्वाभाविक आहे, ज्या मातीतून आलो आहोत त्या मातीच्या विकासासाठी अहवालात काही नसेल तर ती माती तरी वेगळी आमच्या कपाळी लावू द्या अशी सन्माननीय सदस्यांनी भूमिका मांडली. अहवालामध्ये फक्त विदर्भाच्याच बाबतीत असमतोल आहे असे दाखविले आहे का ? पूर्वी समित्या गठीत झाल्या त्यातील सर्वात कन्फ्यूज्ड माईंड सेट झालेली, गोंधळलेली, विचलित असलेली ही समिती आहे. समितीने राज्याचा प्रादेशिक असमतोलच चुकविलेला आहे. माननीय राज्यपालांनी ज्या उद्देशासाठी समितीचे गठण केले तोच पूर्ण झालेला नाही. डॉ. विजय केळकर यांच्या अध्यक्षतेखाली महाराष्ट्राच्या समतोल प्रादेशिक विकासाच्या प्रश्नावरील उच्चस्तरीय समिती म्हणजे ही केळकर समिती आहे. समितीमध्ये 14 तज्ज्ञ सदस्य होते. महाराष्ट्रातील असमतोलपणा काढून समतोल विकास व्हावा यासाठी अनेक वर्षे त्यांनी अभ्यास केला.

सभापती महोदय, राज्यातील उर्वरित महाराष्ट्र, मराठवाडा, विदर्भ या प्रदेशाच्या दरडोई उत्पन्नाच्या प्रमाणाचा अभ्यास केला असता असे निदर्शनास येते की, सन 2001 ते सन 2010 च्या दरम्यान मराठवाड्याचे उर्वरित महाराष्ट्राच्या तुलनेत दरडोई उत्पन्नाचे प्रमाण 0.66 टक्क्यांवरून 0.59 टक्क्यांपर्यंत खाली आले. उर्वरित महाराष्ट्राच्या तुलनेत विदर्भाचे दरडोई उत्पन्नाचे प्रमाण 0.82 टक्क्यांवरून 0.76 टक्क्यांपर्यंत खाली आले. हे स्पष्ट आहे की, गोंधळलेल्या परिस्थितीत डॉ. विजय केळकर साहेबांनी या समितीचा अहवाल तयार केला आहे.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

09-04-2015 (असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही) L.2

MSK/ AKN/ AKN/ KTG/ MMP/ पूर्वी श्री. बोर्डे 12:20

श्री. धनंजय मुंडे ....

सभापती महोदय, पहिली गोंधळलेली परिस्थिती अशी आहे की, काही ठिकाणी लोकसंख्येच्या आधारे अनुशेष काढला आहे, काही ठिकाणी तालुक्याच्या आधारे अनुशेष काढला आहे, काही ठिकाणी जिल्हा घटक मानून अनुशेष काढला आहे आणि काही ठिकाणी विभाग मानून अनुशेष काढला आहे. काही ठिकाणी अनुशेष काढताना अतिशय मोठ्या प्रमाणावर विकसित झालेल्या 3 जिल्ह्यांचा संदर्भ देऊन अनुशेष काढला आहे. कोणत्याही एका ठोस निकषावर केळकर समितीचा अनुशेष अहवाल नाही. असमतोल प्रादेशिकपणा ही एकट्या राज्याची परिस्थिती नाही. देशात फक्त एकमेव अखंड महाराष्ट्रामध्ये प्रादेशिक असमतोल झाला आहे असे नही. देशात अनेक राज्ये आहेत की, जेथे प्रादेशिक असमतोल झालेला आहे. सन 1991 नंतर खुल्या आर्थिक धोरणाचा स्वीकार करण्यात आला. त्यामुळे 25 वर्षांत विकास करणाऱ्या घटकांमध्ये शासनाच्या सोबत खाजगी क्षेत्राचा देखील मोठ्या प्रमाणात प्रभाव दिसून येत आहे.

द्वितीय व तृतीय क्षेत्रातील विकास क्षेत्राच्या प्रभावाखाली असल्याचे दिसते. प्रथम क्षेत्र म्हणजे शेती, नैसर्गिक खाणी. द्वितीय क्षेत्र म्हणजे प्रो-इंडस्ट्रीज, औद्योगिक विकास. तृतीय क्षेत्र म्हणजे सेवा. राज्यात विदर्भावर, मराठवाड्यावर वर्षानुवर्षे नेहमीच अन्याय होत गेला आहे हे स्पष्ट दिसत आहे. खानदेशावर, उर्वरित महाराष्ट्रावर अन्याय झाल्याचे दिसत आहे. कोकणावर देखील अन्याय केला आहे. राज्यात फक्त शहरी भागाकडेच जास्त लक्ष का गेले असा माझ्यासारख्या ग्रामीण भागात काम करणाऱ्या कार्यकर्त्याच्या मनात प्रश्न येतो. देशातील काही राज्ये अशी आहेत की, ज्यांनी आजपर्यंत नेहमीच आपल्या राज्यासोबत स्पर्धा केली आहे. राज्याबाहेर कायम चर्चेत राहिलेले, स्पर्धात्मकदृष्ट्या नेहमी तुलना झालेले गुजरात राज्य. या राज्याच्या संदर्भात विचार केला तर सन 1991 मध्ये गुजरातधील 3 जिल्हे, तसेच सुरत व गांधीनगर हे 2 जिल्हे असे एकूण 5 जिल्हे अति विकसित जिल्हे म्हणून होते. 5 जिल्ह्यांत एकूण 36 टक्के लोकसंख्या वास्तव्य करीत होती. मध्य गुजरातमधील मेहसाना व साबरकंठा, दक्षिण गुजरातमधील भरूच व वलसाड आणि सौराष्ट्रातील सर्व जिल्हे असे एकूण 16 जिल्हे मध्यम विकसित जिल्हे होते. प्रत्येक राज्याच्या दृष्टीने असमतोल विकास झाला आहे. केळकर समिती गठीत करण्यात

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

09-04-2015 (असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही) L.3

MSK/ AKN/ AKN/ KTG/ MMP/ पूर्वी श्री. बोर्डे 12:20

श्री. धनंजय मुंडे ....

आली. 3 अति विकसित जिल्ह्यांचा किंवा इतर भागाचा विकास करण्यासाठी निकष लावले गेले. जिल्ह्यांतील एकूण लोकसंख्येचा आधार घेऊन निकष लावले पाहिजे होते.

(नंतर श्री. रोझेकर ....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.धनंजय मुंडे.....

दुसऱ्या बाजूला आदिवासींचा विषय सुध्दा घेतलेला आहे. माझ्या अगोदर अनेक वक्त्यांनी या अहवालावरील चर्चेत भाग घेतला आहे. एकीकडे 3 जिल्हे, एकीकडे आदिवासी, एकीकडे कुपोषित, अशा प्रकारे हा अहवाल गोंधळून गेलेला आहे.

सभापती महोदय, मी या ठिकाणी गुजरातचा संदर्भ देणार आहे. ज्यावेळी गुजरातने समतोल विकास करण्याचे ठरविले त्यावेळी 16 जिल्हे मध्यम विकसित होते, 5 जिल्हे अतिविकसित होते. या 16 जिल्ह्यांमध्ये 48 टक्के लोकसंख्या वास्तव्य करीत होती. डांग, कच्छ, मानसतांडा व पंचमढी हे 4 जिल्हे अविकसित जिल्हे होते आणि 16 टक्के लोकसंख्या तेथे वास्तव्य करीत होती. सन 2010 मधील त्यांच्या आकडेवारीचा विचार केला तर मेहसाणा, बलसाड, भरुच हे मध्यम विकसित मधून अतिविकसित जिल्ह्यांमध्ये समाविष्ट झाले आणि त्याचवेळी विकसित 4 जिल्ह्यांची संख्या वाढून ती 10 पर्यंत गेली.

सभापती महोदय, दांडेकर समितीचा अहवाल आल्यानंतर मागील 25 वर्षात त्या समितीने निर्धारित केलेल्या निर्देशांकानुसार त्या त्या भागांसाठी नियतव्यय सुध्दा देण्यात आला. पण या संदर्भातील सद्य:स्थिती या अहवालात दिसून येत नाही. महाराष्ट्रामध्ये विकासाच्या दृष्टीने फार मोठा असमतोल झाला असेल आणि त्यासंबंधी समिती नेमली गेली असेल तर त्या समितीचा दृष्टीकोन सबंध महाराष्ट्राकडे पाहाण्याचा आणि अखंड महाराष्ट्राच्या विकासाचा असावयास हवा होता. ज्या ठिकाणी विकास झाला आहे, तो डोळ्यासमोर ठेवून दुसऱ्या भागाचा विकास व्हावा, हे स्पष्ट आहे. केळकर समितीने आणि समितीच्या अध्यक्षांनी मात्र त्यांचा दृष्टीकोन अहवालाच्या सुरुवातीलाच स्पष्ट केला आहे. त्यांनी असे म्हटले आहे की, "आमचा अहवाल संबंधित जनतेचे लक्ष अनुशेष निर्मूलन समस्येपासून दूर नेऊन विकासवृध्दी आणि प्रशासन सुधारणेकडे नेण्याचे काम करील." हा उद्देश या समितीचा नाहीच. एकूण महाराष्ट्रामध्ये जो असमतोल विकास झाला आहे, तो विकास येणाऱ्या काळात समतोल करावयाचा असेल तर विकासाची कोणती दिशा ठरवावी, असा या समितीचा उद्देश होता. परंतु, असमतोल विकास झाल्याचे कुठेही अहवालात नमूद केलेले नाही. जे काही या अहवालात आलेले आहे, ते मोघम स्वरुपात आलेले असून स्पष्टपणे त्यासंदर्भातील

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.धनंजय मुंडे.....

अभिप्राय अहवालात कुठेही नाहीत. या अहवालाने सुरुवातीलाच हे सांगितले आहे की, एखादा भाग मागासलेला आहे, याची येथून पुढे चर्चा होणार नाही आणि तेथील जनतेचे लक्ष सुध्दा अनुशेषाकडून विकासाकडे केंद्रित होईल, यासाठी आम्ही हा अहवाल तयार करीत आहोत. त्यामुळे केळकर समिती ज्या उद्दिष्टासाठी नेमली होती, ते उद्दिष्ट आणि केळकर समितीचा अहवाल यामध्ये फरक झालेला आहे.

सभापती महोदय, या अहवालाचे अवलोकन केल्यानंतर असे लक्षात येते की, राज्याच्या विकासासाठी काही क्षेत्रामध्ये मार्गदर्शक ठरेल, अशा सूचनाही या अहवालात आहेत. मी संपूर्ण अहवालावर टीका करणार नाही. पण गोंधळून गेलेल्या परिस्थितीतून या अहवालात एखाद दुसरी गोष्ट नक्कीच राज्याच्या हितासंबंधी आलेली आहे. पण ती फार तुटपुंजी आहे.

सभापती महोदय, समितीने केलेल्या प्रस्तावावरुन अहवालाचा केंद्रबिंदू अनुशेषाकडून अभिवृध्दीवेग आणि मार्गदर्शक सुधारणांकडे वळविण्याचे धोरण या समितीने अवलंबिले आहे. परंतु, राज्यपाल महोदयांनी ही समिती गठीत करीत असताना हा विषय या समितीला दिलेलाच नव्हता. ही समिती विकासाचा वेग वाढविण्यासाठी नेमलेलीच नव्हती. ही समिती राज्याच्या प्रादेशिक असमतोलामुळे निर्माण झालेला अनुशेष भरुन काढण्यासाठी नेमण्यात आली होती.

सभापती महोदय, सुरुवातीलाच या समितीमध्ये काय व्हावे ? या समितीचे एकूण 15 सदस्य होते. समितीचा अहवाल तयार करीत असताना समिती सदस्यांमध्ये काही मूलभूत स्वरुपाचे मतभेद होते. मला माहीत नाही की, या अगोदर या अहवालावर सदनात चर्चा होत असताना या विषयावर चर्चा झाली आहे किंवा नाही, हा विषय कोणी काढला आहे किंवा नाही. पण या समितीच्या एका सदस्यांनी विशिष्ट क्षेत्रातील अनुशेष निर्धारणाकरिता 3 सर्वोच्च जिल्ह्यांची सरासरी हा बेंचमार्क वापरण्यास विरोध केला होता. सुरुवातीलाच या समितीच्या एक सदस्या डॉ.संगिता कामदार यांनी राजीनामा दिला होता. त्यांनी राजीनामा का दिला ? अनुशेष काढण्यासाठी अवलंबिण्यात आलेली पध्दतच अतिशय चुकीची आहे, अशा प्रकारची नाराजी व्यक्त करुन एका सन्माननीय सदस्यांनी राजीनामा द्यावा, यातून आणि आता सदनामध्ये सर्व सन्माननीय सदस्यांनी या अहवालावर केलेल्या चर्चेतून आपल्यासमोर कशा प्रकारे अहवाल आला आहे, याची आपल्याला कल्पना येईल.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.धनंजय मुंडे.....

सभापती महोदय, अनुशेष निर्धारित करीत असताना समितीने प्रत्यक्ष क्षेत्रनिहाय अनुशेष निर्धारित न करता अत्यंत क्लिष्ट अशा प्रकारे अभिप्राय नोंदविले आहेत. हा अहवाल कोणाला समजला मला माहीत नाही. तीन ते चार वेळा अहवाल वाचून सुध्दा मला तो समजलेला नाही, एवढी क्लिष्ट पध्दत यामध्ये वापरलेली आहे. यामध्ये ज्या मार्गदर्शक सूचना घालून दिलेल्या आहेत त्या एवढ्या भयानक आहेत की, कोणत्याही पक्षाचे सरकार आले तरी केळकर समितीचा अहवाल जसाच्या तसा स्वीकारु शकणार नाही, अशी परिस्थिती आहे.

सभापती महोदय, अनुशेष भरुन काढावयाचा असेल तर काय नियोजन केले पाहिजे, या संदर्भात हा अहवाल काय म्हणतो ? या अहवालाने या संदर्भात काय सुचविले आहे ? त्यांनी असे सुचविले आहे की, अगोदर तालुक्याच्या विकासाचा नियोजनाचा आराखडा तयार करा, तालुक्याचा झाल्यानंतर जिल्ह्याचा करा, जिल्ह्याचा झाल्यानंतर विभागाचा करा, विभागाचा झाल्यानंतर राज्याच्या विकासाचा नियोजनाचा आराखडा तयार करा आणि मग राज्याच्या अर्थसंकल्पात त्यासंबंधी तरतुदी करा. आता अशा पध्दतीने विकासाची तूट भरुन काढावयाची असेल तर ही कार्यपध्दती राज्य सरकार म्हणून आपल्याला अवलंबिता येईल का ?

सभापती महोदय, मी आपल्याला शिक्षण क्षेत्राविषयीच्या अनुशेषाच्या संदर्भातील एक उदाहरण देतो. एस.एस.सी.वर्गात आलेल्या विद्यार्थ्यांची संख्या मोजून जर शिक्षणाच्या अनुशेषाबाबत अहवालामध्ये शिफारशी सुचविल्या असतील तर ते योग्य आहे का ? पहिली ते तिसरी पर्यंतच्या इयत्तेत किती विद्यार्थ्यांची गळती होते ? जालना जिल्ह्याचे उदाहरण आपण पहा. 100 विद्यार्थ्यांनी प्रवेश घेतला तर पहिली नंतर तिसऱ्या इयत्तेपर्यंत फक्त 4 विद्यार्थी शिल्लक राहतात. त्यामुळे शिक्षणाचा अनुशेष काढताना याबाबतचा विचार झालेला नाही.

सभापती महोदय, अशा प्रकारे एक मोघम अहवाल तयार करायचा आणि सर्व पध्दतीचा अवलंब करुन अहवाल तयार केलेला आहे, असे दाखवायचे. या अहवालासाठी वेगवेगळ्या पध्दती

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.धनंजय मुंडे.....

वापरलेल्या आहेत, वेगवेगळ्या तरतुदी दाखविलेल्या आहेत. परंतु, या तरतुदींचा राज्याच्या हिताशी काही संबंध नाही, हे या ठिकाणी स्पष्ट होत आहे. कारण, अहवाल तयार करीत असताना ज्या गोष्टी होणे आवश्यक होते, त्या यामध्ये आलेल्या नाहीत.

सभापती महोदय, विविध क्षेत्रातील अनुशेष काढताना समितीने तुलनात्मक अभ्यासासाठी कधी राज्याच्या सरासरीचा वापर केला आहे, कधी राज्यातील पहिल्या 3 जिल्ह्यांच्या सरासरीचा वापर केला आहे, कधी स्वइच्छापूर्त तरतुदी केल्या आहेत. कदाचित हा अहवाल तयार करीत असताना या समितीला आपल्या राज्याच्या सर्व विभागातून जी 10 वर्षाची, 15 वर्षाची माहिती पाहिजे होती, ती मिळालेली दिसत नाही. कदाचित, माहिती मिळण्यास उशीर झाला असावा.

यानंतर श्री.वि.खर्चे.....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

(सभापतीस्थानी माननीय उप सभापती)

श्री.धनंजय मुंडे...

त्या विभागाला सांख्यिकी विभाग असे नाव देण्यात यावे, या विभागासाठी प्रधान सचिव नियुक्त करण्यात यावा. त्या विभागाने ही सर्व माहिती संकलित करावी अशी शिफारस करण्यात आली आहे. समितीला माहिती मिळाली नाही म्हणून अशी सूचना करण्यात आली आहे. अशा प्रकारे राज्यातील अनुशेषाचा अहवाल तयार होऊ शकत नाही. विविध क्षेत्रातील अनुशेष काढताना समितीने भौगोलिक घटक म्हणून कधी महसूल विभाग तर कधी जिल्हा, तालुका अशा कन्फ्युज माईंडने अहवाल तयार केला आहे. समितीने अभ्यासासाठी घेतलेल्या विविध विषयांपैकी आदिवासी क्षेत्र, आरोग्य, शिक्षण, दळणवळण इत्यांदी घटकांचा अनुशेष न काढता विकास दुरत्व काढून शिफारशी केल्यामुळे या घटकांचा अनुशेष कधीही भरुन निघू शकत नाही. सिंचनाच्या अनुशेषाबाबत दोन्ही सभागृहात विदर्भ, मराठवाडा किंवा उर्वरित महाराष्ट्रातील सदस्यांनी आपले मुद्दे प्रकर्षाने मांडले आहेत. या समितीने प्रामुख्याने सन 1960 ते 1982 या कालावधीत तिन्ही प्रदेशातील ओलिताखालील जमिनीचा वार्षिक वाढीचा दर जवळपास सारखाच असल्याचे नमूद केले आहे. सिंचनाचा अनुशेष काढताना ही सर्वात मोठी चूक करण्यात आली आहे. सन 1982 ते 1984 या काळात उर्वरित महाराष्ट्रात त्या मानाने ओलिताखालील जमिनीचा वार्षिक वाढीचा दर इतर प्रदेशापेक्षा अधिक असल्याचे स्पष्टपणे नमूद केले आहे. सन 1994 ते 2001 या कालावधीत उर्वरित महाराष्ट्रात सिंचन वाढीचा वार्षिक दर इतर प्रदेशापेक्षा खूप अधिक राहिल्यामुळे व त्या तुलनेने विदर्भ व मराठवाड्यातील सिंचनाचा वार्षिक वाढीचा दर कमी झाल्यामुळे मोठ्या प्रमाणावर सिंचनाचा अनुशेष निर्माण झाला आहे.

सभापती महोदय, सन 2001 ते 2010 या कालावधीत वृध्दीदराचा कल समानीकरणाकडे राहिल्याचे समितीने नमूद केले आहे. उर्वरित महाराष्ट्रात सन 1960 ते 1982 मध्ये सिंचन क्षेत्रातील वाढीचा वार्षिक दर 0.32 टक्के नमूद केला आहे. सन 1982 ते 1984 या कालावधीत सिंचन क्षेत्रातील वाढीचा वार्षिक दर 0.49 टक्के आहे. सन 1994 ते 2001 या कालावधीत सिंचन क्षेत्रातील वाढीचा वार्षिक दर 0.65 टक्के होता. सन 2001 ते 2010 या कालावधीत सिंचन क्षेत्रातील वाढीचा वार्षिक दर 0.56 टक्के होता.

सभापती महोदय, मराठवाड्यात सन 1960 ते 1982 या कालावधीत सिंचन क्षेत्रातील

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.धनंजय मुंडे...

वार्षिक वाढीचा दर 0.36 टक्के होता. सन 1982 ते 1984 या कालावधीत सिंचन क्षेत्रातील वार्षिक वाढीचा दर 0.32 टक्के होता. सन 1994 ते 2001 या कालावधीत सिंचन क्षेत्रातील वार्षिक वाढीचा दर 0.38 टक्के होता. सन 2001 ते 2010 या कालावधीत सिंचन क्षेत्रातील वार्षिक वाढीचा दर 0.38 टक्के होता. हे मागील सिंचनाचे प्रमाण आहे.

सभापती महोदय, विदर्भात सन 1960 ते 1982 या कालावधीत सिंचन क्षेत्रातील वार्षिक वाढीचा दर 0.25 टक्के होता. सन 1982 ते 1984 या कालावधीत सिंचन क्षेत्रातील वार्षिक वाढीचा दर 0.25 टक्के होता. सन 1994 ते 2001 या कालावधीत सिंचन क्षेत्रातील वार्षिक वाढीचा दर 0.41 टक्के होता. सन 2001 ते 2010 या कालावधीत सिंचन क्षेत्रातील वार्षिक वाढीचा दर 0.48 टक्के होता. सन 2001 ते 2010 या कालावधीत किमान 0.7 टक्क्यांनी का होईना विदर्भातील सिंचनाचा अनुशेष वर आला आहे.

सभापती महोदय, समितीने जलक्षेत्राचा अनुशेष भरुन काढण्यासाठी वार्षिक वित्तीय सूत्राची शिफारस केली आहे. त्यामध्ये वार्षिक योजनेचे आकारमान 65 हजार कोटी रुपये गृहीत धरुन त्यातून विशेष घटक योजना व अनुसूचित जमाती उपयोजनेपोटी द्यावयाची 19.9 टक्के रक्कम वजा करुन उरलेल्या 52,585 कोटी रुपयांतील 30 टक्के रक्कम म्हणजे 15,775 कोटी रुपये जल विकास योजनेसाठी ठेवावी अशी शिफारस करण्यात आली आहे. त्यापैकी 8.5 टक्के निधी म्हणजे 1340 कोटी रुपये विशेष क्षेत्रासाठी राखून ठेवले आहेत. त्यामध्ये खालील प्रमाणे चार विभाग केले आहेत. अतिपाणी तुटीचे तालुके एकूण 44 आहेत.

उप सभापती : 12.45 वाजेपर्यंत सभागृहाची विशेष बैठक होती, त्यामुळे ती वेळ संपलेली आहे. विरोधी पक्ष नेत्यांना मी ऑनलेग ठेवतो. माननीय सभापती यांच्याशी चर्चा करुन अहवालावरील उर्वरित चर्चेची वेळ निश्चित करण्यात येईल. ज्या सन्माननीय सदस्यांना यावर बोलयाचे आहे त्यांनी त्या वेळेत बोलावे.

सभागृहाची विशेष बैठक आता स्थगित होत आहे. सभागृहाची नियमित बैठक दुपारी 1.00 वाजता पुन्हा सुरु होईल.

(सभागृहाची बैठक दुपारी 12.45 ते 01.00 वाजेपर्यंत स्थगित झाली.)

(या नंतर श्री.बोरले...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

(स्थगितीनंतर)

(सभापतीस्थानी माननीय सभापती)

पृ.शी./मु.शी.: तोंडी उत्तरे

<u>ता.प्र.क्र.4009, 2833 व 4809 एकत्रित चर्चेला घेण्याबाबत</u>

श्री.हेमंत टकले : सभापती महोदय, आजच्या तारांकित प्रश्नांच्या यादीतील तारांकित प्रश्न क्र.8, 10 व 17 हे तिन्ही प्रश्न राज्यातील रेशन दुकानातील स्वस्त धान्य वाटपाच्या संदर्भातील आहेत. मला असे वाटते की, हे तिन्ही प्रश्न एकत्रित चर्चेला घेतले तर मंत्री महोदयांना या प्रश्नांचे उत्तर देणे सोपे होईल.

सभापती : सन्माननीय सदस्य श्री.हेमंत टकले यांनी हे तिन्ही प्रश्न एकत्रितपणे चर्चेला घेण्याबाबत सूचना केलेली आहे. आज सकाळी माननीय अन्न व नागरी पुरवठा मंत्री महोदयांसमवेत माझी चर्चा झालेली आहे. त्यांना काही महत्वाचे कामकाज आहे. त्यामुळे आपण प्रथम तारांकित प्रश्न क्रमांक 8 आणि 17 एकत्रितपणे चर्चेला घेऊ.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ग्रामपंचायत देवली (खुर्द) अंतर्गत मौजा टाकळी येथील महिलांनी आमच्या हक्काचे रेशन आमच्याच गावात वितरित करण्याची केलेली मागणी

(८) * **४००९ *श्रीमती* विद्या चव्हाण :** सन्माननीय **अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ग्रामपंचायत देवली (खुर्द) अंतर्गत मौजा टाकळी येथील रेशन कार्डधारक महिलांनी संघटीत होऊन आमच्या हक्काचे रेशन आमच्याच गावात वितरीत करा अशी मागणी कुही तहसील कार्यालयावर मोर्चा नेऊन प्रशासनाकडे केली, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, महिलांच्या मागणीस न्याय मिळण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) अद्याप कोणतीही कार्यवाही केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेतत ?

श्री. गिरीश बापट : (१) होय,
(२) मौजा टाकळी ता.कुही येथे अन्न धान्याचे वाटप करण्याबाबत संबंधित परवानाधारकास सूचना देण्यात आलेल्या असून, त्यानुसार मौ. टाकळी येथे अन्न धान्याचे वाटप सुरळीत सुरु आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

सुरगाणा (जि.नाशिक) येथे प्रजासत्ताकदिनी सार्वजनिक धान्य वितरणातील धान्य जप्त केल्याबाबत

(१७) * **४८०९ *श्री.जयवंतराव* जाधव, श्री.नरेंद्र पाटील, श्री.अनिल भोसले, श्री.हेमंत टकले :** सन्माननीय **अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सुरगाणा (जि.नाशिक) येथे दिनांक २६ जानेवारी, २०१५ रोजी प्रजासत्ताक दिनाच्या दिवशी साडेपाच कोटी रुपयांचे सार्वजनिक धान्य वितरणातील साखर, गहू, तांदुळ इ.वस्तू बाजारात परस्पर विक्रीसाठी जात असताना जप्त करण्यात आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सार्वजनिक धान्य वितरणातील हे हिमनगाचे टोक असून या प्रकरणामुळे राज्यातील रेशनचे धान्य गुजरातमध्ये विकणारी टोळी कार्यरत असल्याचे स्पष्ट झाल्याचे निदर्शनास आले, हेही खरे आहे काय,
(३) असल्यास, प्रश्न भाग (१) व (२) बाबत शासनामार्फत सखोल चौकशी करण्यात आली आहे काय,
(४) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व तद्‌नुसार संबंधितांवर शासनामार्फत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे ?

श्री. गिरीश बापट : (१) सुरगाणा (जि.नाशिक) येथील शासकीय गोदामात ३०,६८२.१७ क्विं. अन्नधान्याचा अपहार झाल्याचे निदर्शनास आल्याने दिनांक २६ जानेवारी, २०१५ रोजी पोलीस स्टेशन, सुरगाणा येथे गुन्हा दाखल करण्यात आला आहे.
(२) नाही.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ता.प्र.क्र.4009 व 4809.....

श्री.गिरीष बापट.....

(३) व (४) सुरगाणा, जि.नाशिक येथील शासकीय गोदामात जिल्हा पुरवठा कार्यालयाच्या लेखा तपासणी पथकाच्या अहवालानुसार २१५५७.४० क्विं. गहू ९०५१.७७ क्विं. तांदूळ व ७३ क्विं. साखर असे एकूण ३०६८२.१७ क्विं. अन्नधान्य पुस्तकी साठ्याच्या तुलनेत कमी आढळून आले आहे. सदर प्रकरणी अपहारात प्रथमदर्शनी सहभागी आढळून आलेले गोदामपाल, सुरगाणा, वाहतूक ठेकेदार व त्यातील भागीदार, वाहतूक प्रतिनिधी, नाशिक रोड/अंबड, पुरवठा निरीक्षक व तहसीलदार, सुरगाणा यांचे विरुध्द पोलीस स्टेशन, सुरगाणा येथे गुन्हा दाखल करण्यात आला असून पोलीस तपास सुरु आहे. अपहारास जबाबदार असणारे संबंधित गोदामपाल, वाहतूक प्रतिनिधी, पुरवठा निरीक्षक व तहसीलदार, सुरगाणा यांना निलंबित करण्यात आले असून त्यांच्या विभागीय चौकशीच्या प्रस्तावाबाबत कार्यवाही सुरु आहे. तसेच सदर अपहारात प्रथमदर्शनी सहभागी असलेले वाहतूक ठेकेदार मे.एस.एन.मंत्री यांचे कंत्राट निलंबित करण्यात आलेले असून सदर वाहतूक कंत्राटास दिलेली मुदतवाढ दि. ०६.०२.२०१५ पासून संपुष्टात आणलेली आहे. अपहारास प्रत्यक्ष जबाबदार असलेल्या सर्व संबंधितांकडून अपहारित धान्याची रक्कम ईकॉनॉमिक कॉस्टने वसूल करण्याचे लेखी निर्देश जिल्हाधिकारी, नाशिक यांना दिले आहेत.

श्री.हेमंत टकले : सभापती महोदय, ग्रामपंचायत देवली (खुर्द) अंतर्गत मौजा टाकळी येथील रेशन कार्डधारक महिलांनी संघटित होऊन आमच्या हक्काचे रेशन गावात वितरित करावे, अशी मागणी केली होती आणि मोर्चाही काढला होता. लेखी उत्तरात असे नमूद केलेले आहे की, "मौजे टाकळी ता.कुही येथे अन्न धान्याचे वाटप करण्याबाबत संबंधित परवानाधारकास सूचना देण्यात आलेल्या आहेत." भविष्यात देखील स्वस्त धान्याचा पुरवठा सुरळीत राहील यासाठी आपण कोणती उपाययोजना करणार आहात ?

श्री.गिरीष बापट : सभापती महोदय, हे खरे आहे की, टाकळी गावात रेशन दुकान आहे. तेथे 78 कार्डधारक आहेत आणि 429 लाभधारक आहेत. टाकळी गावाच्या शेजारी खेंडा नावाचे गाव आहे. तेथे रेशन दुकानदाराचे दुकान होते. खरे म्हणजे, ते दुकान टाकळी येथे पाहिजे होते. म्हणून टाकळी येथील गावाकऱ्यांनी संबंधित अधिकाऱ्यांना भेटून निवेदन दिले होते. त्यानंतर संबंधित अधिकाऱ्यांनी बैठक घेतली आणि आता टाकळी येथील रेशन दुकानदार श्री.रामटेके यांनी टाकळी येथे दुकान सुरु केलेले आहे. आता त्या लोकांना पूर्ण अन्नधान्य मिळत आहे. आता आमची

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ता.प्र.क्र.4009 व 4809.....

श्री.गिरीष बापट.....

तक्रार नाही, असे त्या लोकांनी उत्तर दिलेले आहे. त्या लोकांना टाकळी येथे जावे लागत होते आणि ते अंतर 3 किलोमीटर होते. परंतु, पायवाटेने ते अंतर पाऊण किलोमीटर होते. टाकळी आणि खेंडा येथील दुकानदारांना तालुक्याच्या ठिकाणावरून एकत्रितपणे रेशनिंगचे धान्य आणण्याकरिता वाहतुकीला सोईचे व्हावे, म्हणून त्यांनी हे केले होते. परंतु, आता तेथील लाभधारकांना सोईचे झालेले आहे. त्यांची कोणतीही तक्रार नाही. आता हा प्रश्न निकाली निघालेला आहे.

डॉ.नीलम गोऱ्हे : सभापती महोदय, हे दोन्ही तारांकित प्रश्न अतिशय महत्वाचे आहेत. अन्न व व नागरी पुरवठा विभागाच्या वतीने अनेक वर्षापासून प्रत्येक जिल्ह्यात, तालुक्यात आणि शहरात दक्षता समित्या स्थापन करण्यात येतात. त्या समित्यांमध्ये विद्यमान आमदार, विधानपरिषदेचे आमदार तसेच, स्थानिक महिला संघटनांचे प्रतिनिधी, अनुसूचित जातींचे प्रतिनिधी यांचा समावेश असतो. जेणे करून रेशन दुकानातील तक्रारींच्या संदर्भात लोकांना काही वाव राहतो. परंतु, या समित्या अद्याप पुनर्गठित झालेल्या नाहीत. रेशन दुकानांच्या संदर्भातील दक्षता समित्या कधी पर्यंत गठित होणार आहेत ?

श्री.गिरीष बापट : सभापती महोदय, सर्व डीएसओ आणि संबंधित अधिकाऱ्यांना सूचना देण्यात आलेल्या आहेत. विधानसभेची निवडणूक झाल्यानंतर दक्षता समितीचे पुनर्गठन केले जाते. त्या समित्यांमध्ये महिला प्रतिनिधी, विरोधी पक्षाचे प्रतिनिधी आणि मागासवर्गीय समाजातील लोकांना प्रतिनिधित्व दिले जाते. पुढील महिना दोन महिन्यात या समित्या गठित कराव्यात, अशा सूचना अगोदरच देण्यात आलेल्या आहेत. या समित्या लवकरात लवकर गठित होतील.

श्री.जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, सुरगाणा तालुक्यात तहसीलदार, पुरवठा निरीक्षक, वाहतूक ठेकेदार आणि गोडाऊन किपर यांनी करोडो रुपयांचा अपहार केलेला आहे. सुरगाणा हा आदिवासी भाग आहे आणि आदिवासींचे धान्य खाण्याचे काम त्या ठिकाणी मागील अनेक वर्षापासून सुरु होते. तेथील किती धान्य दुकानदारांचा व अधिकाऱ्यांचा यामध्ये समावेश होता आणि ज्या

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ता.प्र.क्र.4009 व 4809.....

श्री.जयंत प्र.पाटील.....

तहसीलदारांना निलंबित केलेले आहे त्याचे स्टेटस काय आहे ? तसेच, शासन त्या दुकानदारांचे लायसन्स रद्द करणार आहे काय, जी रक्कम वसूल करण्यात आलेली आहे ती किती आहे आणि त्या कर्मचाऱ्यांना कायम स्वरूपी नोकरीतून काढण्याबाबत शासन विचार करणार आहे काय ?

श्री.गिरीष बापट : सभापती महोदय, सुरगाणा येथे जे झाले त्या संदर्भात स्थानिक अधिकाऱ्यांनी माहिती कळविली नाही. मग सचिव पातळीवर निर्णय घेऊन श्री.सुपे, उप सचिव यांच्या नेतृत्वाखाली तेथे एक टीम पाठविण्यात आली आणि त्यांच्याकडून हा संपूर्ण अहवाल प्राप्त झाला आहे. त्यामध्ये असे लक्षात आले की, मागील काही महिन्यांपासून तेथे सतत गैरव्यवहार होत आहे आणि या गैरव्यवहारामध्ये मोठी साखळी आहे. काही तहसीलदार, एफसीआयच्या गोडाऊन मधील काही अधिकारी, काही दुकानदार या सर्वांचा यामध्ये समावेश असल्यामुळे त्या सर्वांच्या चौकशीच्या संदर्भातील कार्यवाही सुरु आहे. हे खरे आहे की, सुरगाणा येथील गोडाऊनची क्षमता 3,500 क्विंटल इतकी आहे आणि सुरगाणा येथे 25-30 हजार क्विंटल माल आल्याची नोंद झाली. सुरगाणा हा आदिवासी भाग आहे. आता ही संपूर्ण साखळी उजेडात आलेली आहे आणि त्या संदर्भात स्पेशल टीम तर जाईलच परंतु, त्यांच्यावर फौजदारी गुन्हे दाखल करण्यात आलेले आहेत. या संदर्भातील 12 लोकांना अटक करण्यात आलेली आहे आणि आता ते जेलमध्ये आहेत. त्यामध्ये तहसीलदार यांचा देखील समावेश आहे. यातील काही व्यापारी आणि काही वाहतूक ठेकेदारांनी न्यायालयाकडून अटकपूर्व जामीन मिळविला आहे. त्यांच्यावर देखील कारवाई सुरु आहे.

श्री.हेमंत टकले : सभापती महोदय, आदिवासींसाठी असलेल्या स्वस्त धान्य वाटपात मोठ्या प्रमाणावर अपहार झालेला असल्यामुळे आपण संबंधित अधिकारी आणि कर्मचाऱ्यांवर कारवाई करावीच. परंतु वाहतूकदार आणि जे इतर लोक आहेत ते जामीन मिळवू शकतात. म्हणून आपण त्यांना मोक्का सारखा कायदा लावणार आहात काय ? आपण त्यांच्यावर कोणती कारवाई करणार आहात की ज्यामुळे असे प्रकार त्वरित बंद होतील ?

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ता.प्र.क्र.4009 व 4809.....

श्री.गिरीष बापट : सभापती महोदय, यामध्ये जो वाहतूक ठेकेदार आहे त्याच्या संदर्भात माहिती गोळा करण्याचे काम डीवायएसपी लेव्हलचे अधिकारी करीत आहेत. विषयाचे गांभीर्य लक्षात घेऊन मी सभागृहाला आश्वासित करतो की, या विषयाच्या संदर्भातील संबंधित अधिकाऱ्यांना आम्ही सस्पेंड करीत आहोत. जिल्हा पुरवठा अधिकारी नाशिक यांच्या अधिपत्यातील सुरगाणा गोदामासंबंधातील कामकाज करणारे 1) श्रीमती भोसले, लेखाधिकारी 2) श्री.खैरनार, सहाय्यक लेखाधिकारी 3) श्रीमती खर्डे, अव्वल कारकून 4) श्रीमती चमनाल, नियतव्ययाशी संबंधित 5) श्रीमती त्रिभुवन 6) श्रीमती सायकर, नायब तहसीलदार हे 6 अधिकारी/कर्मचारी जिल्हाधिकारी आणि डीएसओ यांच्या कार्यालयातील आहेत. या भयानक घोटाळ्यामुळे त्यांना निलंबित करण्याचा निर्णय घेण्यात आलेला आहे. 3 हजार क्षमतेचे गोडाऊन आणि 30 हजार क्विंटल धान्याचा घोटाळा हा एका तालुक्याशी संबंधित नाही. सुरगाणा येथील श्री.रशिद तरवी यांना आपण ऑलरेडी सस्पेंड केलेले आहे. श्री.खैरनार, तहसीलदार, सिन्नर तसेच, श्री.उजागरे नावाचे तहसीलदार निवृत्त झालेले आहेत. त्यांच्यावर देखील गुन्हा दाखल करण्यात येणार आहे. श्री.राठोड, तहसीलदार नाशिक तालुका, श्री.कल्लख, तहसीलदार, पेठ....

यानंतर श्री.भोगले.....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ता.प्र.क्र.3797...

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, शासनामार्फत त्या त्या शाळांसाठी पुस्तके घेतली जातात. ती पुस्तके विद्यार्थ्यांनी वापरल्यानंतर ते घेऊन जातात. ही पुस्तके टेम्पोतून नेऊन भंगारमध्ये विकण्यासाठी नेण्यात येत आहेत असे आढळून आले त्यावेळी चौकशी करण्यात आली. त्यात असे आढळून आले की, त्या विद्यालयाने वितरित न केलेली ही कोरी पुस्तके होती. हा कोऱ्या पुस्तकांचा विषय नाही. कोरी पुस्तके आहेत याचा अर्थ त्या शाळेत तेवढी विद्यार्थी संख्याच नाही. विद्यार्थी संख्या नसताना पुस्तके उरली तर ती पुढच्या शैक्षणिक वर्षामध्ये कमी घेतली पाहिजेत. पण ती संख्या कमी सांगितली तर शिक्षक कमी होतील. त्यामुळे शाळा कमी संख्या सांगत नाहीत आणि पुढच्या वेळी जास्त पुस्तके घेतात. हे शिक्षक गबाळे होते म्हणून सापडलेत. बाकीचे हुशार शिक्षक सापडत नाहीत. तेव्हा अशा सर्वांचीच चौकशी करण्याचा माझा इरादा आहे. पुस्तकाच्या निमित्ताने कोण किती शिक्षक नेमतात हे कळेल. हा जो खोटेपणा करण्यात येत आहे त्या शाळांच्या विरोधात कारवाई करावयाची आहे. त्यास शिक्षक आमदारांनी पाठींबा दिला तर अधिक बळ मिळेल. असा खोटेपणा हा थांबला पाहिजे. तेव्हा याची चौकशी करून महिन्याभरात कारवाई करण्यात येईल.

ॲड.निरंजन डावखरे : सभापती महोदय, भिवंडी-निजामपूर महानगरपालिकेच्या शाळेत घटना घडली असल्याचे लेखी निवेदनामध्ये सांगण्यात आले आहे. महाराष्ट्रात असा प्रकार कुठे कुठे घडत आहे यासंबंधातील तपशील शासन घेणार आहे काय, असा माझा प्रश्न आहे. ही घटना साधारणत: जून जुलै महिन्यामध्ये घडली आहे. तेव्हा यात ताबडतोब कारवाई करण्यात येणार आहे काय ?

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य ॲड.निरंजन डावखरे यांनी विचारलेला प्रश्न खरा आहे. ही घटना खूप आधी घडली आहे. पोलिसांमध्ये तक्रार करण्याचा विषय आल्यानंतर पोलिसांनी एकूण मुले किती होती, किती पुस्तके आली, कुठल्या विषयाची किती पुस्तके आली, त्यापैकी किती वितरित करण्यात आली अशा आशयाची भरपूर प्रकारची माहिती विचारली. सदर माहिती गोळा करण्यासाठी वेळ लागला होता. हा व अन्य असे जे प्रकार उघडकीस आले आहेत त्यासंबंधातील पुढील कारवाई आम्ही एक महिन्यामध्ये करणार आहोत.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.नागो गाणार : सभापती महोदय, या प्रश्नाच्या अनुषंगाने मी नागपूर विभागातील प्रश्न विचारणार आहे. नागपूर विभागात सर्व शिक्षा अभियाना अंतर्गत वितरित होणारी पुस्तके आज पर्यंत विद्यार्थ्यांना मिळालेली नाहीत. यासंबंधी मी वारंवार तक्रारी केल्या आहेत. माझ्या तक्रारीची दखल नागपूर विभाग शिक्षण उप संचालक व नागपूर विभागातील शिक्षणाधिकारी यांनी घेतली नाही. विद्यार्थ्यांना पुस्तकापासून वंचित ठेवणाऱ्या अधिकाऱ्यांविरूद्ध कारवाई केली जाणार आहे काय, असा माझा प्रश्न आहे.

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, हा प्रश्न मूळ तारांकित प्रश्नाशी संबंधित नाही. सभागृहात सन्माननीय सदस्यांनी सांगितलेली माहिती खरी समजून चौकशी करून कारवाई करण्यात येईल.

.....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

उच्च प्राथमिक विभागातील प्रशिक्षित पदवीधरांच्या वेतनश्रेणीबाबत

(2) *३२६२ श्री.रामनाथ मोते, श्री.नागो गाणार, डॉ.अपूर्व हिरे : सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(1) दिनांक १३ फेब्रुवारी, २०१३ च्या शासन निर्णयानुसार उच्च प्राथमिक शाळांसाठी (६ वी ते ८ वी) प्रशिक्षित पदवीधर शिक्षक नेमण्याची तरतूद करण्यात आली, हे खरे आहे काय,
(2) असल्यास, सेवेत असलेल्या अपदवीधरांना पदवीधर होण्याच्या अटीतून वगळण्यात आले आहे, हे खरे आहे काय,
(3) असल्यास, सेवेत कायम असलेल्या अपदवीधर शिक्षकांना ६ वी ते ८ वीसाठी समायोजन न करता त्यांना अतिरिक्त ठरविण्याची कारणे काय आहेत,
(4) उच्च प्राथमिक शाळेतील सर्व प्रशिक्षित पदवीधरांना प्रशिक्षित पदवीधरांची वेतनश्रेणी लागू करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे काय, असल्यास केव्हा,
(5) जिल्हा परिषदेच्या सर्व उच्च प्राथमिक शिक्षकांना पदवीधर वेतनश्रेणी मिळत असून त्याच धर्तीवर माध्यमिक शाळांमधील ६ वी ते ८ वीच्या वर्गासाठी काम करणाऱ्या प्रशिक्षित पदवीधरांना पदवीधर शिक्षकाची वेतनश्रेणी न देण्याची कारणे काय आहेत,
(6) महाराष्ट्र राज्य शिक्षक परिषदेचे कार्यध्यक्ष व कोकण विभाग शिक्षक मतदार संघाचे लोकप्रतिनिधींनी दिनांक ४ जुलै, २०१४ रोजी दिलेल्या निवेदनाच्या अनुषंगाने काय निर्णय घेण्यात आला आहे?

श्री. विनोद तावडे : (१) होय.
(2) नाही.
(3) बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियम, २००९ च्या अनुषंगाने इयत्ता ६ वी ते ८ वी करिता पदवीधन शिक्षक नेमण्याची तरतूद करण्यात आली आहे. अतिरिक्त ठरणाऱ्या अपदवीधर शिक्षकांच्या सेवा समाप्त न करता त्यांचे समायोजन इयत्ता १ ली ते ५ वी या वर्गांवर करण्यात येते.
(4) नाही.
(5) व (६) उच्च प्राथमिक व माध्यमिक शाळेतील इयत्ता ६ वी ते ८ वीला शिकविणाऱ्या प्रशिक्षित पदवीधर शिक्षकांना पदवीधर प्राथमिक शिक्षकांची वेतनश्रेणी देय आहे. मात्र त्यांना पदवीधर शिक्षकाची वेतनश्रेणी लागू करण्यात आली नाही.

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, या प्रश्नाच्या उत्तरात मला आपल्या परवानगी पुढील सुधारणा करावयाची आहे. सदर सुधारणा छोटी दुरुस्ती आहे. उप प्रश्न दोन च्या उत्तरामध्ये "नाही" ऐवजी "होय" असे वाचावे.

सभापती : ठीक आहे.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ता.प्र.क्र.3262

श्री.रामनाथ मोते : सभापती महोदय, या राज्यातील प्राथमिक आणि उच्च प्राथमिक शाळेतील शिक्षकांच्या वेतनश्रेणीचा हा प्रश्न आहे. या प्रश्नासंबंधी मी दिनांक 4 जुलै 2014 रोजी शिक्षण विभागाला एक पत्र लिहिले होते. त्याचा उल्लेख माझ्या लेखी प्रश्नामध्ये देखील आहे. सदर निवेदन मिळाल्याचे शासनाने देखील मान्य केलेले आहे. दिनांक 4 जुलै 2014 रोजीच्या माझ्या पत्राला अजून पर्यंत पोहोच देण्यात आलेली नाही. दोन महिन्यांनी या बाबीला एक वर्ष पूर्ण होईल. अद्यापि मला या पत्रावर शासनाने उत्तर दिलेले नाही. शासनाने कोणती कार्यवाही केली आहे हे न समजल्यामुळे मला हा तारांकित प्रश्न उपस्थित करावा लागला आहे. तेव्हा माझा पहिला प्रश्न असा आहे की, ज्या अधिकाऱ्यांनी माझ्या पत्राची दखल घेतली नाही, लोकप्रतीनिधीच्या पत्राला उत्तर दिले नाही, म्हणून त्या अधिकाऱ्यावर तातडीने कोणती कारवाई करण्यात येणार आहे ?

केंद्र शासनाचा आरटीई संबंधातील कायदा सन 2009 मध्ये आला. आपल्या येथे तत्कालीन शिक्षण मंत्री श्री.दर्डा साहेबांनी दरडावून सांगितल्यानंतर सुद्धा अधिकाऱ्यांनी न ऐकता दिनांक 13 फेब्रुवारी 2013 रोजी शासन निर्णय निर्गमित केला. त्यात आपण शिक्षकांची पात्रता वाढविली आहे. आपण पहिली ते पाचवी पर्यंतच्या शिक्षकांची वेगळी पात्रता आणि सहावी ते आठवी पर्यंतच्या शिक्षकांची वेगळी पात्रता केली आहे. एनसीईटीने स्पष्टपणे आदेश काढले आहेत की, जे शिक्षक सेवेत होते त्यांना यातून वगळण्यात यावे. मी उच्च न्यायालयाच्या आदेशाची प्रत स्वत: मिळविलेली आहे. या शिक्षकांना उच्च अर्हता प्राप्त करण्यामध्ये सूट मिळालेली आहे. ती शासन देणार आहे काय, असा माझा दुसरा प्रश्न आहे.

तिसरा प्रश्न हा वेतनश्रेणी संबंधातील आहे. राज्य शासनाने अर्हता वाढविली आहे. प्राथमिक शाळेमध्ये सहावी ते आठवी पर्यंतचे वर्ग असो किंवा माध्यमिक शाळेमध्ये सहावी ते आठवी पर्यंतचे वर्ग असो त्या शाळांमधील शिक्षकांची पात्रता आपण पदवीधर अधिक डी.एड., बी.एड.ठरविली तर त्यांना पदवीधरची वेतनश्रेणी मिळावी अशा प्रकारचा विषय आहे. आज अनेक प्राथमिक शाळांमधील शिक्षक बी.ए.बी.एड.ची वेतनश्रेणी घेत आहेत. ठाणे जिल्ह्यात 1340 शिक्षक,

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ता.प्र.क्र.3262...

श्री.रामनाथ मोते....

रत्नागिरी जिल्ह्यात 623, सिंधुदुर्ग जिल्ह्यात 1819 पदवीधर बी.ए., बी.एड.ची वेतनश्रेणी घेत आहेत. त्याबद्दल माझा आक्षेप नाही. ती आनंदाची बाब आहे. उच्च प्राथमिक शाळांना जोडलेल्या शिक्षकांना आपण ही वेतनश्रेणी लागू केली असल्यामुळे माध्यमिक शाळांमधील सहावी ते आठवी पर्यंतच्या शाळांमधील बी.ए., बी.एड.धारक शिक्षकांना ही वेनतश्रेणी आपण लागू करणार आहात काय, असल्यास, ती पूर्वलक्षी प्रभावासह लागू करण्यात येणार आहे काय ?

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, माझी आपल्याला विनंती आहे. आम्ही जेव्हा इंजिनिअरिंगला होतो तेव्हा काही विषय ऑप्शनला टाकायची परवानगी होती. तेव्हा वेतनश्रेणीचे सर्व प्रश्न ऑप्शनला टाकण्याची आपण मला अनुमती द्यावी. नाही तर मग या प्रश्नांसंबंधी आपण अर्धा तास चर्चा घेण्यास अनुमती द्यावी. प्रश्नोत्तराच्या तासामध्ये वेतनश्रेणीचे प्रश्न मार्गी लागूच शकत नाही. एवढे यामध्ये कन्फ्युजन असते. यामध्ये डिटेलिंगमध्ये जावे लागते. त्यामुळे....

श्री.विक्रम काळे (बसून) : सभापती महोदय, माननीय मंत्र्यांनी अभ्यास करून यावे.

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, आता सन्माननीय सदस्य श्री.विक्रम काळे यांनी आम्हाला अभ्यास करून यावे असे सांगणे कितपत योग्य आहे ? त्यांच्या लातूरमध्ये बोगस संस्था भरपूर असून त्या शोधता शोध्ता तोंडाला फेस आला. तरी पण....

श्री.विक्रम काळे : सभापती महोदय, मी त्या दिवशी सुद्धा सभागृहामध्ये माननीय मंत्री श्री.विनोद तावडे यांना सांगितले आहे की, आपण राज्याचे शिक्षण मंत्री आहात. त्यांच्याकडे पाच विभाग आहेत म्हणून असे काही होत आहे काय अशी शंका वारंवार येऊ लागली आहे. लातूर शिक्षण पॅटर्न हा महाराष्ट्रात गाजला आहे. आज केंद्रीय शिक्षण मंत्र्यांना देखील तेथील कॉलेजमध्ये प्रवेश मिळवून देण्यासाठी फोन करावा लागतो. अशी गुणवत्ता लातूरची आहे. जे काही चुकीचे असेल ते आपण दुरुस्त करावे. त्यांना शिक्षा देण्यामध्ये आमचे काहीही म्हणणे नाही. पण अशा प्रकारे हेत्वारोप करणे बरोबर नाही.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ता.प्र.क्र.3262...

श्री.माणिकराव ठाकरे : सभापती महोदय, माझा पॉईंट ऑफ ऑर्डर आहे. सन्माननीय मंत्री श्री.विनोद तावडेजी हे नेहमीच हसत खेळत उत्तरे देतात त्याबद्दल काही प्रश्नच नाही. त्यांनी लातूर मध्ये बोगस शिक्षण संस्था आहेत असा उल्लेख केला आहे. लातूर जिल्ह्यामधील सर्वच शिक्षण संस्था बोगस आहेत त्यातून त्यांनी अर्थ काढणे योग्य नाही. मला असे वाटते की, हे जे वक्त्व्य आहे ते कामकाजातून काढून टाकले पाहिजे किंवा त्यांनी माघार घेतली पाहिजे. जे चुकीचे कामकाज करीत असतील त्यांच्यावर आपण कारवाई करावी. कारण शेवटी शासन म्हणून ती आपली जबाबदारी आहे. परंतु, संपूर्ण जिल्हाच असा आहे असे म्हणणे बरोबर नाही

सभापती : मी आपल्या मुद्याची नोंद घेतली आहे.

यानंतर श्री.जुन्नरे....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ता.प्र.क्र.: 3262.....

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, माझे म्हणणे एवढेच होते की, लातूर येथील एका शिक्षणाधिकाऱ्याने बोगस तुकडया निर्माण करुन तेथे बोगस 300-350 शिक्षक नेमले. या 300-350 शिक्षकांचा प्रश्न सोडवता सोडवता माझ्या तोंडाला फेस आला. लातूर येथे बोगस शिक्षक नेमले असून ते काढा असा प्रश्न तेथून निवडून येणाऱ्या लोकप्रतिनिधींनी उपस्थित केला नाही त्यामुळे माझा उल्लेख तेवढयापुरता होता. सामान्य माणसाच्या घामाचा पैसा कोणीतरी बोगस शिक्षक नेमून पसार करतो याबद्दल माझ्या मनात खंत आहे. या विषयासंदर्भात माझे एवढयापुरतेच मत आहे. लातूर पॅटर्न तर आमच्या गोपाळराव पाटलांचाच आहे. लातूर पॅटर्नचे आम्ही कौतुक केलेले आहे. मुंबई-पुण्याच्या पुढे जाणाऱ्या लातूरचे कौतुक मी प्रथम केलेले आहे. त्यावेळी मी विद्यार्थी चळवळीत काम करीत होतो. मी केवळ लातूर जिल्हयाच्या या बोगस संस्थेच्या बाबतीत उल्लेख केलेला आहे. त्यामुळे आपला या बोगस शाळेला पाठिंबा आहे काय ? लातूरमध्ये ज्या बोगस संस्था आहेत, त्यासंदर्भात तेथील लोकप्रतिनिधींनी प्रश्न उपस्थित केला नाही त्यांनी मला अभ्यास करावयास कशाला सांगावयास पाहिजे. या प्रश्नाच्या संदर्भात मीच अभ्यास केला, एवढेच मी सांगितले आहे.

सभापती महोदय, मी उच्चारलेले जे शब्द आपल्याला योग्य वाटत नाही ते कामकाजातून काढावेत व जे योग्य शब्द असतील ते ठेवावेत. आपल्याला पूर्ण अधिकार आहे.

सभापती महोदय, आरटीईचा कायदा आल्यानंतर 11+2+2 होते तसेच 10+2+3 आल्यानंतर त्या त्या पध्दतीने प्रश्न निर्माण झाले परंतु हे प्रश्न आरटीईमुळे निर्माण झाले आहेत. अगोदर इयत्ता पाचवी, सहावी व सातवीच्या शिक्षकांसाठी पदवीधरची अट नव्हती परंतु आरटीईच्या कायद्यामुळे ही अट आली. ही अट आल्यानंतर मुळात जे अगोदरचे शिक्षक आहेत त्यांचे काय करावयाचे ? मग त्यांना पहिली ते पाचवीपर्यंत सरकवण्याचा प्रयत्न करण्यात आला. आता सहावी, सातवी आठवीच्या वर्गाकरिता पदवीधर शिक्षक पाहिजे तर तो विज्ञान शिकवणारा पदवीधर पाहिजे. आता अनेक शाळांमध्ये आर्टस्चे शिक्षकच सायन्सचा विषय शिकवित असतात. यामध्ये फार कॉम्प्लीकेशन्स आहेत. विद्यार्थ्यांना चांगले शिक्षण मिळाले पाहिजे यासाठी आरटीईचा कायदा आलेला आहे. आरटीईच्या कायद्याची अंमलबजावणी विद्यार्थ्यांना चांगल्या प्रकारे शिक्षण मिळावे यासाठी केला तर त्यासंदर्भात कोर्टातून आदेश मिळतो. अगोदरचे जे शिक्षक आहेत त्यांना कमी केले जात नाही. परंतु नवीन कायद्याची अंमलबजावणी करण्याचा प्रयत्न केला तर लोक कोर्टात

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. विनोद तावडे....

जातात. या शिक्षकांची आता नोकरीच जाणार या कारणासाठी स्टे घेतला जातो व या शिक्षकांची नोकरी घालवू नका असे सांगितले जाते. कोणत्याही शिक्षकाची नोकरी न जाता आरटीईचे जे स्पिरिट आहे त्यानुसार आपण अंमलबजावणी करण्याचा प्रयत्न करीत आहोत. आता आपण शैक्षणिक अर्हता वाढवली याचा अर्थ या शिक्षकांचे काम वाढवले असा होतो काय ? या शिक्षकांना त्याच मुलांना शिकवायचे आहे. मुलांना अगोदरच्या सारखेच शिकवायचे असेल तर वेतनवाढीची मागणी कशासाठी केली जाते ते मला काही कळत नाही. परंतु यासंदर्भात मी चर्चा करण्यास तयार आहे. या ठिकाणी सन्माननीय सदस्यांनी सांगितल्या प्रमाणे यासंदर्भात अधिकाऱ्यांची चौकशी करतो व यासंदर्भात पुढील कारवाईही तातडीने करतो. यापुढे आर्टस्‌चा पदवीधर शिक्षक विज्ञान शिकवण्यासाठी न ठेवता यासंदर्भात नवीन शिक्षकांची जी काही भरती होईल ती विज्ञान पदवीधरांचीच होईल एवढेच मी या निमित्ताने सांगू इच्छितो.

श्री. कपिल पाटील : सभापती महोदय, माननीय मंत्र्यांनी दुसरे उत्तर दुरुस्त केल्यामुळे एक प्रश्न निर्माण झालेला आहे. तसेच पाच व सहाच्या लेखी उत्तरामध्ये विसंगत उत्तर आलेले आहे. दुसऱ्या प्रश्नाचे उत्तर "नाही" चे "होय" करण्यात आलेले आहे. पदवीधर होणे हे कायदेशीर बंधन आहे. मात्र राज्यसरकारने यासंदर्भात जीआर काढला. मुंबईमध्ये आम्ही दीड हजार शिक्षकांना पदवीधर केल्यामुळे हे दीड हजार शिक्षक पात्र ठरतात. मुंबईमध्ये विज्ञान शिकवणारे शिक्षक बी.एससी. आहेत. ज्या शिक्षकांनी पदवी प्राप्त करण्यासाठी कॉलेजमध्ये प्रवेश घेतला त्यांना मुदतवाढ दिली जाणार का ? पाचव्या व सहाव्या प्रश्नाच्या संदर्भात त्यांनी असे म्हटले आहे की, "वेतनश्रेणी देय आहे, मात्र लागू करण्यात आली नाही." त्यामुळे ही जी विसंगती आहे ती दूर केली जाणार आहे काय ?

श्री. विनोद तावडे : सभापती महोदय, यशवंतराव चव्हाण मुक्त विद्यापीठामध्ये विज्ञान विषय शिकवला जात नव्हता. परंतु यासंदर्भात आम्ही त्यांच्याशी चर्चा केली असून त्या ठिकाणी विज्ञान विषय शिकवण्याचे त्यांनी आता मान्य केले आहे. त्यामुळे शासनाने यासंदर्भातील अडचण दूर केली असून याचे कौतुक सर्व शिक्षक आमदार करतील अशी माझी अपेक्षा आहे.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.विनोद तावडे .....

सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी वेतनश्रेणीचा उल्लेख केलेला आहे परंतु त्यामध्ये काही फरक आहे. त्यामुळे यासंदर्भात एकत्र विचार करुन प्रश्न सोडविण्याची गरज असून हा प्रश्न मी निश्चितपणे सोडवणार आहे एवढे मी या निमित्ताने सांगू इच्छितो.

श्री. जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, वेतनश्रेणी वाढविताना शिक्षकांना तासिका कमी दिलेल्या आहेत. शिक्षकांनी वाचन, मनन आणि चिंतन करुन विषय शिकवायचा असतो त्यामुळे यासंदर्भात विचार करुन धोरण ठरविले जाणार आहे काय ? किती शिक्षकांनी वाचन,मनन आणि चिंतन केलेले आहे ?

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, यासंदर्भात शासनाच्या वतीने श्री. जयंत पाटीला यांच्या वतीने समिती नियुक्त करुन ते म्हणतील त्याप्रमाणे आम्ही निर्णय राबवू.

श्री. रामनाथ मोते : सभापती महोदय, प्राथमिक शाळेतील बी.ए.बीएड.चा शिक्षक बी.ए.बीएड. चे स्केल घेतो परंतु त्याच शाळेत पाचवी ते आठवीचे वर्ग जोडले गेले आहेत. त्या वर्गांना शिकवणारा, त्याच निकषानुसार आलेला शिक्षकाला मात्र बी.ए.बीएड. चे स्केल मिळत नाही. त्यामुळे हा भेदभाव आपण दूर करणार आहात काय ? शासनाने दि. 20 ऑगस्ट, 2013 मध्ये जे सेवेत आहेत त्यांना उच्च अर्हता प्राप्त करण्याची अट लागू नाही अशा प्रकारचे जे परिपत्रक काढलेले आहे त्या परिपत्रकाची आपण अंमलबजावणी करणार काय ?

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, आरटीईतील नवीन नियमामुळे वेगवेगळे फाटे फुटत आहेत. घटनेप्रमाणे आपल्याला बदल करता येणार नाही. परंतु हे करीत असताना शिक्षणाच्या दर्जामध्ये फरक होणार नाही याचा विचार करुन त्यासंदर्भात सगळयांना एकत्रित बसवून, विश्वासात घेऊन निर्णय केला जाईल एवढे मी या निमित्ताने सांगू इच्छितो.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

राज्यात अनुदानित शैक्षणिक संस्थांमधील कर्मचा-यांना

वरिष्ठ वेतन श्रेणीचा लाभ देण्याबाबत

(३) * **२८८७ *डॉ.सुधीर* तांबे, श्री.विक्रम काळे, श्री.सतिश चव्हाण, श्री.संजय दत्त, श्री.अशोक उर्फ भाई जगताप, श्री.मुझफ्फर हुसैन सय्यद** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातत शासकीय कर्मचाऱ्यांना २४ वर्षे सेवा पूर्ण केल्यानंतर वरिष्ठ वेतन श्रेणीचा लाभ मिळतो, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, अनुदानित शैक्षणिक संस्थांमधील कर्मचा-यांना (शिक्षकेतर) शासकीय कर्मचाऱ्यांप्रमाणे वेतन श्रेणीचा लाभ मिळत नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, वरिष्ठ वेतनश्रेणीमध्ये तफावत असण्याची कारणे काय आहेत,
(४) असल्यास, अनुदानित शैक्षणिक संस्थांमधील कर्मचा-यांना (शिक्षकेतर) शासकीय कर्मचाऱ्यांप्रमाणे वेतन श्रेणी देणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) अद्याप, याबाबत कोणतीच कार्यवाही करण्यात आली नसल्यास त्याची कारणे काय आहेतत?
श्री. विनोद तावडे : (१) होय, हे खरे आहे.
(२) होय, हे खरे आहे.
(३) व (४) सदर बाब शासन स्तरावर विचाराधीन आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

डॉ.सुधीर तांबे : राज्यामध्ये आपण शासकीय कर्मचाऱ्यांना कालबध्द पदोन्नती देत असतो. राज्यातील लाखो शासकीय कर्मचाऱ्यांना आणि शिक्षकांना आपण २४ वर्षानंतर वेतनश्रेणी देतो परंतु शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना आपण पदोन्नती देत नाही. आपण निर्णय घेताना समान काम, समान वेतन व समान सवलती अशा प्रकारचे तत्व लावले तर अशा प्रकारचे प्रश्नच निर्माण होणार नाही. त्यामुळे अशा ज्या काही विसंगती आहेत त्या दूर केल्या तर बरेचसे प्रश्न कमी होतील. त्यामुळे सर्व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना आपण अशा प्रकारची वेतनश्रेणी देणार आहात काय ?

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. तांबे साहेबांनी विचारलेला प्रश्न योग्य आहे. यामध्ये जी काही विसंगती आहे ती दूर करताना खालच्याला वर आणले किंवा वरच्याला खाली आणले तर विसंगती दूर होते. विसंगती दूर करावयाची असेल तर ती नियमाने केली पाहिजे. शासकीय कर्मचारी नोकरीत आल्यानंतर प्रथम तो लिपिक होतो त्यानंतर वरिष्ठ लिपिक होतो अशा प्रकारे त्याचे प्रमोशन होत जाते. जसजसे प्रमोशन होत जाते तस तसे त्याचे काम सुध्दा वाढत जाते. मात्र शिक्षक म्हणून काम पत्करले तर त्या शिक्षकाला तेच काम करावे लागते. शिक्षकाचे शिकवण्याचे काम वाढत नाही. वाचन,मनन आणि चिंतन केले तरी देखील शिक्षकाचे काम वाढत नाही.

यानंतर श्री. अजित....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ता.प्र.क्र. 2887...

श्री.विनोद तावडे....

जे शिक्षकेतर कर्मचारी आहेत जसे प्रयोगशाळा सहायक, शिपाई यांच्या कामात वाढ होत नाही. तरीही त्यांच्या वेतनामध्ये वाढ झाली पाहिजे असा आग्रह आहे. एखादा उमेदवार प्रयोगशाळा सहाय्यक या पदासाठी अर्ज करतो त्यावेळी त्याला माहीत असते की, आपल्याला भविष्यात पदोन्नती मिळणार नाही. तरीही देखील त्यांना वरिष्ठ वेतनश्रेणीचा लाभ देण्याबाबत अनेक संघटना आणि आमदारांकडून मागणी होते. आपण जी बैठक बोलाविली आहे त्यामध्ये या विषयाचा समावेश करून या प्रश्नाच्या संदर्भातील विसंगती कशी दूर करता येईल यादृष्टीने प्रयत्न करण्यात येईल.

श्री.विक्रम काळे : सभापती महोदय, माननीय मंत्र्यांनी चांगले उत्तर देण्याचा प्रयत्न केलेला आहे. परंतु त्यांनी दिलेल्या उत्तरामध्ये थोडी विसंगती आहे. ही लेन्थ ऑफ सर्व्हीस आहे. 12 आणि 24 वर्षे सेवा झाली की वरिष्ठ श्रेणी आणि निवडश्रेणी मिळते. जास्त सेवा केली म्हणून ही वेतनश्रेणी दिली जाते. शासकीय शाळांतील शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना अशी वेतनश्रेणी मिळते. तेव्हा शासकीय शाळांतील शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना जशी वेतनश्रेणी मिळते त्याप्रमाणे खाजगी शाळांतील शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना वेतनश्रेणी देण्यात येईल काय ? माझा दुसरा प्रश्न आहे की, आपण शिक्षकांना 12 आणि 24 वर्षे सेवा झाली की त्यांना वरिष्ठ श्रेणी आणि निवडश्रेणीचा लाभ देतो. परंतु निवडश्रेणी देताना 20 टक्क्यांची अट घातलेली आहे. एका शाळेतील 10 शिक्षकांची 24 वर्षे सेवा झाली तर त्यातील सर्वच शिक्षकांना त्याचा लाभ मिळत नाही. तेव्हा ही अट काढून टाकण्यात येईल का ? तसेच पदव्युत्तर होण्याची अट घातलेली आहे. म्हणजे 24 वर्षे सेवा झाल्यानंतर पदव्युत्तर व्हायचे का ? हा कोणता तुघलकी निर्णय आहे ? समजा एखादा शिक्षक बी.एससी झाला असेल तो कॉलेजमध्ये जाऊन पी.जी.करु शकत नाही. ही जाचक अट काढून टाकणार काय ?

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, लेन्थ ऑफ सर्व्हीसमुळे वेतनश्रेणीत वाढ केली पाहिजे हा कोणता न्याय आहे हे मला समजत नाही. शिक्षक स्वत:ला अपग्रेड करणार असतील तर त्यांना जास्तीची वेतनश्रेणी मिळणार आहे. कायदा बनविणाऱ्यांनी तो विचारपूर्वक बनविलेला आहे. आपण कोणताही विचार न करता तो काढून टाकणे बरोबर आहे का ?

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

शासकीय तंत्रनिकेतनमध्ये कार्यरत कंत्राटी अधिव्याख्यात्यांच्या

सेवा नियमित करणेबाबत

(४) ****३७७३ *श्री.विक्रम* काळे, श्री.हेमंत टकले, श्री.प्रकाश गजभिये, डॉ.सुधीर तांबे, ॲड.जयदेव गायकवाड, श्री.अमरसिंह पंडित, श्री.ख्वाजा बेग, श्री.सतीश चव्हाण, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी : तारांकित प्रश्न क्रमांक २१९२९ ला दिनांक १६ डिसेंबर, २०११ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात:*** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शासकीय तंत्रनिकेतनमध्ये कार्यरत कंत्राटी अधिव्याख्यात्यांच्या सेवा नियमित करणेबाबत मा. सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या निर्णयाच्या अनुषंगाने शासनाने केलेल्या कार्यवाहीचे स्वरुप काय आहे,

(२) उपरोक्त प्रकरणी अद्याप कोणतीच कार्यवाही केली नसल्यास, होणाऱ्या विलंबाची सविस्तर कारणे काय आहेत ***?***

श्री. विनोद तावडे : (१) मा.उच्च न्यायालय, मुंबई खंडपीठ नागपूर यांनी याचिका क्र. २०४६/२०१० मध्ये दिलेल्या आदेशाच्या अनुषंगाने मा.सर्वोच्च न्यायालयाने विशेष अनुमती याचिका क्र.३९०१४/२०१३ वर दि.०६/०१/२०१५ रोजी दिलेल्या आदेशानुसार याचिकेतील ९१ याचिकाकर्त्यांपैकी दि. १५/१०/२०१३ रोजी कंत्राटी सेवेची ३ वर्षे पूर्ण केलेली व अद्याप कार्यरत असलेल्या ६२ कंत्राटी अधिव्याख्यात्यांच्या सेवा शासन निर्णय क्र. न्यायाप्र-२०१०/प्र.क्र.११०/२०१० (ब)/तांशि-७, दि. १४/०१/२०१५ अन्वये नियमित करण्यात आल्या आहेत. तसेच शासन निर्णय क्र. न्यायाप्र-२०१०/प्र.क्र.११०/२०१० (ब)तांशि-७, दि. २३/०१/२०१५ अन्वये सेवा नियमित करण्यात आलेल्या ६२ अध्यापकांची पदस्थापना करण्यात आलेली आहे.

(२) प्रश्न उद्‌भवत नाही.

श्री.विक्रम काळे : सभापती महोदय, शासकीय तंत्रनिकेतन कंत्राटी अधिव्याख्यात्यांच्या सेवा नियमित कराव्यात असा माननीय सर्वोच्च न्यायालयाने निर्णय दिल्यानंतर सरकारने तसा निर्णय घेतलेला आहे. त्यांच्या सेवा नियमित करण्यासाठी जी.आर.काढला त्याबद्दल मी मंत्री महोदयांचे आभार मानतो. परंतु त्यामध्ये तीन वर्षे पूर्ण होण्याची अट घातलेली आहे. आज राज्यातील अनेक तंत्रनिकेतनामध्ये शिक्षकांची कमतरता आहे. आम्हाला शिकवण्यासाठी शिक्षक नाहीत अशा तक्रारी विद्यार्थ्यांकडून आलेल्या आहेत. ज्यांची सेवा तीन वर्षापेक्षा कमी झालेली आहे, परंतु ते पात्र आहेत

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ता.प्र.क्र.3773...

श्री.विक्रम काळे...

अशा कंत्राटी अधिव्याख्यातांच्या सेवा नियमित करण्यात येईल काय ? उच्च व तंत्र शिक्षण विभागाचा कार्यभार देखील याच मंत्री महोदयांकडे आहे. आपण शासकीय तंत्रनिकेतनमधील कंत्राटी अधिव्याख्यातांच्या सेवा नियमित केल्या त्याप्रमाणे शासकीय जनरल महाविद्यालयामध्ये कंत्राटी अधिव्याख्यात्यांच्या सेवा देखील नियमित करण्यात येतील काय ? कारण त्यांनी पी.एच.डी., नेटसेट केलेले आहे. शासनाच्या नियमाप्रमाणे ते पात्र आहेत. असे एकूण 90 कंत्राटी अधिव्याख्याते आहेत. त्यांची सेवा सुद्धा नियमित करण्याचा निर्णय घेण्यात येईल का ?

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, ज्यांची सेवा तीन वर्षे होईल त्यांना तो लाभ देण्यात येईल. न्यायालयाने सुद्धा ज्यांची तीन वर्षे सेवा पूर्ण झालेली नाही त्यांना सुद्धा संरक्षण दिलेले आहे. त्यामुळे त्यांना कमी करण्याचा प्रश्न येत नाही. यामध्ये अडचण अशी झाली होती की, एमपीएससी कडून उमेदवार न मिळाल्यामुळे विद्यार्थ्यांचे नुकसान होऊ नये म्हणून संस्थांनी कंत्राटी पद्धत्ीने अधिव्याख्यातांची पदे भरली. इतक्या वर्षाची सेवा झाल्यामुळे ते न्यायालयात गेले. न्यायालयाने त्यांच्या बाजूने निवाडा दिला. एमपीएससी परीक्षेमध्ये 87 उमेदवार पास झाले. एमपीएससीने निर्णय घोषित करणे आणि त्यांना नियुक्ती देणे या कालावधीमध्ये न्यायालयाचा निर्णय आला. त्यामुळे कंत्राटी अधिव्याख्यातांना कायम करण्यात आले. आता आपल्याकडे जागा नसल्यामुळे एमपीएससीची परीक्षा उत्तीर्ण झालेल्या उमेदवारांची नियुक्ती करता येत नाही. मी थोडक्यात उत्तर दिले तर अभ्यास केला नाही आणि सविस्तर उत्तर दिले तर उत्तर लांबवीत आहे असे म्हणतात. थोडक्यात तीन वर्षे सेवा नियमित झाल्यानंतर त्यांची सेवा नियमित करण्यात येईल. सन्माननीय सदस्यांनी शासकीय महाविद्यालयासंबधी जो प्रश्न विचारलेला आहे तो वेगळा विषय आहे.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

राज्यात पहिली ते आठवी पर्यंतचे सर्वच विद्यार्थी पास करण्याच्या धोरणामुळे विद्यार्थ्यांची गुणवत्ता कमी झाल्याबाबत

(५) * **३२०८ *श्रीमती* दिप्ती चवधरी, डॉ.सुधीर तांबे, श्री.आनंदराव पाटील, *ॲड.* हुस्नबानू खलिफे, श्री.रामहरी रुपनवर, श्री.अमरनाथ राजूरकर, श्री.संजय दत्त, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.शरद रणपिसे, श्री.सुभाष झांबड:** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात पहिली ते आठवी पर्यंतचे सर्वच विद्यार्थी पास करण्याच्या शासनाच्या धोरणामुळे शैक्षणिक गुणवत्ता खूपच कमी होत असल्याचे माहे जानेवारी २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शैक्षणिक गुणवत्ता कमी होत असल्यामुळे या धोरणात बदल करण्याबाबत शासनाने कोणता निर्णय घेतला आहे वा घेण्यात येत आहे,

(३) अद्याप, कोणतीच कार्यवाही करण्यात आली नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत?

श्री. विनोद तावडे : (१) हे खरे नाही.

(२) व (३) प्रश्न उद्‌भवत नाही.

ॲड.हुस्नबानू खलिफे : सभापती महोदय, इयत्ता पहिली ते आठवीच्या परीक्षा होत नसल्यामुळे विद्यार्थ्यांच्या गुणवत्तेचे मूल्यमापन होत नाही. नापास करण्यात येत नाही हे लक्षात आल्यामुळे विद्यार्थी अभ्यासाकडे दुर्लक्ष करीत आहेत. त्यामुळे शिक्षणाचा दर्जा खालावला जात आहे. शैक्षणिक गुणवत्ता खूपच कमी होत आहे या प्रश्नाचे उत्तर हे खरे नाही असे दिलेले आहे ते कोणत्या निकषावर दिलेले आहे ? माझा दुसरा प्रश्न असा आहे की, पूर्वीप्रमाणेच इयत्ता पहिली ते आठवीपर्यंच्या परीक्षा घेण्यात येतील का ?

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी अतिशय योग्य प्रश्न विचारलेला आहे. शिक्षण हक्क कायद्यामध्ये परीक्षा घेण्यात येऊ नये म्हटलेले आहे असा गैरसमज पसरलेला आहे. परंतु परीक्षा घेऊ नयेत असे कुठेही म्हटलेले नाही. विद्यार्थ्यांची त्या वयातील मानसिकता लक्षात घेऊन त्यांना नापास करून त्याच वर्गात ठेवू नये असे म्हटलेले आहे. अनेक शाळांमध्ये परीक्षा होत आहेत. परंतु काही शाळांनी विद्यार्थ्यांना नापास करायचे नाही तर मग परीक्षा कशाला घ्यायची असे सोपे उत्तर शोधलेले आहे. सन्माननीय सदस्यांनी सांगितल्याप्रमाणे त्या ठिकाणी

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ता.प्र.क्र.3208...

श्री.विनोद तावडे....

परीक्षा घेणे बंद केलेले आहे. एखादी सामाजिक संस्था सर्वेक्षण करते त्यामध्ये इयत्ता आठवी उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांला वाचता येत नाही, गणित येत नाही असे निष्कर्ष बाहेर येतात आणि ते खरे आहे. विद्यार्थ्यांच्या परीक्षा घेतल्या पाहिजे असे सर्व शाळांना कळविण्यात येईल. आपणास असा चुकीचा अर्थ लावता येणार नाही असेही शाळांना सांगण्यात येईल. परीक्षेमध्ये एखादा विद्यार्थी नापास झाला तर त्या विद्यार्थ्यांसाठी एक महिना विशेष कोचिंग घेऊन त्याला पुढच्या वर्गात जाण्यासाठी जे आवश्यक आहे ते शिकविले पाहिजे असे आरटीईमध्ये म्हटलेले आहे. यामध्ये शिक्षकांचे किंवा मुख्याध्यापकांचे चुकत नाही. मला काही मुख्याध्यापकांनी सांगितले की, आम्ही विद्यार्थ्यांची परीक्षा घेतली. त्यामध्ये विद्यार्थी नापास झाला. त्याला महिनाभर क्लास लावला तेव्हा त्याच्या आईने सांगितले की, आम्हाला गावी जायचे आहे, आम्ही बुकींग केलेले आहे. तुम्हाला विद्यार्थ्यांला पास करायचे आहे ना, मग पास करा. मुख्याध्यापकांनी त्या विद्यार्थ्याच्या आईला सांगितले पाहिजे होते की, एक वर्ष गावी गेला नाही तरी चालेल, परंतु मुलाने क्लासला हजर राहणे आवश्यक आहे आणि असे सांगण्यामध्ये ते कमी पडले असे माझे मत आहे.

यानंतर श्री.बोर्डे..

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ता.प्र.क्र.3208....

श्री.विनोद तावडे....

त्यामुळे प्रत्येक वर्षी परीक्षा घेतली पाहिजे. यापुढे जाऊन सरकार असा विचार करीत आहे की, विद्यार्थ्यांच्या वर्षातून तीन चाचण्या घ्याव्यात. त्यातील दोन चाचण्या शाळांतर्गत आणि एक चाचणी राज्य स्तरावर कोऑर्डीनेट करून पायाभूत चाचणी घ्यावी. या चाचण्यांतून विद्यार्थ्यांची किंवा शिक्षकांची गुणवत्ता नव्हे तर त्या शाळेत शिक्षणाची गुणवत्ता काय आहे, याचा अभ्यास करण्यात येईल. त्या शाळेच्या गुणवत्तेचा स्तर कळला तर त्या शाळेने गुणवत्तेच्या दृष्टीने अजून किती पुढे गेले पाहिजे, त्यासाठी काय प्रयत्न केले पाहिजे आणि सरकारने त्या शाळांना काय मदत केली पाहिजे या सर्व बाबींचा नीटपणे शास्त्रोक्त अभ्यास करून, अशा शाळांची गुणवत्ता वाढविण्याच्या दृष्टीने निश्चितपणे प्रयत्न करण्यात येईल.

प्रा.जोगेंद्र कवाडे : सभापती महोदय, माननीय मंत्र्यांनी या प्रश्नाला चांगले उत्तर दिले आहे. आजच्या काळात विद्यार्थ्यांची परीक्षाच घ्यायची नाही असा प्रवाह निर्माण झाला आहे. इयत्ता आठवी पर्यंत विद्यार्थ्यांना पास करावयाचे आहे. माननीय प्रा.वसंत पुरके हे शालेय शिक्षण मंत्री असताना हा विषय उपस्थित झाला होता. त्यांनी सभागृहात सांगितले होते की, या पध्दतीमुळे इयत्ता आठवीमध्ये गेलेल्या विद्यार्थ्यांपैकी 2.5 लाख विद्यार्थ्यांना अंक आणि अक्षर ओळखता येत नाही. त्यामुळे या पध्दतीविषयी संभ्रम निर्माण झाला आहे. त्यामुळे राज्यातील सर्व शाळांना कळवावयास पाहिजे की, विद्यार्थ्यांना इयत्ता आठवीपर्यंत नापास करावयाचे नसले तरी त्यांच्या वेळोवेळी चाचण्या घेतल्या पाहिजे आणि त्यानंतर त्यांना पुढील वर्गात पाठवावयास पाहिजे. त्यामुळे मी स्पेसिफिक विचारतो की, अशा प्रकारचे निर्देश सर्व शाळांना देण्यात येतील काय ?

श्री.विनोद तावडे : महोदय, नक्की देण्यात येतील.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, नागपूर येथे नियमित अधिष्ठातांची नेमणूक करण्याबाबत

(६) * **२६९६** ***प्रा.अनिल*** **सोले, श्री.नागो** ***पुंडलिक*** **गाणार, श्री.मितेश भांगडिया :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, नागपूर हे आशिया खंडातील सर्वात मोठे रुग्णालय आहे, हे खरे आहे काय
(२)शासकीय वैद्यकीय महाविद्यालय येथे किती जणांना प्रभारी चार्ज देण्यात आला आहे
(३) असल्यास, सदर रुग्णालयात नियमित अधिष्ठातांची नेमणूक होण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ***?***

श्री. विनोद तावडे : (१) शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, नागपूर हे राज्यातील एक मोठे शासकीय रुग्णालय आहे.
(२) सात शासकीय वैद्यकीय महाविद्यालयात रिक्त असलेल्या अधिष्ठाता पदांवर सात सेवाज्येष्ठ प्राध्यापकांना अतिरिक्त कार्यभार देण्यात आलेला आहे.
(३) कार्यवाही सुरु आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

प्रा.अनिल सोले : सभापती महोदय, या प्रश्नाच्या लेखी उत्तरात माननीय मंत्र्यांनी कबूल केले आहे की, सात शासकीय वैद्यकीय महाविद्यालयांमध्ये अधिष्ठातांची पदे रिक्त आहेत. मला या निमित्ताने एवढेच विचारावयाचे आहे की, ही रिक्त पदे भरण्याची कार्यवाही किती दिवस सुरु राहणार आहे आणि किती कालावधीत ही सातही रिक्त पदे नियमितपणे भरण्यात येतील ?

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, वैद्यकीय शिक्षण विभागातील पदे एमपीएससीच्या माध्यमातून भरली जात होती. परंतु त्या ठिकाणी झालेल्या घोळामुळे ही पदे वैद्यकीय शिक्षण विभागानेच परीक्षा घेऊन भरावीत असे ठरले. रिक्त पदांची जाहिरात काढत असतानाच मागच्या सरकारने मराठा आरक्षण लागू केले. मागच्या सरकारने निवडणुकीपूर्वी मराठा आरक्षण लागू केल्यानंतर, त्या आरक्षणानुसार बिंदूनामावली तयार करण्यात आली. या संदर्भातील जाहिरात देणार तितक्यात ही पदे भरण्यास स्टे मिळाला. त्यामुळे ही पदे कशा पध्दतीने भरावीत या

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

09-04-2015 (असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही) T-3

SJB/ KTG/ AKN/ पूर्वी श्री.अजित.... 13:50

ता.प्र.क्र.2696....

श्री.विनोद तावडे....

बाबतचा अभ्यास करण्यास वेळ लागला. रिक्त पदे भरण्याच्या बाबतीत जाहिरात काढण्यात आली आहे. या संदर्भातील प्रक्रिया फास्ट ट्रॅकवर टाकली आहे. कारण एकाच समितीला 600 पदांच्या मुलाखती घेणे शक्य नाही. त्यामुळे त्या त्या विषयाचे एक्स्पर्टस् घेऊन संबंधित डीनच्या अध्यक्षतेखाली समिती गठीत करणार आहेत. त्या समितीने शॉर्टलिस्ट केलेल्या उमेदवारांच्या मुलाखती सर्वोच्च समिती घेईल. या भरती प्रक्रियेत एमपीएससीचे निकष पाळले जातील आणि चांगल्या व्यक्तीच्या नेमणुका होतील. येत्या तीन महिन्यात म्हणजेच 15 ऑगस्ट रोजी झेंडा फडकविण्यासाठी संबंधित अधिकारी त्या ठिकाणी पोहचतील, एवढेच या निमित्ताने सांगतो.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.प्रकाश गजभिये : सभापती महोदय, आजच्या प्रश्नोत्तराच्या यादीतील अनुक्रमांक-7 वरील ता.प्र.क्र.3946 आणि अनुक्रमांक-24 वरील ता.प्र.क्र.3750 हे दोन्ही विषय सारखेच असल्यामुळे ते क्लब करुन एकत्रितपणे चर्चेला घ्यावेत.

सभापती : ठीक आहे.

राज्यात कायम विनाअनुदानातील अशासकीय व्दिलक्षी व्यवसाय अभ्यासक्रम शासनामार्फत राबविण्याबाबत

(७) * **३९४६ *श्री.सतिश* चव्हाण, श्री.हेमंत टकले, डॉ.सुधीर तांबे, श्री.अनिल भोसले, श्री. दीपकराव साळुंखे-पाटील, श्री.अमरसिंह पंडित, श्री.प्रकाश गजभिये, श्री.विक्रम काळे, श्री.ख्वाजा बेग, श्री.धनंजय मुंडे, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात कायम विनाअनुदानातील अशासकीय व्दिलक्षी व्यवसाय अभ्यासक्रम खाजगी संस्थामार्फत राबविण्यात येत आहे हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर संस्था अनुदान पात्र करण्यासाठी शासनाने दिनांक ३ सप्टेंबर, २०१३ रोजीच्या आदेशान्वये आवश्यक ती माहिती शासनाकडे जमा केली आहे, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर माहिती जमा करुन कोणतीच कार्यवाही केली नाही, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, त्याचे स्वरुप काय,
(५) तसेच सदर कायम विनाअनुदानित अशासकीय व्दिलक्षी व्यवसाय अभ्यासक्रम शासनामार्फत राबविणेबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे ***?***

श्री. विनोद तावडे : (१) होय.
(२) होय.
(३), (४) व (५) व्दिलक्षी अभ्यासक्रम राबविणा-या कायम विनाअनुदानित अशासकीय संस्थांना अनुदानित तत्वावर परवानगी देण्यात येत नसल्याने अनुदानास पात्र करण्याची कार्यवाही करण्यात आली नाही.

राज्यातील कायम विनाअनुदानित वरिष्ठ महाविद्यालय व एमसीव्हीसी कनिष्ठ महाविद्यालयांचा कायम शब्द काढण्याबाबत

(२४) * **३७५० *श्री.विक्रम* काळे, श्री.हेमंत टकले, श्री.प्रकाश गजभिये, ॲड.जयदेव गायकवाड, श्री.सतिश चव्हाण, श्री.अनिल भोसले, श्री.ख्वाजा बेग, श्री.अमरसिंह पंडित, डॉ.सुधीर तांबे, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ता.प्र.क्र.3946 व 3750

श्री.विनोद तावडे....

(१) राज्यातील कायम विनाअनुदानित वरिष्ठ महाविद्यालय व एमसीव्हीसी कनिष्ठ महाविद्यालयाचा कायम शब्द काढावा यासाठी शासनस्तरावर निर्णय घेण्याची प्रक्रिया पूर्ण झाली आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) अद्याप कोणतीच कार्यवाही केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ***?***
श्री. विनोद तावडे : (१) याबाबतचा प्रस्ताव अमान्य केला आहे.
(२) व (३) प्रश्न उद्‌भवत नाही.

श्री.विक्रम काळे : सभापती महोदय, या राज्यात अनुदानित कनिष्ठ महाविद्यालयात बायोफोकल विषय शिकविला जातो आणि हा विषय विद्यार्थ्यांच्या भविष्याच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाचा आहे. राज्यातील 1255 महाविद्यालयांमध्ये हा विषय 1 लाख 55 हजार 500 विद्यार्थी शिकत आहेत. मी स्पेसिफिक विचारतो की, पुढील शैक्षणिक वर्ष येण्यापूर्वी बायोफोकल विषयाला अनुदान देण्याबाबतचा निर्णय शासन घेईल काय ?

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, एखादा विषय आणि अभ्यासक्रम कोणत्या कल्पनेने सुरु करावा आणि त्याचे भजं कसे व्हावे याचे मूर्तिमंत उदाहरण म्हणजे बायोफोकल विषय आहे. हा विषय घेतल्यास गुणाचे प्रमाण वाढते. पदवीकडे जाणारी गर्दी कमी व्हावी आणि व्यावसायिक अभ्यासक्रमाकडे विद्यार्थ्यांनी जावे या हेतूने हा विषय सुरु केला. परंतु अगोदर बोर्डात यायला, आता स्कोरींगला आणि नंतर डिप्लोमासाठी प्रवेश मिळण्यास सोपे होते म्हणून हा विषय घेतला जाऊ लागला. वास्तविक पाहता हा विषय सुरु करण्याचा मूळ उद्देश असा होता की, व्यावसायिक अभ्यासक्रम पूर्ण केलेला विद्यार्थी स्वतःच्या पायावर लवकर उभा राहावा. परंतु तसे न होता व्होकेशनलच्या माध्यमातून अनेक विद्यार्थी परीक्षेतील गुणांच्या रॅड ट्रेटसाठी प्रयत्न करतात. मुळात गुणांची रॅड ट्रेट चांगली नाही. या पध्दतीमुळे विद्यार्थी हा परीक्षार्थी झाला आहे. आता विद्यार्थी हा विद्यार्थी राहिला नाही. वास्तविक पाहता आम्हाला विद्यार्थी हा विद्यार्थीच ठेवावयाचा आहे. राज्य सरकारने अशा प्रकारच्या विषयाला किंवा अभ्यासक्रमाला प्रोत्साहन दिले तर विद्यार्थी हे परीक्षार्थी होतील.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ता.प्र.क्र.3946 व 3750

श्री.प्रकाश गजभिये : सभापती महोदय, मी तारांकित प्रश्न क्रमांक 3750 च्या अनुषंगाने विचारतो. या अंतर्गत प्रश्न क्रमांक-1 असा विचारण्यात आला होता की, "राज्यातील कायम विनाअनुदानित वरिष्ठ महाविद्यालय व एमसीव्हीसी कनिष्ठ महाविद्यालयाचा कायम शब्द काढावा यासाठी शासन स्तरावर निर्णय घेण्याची प्रक्रिया पूर्ण झाली आहे काय ?" या प्रश्नाला "या बाबतचा प्रस्ताव अमान्य केला आहे." अशा प्रकारचे लेखी उत्तर देण्यात आले आहे. तसेच प्रश्न क्रमांक-2 व 3 ला "प्रश्न उद्भवत नरही." अशा प्रकारचे लेखी उत्तर दिलेले आहे. माननीय उच्च व तंत्र शिक्षण मंत्र्यांनी जेवढ्या प्रश्नांची उत्तरे दिली त्यावरुन त्यांचा सन्माननीय सदस्य सर्वश्री रामनाथ मोते, नागो गाणार किंवा अन्य शिक्षक प्रतिनिधींना नाराज करण्याचा मानस दिसत नाही. याबद्दल माननीय उच्च व तंत्र शिक्षण मंत्र्यांचे आभार मानले पाहिजे. असा कोणताही प्रश्न नाही की, त्यांनी त्या प्रश्नाला उत्तर दिले नाही. महोदय, विनाअनुदानितच्या अगोदर 'कायम' हा शब्द नोव्हेंबर-2001 मध्ये समाविष्ट केला गेला. तेव्हापासून सर्व विनाअनुदानित महाविद्यालयांना कायम विनाअनुदान तत्त्वावर मान्यता देण्यात आली. हा प्रस्ताव मान्य केला असेल तर, कायदेशीररित्या हा प्रश्न सोडवून 2001 पूर्वीच्या विनाअनुदानित महाविद्यालयांना अनुदान देण्याबाबतचा निर्णय शासन उद्यापर्यंत घोषित करणार काय ?

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.प्रकाश गजभिये यांनी प्रश्नोत्तराच्या यादीतील अनुक्रमांक-24 वरील प्रश्न विचारलेला आहे. सभापती महोदय, आपण सांगितले होते की, प्रश्नोत्तराच्या तासात निदान 10-12 प्रश्नांवर चर्चा झाली पाहिजे. त्यामुळे मी अनुक्रमांक-15 पर्यंत ब्रिफींग घेतले होते. सन्माननीय सदस्य 24 व्या क्रमांकावरील प्रश्न विचारत आहेत. सभापती महेदय, आपण गतिमान पध्दतीने सभागृह चालवित असल्याबद्दल मी आपले अभिनंदन करतो.

नंत श्री.कांबळे...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ता.प्र.क्र.3946 व 3750 ....

श्री. विनोद तावडे ....

एमसीव्हीसीवर अन्याय झालेला आहे. एमसीव्हीसी हे तंत्र शिक्षण विभागाकडे आहे. शालेय शिक्षण विभागाने मान्य केले. ते खाते यापूर्वी वेगळ्या माननीय मंत्र्यांकडे होते. तंत्र शिक्षण विभाग दुसऱ्या माननीय मंत्र्यांकडे होता. त्यामुळे त्याला लागू झाले आणि याला लागू झाले नाही. दोघेही एकाच पध्दतीचे शिक्षक आहेत. परंतु विभाग वेगळे असल्यामुळे त्यांना ते लागू झाले नाही. सदर विषयाबाबत मी सकारात्मक आहे. मात्र 24 तासात काही देऊ शकत नाही. अधिवेशन संपण्याच्या आत हे करावे अशी सन्माननीय सदस्य श्री. विक्रम काळे यांची सवय आपल्याला लागली आहे.

श्री. प्रकाश गजभिये : सभापती महोदय, 'कायम, शब्दाचा प्रश्न आहे. कनिष्ठ व वरिष्ठ महाविद्यालयांच्या संदर्भातील प्रश्न एक झाले आहेत. सन 2002 पासून आपण कायम विनाअनुदान तत्वावर मान्यता दिली आहे. परंतु नोव्हेंबर, 2001 पूर्वीचे महाविद्यालय अनुदानाच्या कक्षेत येत आहेत. माझा प्रश्न एवढाच आहे की, आपण 'कायम' शब्द काढणार का ?

श्री. विनोद तावडे : सभापती महोदय, 'कायम' शब्द काढला की लगेच अनुदान सुरू होते हा भ्रम आमचाही होता. अजून त्यांचे अनुदान देण्याच्या स्थितीत शालेय शिक्षण विभागही नाही आणि अर्थ विभागही नाही. त्यामुळे 'कायम' शब्द काढणे हे केवळ मानसिक समाधान आहे. नंतर गडबड नको. (अडथळा) तुमची त्यावर एखादी निवडणूक निघेल. परंतु मला शिक्षकांना भ्रमात ठेवायचे नाही. शिक्षक तास घेतात. सन्माननीय सदस्यांनी योग्य प्रश्न विचारला आहे.

श्री. विक्रम काळे : सभापती महोदय, माननीय मंत्री म्हणाले की, तुमची यावर निवडणूक निघेल. माननीय मंत्र्यांनी असे हेतू:पुरस्सर बोलणे बरोबर आहे का ? मला त्यांनी निवडून दिले आहे. मी दोन वेळा निवडून आलो आहे आणि तिसऱ्यांदा निवडून येणार आहे.

श्री. विनोद तावडे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांची भूमिका प्रामाणिक आहे. मी नीट अभ्यास करून उत्तर देत आहे. विभाग पैसे देण्याच्या स्थितीत येईल तेव्हा त्याप्रमाणे त्याचा विचार करण्यात येईल.

सभापती : प्रश्नोत्तराचा तास संपला आहे.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

नियम 289 च्या प्रस्तावाच्या सूचनेबाबत

ॲड. निरंजन डावखरे : सभापती महोदय, मी नियम 289 अन्वयेची प्रस्तावाची सूचना दिलेली आहे. शासनाने उल्हासनगर मनपाच्या संदर्भात काढलेली अधिसूचना पूर्वग्रहदूषित आहे असे वाटते. ठाणे जिल्ह्यात 7 मनपा आहेत. कोणत्याही मनपामध्ये सल्लागार समिती नेमलेली नाही. फक्त उल्हासनगर मनपा त्याला अपवाद आहे. पुणे व मुंबई मनपामध्ये सल्लागार समिती आहे. सल्लागार समिती 70 मीटरवरील उंचीच्या संदर्भात आहे. उल्हासनगर मनपासाठी 24 मीटर उंचीची अट घालण्यात आली आहे. अधिसूचनेच्या स्तंभ क्रमांक 2 मधील 24 मीटर उंचीची अट रद्द करण्यात यावी. जेणेकरून उल्हासनगर मनपा क्षेत्रांतील नागरिकांना न्याय मिळेल. वस्तुस्थिती लक्षात घेता शासनाने या बाबतीत तातडीने निवेदन करावे, अशी मागणी मी नियम 289 अन्वये प्रस्तावाच्या सूचनेच्या माध्यमातून करीत आहे.

सभापती : आजच्या दिवसाच्या कामकाजपत्रिकेवर समाविष्ट असलेल्या कोणत्याही बाबीसंबंधात, प्रश्नोत्तराचा तास किंवा इतर सर्व कामकाज स्थगित करण्याबाबत या सूचनेद्वारे सन्माननीय सदस्यांनी दिलेल्या या प्रस्तावातील विषय समाविष्ट नसल्यामुळे मी सूचना आमन्य करीत आहे. तथापि, विषयाचे गांभीर्य लक्षात घेता मी या विषयावर शासनाने उद्यापर्यंत निवेदन करावे असे निदेश देत आहे.

श्री. विनोद तावडे : सभापती महोदय, होय.

श्री. माणिकराव ठाकरे : सभापती महोदय, मी नियम 289 अन्वये दिलेल्या प्रस्तावाच्या सूचनेतील विषय देशाच्या व राज्याच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाचा आहे. जीवनावश्यक 509 औषधांच्या दरात शासनामार्फत भरमसाठ वाढ करण्यात आली आहे. अनेकदा राज्यातील गरिबांना मोठ्या प्रमाणात औषधे हवी असतात. अगोदर देखील औषधांचे दर जास्त होते. मधुमेह, हेपेटायटीस-बी, कर्करोग अशा रोगांसाठी लागणाऱ्या औषधांचे दर वाढविण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

सभापती महोदय, रुग्ण मोठ्या संख्येने मुंबईतील कॅन्सर रुग्णालयात येतात. परंतु त्यांना तेथील औषधांचे दर परवडत नाहीत. शासनाने औषधांचे दर कमी करण्याऐवजी वाढविले आहेत. कर्करोग, मधुमेह अशा महत्त्वाच्या रोगांवरील औषधे महाग झाली आहे. केंद्रीय उद्योग व व्यापार

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. माणिकराव ठाकरे ....

विभागाने सुध्दा याला मान्यता दिली आहे. गरीब माणसांचे बरेच पैसे औषधांवर खर्च होणार आहेत. शासन असे औषधांचे दर वाढवित असेल तर गरीब काय होणार आहे ? अच्छे दिन आयेंगे अशा घोषणेचे काय झाले. सभापती महोदय, हा प्रश्न ज्वलंत आहे. जनतेच्या जीवनमृत्यूशी संबंधित असा हा प्रश्न आहे. राज्यातील जनतेच्या संबंधातील प्रश्न आहे. नियम 289 अन्वये सदनातील सर्व कामकाज बाजूला सारून या विषयावर चर्चा झाली पाहिजे. काही विषयच असे असतात की, ज्यावर चर्चा व्हावी लागते. शासनाने सर्व औषधांचे दर वाढविले आहेत. सदर विषयाच्या संदर्भात सदनात गंभीरपणे चर्चा व्हावी अशी अपेक्षा आहे. नियम 289 अन्वये सदनातील सर्व कामकाज बाजूला सारून हा विषय चर्चेला घ्यावा अशी मी मागणी करतो.

सभापती : या सूचनेद्वारे सन्माननीय सदस्यांनी दिलेल्या प्रस्तावावरील विषय आजच्या दिवसाच्या कामकाजपत्रिकेवर समाविष्ट असलेल्या कोणत्याही बाबीमध्ये समाविष्ट नसल्याने ही सूचना मी अमान्य करीत आहे. याच विषयी एक लक्षवेधी सूचना देखील आहे याची सन्माननीय सदस्यांनी नोंद घ्यावी. सदर विषयाचे गांभीर्य लक्षात घेता या प्रकरणाची शासनाने नोंद घ्यावी असे मी निदेश देत अहे.

श्री. माणिकराव ठाकरे : सभापती महोदय, तो विषय आणि हा विषय वेगवेगळा आहे.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

पृ.शी.: लेखी उत्तरे

मु.शी.: तारांकित प्रश्नासंबंधी अधिक माहिती सभागृहासमोर ठेवणे.

डॉ. रणजित पाटील (संसदीय कार्य राज्यमंत्री) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने "मुंबई राज्य शासनाकडे धान्य ठेवण्यासाठी गोदामे नसल्याबाबत" या विषयावरील श्री. रामदास कदम, वि.प.स. व डॉ. दीपक सावंत, वि.प.स. यांच्या दिनांक 17 एप्रिल, 2013 रोजी उत्तरित झालेल्या तारांकित प्रश्न क्रमांक 38945 ची अधिक माहिती सभागृहासमोर ठेवतो.

सभापती : अधिक माहिती सभागृहासमोर ठेवण्यात आली आहे.

(**प्रेस** : अधिक माहिती छापावी.)

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

पृ.शी./मु.शी. : कागदपत्रे सभागृहासमोर ठेवणे.

डॉ. रणजित पाटील (नगरविकास राज्यमंत्री) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने महाराष्ट्र अर्बन इन्फ्रास्ट्रक्चर डेव्हलपमेंट कंपनी लिमिटेड यांचा सन 2012-2013 व 2013-2014 या वर्षांचा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतो.

सभापती : वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवण्यात आले आहेत.

डॉ. रणजित पाटील : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने "महाराष्ट्र अर्बन इन्फ्रास्ट्रक्चर फंड ट्रस्टी कंपनी लिमिटेड यांचा सन 2012-2013 व 2013-2014 या वर्षांचा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतो.

सभापती : वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवण्यात आले आहेत.

(नंतर श्री. रोझेकर ....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

प्रा.राम शिंदे (गृह (ग्रामीण), पणन, सार्वजनिक आरोग्य व पर्यटन राज्यमंत्री) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने विदर्भ, मराठवाडा आणि उर्वरित महाराष्ट्र यासाठी विकास मंडळे आदेश, 2011 मधील खंड 8 अन्वये कृषी, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभागाचा सन 2013-2014 या वित्तीय वर्षातील योजनेतर व योजनांतर्गत योजनांवरील वैधानिक विकास मंडळनिहाय (अविभाज्य भागासह) प्रत्यक्ष खर्चाचा तपशील सभागृहासमोर ठेवतो.

सभापती : प्रत्यक्ष खर्चाचा तपशील सभागृहासमोर ठेवण्यात आला आहे.

प्रा.राम शिंदे : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने डॉ.बाळासाहेब सावंत कोकण कृषी विद्यापीठ, दापोली यांचा सन 2009-2010, 2010-2011, 2011-2012 व 2012-2013 या वर्षांचा अनुक्रमे अडतिसावा, एकोणचाळिसावा, चाळिसावा व एकेचाळिसावा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतो.

सभापती : अहवाल सभागृहासमोर ठेवण्यात आले आहेत.

प्रा.राम शिंदे : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने महाराष्ट्र कृषी उद्योग विकास महामंडळ मर्यादित यांचा सन 2012-2013 या वर्षाचा सत्तेचाळिसावा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतो.

सभापती : अहवाल सभागृहासमोर ठेवण्यात आला आहे.

श्री.विनोद तावडे (उच्च व तंत्र शिक्षण मंत्री) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर यांचा सन 2012-2013 या वर्षाचा पन्नासावा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतो.

सभापती : अहवाल सभागृहासमोर ठेवण्यात आला आहे.

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर यांचे सन 2013-2014 या वर्षाचे वार्षिक लेखे सभागृहासमोर ठेवतो.

सभापती : वार्षिक लेखे अहवाल सभागृहासमोर ठेवण्यात आले आहेत.

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली यांचा सन 2013-2014 या वर्षाचे वार्षिक लेखे सभागृहासमोर ठेवतो.

सभापती : वार्षिक लेखे सभागृहासमोर ठेवण्यात आले आहेत.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.राजे अम्ब्रीशराव अत्राम (आदिवासी विकास राज्यमंत्री) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने शबरी आदिवासी वित्त व विकास महामंडळ मर्यादित, नाशिक-2 यांचा सन 2009-2010 या वर्षाचा अकरावा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतो.

सभापती : अहवाल सभागृहासमोर ठेवण्यात आला आहे.

श्री.प्रविण पोटे-पाटील (उद्योग राज्यमंत्री) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने महाराष्ट्र लघू उद्योग विकास महामंडळ मर्यादित यांचा सन 2010-2011 या वर्षाचा एकोणपन्नासावा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतो.

सभापती : अहवाल सभागृहासमोर ठेवण्यात आला आहे.

श्री.प्रविण पोटे-पाटील : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ यांचा सन 2011-2012 या वर्षाचा वार्षिक हिशेब सभागृहासमोर ठेवतो.

सभापती : वार्षिक हिशेब सभागृहासमोर ठेवण्यात आले आहेत.

श्री.प्रविण पोटे-पाटील : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ यांचा सन 2013-2014 या वर्षाचे अर्थविवरण पत्रक व कामाचा कार्यक्रम आणि सन 2012-2013 या वर्षाचे सुधारित अंदाज सभागृहासमोर ठेवतो.

सभापती : अर्थविवरण पत्रक, कामाचा कार्यक्रम व सुधारित अंदाज सभागृहासमोर ठेवण्यात आले आहे.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

पृ.शी. : राज्यातील कृषि उत्पन्न बाजार समितीमध्ये शेतमालाच्या खरेदी विक्रीवर आकारल्या जाणाऱ्या अडत व तोलाई व इतर मुद्यांबाबत अभ्यास करण्यासाठी समिती घटित करणे

मु.शी. : राज्यातील कृषि उत्पन्न बाजार समितीमध्ये शेतमालाच्या खरेदी विक्रीवर आकारल्या जाणाऱ्या अडत व तोलाई व इतर मुद्यांबाबत अभ्यास करण्यासाठी समिती घटित करणे या संबंधी माननीय पणन मंत्र्यांचे निवेदन.

श्री.चंद्रकांत पाटील (पणन मंत्री) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने नियम 46 अन्वये पुढील निवेदन करतो :-

(प्रेस : येथे सोबत जोडलेले निवेदन छापावे.)

...4....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

पृ.शी. : थेट पणन व्यवस्थेसाठी शेतकरी व शेतकरी गटांना सवलत

मु.शी. : थेट पणन व्यवस्थेसाठी शेतकरी व शेतकरी गटांना सवलत या संबंधी माननीय पणन मंत्र्यांचे निवेदन.

श्री.चंद्रकांत पाटील (पणन मंत्री) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने नियम 46 अन्वये पुढील निवेदन करतो :-

(प्रेस : येथे सोबत जोडलेले निवेदन छापावे.)

.....5.....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

पृ.शी./मु.शी. : औचित्याचे मुद्दे

स**भापती** : आता औचित्याचे मुद्दे घेण्यात येतील.

श्री.विक्रम काळे : सभापती महोदय, माझा औचित्याचा मुद्दा आहे.

सभापती महोदय, महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यास संशोधन मंडळ (बालभारती) ही शालेय पुस्तक नियमन करणारी महत्त्वाची संस्था आहे. शिक्षण क्षेत्रात या संस्थेचे विशेष असे महत्त्व आहे. या संस्थेचे स्वत:चे बोधचिन्ह आहे. ते प्रत्येक शालेय पुस्तकावर छापलेले असते.

सभापती महोदय, बालभारतीचे हे बोधचिन्ह प्रसिध्द दिग्दर्शक श्री.श्लोक शर्मा यांनी 'हरामखोर' या चित्रपटाच्या पोस्टरसाठी वापरले आहे, हे अत्यंत खेदजनक आहे. 'हरामखोर' हा शब्द 'शिवी' साठी वापरला जातो. त्यामुळे शिक्षण क्षेत्राचे पावित्र्य भंग करण्याचे काम श्लोक शर्मा यांनी केले आहे. तेव्हा बालभारतीचे हे बोधचिन्ह पोस्टरवरुन तातडीने काढण्यात यावे व या संबंधी दिग्दर्शक श्री.श्लोक शर्मा यांच्यावर कार्यवाही करावी, अशी मागणी मी या औचित्याच्या मुद्याव्दारे करीत आहे.

सभापती महोदय, सन्माननीय सांस्कृतिक कार्य मंत्री व शिक्षण मंत्री सभागृहात उपस्थित आहेत. आपण त्यांना योग्य ते निदेश द्यावेत.

सभापती : सन्माननीय सदस्यांनी केलेली मागणी तपासून घेऊन योग्य तो निर्णय शासनाने घ्यावा.

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी औचित्त्याच्या मुद्याव्दारे एक बाब निदर्शनास आणली आहे. चार दिवसांपूर्वी जेव्हा वृत्तपत्रात या संदर्भातील जाहिरात पसिध्द झाली त्याच दिवशी कॉपीराईट ॲक्टअंतर्गत संबंधितांविरुध्द केस दाखल केलेली आहे.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.रामनाथ मोते : सभापती महोदय, माझा औचित्याचा मुद्दा आहे.

सभापती महोदय, भिवंडी-निजामपूर शहर महानगरपालिकेच्या सेवेतून गेल्या 3-4 वर्षात 150 पेक्षा अधिक कर्मचारी सेवानिवृत्त झाले असून संबंधित कर्मचाऱ्यांना सेवानिवृत्तीनंतर मिळणारे अर्जित रजेचे रोखीकरण सुमारे 19 लाख, 40 हजार, अंश राशीकरण सुमारे 3 कोटी, 73 लाख, 20 हजार, 531, सेवा व मृत्यू उपदान सुमारे 2 कोटी 30 लाख इत्यादी देय रकमा महापालिका प्रशासनाने अद्यापही दिलेल्या नाहीत. वारंवार निवेदने देऊनही महापालिका प्रशासनाने संबंधित कर्मचाऱ्यांना आर्थिक लाभापासून वंचित ठेवले आहे. संबंधित कर्मचाऱ्यांना देय रक्कम अदा करण्यासाठी महापालिकेच्या संबंधित विभागाकडून टक्केवारीची मागणी केली जात आहे. सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांना आर्थिक लाभापासून वंचित ठेवणे अन्यायकारक असून लाभ न मिळाल्यामुळे अनेक चतुर्थ श्रेणी कर्मचाऱ्यांनी कुटुंबीयांसह आत्महत्या करण्याचा इशारा दिला आहे. म्हणून विनंती आहे की, संबंधितांना देय असलेली रक्कम तातडीने देण्याबाबत कार्यवाही करण्यात यावी. अन्यथा, सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांपैकी एखाद्याने आत्महत्या करण्याचा प्रयत्न केल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी भिवंडी-निजामपूर शहर महानगरपालिकेच्या प्रशासनावर राहील. तातडीने कार्यवाही करण्याचे निर्देश द्यावेत, ही विनती आहे.

...7....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.संजय दत्त : सभापती महोदय, माझा औचित्त्याचा मुद्दा आहे.

सभापती महोदय, डोंबिवलीतील रासायनिक कारखान्यातून होणाऱ्या जल व वायू प्रदूषणामुळे नागरिक हैराण झाले आहेत. राष्ट्रीय हरित लवादाने सुध्दा याची दखल घेतली आहे. नुकत्याच जानेवारी महिन्यात माननीय राज्यमंत्री श्री.प्रविण पोटे-पाटील यांनी या भागाची स्वत: पाहणी केली होती. पाहणीच्या वेळी हेतूपुरस्सर नियमांचे उल्लंघन करणाऱ्या कंपन्या जाणीवपूर्वक बंद ठेवण्यात आल्या. मंत्री महोदयांच्या दौऱ्यात सर्व काही आलबेल आहे, हे भासविण्याचे प्रयत्न प्रदूषण मंडळाच्या अधिकाऱ्यांनी केले. तरी मंत्री महोदयांनी परिस्थितीची पाहणी करून अपुऱ्या व्यवस्थेबद्दल नाराजी व्यक्त केली होती व पुरेशा कार्यक्षम पध्दतीने प्रक्रिया केंद्र राबविण्याच्या सूचनाही दिल्या होत्या. महत्त्वाचे म्हणजे या दौऱ्याअंतर्गत मंत्री महोदयांनी डोंबिवलीतील रासायनिक कारखान्यातून होणाऱ्या प्रदूषणाला प्रदूषण नियंत्रण मंडळाचेच अधिकारी जबाबदार असल्याची भूमिका मांडली होती व या अधिकाऱ्यांवर कठोर कारवाई केली जाईल, असे आश्वासन दिले. तसेच दीड महिन्यात प्रदूषण करणारे कारखाने बंद करण्यात येतील, असे स्पष्ट केले होते. तरी आजतागायत या दौऱ्याला अडीच महिने होऊन सुध्दा कोठल्याही अधिकाऱ्यांवर किंवा प्रदूषण करणाऱ्या कारखान्यांवर कारवाई करण्यात आली नाही व सर्रासपणे प्रदूषण करणारे कारखाने बेकायदेशीरपणे चालू आहेत व नागरिकांच्या आरोग्याशी खेळ खेळीत आहेत.

सभापती महोदय, योगायोगाने संबंधित खात्याचे माननीय राज्यमंत्री श्री.प्रविण पोटे-पाटील साहेब सभागृहात उपस्थित आहेत. हा विषय महत्त्वाचा आहे. मी आपल्यामार्फत सर्व डोंबिवलीकरांच्या वतीने आपल्याला नम्र विनंती करतो की, आपण त्यांना याबाबतीत खुलासा करण्याची सूचना करावी.

यानंतर श्री.वि.खर्चे.....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.प्रविण पोटे-पाटील : सभापती महोदय, सन्मानीय सदस्य श्री.संजय दत्त यांनी डोंबिवली कारखान्यासंबंधी जल व वायू प्रदूषणाबाबत औचित्याचा मुद्दा मांडला आहे. ही परिस्थिती अत्यंत सत्य आहे. या ठिकाणी मी भेट दिल्यानंतर तेथील तीन अधिकाऱ्यांच्या बदल्या करण्यात आल्या आहेत. संबंधित कारखान्याची त्या पध्दतीने चौकशी सुरु करण्यात आली आहे. या संदर्भातील कारवाई तातडीने करण्यात येणार आहे.

...2...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.हेमंत टकले : सभापती महोदय, औचित्याचा मुद्दा येथे मांडतांना माननीय मुख्यमंत्री आणि सांस्कृतिक कार्यमंत्री सभागृहात उपस्थित आहेत याबाबत मी समाधान व्यक्त करतो.

सभापती महोदय, माझा औचित्याचा मुद्दा असा आहे की,

"अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन नुकतेच घुमान (पंजाब) येथील संत नामदेवांच्या भूमीत संपन्न झाले. आजपर्यंतच्या झालेल्या संमेलनापेक्षाही घुमान येथील संमेलन अनेक अर्थाने वैशिष्ट्यपूर्ण आणि संस्मरणीय ठरले. इतक्या दूरच्या ठिकाणी मराठी प्रेमींची अलोट गर्दी होऊन एक उच्चांकही गाठला. या संमेलनासाठी पंजाब राज्याचे माननीय मुख्यमंत्री ना.प्रकाशसिंग बादल व शासन आणि पंजाबमधील नागरिकांनी हा सोहळा आपलाच समजून जे प्रेम व आदरातिथ्य दिले ते खरोखरीच सुखावह होते. या संमेलनाद्वारे संत नामदेवांचे चिरस्मरण, घुमानचा विकास व विद्यापीठातील संत नामदेव न्यास निर्मिती हे सर्व ऐतिहासिक व महत्वाचे आहे. मराठी व पंजाबी बांधवांना एकत्र आणणारा हा जिव्हाळ्याचा धागा भविष्यात साहित्यिक आदान प्रदानासाठी मौल्यवान ठरणार आहे. अशा या समर्पक आयोजनाबद्दल ही विधानपरिषद पंजाबचे मुख्यमंत्री ना.प्रकाशसिंग बादल व पंजाबच्या नागरिकांचे मन:पूर्वक अभिनंदन करीत आहे व आभार ही व्यक्त करीत आहे. असे मी औचित्याच्या मुद्याद्वारे शासनासमोर विनंती करीत आहे.

सभापती : याबाबत माननीय मुख्यमंत्री यांनी पंजाब शासनाला कळवावे.

श्री.देवेंद्र फडणवीस : सभापती महोदय, होय.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

डॉ.नीलम गोऱ्हे : सभापती महोदय, मला औचित्याचा मुद्दा मांडण्यास परवानगी दिली त्याबाबत मी आपली आभारी आहे. आपल्या अनुमतीने एक वाक्य सन्माननीय सदस्य श्री.हेमंत टकले यांनी जो औचित्याचा मुद्दा मांडला त्यामध्ये मी जोडू इच्छिते. माननीय मुख्यमंत्री श्री.देवेंद्र फडणवीस आणि सांस्कृतिक कार्यमंत्री श्री.विनोद तावडे यांनी मराठी साहित्य संमेलनासाठी जे सहकार्य दिले त्यामुळे साहित्य प्रेमींचा उत्साह वाढलेला आहे. याबाबत मी मुख्यमंत्री महोदयांना धन्यवाद देते.

सभापती महोदय, माझा औचित्याचा मुद्दा असा आहे की,

गोवा येथे फॅब इंडियाच्या चेंजिग रूममध्ये दोन तीन दिवसांअगोदर एक प्रकार घडला होता. त्याचप्रमाणे कोल्हापूर येथील फॅब इंडियाच्या शोरूममध्ये असाच एक मोबाईल तेथे गुप्तपणे दिसून आला आहे. शॉप आणि लायसन्स ॲक्ट नुसार दुकानदारांना अनेक नियम लागू आहेत. मुद्दाम निरपराध लोकांना त्रास द्यावा असा आमचा हेतू नाही. नागपूर, पुणे, मुंबई, कोल्हापूर अशा अनेक ठिकाणी अशा घटना घडलेल्या आहेत. मोबाईलवर एक ॲप्लीकेशन डाऊनलोड करून त्याच्या आधारे आरशातून पलीकडील दिसते. ते सुध्दा कॅच करता येते अशी माहिती पोलीस अधिकारी यांनी दिलेली आहे. छुपे वेब कॅमेरे असतील तर त्याची तपासणी करता येईल असे अनेक डिवायसेस उपलब्ध झाले आहेत. माननीय मुख्यमंत्री सभागृहात आहेत, अशा प्रकारे दुकानात व विशेषत: मॉल्समधील चेंजिग रूम मध्ये किंवा स्वच्छतागृहांमध्ये गुपचूप वेब कॅमेरे बसविण्याबाबत काही तपासणी व वेळ पडल्यास शॉप आणि लायसन्स ॲक्टनुसार काही बंधन आणण्याच्या संदर्भात शासनाने विचार करावा असा माझा औचित्याचा मुद्दा आहे.

सभापती : शासनाने नोंद घ्यावी.

श्री.देवेंद्र फडणवीस : सभापती महोदय, हा विषय अत्यंत महत्वाचा आहे. यासंदर्भात निश्चितपणे कारवाई करण्यात येईल.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.चंद्रकांत रघुवंशी : सभापती महोदय, औचित्याच्या मुद्याद्वारे मी एक विषय उपस्थित करीत आहे.

सभापती महोदय, दोन दिवस अगोदर महिला व बाल कल्याण विभागाच्या लक्षवेधी सूचनेच्या संदर्भात 64 महिला बचत गटांची निवड होऊन एक वर्षे झाली तरी त्यांना पुरवठा आदेश दिले जात नाही, अशी भावना व्यक्त करण्यात आली होती, त्यावेळी मंत्री महोदयांनी या बाबीला सकारात्मक उत्तर दिले होते. 64 बचत गटांची कामे तत्काळ सुरु करण्यासंदर्भात सहानुभूतीपूर्वक विचार करीत आहोत असे त्यांनी सांगितले आहे. परंतु गेल्या एका वर्षापासून बचत गटांच्या कामाला प्रत्यक्षात सुरुवात होऊ शकली नाही म्हणून माननीय उप सभापती यांनी तेथून निर्देश दिले की, तातडीने या बचत गटांची कामे सुरु व्हावीत व दुसऱ्या दिवशी दुपारी साडेचार वाजता त्यांच्या दालनात माननीय मंत्री महोदया आणि ज्या संबंधित सदस्यांनी ही लक्षवेधी सूचना उपस्थित केली होती, त्यांच्याबरोबर बैठक घेण्यात येईल. काल उप सभापती महोदयांच्या दालनात आम्ही गेलो होतो. परंतु अशी बैठक झाली नाही, बैठक केव्हा होईल हे कोणी सांगत नाही. महिला बचत गटांना न्याय देण्याचे धोरण शासनाचे आहे. शासनाची व इतर सर्व लोकांची सकारात्मक भूमिका आहे. या 64 महिला बचत गटांनी युनिट उभे केले आहे. यासाठी जवळपास 30 कोटी रुपयांचे भांडवल बचत गटांनी गुंतविले आहे. मुख्यमंत्री महोदयांना माझी विनंती आहे की, राज्यातील 64 महिला बचत गट आहेत, त्यांची कामे तत्काळ सुरु करण्यासंदर्भात अधिवेशन संपण्याच्या आत शासनाने निर्णय घेतला पाहिजे. याबाबत मंत्री महोदयांची भूमिका सकारात्मक आहे. परंतु निर्णय घेण्यास वेळ लागत आहे.

सभापती : सन्माननीय सदस्य श्री.चंद्रकांत रघुवंशी आपला मुद्दा लक्षात आलेला आहे. उप सभापती यांनी बैठक घेण्याचे आश्वासन येथून दिले होते. ती बैठक माझ्या माहिती प्रमाणे काल होणार होती. ती बैठक रद्द झालेली नाही. याबाबत उप सभापती यांना विचारून आपणाला कळविण्याची व्यवस्था करण्यात येईल.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.माणिकराव ठाकरे : सभापती महोदय, मी औचित्याच्या मुद्याद्वारे एक विषय मांडत आहे.

सभापती महोदय, दोन्ही सभागृहात ज्या चर्चा होतात त्यासंदर्भात विधानसभा सभागृहात मंत्री महोदय उत्तर देतात असे अनेक उदाहरणावरून आपणाला दिसून येते. त्याचवेळी विधानसभेत काही धोरणात्मक घोषणा करायची असेल तर ती घोषणा विधानपरिषद सभागृहात देखील झाली पाहिजे. काल किंवा परवा शेतकऱ्यांच्या संदर्भात मंत्री महोदय किंवा मुख्यमंत्री महोदय यांनी कोणती घोषणा केली याबाबत मला नेमकी माहिती नाही. सभागृहात उत्तर देत असताना हे सरकार शेतकऱ्यांना अशा पध्दतीने आर्थिक मदत देणार, त्यासंदर्भातील पॅकेज अधिवेशन संपण्याआधी जाहीर करणार आहोत, असे विधानसभेत सांगण्यात आले आहे. यासंदर्भातील दोन चर्चा या सदनात उपस्थित करण्यात आल्या होत्या. दोन्ही चर्चा झाल्यानंतर असे उत्तर अपेक्षित होते परंतु विधानसभेत घोषणा केली व विधानपरिषदेत घोषणा करण्यात आली नाही. आता चर्चेच्या उत्तरात आपण सांगितले तरी काही हरकत नाही. परंतु तशीच घोषणा विधानपरिषद सभागृहात व्हायला पाहिजे होती. हा विषय अत्यंत महत्वाचा आहे. काल परवा देखील गारपीट झालेली आहे. आज देखील नियम 260 अन्वये प्रस्ताव देण्यात आला आहे. तो मुद्दा त्यावेळी उपस्थित करता येईल. केंद्र शासनाने जे नवीन धोरण स्वीकारले आहे त्यासंदर्भात राज्य शासनाची काय भूमिका राहणार आहे ती बाब जाणून घ्यावयाची आहे. याबाबत मुख्यमंत्री महोदय खुलासा करतील काय ?

श्री.देवेंद्र फडणवीस : सभापती महोदय, विधानसभेत जी निवेदने झाली असतील ती सर्व निवेदने विधानपरिषद सभागृहात करण्यात येतील, ती केलीच पाहिजेत. कोणते निवेदन राहिले असेल तर ते निवेदन करण्यात येईल. काही गोष्टी चर्चेच्या उत्तरातून सांगण्यात येतील.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.धनंजय मुंडे : सभापती महोदय, माझा औचित्याचा मुद्दा असा आहे की,

"हिंगोली शहराच्या मध्यवर्ती भागात सुप्रसिध्द रामलीला मैदान आहे. या मैदानावर दसरा सणाच्या दिवशी मोठा उत्सव होतो. या मैदानाला रामलीला मैदान असे नाव असणे, परंतु या मैदानावर अतिक्रमण आहे, मैदानावर अवैध धंदे सुरु आहेत, मैदानावर दारूची विक्री खुले आम होत आहे. मैदान परिसरात गुंडांचा मुक्त वावर आहे, यामुळे खेळण्यासाठी मैदानाचा उद्देश सफल होत नाही. याबाबत अनेक वेळा तक्रारी करून देखील कोणत्याही प्रकारची प्रशासकीय पातळीवर कारवाई झाली नाही.

या नंतर श्री.बोरले..

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.धनंजय मुंडे.....

सभापती महोदय, श्री.संपतराव बांगर हे हिंगोली येथील माजी नगरसेवक आहेत. ते मागील तीन दिवसांपासून या विषयाच्या संदर्भात विधान भवनामध्ये येत होते आणि ते काल या मागणीसाठी आलेले असताना त्यांचा मृत्यू झाला. या संदर्भात ते सतत कारवाईची मागणी करीत होते. शासनाने याबाबत निवेदन करावे, अशी माझी विनंती आहे.

सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने आणखी एक विषय उपस्थित करतो. मुंबईच्या महापौरांनी केलेल्या संभाषणाच्या संदर्भात आम्ही म.वि.प. नियम 289 अन्वये प्रस्तावाची सूचना दिली होती. या संदर्भात शासन अधिवेशन संपेपर्यंत निवेदन करेल, असे सांगण्यात आले होते. परंतु, अद्याप या संदर्भात सभागृहात निवेदन करण्यात आलेले नाही. (...अडथळा...) आजच्या कामकाज पत्रिकेत मुंबईचा प्रस्ताव दाखविलेला आहे. माननीय सभापतींनी निवेदन करावे, असे निदेश दिल्यानंतर देखील शासनाच्या वतीने तीन-चार दिवस निवेदन केले जात नाही. याकडे मला आपले लक्ष वेधावयाचे आहे.

सभापती : शासनाने त्वरित निवेदन करावे.

..2...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.प्रकाश बिनसाळे : सभापती महोदय, माझा औचित्याचा मुद्दा आहे.

सभापती महोदय, मुंबई शहरातून मांडवा किंवा अलिबाग येथे जाण्यासाठी बोट सेवा अत्यंत सोईस्कर आहे. आपण पब्लिक ट्रान्सपोर्टच्या माध्यमातून तिकीट खरेदी करुन बोटीने प्रवास करतो. ज्यांच्या बोटी आहेत ते किंवा आमच्या सारखी काही मंडळी 5 नंबरच्या जेट्टीवरुन बोटीने मांडवा येथे जातात. पब्लिक सर्व्हिसच्या बोटींना रात्री 10.00 ते 10.30 वाजेपर्यंत परवानगी आहे. त्या ठिकाणी काही स्पीड बोटी आहेत. मध्यंतरी मुख्यमंत्री महोदयांनी देखील त्या स्पीड बोटीतून प्रवास केला. परंतु, सायंकाळी 6.00 वाजता स्पीट बोटीची जेट्टी बंद केली जाते. यॉट क्लबमध्ये काही घडले, डिसेंबरच्या दरम्यान डीसीपींनी परवानगी दिली नाही त्याचा राग काढत त्यांनी आरोप केलेले आहेत. त्या स्पीड बोटचे मालक मुंबई शहरातील मोठे इंडस्ट्रियलिस्ट आहेत. मी सभागृहाचा जास्त वेळ घेणार नाही. त्यांनी पत्रात असे म्हटलेले आहे की, "We have received information from the naval authorities and Secret Agencies that Parties are being organised." समुद्रातील बोटींच्या संदर्भातील काम कुलाबा पोलीस स्टेशनच्या अंतर्गत येत नाही. ते काम पोर्ट झोन पोलीस स्टेशनच्या अंतर्गत आहे. ते या पत्रात लिहिले गेलेले आहे. त्यांनी जो दुसरा आरोप केलेला आहे तो अतिशय गंभीर आहे. "We have also received information regarding drugs and flesh trade being illegally done in the boats." याला आधार काय आहे, पुरावा काय आहे, हे मला माहीत नाही. खरे म्हणजे, समाजातील ज्या मोठ्या व्यक्ती आहे त्यांच्यावर हा आरोप आहे. अधिकार नसताना त्यांनी अशा प्रकारे आरोप करणे बरोबर नाही. समुद्रातील गस्त वाढविणे हे पोर्ट झोनचे काम आहे आणि त्यांचे काम फक्त लॅण्डच्या संदर्भातील आहे. हा सर्व प्रकार अहंकारातून झालेला आहे. पब्लिक सर्व्हिसच्या बोटींना तुम्ही रात्री 10.00 ते 10.30 वाजेपर्यंत परवानगी देत असाल तर स्पीड बोटी सायंकाळी 6.00 वाजता बंद करण्याचे काही कारण नाही. ते 2008 च्या सर्क्युलरचा आधार देतात. 26/11 च्या घटनेनंतर आपण सायंकाळी 6.30 वाजता बोटी बंद केल्या होत्या. परंतु, त्या नंतरच्या काळात आपण हे रिलॅक्सेशन केले. सर्वच बोटींना परवानगी दिली. मला मांडावा येथे बोटीने जावयाचे असेल तर मला सायंकाळी 5.30 वाजता माननीय सभापतींची परवानगी घेऊन

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.प्रकाश बिनसाळे.....

सभागृहातून निघावे लागते. सायंकाळी 6.00 वाजताची बोट पकडली तर मी घरी पोहोचू शकतो. स्वतःच्या अहंकारासाठी अशा प्रकारे कायदा वापरणारी जी मंडळी आहे त्यांच्यावर योग्य ती कारवाई करण्यात यावी. ॲडिशनल सीपी यांच्या बरोबर माझे बोलणे झालेले आहे. त्यांच्यावर ॲलिगेशन करण्यात आले की, तुम्ही त्यांना चुकीच्या कामासाठी सहकार्य करीत आहात. हे कोठे तरी थांबले पाहिजे आणि या संदर्भात योग्य ती कार्यवाही करून आज सायंकाळी 6.00 वाजेनंतर ज्या बोटी बंद केलेल्या आहेत त्या सुरु करण्याबाबत आदेश द्यावेत, अशी माझी विनंती आहे.

सभापती : शासनाने उचित कार्यवाही करावी.

श्री.देवेंद्र फडणवीस : सभापती महोदय, होय.

..4...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

पृ.शी./मु.शी.: अशासकीय विधेयके व ठराव समितीचे प्रतिवृत्त सादर करणे व संमत करणे

श्री.रामनाथ मोते (समिती प्रमुख) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने अशासकीय विधेयके व ठराव समितीचे प्रतिवृत्त सभागृहास सादर करतो.

शुक्रवार, दिनांक 10 एप्रिल, 2015 रोजीच्या कामकाजाच्या क्रमात दाखविण्यात येणाऱ्या अशासकीय कामकाजास द्यावयाचा वेळ ठरविण्याकरिता गुरुवार, दिनांक 9 एप्रिल, 2015 रोजी समितीची बैठक झाली. अशासकीय कामकाजासाठी एकूण 150 मिनिटांचा वेळ उपलब्ध आहे. 4 अशासकीय विधेयके पुर:स्थापनार्थ दर्शविण्यात येणार असून बॅलटद्वारा ठरविलेल्या प्राथम्यक्रमानुसार 4 अशासकीय विधेयकांना तसेच दिनांक 20 मार्च, 2015 रोजीच्या दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेल्या परंतु विचारार्थ प्रलंबित असलेल्या विधेयकांना खालीलप्रमाणे वेळ नेमून देण्यात यावा अशी शिफारस समितीने केली आहे.

पुर:स्थापनार्थ विधेयके :-

1) सन 2015 चे वि.प.वि. क्रमांक 5 - महाराष्ट्र झाडे तोडण्याबाबत (विनियमन) (सुधारणा) विधेयक, 2015 - श्रीमती शोभाताई फडणवीस, वि.प.स.

2) सन 2015 चे वि.प.वि. क्रमांक 6 - महाराष्ट्र राज्य विशेष मागास प्रवर्ग-अ (एसबीसी-ए) करिता (राज्यातील शैक्षणिक संस्थांमधील जागांच्या प्रवेशाचे आणि राज्याच्या नियंत्रणाखालील लोकसेवांमधील नियुक्त्यांचे किंवा पदांचे) आरक्षण विधेयक, 2015 - श्री. शरद रणपिसे, वि.प.स. यांचे

3) सन 2015 चे वि.प.वि. क्रमांक 7 - महाराष्ट्र स्वयंसेवी संस्था विकास व व्यवस्थापन महामंडळ विधेयक, 2015 - श्री.अमरसिंह पंडित, वि.प.स. यांचे

4) सन 2015 चे वि.प.वि. क्रमांक 8 - महाराष्ट्र कामकरी स्त्रिया व महिला शेतमजूर (प्रसूती सहाय्य) विधेयक, 2015 - श्री.अमरसिंह पंडित, वि.प.स. यांचे 10 मिनिटांपेक्षा जास्त नाही.

दिनांक 20 मार्च, 2015 रोजीच्या दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेल्या परंतु विचारार्थ प्रलंबित असलेली विधेयके :-

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.रामनाथ मोते.....

1) सन 2014 चे वि.प.वि.क्रमांक 3 - महाराष्ट्र गुंठेवारी विकास (नियमाधीन करणे, श्रेणीवाढ व नियंत्रण) (सुधारणा) विधेयक, 2014 - श्रीमती शोभाताई फडणवीस, वि.प.स. यांचे 20 मिनिटांपेक्षा जास्त नाही.

2) सन 2014 चे वि.प.वि. क्रमांक 11 - मुंबई ग्रामपंचायत (सुधारणा) विधेयक, 2014 - श्री.अमरसिंह पंडित, वि.प.स. यांचे. 20 मिनिटांपेक्षा जास्त नाही.

3) सन 2013 चे वि.प.वि. क्रमांक 6 - महाराष्ट्र खाजगी शाळांतील कर्मचारी (सेवेच्या शर्ती) विनियमन (सुधारणा) विधेयक, 2013 -श्री.रामनाथ मोते, वि.प.स. यांचे. 20 मिनिटांपेक्षा जास्त नाही.

बॅलेटद्वारा ठरविलेल्या प्राथम्यक्रमानुसार अशासकीय विधेयके

1) सन 2015 चे वि.प.वि.क्रमांक 2 -महाराष्ट्र प्रकल्पबाधित व्यक्तींचे पुनर्वसन (सुधारणा) विधेयक, 2015 - श्री. संजय दत्त, वि.प.स. यांचे. 20 मिनिटांपेक्षा जास्त नाही.

2) सन 2014 चे वि.प.वि. क्रमांक 19 - महाराष्ट्र हिंसाचार व लैंगिक गुन्ह्यांना प्रवृत्त करणाऱ्या जाहिराती व जाहिरात-फलक लावण्यास प्रतिबंध करण्याबाबत विधेयक, 2014- श्री. अमरसिंह पंडित, वि.प.स. यांचे. 20 मिनिटांपेक्षा जास्त नाही.

3) सन 2014 चे वि.प.वि. क्रमांक 23 - बाल कामगार (प्रतिबंध आणि विनियमन) (महाराष्ट्र सुधारणा) विधेयक, 2014 - श्री. अमरसिंह पंडित, वि.प.स. यांचे. 20 मिनिटांपेक्षा जास्त नाही.

4) सन 2014 चे वि.प.वि. क्रमांक 18 - हिंदू अज्ञानत्व व पालकत्व (महाराष्ट्र सुधारणा) विधेयक, 2014 - श्री. अमरसिंह पंडित, वि.प.स. यांचे. 20 मिनिटांपेक्षा जास्त नाही.

सभापती : अशासकीय विधेयके व ठराव समितीचे प्रतिवृत्त सभागृहास सादर झाले आहे.

श्री.रामनाथ मोते : सभापती महोदय, अशासकीय विधेयके व ठराव समितीचे प्रतिवृत्त सभागृहाला संमत आहे, असा मी आपल्या अनुमतीने प्रस्ताव मांडतो.

प्रस्ताव मतास टाकून संमत झाला.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

<u>माननीय विरोधी पक्षनेत्यांना द्यावयाच्या सिक्युरिटीबाबत पॉईंट ऑफ इन्फर्मेशन</u>

श्री.अमरसिंह पंडित : सभापती महोदय, माझा पॉईंट ऑफ इन्फर्मेशन आहे. माननीय विरोधी पक्षनेत्यांना संरक्षण देण्याच्या संदर्भात आपण सांगितले होते की, तीन दिवसात या संदर्भातील निर्णय होईल. परंतु, अद्याप याबाबत निर्णय झालेला नाही.

श्री.देवेंद्र फडणवीस : सभापती महोदय, आपण त्यांचे सिक्युरिटी ऑडिट करण्याचे लगेच आदेश दिलेले आहेत.

सभापती : ठीक आहे.

..7...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

पृ.शी. : दिघी पोर्टमधून होणाऱ्या अवजड वाहतुकीमुळे नादुरुस्त झालेला रस्ता व अनियमितता

मु.शी. : दिघी पोर्टमधून होणाऱ्या अवजड वाहतुकीमुळे नादुरुस्त झालेला रस्ता व अनियमितता या संबंधी, श्री.सुनील तटकरे, ॲड.जयदेव गायकवाड, सर्वश्री प्रकाश बिनसाळे, नरेंद्र पाटील, किरण पावसकर, हेमंत टकले, वि.प.स.यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

श्री.सुनील तटकरे (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय शालेय शिक्षण मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

"रायगड जिल्ह्यातील दिघी पोर्ट मधून रायगड जिल्ह्यात तसेच राज्यात इतर ठिकाणी दिघी कंपनीचे अवजड ट्रेलर, 10 चाकी किंवा त्यापेक्षाही जास्त चाकाचे ट्रक यामध्ये क्षमतेपेक्षा जास्त माल भरणे, त्यामध्ये लोखंडी कॉईलची मोठ्या प्रमाणात वाहतूक होणे, म्हसळा गावातील अंतर्गत बाजारपेठेतील रस्त्यावरुन बेकायदेशीरपणे ही वाहतुक सुरु असणे, दिघी पोर्टने रस्ता दुरुस्तीसाठी 55 कोटी रुपये भरणे आवश्यक असणे, परंतु या दिघी पोर्टने अद्याप 55 कोटी रुपये भरलेले नसणे, दिघी पोर्टने केलेल्या माती व वाळूच्या बेकायदा उत्खननाबाबत शासनाने त्यांचेवर सुमारे 45 कोटी रुपये दंड आकारणे, परंतु अद्यापही दिघी पोर्टने दंडाची रक्कम जमा न करता शासनाच्या आदेशाचा केलेला भंग, रस्त्याची अतिशय दुरावस्था झाली असल्यामुळे तत्कालीन पालकमंत्री रायगड यांच्यावतीने शासनाने निधी खर्च करुन रस्त्याची दुरुस्ती करणे, या रस्त्यावरील वाहतूक सुरू करण्याबाबत जिल्हाधिकारी, रायगड व सचिव सार्वजनिक बांधकाम विभाग यांनी मौखिक आदेश देणे, या वाहतुकीमुळे म्हसळा बायपास रस्त्यावरील मोरीवरील पूल तुटून नादुरुस्त झाल्याने इतर वाहनासाठी सदरचा पूल धोकादायक झालेला असणे, रस्त्याचेसुध्दा मोठ्या प्रमाणात नुकसान होणे, याबाबत तेथील नागरिकांनी पोलिसांकडे तक्रारी केल्या असता त्याकडे पोलिसांचे होणारे दुर्लक्ष, आता दिघी पोर्ट कंपनीने ही वाहतूक कोणालाही न जुमानता रात्रीचेवेळी अवैधपणे सुरु ठेवलेली असणे, या वाहतुकीला प्रशासनाचाच अंतर्गत पाठिंबा असल्याची चर्चा स्थानिक

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.सुनील तटकरे.....

नागरिकांमध्ये असणे, म्हसळा बाजारपेठेतील जाणाऱ्या रस्त्याच्या बाजूने शाळा, शासकीय इमारती व निवासी वस्ती असून हा रस्ता आधीच अरुंद असल्याने रात्रीच्यावेळी या ठिकाणी वाहतूक सुरु असल्यामुळे अपघाताचे वाढलेले प्रमाण, राज्य शासनाने सन 2010 मध्ये जाहीर केलेल्या "पोर्ट पॉलिसी" प्रमाणे फायदा घेणे, परंतु अद्यापही सन 2010 च्या पॉलिसीप्रमाणे शासनासोबत (मेरीटाईम बोर्ड) करार न करणे, ही वाहतूक बंद करुन दिघी पोर्ट विरुध्द कारवाई करण्याबाबत तेथील ग्रामस्थांची होत असलेली मागणी, मागणी पूर्ण होत नसल्याने नागरिकांमध्ये निर्माण झालेला असंतोष व संतापाची भावना, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

श्री.देवेंद्र फडणवीस (मुख्यमंत्री) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

सभापती : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

(प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे)

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.सुनील तटकरे : सभापती महोदय, बऱ्याच वर्षांनी या लक्षवेधी सूचनेला न्याय मिळालेला आहे आणि माननीय मुख्यमंत्री या लक्षवेधी सूचनेला उत्तर देणार आहेत, त्याबद्दल मी त्यांचे अभिनंदन करतो.

सभापती महोदय, दिघी पोर्ट खाजगीकरणाच्या माध्यमातून विकसित करण्यासाठी राज्य शासनाने सन 2002 मध्ये सुरुवात केली. सन 2002 मध्ये ज्यावेळी खाजगीकरणातून करारनामा राज्य सरकारकडे, मेरिटाईम बोर्डाकडे झाला त्यावेळी या पोर्टला कोणत्या सवलती देण्यात आल्या आणि या पोर्टच्या माध्यमातून त्यांनी करावयाच्या कोणत्या जबाबदाऱ्या निश्चित करण्यात आल्या ? दिघीच्या परिसरातील प्रवासी जेट्टी, मच्छीमार जेट्टी हे सर्व या पोर्टकडे हस्तांतरित करण्यात आलेले आहे.

यानंतर श्री.भोगले.....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.सुनील तटकरे....

त्यामुळे तेथील जेट्टीबाबत नेमके काय होणार? त्याचबरोबर या रस्त्यावरून होणाऱ्या वाहतुकीच्या संदर्भात दिघी पोर्ट कमिशन झाल्यानंतर या रस्त्याचे चौपदरीकरण करायचे त्या करारामध्ये नमूद होते. चौपदरीकरण रस्ता पूर्ण होईपर्यंत या रस्त्याची देखभाल आणि दुरुस्ती विकासकाने करावयाची होती. या संदर्भात 55 कोटी रुपयांचा प्रस्ताव आलेला होता. राज्य सरकारने काल सभागृहात सांगितले की, 5 कोटी रुपयांपर्यंत विकासकाने द्यावेत अशी मागणी केली आहे. अद्यापही ते 5 कोटी रुपये मिळालेले नाहीत. काल सार्वजनिक बांधकाम मंत्र्यांनी सभागृहात सांगितले की, दिघी ते माणगाव आणि आगरदांडा ते रोहा या रस्त्याची कामे सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत मेरिटाईम बोर्डाकडे वर्ग करण्यात आली आणि त्यांनी खाजगी विकासकाकडे कामे दिली आहेत. 650 कोटी रुपयांचा प्रस्ताव आहे. पूर्वीचे 5 कोटी रुपये मिळालेले नाहीत. 55 कोटी रुपये मिळणे अपेक्षित होते. या संदर्भात शासनाची भूमिका काय आहे? 620 कोटी रुपयांचे चौपदरीकरणाचे काम हाती घ्यायचे ठरविले आहे. त्या कामाचा करारनामा करून भूसंपादनापासून प्रत्यक्षात चौपदरीकरणाचे काम जेव्हा सुरु होईल, तोपर्यंत या रस्त्याची देखभाल आणि दुरुस्ती करण्यासाठी त्यांच्यावर बंधने टाकण्यात येतील काय?

श्री.देवेंद्र फडणवीस : सभापती महोदय, दिघी पोर्टच्या संदर्भात जो करार झाला त्यातील कलम 24 प्रमाणे बंदर विकासकाने बंदरातून माल वाहतुकीसाठी अस्तित्वातील रस्त्याचा वापर केल्यामुळे रस्त्याचे नुकसान झाल्यास त्याची दुरुस्ती करावी अशी अट होती. माननीय सदस्यांनी जे म्हटले ते सत्य आहे. त्या दृष्टीने फिल्ड ऑफिसरने एक प्रस्ताव पाठविला होता. त्यात 55 कोटी रुपये रस्त्याच्या दुरुस्तीसाठी लागतील असे म्हटले होते. त्यानंतर त्यांनी अपील केले, त्यावर एक समिती नियुक्त झाली. त्या समितीने एक असेसमेंट केले. त्यांनी किती रस्ता केला पाहिजे, स्टेट हायवेला रस्ता जॉईन होतो, त्यामुळे त्या रस्त्यावरून अन्य वाहने जातात अशा बऱ्याच गोष्टीचा अभ्यास करून त्या समितीने असे सुचविले की, 5.5 कोटी रुपये विकासकाने दिले पाहिजेत. माननीय सदस्य श्री.सुनील तटकरे म्हणाले ते सत्य आहे. त्या विकासकाने 5.5 कोटी रुपये दिलेले नाहीत. 5.5 कोटी रुपये तातडीने देण्याचे आदेश दिले जातील आणि त्यांच्याकडून वसुली केली जाईल.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

09-04-2015 (असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही) Y.2

SGB/ AKN/ MMP/ 14:40

श्री.देवेंद्र फडणवीस...

सभापती महोदय, दुसरा मुद्दा इंदापूर ते आगरदांडा आणि माणगाव ते दिघी पोर्ट या अनुक्रमे 41 व 54 कि.मी. रस्त्याच्या संदर्भात 620 कोटी रुपये किंमतीचा अहवाल तयार झाला आहे. माननीय सदस्यांनी मागणी केल्याप्रमाणे तातडीने त्यांना सूचना देण्यात येतील आणि 15 दिवसाच्या आत या संदर्भातील करारनामा करण्यास सांगितले जाईल. त्या करारनाम्यामध्ये याचे टप्पे ठरविण्यात येतील. त्या टप्प्यानुसार काम केले नाही तर त्यांच्यावर कारवाई केली जाईल आणि त्यांच्याकडून काम करवून घेतले जाईल.

श्री.सुनील तटकरे : चौपदरीकरणाचे काम भूसंपादनासहित पूर्ण करण्यासाठी 5 वर्षांचा कालावधी लागू शकतो. शीघ्र गतीने काम झाले तर आम्हाला हवे आहे. परंतु तोपर्यंत या प्रवासी वाहतुकीसाठी असलेल्या रस्त्यावरुन 60 ते 100 टनाची वाहने जातात, त्यामुळे हा रस्ता पूर्णपणे उद्ध्वस्त होतो. आगरदांडा ते रोहा आणि माणगाव ते दिघी हा रस्ता अनेक गावातून जात असताना अपघातांची संख्या जास्त आहे. अशा वेळी अद्ययावत दुरुस्ती करण्यासाठी 5 कोटी रुपये किंवा ठरलेली रक्कम डिपॉझिट घेऊन या रस्त्याची दुरुस्ती करण्यात येईल काय? त्याचबरोबर दिघी बंदर विकासकाला 40 कोटी रुपये दंड झाला आहे. त्याच्याकडून कायद्याचा भंग झालेला आहे. माती आणि वाळू काढण्यात आली. दिलेल्या सवलती व्यतिरिक्त काम झाल्यामुळे तो दंड वसूल करण्याच्या संदर्भात कारवाई करण्यात येईल काय?

श्री.देवेंद्र फडणवीस : सभापती महोदय, या रस्त्यांच्या मेन्टेनन्ससाठी कायमस्वरुपी व्यवस्था व्हावी ही अपेक्षा व्यक्त केली आहे, ती वर्कआऊट केली जाईल आणि व्यवस्थेप्रमाणे मेन्टेनन्स झाले पाहिजे अशा प्रकारचा प्रयत्न राज्य सरकारकडून केला जाईल. खनिजाच्या संदर्भात कायद्याचा भंग झाल्याने 40 कोटी रुपये दंड वसूल करण्याचा मुद्दा आहे. या संदर्भात त्यांनी नियमानुसार महसूल मंत्र्यांकडे अपील दाखल केले आहे. महसूल मंत्र्यांना विनंती करुन तातडीने त्या अपिलाचा निपटारा करण्यात येईल.

श्री.प्रकाश बिनसाळे : सभापती महोदय, हा रस्ता मेरिटाईम बोर्डाने विकासकाकडे हस्तांतरित केला. हे करण्यामागे हा रस्ता तातडीने पूर्ण व्हावा हा उद्देश आहे. तो तातडीने होणार नसेल तर त्यासाठी जे ॲग्रीमेंट केले आहे त्यात बँक गॅरंटीचा समावेश आहे का? नसेल

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

09-04-2015 (असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही) Y.3

SGB/ AKN/ MMP/ 14:40

श्री.प्रकाश बिनसाळे.....

तर तो रस्ता वेळेत पूर्ण होणार नाही. विकासक ठरलेले 5 कोटी रुपये देत नसेल तर 620 कोटी रुपयाचे काम कसे करणार आहे?

श्री.देवेंद्र फडणवीस : मी माननीय सदस्य श्री.सुनील तटकरे यांच्या प्रश्नाला उत्तर देताना हेच म्हटले की, या रस्त्याच्या कामाचे टप्पे ठरवून देण्यात येतील. त्या त्या टप्प्यावर त्यांनी काम केले नाही तर त्यावर पुढील कारवाई निश्चितपणे करण्यात येईल. त्यामध्ये फक्त रस्ता हॅण्डओव्हर झालेला आहे. फायनल ॲग्रीमेंट करावयाचे आहे. रस्ता पूर्ण होण्याच्या दृष्टीने अनेक सूचना आलेल्या आहेत. त्या सर्व सूचनांचे पालन करण्यात येईल.

(सभापतीस्थानी माननीय उप सभापती)

श्री.जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, 2002 मध्ये दिघी पोर्टच्या संदर्भात जे ॲग्रीमेंट झाले ते दिघी पोर्टपुरते मर्यादित होते. दिघी बंदर हे श्रीवर्धन तालुक्यात असून आगरदांडा बंदर मुरुड तालुक्यात आहे. आगरदांडा बंदर स्वतंत्र होते. माझ्या माहितीप्रमाणे मेरिटाईम बोर्डामध्ये चर्चा न होता, कॅबिनेटची मंजुरी न घेता आगरदांडा बंदराचे काम दिले गेले आहे. हे ॲग्रीमेंट करताना आगरदांडा बंदराच्या कामाचा समावेश ज्या अधिकाऱ्यांनी स्वतःच्या अधिकारात केला त्याबाबत तातडीने राज्य शासन चौकशी करणार आहे काय? सध्या दिघी बंदराच्या कामाचे जे ठेकेदार आहेत ते प्रत्येक स्लॉट विकत आहेत. त्यांनी कोणते पैसे भरायचे नाहीत. त्यांनी अनेक वित्तीय संस्थांकडून पैसे घेतले आहेत. जो दर निश्चित केला आहे तो विचारात घेतला तर व्हायबल होणार नाही. 5000 कोटी रुपये कर्जाच्या व्याजाचा विचार करता 10 मिलियन कॉर्गो बंदरामध्ये उतरला तरच प्रकल्प व्हायबल होईल, अन्यथा व्हायबल होण्याची शक्यता नाही. त्या भागातील लोकप्रतिनिधी, मतदारसंघातील लोकप्रतिनिधी यांना एकत्रित बोलावून बंदरे विकास मंत्री या नात्याने बैठक आयोजित करण्यात येईल काय?

श्री.देवेंद्र फडणवीस :पहिल्या प्रश्नाबाबत जरूर तपासणी करण्यात येईल आणि अनियमितता झाली असेल तर कारवाई केली जाईल. बंदर विकास मंत्री या नात्याने जरूर बैठक घेऊ.

श्री.सुनील तटकरे : सभापती महोदय, दिघी येथे पूर्वी मच्छीमारांसाठी जेट्टी होती. ती प्रवासी जेट्टी म्हणून वापरली जात होती. दिघी येथे 300 ते 400 कोळी समाजाची कुटुंबे रहात

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

आहेत. या विकासकाने मच्छीमारांची जेट्टी बांधून द्यायची आहे. त्या संदर्भात कार्यवाही केली जाईल काय? ...4..

09-04-2015 (असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही) Y.4

SGB/ AKN/ MMP/ 14:40

श्री.देवेंद्र फडणवीस : तपासून घेऊ. जर माननीय सदस्यांचे म्हणणे उचित असेल तर कार्यवाही केली जाईल.

..5...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

पृ.शी. : राज्यात निकृष्ट दर्जाच्या औषध विक्रीमुळे आरोग्यावर होणारे दुष्परिणाम

मु.शी. : राज्यात निकृष्ट दर्जाच्या औषध विक्रीमुळे आरोग्यावर होणारे दुष्परिणाम यासंबंधी श्री.संजय दत्त,वि.प.स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

श्री.संजय दत्त (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय अन्न व औषध प्रशासन मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

"अन्न व औषधे प्रशासनाने राज्यातील २८१ सरकारी रुग्णालये व आरोग्य केंद्रातील विविध औषधांच्या दोन हजारापेक्षा जास्त औषधांची चाचणी केली असून त्यात ३३५ औषधे निकृष्ट असल्याचे माहे एप्रिल, २०१५ रोजी वा त्या सुमारास उघडकीस येणे, उक्त औषध स्वस्त असल्याने सामान्य रुग्ण अज्ञानापोटी ती खरेदी करीत असून औषध कंपन्यांनी बेमालूमपणे केलेल्या चलाखीची कल्पना डॉक्टरांनाही येत नसणे, त्यामुळे अजाणतेपोटी डॉक्टरही रुग्णांना अशी औषधे सुचवित असणे, गुजरात, हिमाचल प्रदेश, पंजाब, उत्तरांचल, कर्नाटक येथून ही निकृष्ट औषधे आली असून विशिष्ट औषधात कोणत्या घटकांचे किती प्रमाण असावे याचे सुस्पष्ट निकष अन्न व औषध खात्याने ठरविले असतांना अन्य राज्यांतून येणारी सुमारे १२.३६ टक्के औषधे निकषाचे उल्लंघन करणारी असल्याचे अन्न व औषधे प्रशासनाच्या तज्ज्ञ अधिकाऱ्यांना आढळून येणे, या निकृष्ट दर्जाच्या औषधामुळे आरोग्यावर दुष्परिणाम होत असल्याने नागरिकांमध्ये निर्माण झालेली भीतीची व चिडीची भावना पाहता शासनाने त्वरित करावयाची कार्यवाही तसेच शासनाची प्रतिक्रिया."

श्री.गिरीष बापट (अन्न व औषध प्रशासन मंत्री) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती सन्माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

उप सभापती : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

(प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे)

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.संजय दत्त : सभापती महोदय, राज्यात निकृष्ट औषधांचा गंभीर प्रश्न निर्माण झाला आहे. त्यामुळे जनतेच्या आरोग्याला धोका निर्माण झाला आहे. बाहेरच्या राज्यातून येणारी औषधे सब स्टॅण्डर्ड असल्यामुळे हे प्रकार सुरु आहेत. याबाबत मी दोन-तीन मुद्दे उपस्थित करु इच्छितो. सध्या यावरील मॉनिटरिंग फॅसिलिटी इन्फ्रास्ट्रक्चर पाहिले तर एफडीए ही ॲथॉरिटी आहे.

नंतर झेड.1..

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.संजय दत्त..

एफडीएमध्ये सध्या अशी परिस्थिती आहे की, सँक्शन पोस्ट आणि ॲक्च्युअल पोस्ट यामध्ये खूप मोठी तफावत आहे. राज्यातील कन्व्हीक्शन रेट वाढविण्याची भूमिका माननीय मुख्यमंत्र्यांनी घेतली आहे व काही ठिकाणी तो रेट वाढला देखील आहे. परंतु, यांच्याकडे कुठल्याही प्रकारचा लिगल सेल नसल्यामुळे कन्व्हीक्शन रेट पुअर आहे व तो पुअरच राहणार आहे. अँक्शन घेण्यासाठी देखील त्यांना पॉवर्स नाहीत. सध्या एफडीएमध्ये अंडरस्टाफ परिस्थिती आहे. तेव्हा एफडीएमधील पदे वाढविण्यासंबंधीतील कार्यवाही माननीय मंत्री करणार आहेत काय, असा माझा प्रश्न आहे.

आपल्या देशातील काही राज्यांमध्ये जेनेरिक मेडिसिनचा विस्तार खूप मोठ्या प्रमाणावर झालेला आहे. जेनेरिक मेडिसिन स्वस्त दरात उपलब्ध होते. त्यामुळे त्याचा फायदा गोरगरीब जनतेला होऊ शकतो. तेव्हा जेनेरिक मेडिसिन राज्यात सर्व ठिकाणी उपलब्ध करून दिले पाहिजे. तेव्हा महाराष्ट्रात जेनेरिक मेडिसिनचा विस्तार करण्यासाठी शासनाचे नेमके धोरण काय राहणार आहे व त्यासाठी काही निश्चित अशी कालमर्यादा असणार आहे काय ?

श्री.गिरीश बापट : सभापती महोदय, एका महत्त्वाच्या प्रश्नासंबंधी सन्माननीय सदस्य श्री.संजय दत्त यांनी लक्षवेधी सूचना उपस्थित केली आहे. या प्रश्नासंबंधी माननीय मुख्यमंत्र्यांनी देखील ठोस अशी भूमिका घेतली आहे. या लक्षवेधीच्या माध्यमातून सन्माननीय सदस्यांनी दोन प्रश्न विचारले असून मी त्यांना उत्तर देण्याचा प्रयत्न करणार आहे. आपल्याकडे मान्यताप्राप्त कर्मचारी 1176 असून त्यात वर्ग-1, वर्ग-2 व वर्ग-3 व वर्ग-4 च्या कर्मचाऱ्यांचा समावेश आहे. यातील एकूण 352 पदे रिक्त आहेत. या खात्याचे महत्त्व माणसांच्या दैनंदिन जीवनाशी निगडित असते. त्यामुळे दीर्घकाळ ही पदे रिक्त ठेवून आम्हाला चालणार नाही. सदर रिक्त पदे भरण्यासाठी आम्ही एमपीएससीकडे पाठपुरावा केला आहे. आताच नवीन सचिव श्री.कांबळे आले आहेत त्यांनी देखील पाठपुरावा केला आहे. आता इन्स्पेक्टर या पदासाठी बॅचवाईज उमेदवार उपलब्ध होत आहेत. उमेदवार उपलब्ध झाल्यानंतर त्यांना प्रशिक्षण देण्यात येते. त्यात 2-3 वर्षे जातात. मी यात दोन प्रकारची योजना आखली आहे. जो पर्यंत आम्हाला इन्स्पेक्टर उपलब्ध होत नाहीत तो पर्यंत कंत्राट पद्धतीने सेवानिवृत्त झालेले इन्स्पेक्टर घेता येतील काय याचा विचार करीत आहोत. भारत

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.गिरीश बापट...

सरकारचा ॲप्रेन्टीसशिप ॲक्ट आहे. त्याअनुसार वर्ष-दोन वर्षासाठी डी.फार्म झालेल्या उमेदवारांची नेमणूक करता येते. त्यांना दोन वर्षाचे मानधन देऊन या विभागातील स्टाफ वाढविण्याचा तातडीने प्रयत्न आम्ही करीत आहोत. वाढत्या लोकसंख्येचा विचार करता सध्या अस्तित्त्वात असलेला स्टाफ हा फार कमी आहे. आता जेवढी मान्यता प्राप्त पदे आहेत ती भविष्यामध्ये लवरात लवकर भरण्याचा प्रामाणिक प्रयत्न खात्यातर्फे करण्यात येईल.

येथे जेनेरिक मेडिसिनसंबंधात देखील महत्त्वाचा प्रश्न उपस्थित केला आहे. आज वेगवेगळ्या कंपनींच्या माध्यमातून जेनेरिक मेडिसिनचे उत्पादन होत असून खाजगीकरित्या देखील त्याचे वितरण होत आहे. या औषधांची खरेदी एनजीओ व धर्मादाय संस्था करतात. तसेच काही दुकानात देखील जेनेरिक मेडिसिन उपलब्ध होते. गोरगरीब माणसाला आजार झाल्यानंतर त्याला उपचार मिळवून देण्याबाबतची जबाबदारी ही सरकारची असते. तेव्हा जेनेरिक औषधांची सरकारनेच खरेदी करून जेथे जिल्हा रूग्णालये आहेत, जेथे गरीब लोकांची संख्या जास्त आहे तेथे त्यांना ती उपलब्ध व्हावीत म्हणून दुकाने देखील सुरू करण्याचा सरकारचा मानस आहे. या औषधांची खरेदी शासन करणार असून ते दुकान शासन दुसऱ्या व्यक्तीला चालविण्यास देणार आहे. केंद्र शासनाने जेनेरिक मेडिसिनची चेन तयार करण्याचा प्रकल्प तयार केला असून त्याची आम्ही माहिती घेतली आहे. माझ्याकडे लोकप्रतिनिधींनी देखील मागणी केली आहे की, आम्ही आमच्या आमदार निधीतून दुकान उघडतो मात्र औषधे शासनाने खरेदी करून द्यावीत. ते दुकान आम्ही गरीबांकरिता चालवू असे त्यांचे म्हणणे आहे. जेनेरिक औषधांचा फायदा गरिबांना निश्चितपणे होत आहे. सदर औषधे सरकार खरेदी करणार असून आम्ही केंद्र सरकारची देखील मदत घेणार आहोत. तेव्हा अशा औषधांच्या दुकानांची चेन राज्यामध्ये निर्माण करून गरीब माणसांना मदत करण्याचा प्रामाणिक प्रयत्न सरकारकडून केला जाईल. मी सन्माननीय सदस्यांच्या दोन्ही प्रश्नांची उत्तरे दिलेली आहेत.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.माणिकराव ठाकरे : सभापती महोदय, हा अत्यंत महत्त्वाचा प्रश्न आहे. मी नियम 289 अन्वये दिलेल्या प्रस्तावाच्या सूचनेमध्ये हा विषय मांडला होता. कॅन्सर, मधुमेह या आजारांवरील औषधांच्या किंमती खूप आहेत. त्यामुळे त्याचा खूप मोठा आर्थिक भार गरीब रुग्णांवर पडणार आहे. मुंबईत कॅन्सर रुग्णालय असल्यामुळे फार दूरवरून रुग्ण येतात, नव्हे संपूर्ण देशातूनच रुग्ण येतात. कॅन्सर व मधुमेहाच्या आजारांवरील औषधांच्या किंमती वाढल्या आहेत. तेव्हा या आजारांवरील औषधांचे दर कमी करण्यासाठी राज्य शासन स्वत:हून प्रयत्न करणार आहे काय, किंवा औषधांच्या दरावर सबसिडी देणार आहे काय ?

श्री.गिरीश बापट : सभापती महोदय, कॅन्सर, किडनी, हृदय रोग इत्यादी आजारांवरील खर्च गरिबांना परडवणारा नसतो. त्यामुळे आपण आपल्या राज्यातील गरीब रुग्णांना राजीव गांधी जीवनदायी आरोग्य योजनेतून मदत करतो. तसेच, माननीय मुख्यमंत्री व माननीय पंतप्रधान सहाय्यता निधीतून आपण त्यांना औषध घेण्याकरिता मदत करतो. बीपीएल कार्डधारकांची ऑपरेशन्स होतात. त्यांना देखील आपण मोठ्या प्रमाणावर मदत करतो. शहरी गरीब योजने अंतर्गत पुणे महानगरपालिका एक लाख रुपयांची मदत देते. आता आम्ही लोकांना थेट पैसे देण्यापेक्षा या आजारांच्या औषधांची किंमत ऑपरेशन कॉस्टमध्ये धरली तर ते पैसे शासनाच्या माध्यमातून संबंधित रुग्णालयांना देण्याचा विचार केलेला आहे. यासंबंधी केंद्र शासनाशी देखील बोलणे झालेले आहे. महागड्या आणि अतिमहागड्या औषधांवर नियंत्रण आणयाकरिता देखील सरकारतर्फे ....

श्री.माणिकराव ठाकरे : सभापती महोदय, राजीव गांधी जीवनदायी आरोग्य योजने अंतर्गत आपण औषण देणार आहात. पण कॅन्सर आणि मधुमेह या आजारांवर लॉंग टर्म ट्रीटमेंट घ्यावी लागते. त्यामुळे मधल्या काळात आपण कशा प्रकारे गरीब रुग्णांना औषधे उपलब्ध करून देणार आहात किंवा त्यांना मोफत औषधे देण्यासंबंधी निर्णय घेणार आहात काय ?

श्री.गिरीश बापट : सभापती महोदय, यासंबंधी शासनातर्फे जरूर विचार करण्यात येईल. यात एक अडचण अशी आहे की, यातील बरीचशी औषधे इम्पोर्ट करावी लागतात. इम्पोर्ट औषधांवर आपण नियंत्रण ठेवू शकत नाही.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.माणिकराव ठाकरे : सभापती महोदय, मग गरीब रुग्णांना सबसिडीच्या दरात औषधे उपलब्ध करून देण्यात येणार आहेत काय ?

श्री.गिरीश बापट : सभापती महोदय, सबसिडीचा सहानुभूतीपूर्वक विचार केला जाईल.

.....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

पृ.शी.: ***पुणे महानगरपालिकेने युनीपोल उभारण्याची मुदत संपल्यानंतरही मंगेश एन्टरप्रायजेस व सुप्रा पब्लिसीटी प्रा.लि. या जाहिरात कंपनीला बेकायदेशीररित्या मुदतवाढ देणे***

मु.शी.: ***पुणे महानगरपालिकेने युनीपोल उभारण्याची मुदत संपल्यानंतरही मंगेश एन्टरप्रायजेस व सुप्रा पब्लिसीटी प्रा.लि. या जाहिरात कंपनीला बेकायदेशीररित्या मुदतवाढ देणे*** या संबंधी श्री.अनिल भोसले,वि.प.स.यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

श्री.अनिल भोसले (पुणे स्थानिक प्राधिकारी संस्था) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय मुख्यमंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

"पुणे महानगरपालिकेने सन २००५ मध्ये मंगेश एन्टरप्रायजेस आणि सुप्रा या कंपनीला बीओटी तत्त्वावर जाहिरातींचे युनीपोल उभारण्याची परवानगी देणे, याबाबतच्या कराराची मुदत सन २०१० मध्ये संपणे, युनीपोलची मुदत संपल्यानंतरही मंगेश एन्टरप्रायजेस व सुप्रा पब्लिसीटी प्रा.लि. या जाहिरात कंपनीला बेकायदेशीररित्या मुदतवाढ देण्यात आल्याचे फेब्रुवारी, २०१५ मध्ये उघडकीस येणे, ही मुदतवाढ चार वर्षांची असणे, या कंपन्यांकडून सुमारे १ कोटी ५ लाख रुपये महापालिकेला येणे अपेक्षित असणे, प्रत्यक्षात ते मिळाले नाहीच उलट या दोन्ही कंपन्या महापालिकेविरोधात न्यायालयात जाणे, न्यायालयाने रक्कम भरण्याचे आदेश कंपन्यांना देणे, मुदत संपल्यानंतर युनीपोलची मालकी महापालिकेची असून नवीन जागा वाटप नियमावली आणि जाहिराती धोरणानुसार निविदा काढून व त्या निविदांना स्थायी समितीकडून मान्यता घेणे अपेक्षित असतानाही असा ठराव न होणे, दबावाखाली सदरहू कंपन्यांची मुदतवाढ झालेली असल्याने उक्त प्रकरणी तातडीने चौकशी करुन संबंधित कंपन्यांवर कारवाई करुन करार रद्द करण्याची नितांत आवश्यकता, यावर शासनाने करावयाची कारवाई व शासनाची प्रतिक्रिया."

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.देवेंद्र फडणवीस (मुख्यमंत्री) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती सन्माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

उप सभापती : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

(प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे)

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.अनिल भोसले : सभापती महोदय, पुणे महानगरपालिकेने दोन कंपनींना जाहिरातींचे युनीपोल उभारण्याचे काम बीओटीवर दिले होते. सदर काम देताना कोणतेही टेंडर काढण्यात आले नव्हते. सन डिसेंबर 2010 व 2011 मध्ये महानगरपालिकेने जाहिरातीसंबंधातील नियमावली बनवली. त्या नियमावलीतील कलम 8अ अनुसार टेंडर काढून काम केले पाहिजे अशा प्रकारचा प्रस्ताव महानगरपालिकेच्या सर्वसाधारण सभेत मंजूर झाला व ती नियमावली लागू झाली. सुप्रा आणि मंगेश एंटरप्रायझेस यांची मुदत संपली होती. महानगरपालिकेच्या विधी विभागाचे बोओटी तत्त्वावरील काम रद्द करून टेंडर काढण्यात यावे अशा प्रकारचे मत आले होते.

यानंतर श्री.जुन्नरे....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. अनिल भोसले ....

महानगरपालिकेच्या नियमावलीतील कलम 8 अनुसार निविदा काढून कामे दिली गेली पाहिजे होती. परंतु ही कामे कलम आठ अनुसार देण्यात आली नाही. त्यामुळे यासंदर्भातील निविदा का काढण्यात आली नाही ? महानगरपालिकेच्या स्टँडींग कमिटीमध्ये मंगेश एंटरप्रायजेस व सुप्रा पब्लिसिटी या दोन कंपन्यांना काम देऊ नये यासंदर्भात ठराव झालेला असतानाही हे काम का देण्यात आले तसेच यासंदर्भात त्यावेळच्या आयुक्तांवर कारवाई का केली गेली नाही ?

श्री. देवेंद्र फडणवीस : सभापती महोदय, सन 2004 ते 2009 या कालावधीकरिता हे काम पहिल्यांदा देण्यात आले होते. मंगेश कंपनीने 2009 च्या नंतर मुदतवाढ मागितली नाही. मात्र त्यांच्याकडे मोठया प्रमाणात थकबाकी होती. सदर थकबाकी वसूल करण्यात आलेली आहे. हे काम 2004 ते 2009 मध्ये देण्यात आले होते त्यावेळेस यासंदर्भात ॲग्रीमेंट करण्यात आले होते त्यामध्ये फर्स्ट राईट ऑफ रिफ्यूजल महानगरपालिकेने त्यांना दिलेला आहे. फर्स्ट राईट ऑफ रिफ्यूजलच्या अंतर्गत ऑफसेट प्राईसवर ते काम करावयास तयार असतील तर याचे रिन्युअल करता येईल अशा प्रकारचा क्लॉज ॲग्रीमेंटमध्ये असल्यामुळे 2009 मध्ये याचे पुन्हा रिन्युअल करण्यात आले. सन 2014 मध्ये हा करारनामा संपला परंतु 2009 साली जे ॲग्रीमेंट केले होते त्यावेळी त्यांना फर्स्ट राईट ऑफ रिफ्यूजल देण्यात आले होते. त्या फर्स्ट राईट ऑफ रिफ्यूजलच्या अंतर्गत पुन्हा करारनामा रिन्युअल करण्यात आला. दरम्यानच्या काळामध्ये महानगरपालिकेने लिगल ओपिनियन घेतले व त्यामध्ये असे सांगण्यात आले होते की, महानगरपालिकेने जरी फर्स्ट राईट ऑफ रिफ्यूजल दिला असला आणि पुन्हा करारनामा केला असला आणि महानगरपालिकेला असे वाटत असेल की, आपल्याला नव्याने टेंडर काढावयाचे आहे तर महानगरपालिका टेंडर काढू शकते. यांच्याकडून घेतलेले पैसे महानगरपालिकेने परत करावे आणि टेंडर काढावे अशा प्रकारचे लिगल ओपिनियन आले. यासंदर्भातील पुढची जी काही कारवाई होती ती कारवाई महानगरपालिकेने सुरु केल्यानंतर संबंधित सुप्रा कंपनी कोर्टात गेली व आता कोर्टाने यासंदर्भात स्थगिती दिल्यामुळे आता महानगरपालिका पुढील कारवाई करु शकत नाही.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. धनंजय मुंडे : सभापती महोदय, या लक्षवेधी सूचनेच्या संदर्भात माननीय मुख्यमंत्र्यांनी असे सांगितले आहे की, विधी तज्ज्ञांनी सल्ला दिला होता. हे पूर्ण काम निविदा प्रक्रिया राबवून केले जावे असा सल्ला विधी तज्ज्ञांनी दिला होता. परंतु यामध्ये तशा प्रकारची निविदा प्रक्रिया राबवली गेली नसल्यामुळे ज्या संबंधित अधिकाऱ्यांनी या दोन कंपन्यांना फेव्हर करण्याचा प्रयत्न केला आहे त्या संबंधित अधिकाऱ्यांच्या विरोधात व कंपनीच्या विरोधात कोणती कारवाई केली जाणार आहे ? लक्षवेधी सूचनेच्या उत्तरामध्ये 55 लाख रुपये भरले आहे असे सांगितले आहे. परंतु या कंपनीकडे गेल्या पाच वर्षापासून 55.23 लाख रुपयांची बाकी थकीत होती त्यामुळे ही थकबाकी महानगरपालिका दंड व्याज लावून वसूल करणार आहे काय ? या लक्षवेधी सूचनेच्या संदर्भात सन्माननीय सदस्यांनी मूळ प्रश्न असा विचारला होता की, सुप्रा आणि मंगेश एंटरप्रायजेस कंपनीचे मालक, डायरेक्टर व भागीदार कोण आहेत याबाबतीत उत्तर आलेले नाही. त्यामुळे या कंपनीकडे जे काही पैसे राहिले आहेत ते दंड व व्याजासहित वसूल केले जाणार आहे काय, कंपनीच्या डायरेक्टरांची नावे जाहीर केली जातील काय, निविदा न देता काम दिले गेले त्यांच्यावर कारवाई केली जाणार आहे काय ?

श्री. देवेंद्र फडणवीस : सभापती महोदय, सन्माननीय विरोधी पक्ष नेते ज्या थकबाकीचा उल्लेख करीत आहेत त्यासंदर्भात महानगरपालिकेच्या नियमानुसार जी कारवाई करणे आवश्यक असेल ती करुन वसूली केली जाईल. यापूर्वीची संबंधित वसुली करण्यात आलेली आहे.

सभापती महोदय, या विषयाच्या संदर्भात करारनामा एक्झिक्यूट केल्यानंतर लिगल ओपिनियन घेण्यात आले होते. लिगल ओपिनियनमध्ये एवढेच विचारण्यात आले होते की, आपण राईट ऑफ रिफ्यूजलचा करारनामा केल्यानंतर हा करारनामा आपल्याला रद्द करता येईल काय ? यासंदर्भात त्यांनी सांगितले की, करारनामा रद्द करता येईल परंतु करारनामा रद्द करताना तुमच्यावर लायबिलिटी येईल कारण तुम्ही मुळ करारनामा राईट ऑफ रिफ्यूजलचा केला असल्यामुळे तुम्ही पैसे परत केले तर तुम्हाला ते करता येऊ शकते. जे काही लिगल ओपिनियन आहे त्यानुसार महानगरपालिकेने कारवाई सुरु केली होती परंतु त्यावर आता स्थगिती आलेली आहे. या प्रश्नाच्या संदर्भात स्थगिती असल्यामुळे या सभागृहात त्यासंदर्भात निर्णय करणे शक्य होणार नाही. या दोन्ही कंपन्यामध्ये भागीदार कोण आहेत याची आता माझ्याजवळ माहिती नसल्यामुळे ती माहिती मी पटलावर ठेवतो. ...3..

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.धनंजय मुंडे : सभापती महोदय, मंगेश एंटरप्रायजेस आणि सुप्रा पब्लिसिटी कंपनीच्या संदर्भात मुख्यमंत्र्यांकडून उत्तर आलेले नाही. या दोन कंपनीमध्ये डायरेक्टर कोण आहेत याची माहिती पटलावर ठेवण्यात येईल अशी माहिती मुख्यमंत्र्यांनी दिली आहे. परंतु या दोन कंपन्यांमध्ये मालक व भागीदार कोण आहेत याची माहिती आलेली नाही. मंगेश एंटरप्रायजेसकडे 2004 ते 2009 पर्यंत करार होता. मंगेश एंटर प्रायजेस आणि सुप्रा कंपनीकडे ॲडसाठी जे ठराविक लोकेशन दिले होते त्यामध्ये एसएनडीटीच्या पुलावर 80X10 ॲड करावयाची होती परंतु त्यांनी 100X12 ची ॲड दिलेली आहे. अशा प्रकारच्या तक्रारी असतानाही त्यांच्या विरोधात कोणतीही कारवाई झाली नाही. या प्रकरणामध्ये ज्या अधिकाऱ्यांनी कारवाई करावयास पाहिजे होती त्यांनी ती का केली नाही ? या प्रकरणाला कोर्टाने स्टे दिलेला आहे. कोर्टाने स्टे दिलेला असला तरी या प्रकरणाची चौकशी करण्याच्या बाबतीत तसेच अधिकाऱ्यांवर कारवाई करण्याच्या बाबतीत शासनाला कोणतीही अडचण येणार नाही. त्यामुळे संबंधित कारवाई शासनाने केली पाहिजे असे आमचे म्हणणे आहे.

श्री. देवेंद्र फडणवीस : सभापती महोदय, सन 2009 मध्ये जो करार झाला त्यानुसार 2009 ते 2014 या कालावधीत चौकशीची मागणी करण्यात आली नाही परंतु यासंदर्भातील चौकशी 2015 मध्ये मागण्यात येत आहे. खरे म्हणजे 2009 ते 2014 पर्यंत आपल्याला चौकशी मागता आली असती. परंतु ठीक आहे. आपल्याला चौकशी कधीही मागता येते. या प्रकरणामध्ये सकृतदर्शनी गडबड झाली असल्याचे दिसून येत नाही.

यानंतर श्री. अजित....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.देवेंद्र फडणवीस....

लीगल ओपिनियन स्पष्ट आहे की, महानगरपालिकेला नवीन टेंडर काढणे हिताचे वाटत असेल तर महानगरपालिकेने फर्स्ट राईट ऑफ रिफ्युझल नामंजूर करावा त्याप्रमाणे महानगरपालिकेने कारवाई केलेली आहे. पण त्या कारवाईवर न्यायालयाची स्थगिती आली आहे, त्यामुळे आज त्यावर कारवाई करणे शक्य नाही.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

पृ.शी.: नांदगाव पेठ, जि.अमरावती येथील इंडिया बुल्स औष्णिक प्रकल्पाला पर्यावरण विभागाने केवळ रेल्वेने कोळसा वाहतूक करण्याची परवानगी दिलेली असताना ती ट्रकने करण्यात येणे

मु.शी : नांदगाव पेठ, जि.अमरावती येथील इंडिया बुल्स औष्णिक प्रकल्पाला पर्यावरण विभागाने केवळ रेल्वेने कोळसा वाहतूक करण्याची परवानगी दिलेली असताना ती ट्रकने करण्यात येणे या संबंधी ॲड. राहुल नार्वेकर, सर्वश्री आनंद ठाकूर, हेमंत टकले,वि. प. स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

ॲड.राहुल नार्वेकर (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय पर्यावरण मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

"अमरावती जिल्ह्यातील नांदगाव पेठ येथील इंडिया बुल्स औष्णिक प्रकल्पाला कोळसा वाहतूक फक्त रेल्वेने करण्याच्या अटीवर पर्यावरण विभागाकडून परवानगी देण्यात येणे, गेले दीड वर्ष कंपनीकडून वलगाव गावामध्ये नागरी वस्तीच्या 500 मीटर अंतरामध्ये कोळशाची चढ-उतार करणे, परवानगी शिवाय ट्रकने सर्व कोळशाची वाहतूक करण्यात येणे, यामुळे नांदगांव परिसरातील नागरिकांच्या आरोग्याला धोका निर्माण होऊन ऐन पावसाळ्यात सर्व कोळसा आजू-बाजूच्या परिसरातील शेतीमध्ये जाऊन शेतीचे फार मोठ्या प्रमाणावर झालेले नुकसान, अवजड वाहतुकीमुळे या परिसरात वारंवार होत असलेले लहान-मोठे अपघात तसेच या प्रकरणात दोषी आढळणारे अधिकारी व कंपनी व्यवस्थापन यांच्यावर कारवाई करण्याची स्थानिक नागरिकांकडून होत असलेली मागणी, परिणामी स्थानिक नागरिकांत इंडिया बुल्स औष्णिक कंपनीबाबत निर्माण झालेली तीव्र चीड, कंपनी व्यवस्थापन व शासनाने याकडे केलेले अक्षम्य दुर्लक्ष, राज्यशासनाच्या पर्यावरण विभागाची परवानगी न घेता नांदगाव पेठ येथे अवैधपणे चालू असलेली कोळशाची चढ-उतार व वाहतूक त्वरित थांबवून स्थानिक नागरिकांच्या आरोग्याची दक्षता घेऊन उपाययोजना करण्याची आवश्यकता, यावर शासनाने तातडीने करावयाची कारवाई व उपाययोजना."

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.रामदास कदम (पर्यावरण मंत्री) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

उप सभापती : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

(प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे)

..4..

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ॲड.राहुल नार्वेकर : सभापती महोदय, अमरावती जिल्ह्यातील नांदगाव पेठ येथे इंडिया बुल्स पॉवर लि.ही कोलबेस पॉवर जनरेशन कंपनी आहे. ही कंपनी सन 2013 मध्ये सुरु झाली. तेव्हापासून या कंपनीकडून अनेक अनधिकृत गोष्टी होत आहेत. या कंपनीस सन 2010 मध्ये केंद्रीय पर्यावरण विभागाकडून परवानगी मिळालेली आहे. 1 जून 2013 रोजी ही कंपनी सुरु झाली. सन 2010 मध्ये पर्यावरण विभागाकडून परवानगी मिळाली त्यामध्ये स्पष्टपणे म्हटलेले होते की, कंपनीमध्ये लागणारा कोळसा रेल्वेमधून आणण्यात येईल. दिनांक 14.10.2014 रोजी त्यांनी रेल्वे ऐवजी रोडद्वारे कोळशाचे लोडींग अनलोडींगची परवानगी घेतली. दिनांक 1 जून 2013 ते 14.10.2014 या कालावधीत कंपनीने अनधिकृतपणे रोडद्वारे कोळशाची ने-आण केली. रस्त्याने कोळशाची वाहतूक होत असल्यामुळे तेथील नागरिकांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झालेले आहे. या रस्त्यांचा वापर करताना रस्त्याची दुरुस्ती किंवा रस्त्याचा विस्तार यासाठी लागणारा सर्व खर्च कंपनी करणार असे कंपनीने सांगितले होते. सन 2011 मध्ये शासनाने कंपनीकडे या कामासाठी 26 कोटी रुपयांची मागणी केली. परंतु त्या कंपनीने आजपर्यंत शासनाकडे एक रुपयादेखील जमा केलेला नाही. तसेच शासनाने देखील त्याबाबत कोणताही पाठपुरावा केलेला नाही. अपरवर्धा धरणातून ही कंपनी पाणी घेते. या धरणाच्या दुरुस्तीसाठी कंपनीने शासनाकडे 550 कोटी रुपये जमा करावेत असे देखील ठरले होते. परंतु ते पैसे देखील अजूनपर्यंत जमा झालेले नाहीत. माननीय सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशानुसार गावापासून एक किलोमीटर अंतरापर्यंत कोळशाची ने-आण करु शकत नाही. वलगाव हे गाव लोडींग अनलोडींगपासून फक्त 500 मीटर अंतरावर आहे. असे असताना त्या ठिकाणी कोळशाची वाहतूक कशी करण्यात येत आहे ?

श्री.रामदास कदम : सभापती महोदय, सुरुवातीला या कंपनीला ट्रकने कोळसा वाहतूक करण्याची परवानगी नव्हती ही गोष्ट खरी आहे. परंतु सदर कंपनीने केंद्रीय पर्यावरण विभागाकडून ट्रकद्वारा कोळशाची वाहतूक करण्याची परवानगी घेतली आणि ही परवानगी 2016 पर्यंत आहे. त्या कंपनीचा स्वत:चा रेल्वे ट्रॅक तयार झालेला आहे. तेथून वाहतूक करण्याची परवानगी त्यांनी केंद्रीय रेल्वे मंत्रालयाकडे मागितली आहे आणि त्यांना लवकरच परवानगी मिळेल. त्यांना 2016 पर्यंत वाट पाहण्याची आवश्यकता भासणार नाही. तेव्हा आपणास त्या बाबतीत कोणताही विशेष निर्णय घेता येणार नाही.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.रामदास कदम...

सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी रस्त्याच्या दुरुस्तीचा उल्लेख केला. सदर कंपनीने रस्त्याची दुरुस्ती केली पाहिजे यामध्ये दुमत नाही. कंपनीने 20 कोटी रुपये रस्त्यांच्या दुरुस्तीसाठी दिले नसतील तर ते त्यांच्याकडून तातडीने वसूल करण्यात येतील आणि रस्त्यांची तातडीने दुरुस्ती करण्यात येईल यामध्ये दुमत नाही.

सभापती महोदय, सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयानुसार गावापासून एक किलोमीटरच्या आत कोळशाची वाहतूक करता येत नाही असे सन्माननीय सदस्यांनी सांगितले. त्यांनी तो निर्णय माझ्याकडे द्यावा. मी तो निर्णय तपासून घेईन. त्या निर्णयाप्रमाणे 500 मीटरच्या आत वाहतूक होत असेल तर ती थांबविण्यात येईल.

सभापती महोदय, त्या ठिकाणी कोळशाची वाहतूक असल्यामुळे लोकांच्या अनेक तक्रारी आल्या आहेत असे सन्माननीय सदस्यांचे म्हणणे आहे. सदर कंपनीने सहा बाय आठशे फुटाची जाळी कंपनीच्या कंपाऊन्डला लावली आहे जेणेकरुन धुळीचे कण बाहेर जाऊन शेतकऱ्यांचे नुकसान होणार नाही. तसेच कंपनीने स्प्रिंकल लावले आहेत. तीन टँकर ठेवले आहेत. ज्या रस्त्यावरुन वाहतूक होते त्या ठिकाणी पाणी मारण्यात येते जेणेकरुन धुळीचे कण उडून प्रदूषण होणार नाही याची दखल कंपनीने घेतलेली आहे. भविष्यात तसे काही होणार नाही असे कंपनीने लेखी लिहून दिलेले आहे.

श्री.माणिकराव ठाकरे : सभापती महोदय, मंत्री महोदयांनी सांगितले की, सदर कंपनीचा स्वत:चा रेल्वे ट्रॅक होणार आहे. ज्या ठिकाणी ट्रकने वाहतूक होते तेथील रस्ते उखडले जातात, प्रदूषण होते, आरोग्याच्या समस्या निर्माण होतात. अशी कामे होत असताना त्या कंपनीकडून एक खनिज निधी गोळा करण्यात येतो. ज्या गावांना याचा त्रास होतो त्या गावाच्या विकासासाठी तो निधी वापरण्यात येतो. तेव्हा वलगावाच्या बाबतीत तसे होणार आहे काय ?

श्री.रामदास कदम : सभापती महोदय, कंपनीने दोन टक्के निधी आजूबाजूच्या 10 कि.मी.परिसरातील गावांच्या विकासासाठी खर्च केला पाहिजे असा नियम आहे, कायदा आहे. त्या गावांतील जी काही कामे असतील ती मागवून पूर्ण करण्याचा प्रयत्न करण्यात येईल.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ॲड.राहुल नार्वेकर : सभापती महोदय, सदर कंपनीचा स्वत:चा रेल्वे ट्रॅक तयार झालेला आहे परंतु रेल्वे मंत्रालयाकडून परवानगी न मिळाल्यामुळे त्याचा वापर करता येत नाही असे माननीय मंत्र्यांनी सांगितले. त्यांनी पुढे असेही सांगितले की, केंद्रीय पर्यावरण विभागाने सन 2016 पर्यंत रस्त्याने वाहतूक करण्याची परवानगी दिलेली आहे. माझा प्रश्न आहे की, सन 2013 ते 2014 या कालावधीत सदर कंपनीने कोणतीही परवानगी न घेता कोळशाची वाहतूक केली त्याबद्दल शासनाने कंपनीवर कोणती कारवाई केली ?

श्री.रामदास कदम : सभापती महोदय, ही बाब तपासून घेण्यात येईल. सन 2013 ते 2014 या कालावधीत कंपनीने परवानगी न घेता वाहतूक केली असेल तर कारवाई करण्यात येईल.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

पृ. शी. : .मिरा रोड (ठाणे) येथील शांती नगर भागात राहणाऱ्या 13 वर्षीय मुलीवर स्थानिक नगरसेवकाने अतिप्रसंग करणे

मु. शी. : मिरा रोड (ठाणे) येथील शांती नगर भागात राहणाऱ्या 13 वर्षीय मुलीवर स्थानिक नगरसेवकाने अतिप्रसंग करणे यासंबंधी श्री माणिकराव ठाकरे, प्रा. जोगेंद्र कवाडे, सर्वश्री शरद रणपिसे, संजय दत्त, कपिल पाटील, जयवंतराव जाधव, ॲड.रामहरी रुपनवर, श्री. अमरनाथ राजूरकर, ॲड.हुस्नबानू खलिफे, श्रीमती दिप्ती चवधरी, सर्वश्री आनंदराव पाटील, अनंत गाडगीळ, चंद्रकांत रघुवंशी, अशोक ऊर्फ भाई जगताप,वि. प. स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

श्री.माणिकराव ठाकरे (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय मुख्य मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

"मिरा रोड (ठाणे) येथील शांती नगर भागात राहणाऱ्या इयत्ता सातवीत शिकणाऱ्या एका 13 वर्षे वयाच्या मुलीवर स्थानिक लोकप्रतिनिधी (नगरसेवक) यांनी दिनांक 20 मार्च, 2015 रोजी वा त्या सुमारास अतिप्रसंग करण्यात आल्याचा धक्कादायक प्रकार घडणे, यामुळे मिरा रोड पोलीस स्टेशन येथे त्यांच्या विरुध्द विनयभंग व बालकांचे लैंगिक अत्याचार करण्यात आल्या प्रकरणाचा गुन्हा दाखल करण्यात येणे, मात्र पोलिसांकडून त्यांच्यावर कोणतीच कारवाई करण्यात न येता सदरहू मुलीच्या आईवडिलांना तक्रार मागे घेण्याबाबत पोलिसांकडून व काही व्यक्तींकडून दबाव टाकण्यात येणे, यामुळे सदरहू मुलीच्या आईवडिलांमध्ये निर्माण होत असलेले दहशतीचे व भीतीचे वातावरण, यामुळे कायदा व सुव्यवस्था नसणे, यामुळे महिलांची सुरक्षा धोक्यात येणे, सबब, या प्रकरणी चौकशी होऊन दोषीवर तसेच मुलीच्या आईवडिलांना तक्रार मागे घेण्यासाठी दबाव टाकणाऱ्या पोलिसांवर कारवाई करण्याबाबत व महिलांना संरक्षण मिळण्याबाबत शासनाने करावयाची तातडीची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.देवेंद्र फडणवीस (मुख्यमंत्री) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

उप सभापती : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

(प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे)

..9.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.माणिकराव ठाकरे : सभापती महोदय, हा अतिशय गंभीर विषय आहे. मीरा रोड येथील शांतीनगर भागात राहणाऱ्या 13 वर्षाच्या शाळकरी मुलीवर लोकप्रतिनिधीकडून अतिप्रसंग करण्यात आला. या प्रकरणी लोकप्रतिनिधींना अटक होऊ नये म्हणून प्रकरण दाबण्यात आले असे मीरा पोलीस स्टेशनमध्ये उघडकीस आले आहे.

यानंतर श्री.बोर्डे..

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.माणिकराव ठाकरे....

ही घटना 20 मार्च रोजी घडली. 13 वर्षाच्या एका मुलीवर....

उप सभापती : मी सभागृहाच्या आणि विशेषत: सन्माननीय सदस्य श्री.काळे यांच्या निदर्शनास आणून देतो की, सन्माननीय सदस्यांकडून आपली लक्षवेधी सूचना अगोदर चर्चेला घेण्याबाबत विनंती करणाऱ्या चिठ्ठया पाठविण्यात येत आहेत. मी सन्माननीय सदस्यांना विचारु इच्छितो की, आपल्याला इतरत्र जावयाचे असेल तर आपण लक्षवेधी सूचना कशाला देता ? खरोखरच एखाद्या वेळी सन्माननीय सदस्यांची अडचण असेल तर मी समजू शकतो. सन्माननीय सदस्य श्री.विक्रम काळे, आपल्यासारख्या व्यक्तीने अशी कारणे सांगितली तर योग्य नाही.

श्री.विक्रम काळे : महोदय, माझी खरोखरच आज अडचण आहे. त्यामुळे...

उप सभापती : यापूर्वीही आपली अडचण असल्याच्या अनेक चिठ्ठया माझ्याकडे आहेत.

श्री.माणिकराव ठाकरे : सभापती महोदय, या घटनेवरुन स्पेसिफिक लक्षात येते की, या प्रकरणातील आरोपीला अटक होऊ नये यासाठी पोलीस स्टेशनच्या माध्यमातून मदत झाली. अत्याचारग्रस्त मुलगी आणि आरोपी हे दोघेही एकाच इमारतीमध्ये राहतात. घटनेनंतर त्या इमारतीमध्ये आरोपीचा रोजचा वावर होता. 20 मार्च रोजी घटना घडल्यानंतर संबंधित आरोपीला तत्काळ अटक करुन त्याच्यावर कारवाई करणे अपेक्षित होते. परंतु आरोपीला निघून जाता यावे, त्याला अटक होता कामा नये या दृष्टीने पोलीस स्टेशनने दिरंगाईने कारवाई केल्याचे दिसून येते. 20 तारखेला घटना घडली असताना 22 तारखेपर्यंत आरोपीला अटक केली नव्हती. आरोपीला उच्च न्यायालयात जाऊन जामीन आणण्याची संधी उपलब्ध करुन देण्याचा प्रयत्न पोलिसांकडून झाल्याचे दिसून येते. यापूर्वी सुध्दा मीरा रोड येथे अशाच प्रकारची घटना घडली होती. त्यावेळी घटनेच्या दिवशीच आरोपीवर एफआयआर दाखल करुन त्याला अटक करण्यात आली होती. परंतु या प्रकरणी आरोपीला अटक करण्यासाठी दोन दिवस लावले. किंबहुना आरोपीला अटक होऊ नये याच दृष्टीने पोलिसांनी कार्यवाही केली. ही बाब राज्याच्या गृह विभागाच्या आणि कायदा व सुव्यवस्थेच्या दृष्टीने कदापि योग्य नाही. या आरोपीला अटक होऊ नये किंवा त्याला जामीन मिळावा यासाठी ज्या अधिकाऱ्याने जाणीवपूर्वक दिरंगाई केली त्या पोलीस अधिकाऱ्यावर शासन कारवाई करणार काय ?

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.देवेंद्र फडणवीस : सभापती महोदय, ही घटना घडल्याबरोबर दिनांक 20 मार्च, 2015 रोजी 19.15 मिनिटांनी गुन्हा दाखल करण्यात आला. या प्रकरणी विनाविलंब पास्को कायद्याचा अवलंब करण्यात आला. सर्वोच्च न्यायालयाच्या मार्गदर्शक तत्त्वानुसार आरोपीला गुन्ह्याच्या तपासकामी हजर करण्याच्या संदर्भात नोटीस देण्यात आली. दरम्यानच्या काळात आरोपी न्यायालयात गेला आणि त्याला एकतर्फी अंतरिम जामीन मिळाला. सरकारने तो जामीन तातडीने रद्द करण्याच्या दृष्टीने हालचाल केली. आज या प्रकरणी न्यायालयात सुनावणी सुरु आहे. त्यामुळे आरोपीला मिळालेला अंतरिम जामीन रद्द होईल अशी अपेक्षा आहे. आज संध्याकाळपर्यंत या प्रकरणाचा निकाल येईल. तरी देखील सन्माननीय सदस्यांनी ज्या भावना व्यक्त केल्या त्यानुसार या प्रकरणी पोलीस अधिकाऱ्यांनी कारवाई करण्यात दिरंगाई केली आहे काय किंवा आरोपीला साथ देण्याचा प्रयत्न केला आहे काय, या बाबतची चौकशी करण्यात येईल. चौकशीमध्ये जर पोलीस अधिकारी दोषी आढळले तर त्यांच्यावर कारवाई केली जाईल.

श्री.माणिकराव ठाकरे : सभापती महोदय, माननीय मुख्यमंत्र्यांनी सांगितले की, या प्रकरणी आरोपीला नोटीस देण्यात आली होती. वास्तविक पाहता ही घटना घडल्यानंतर त्याला नोटीस देणे म्हणजे त्या आरोपीला न्यायालयात जाऊन जामीन आणण्याची संधी देणे होय. या संदर्भात सीसीटीव्ही कॅमेऱ्यामध्ये स्पष्टपणे दिसत आहे. आपण सीसीटीव्हीचे फुटेज जप्त केले आहे. सीसीटीव्हीच्या चित्रीकरणामध्ये सर्वकाही उघडउघड दिसत आहे. असे असताना आरोपीला केवळ तपासकामी हजर राहण्याबाबतची नोटीस देणे आणि त्याच्यावर कारवाई न करणे हे अतिशय भयंकर आहे. माननीय मुख्यमंत्र्यांनी सांगितले की, संबंधित आरोपीचा जामीन रद्द करण्यासाठी प्रयत्न करण्यात येईल. माननीय मुख्यमंत्री, आपण या प्रकरणी कारवाई करीत आहात, याबद्दल शंका घेण्याचे कारण नाही. परंतु, या प्रकरणी ज्या अधिकाऱ्यांनी योग्य ती कार्यवाही करण्यात दुर्लक्ष केले त्याच्यावर आपण काहीच कारवाई करणार नाही काय, आरोपीला पकडले म्हणजे सर्व संपले काय ? या निमित्ताने मी स्पेसिफिक विचारतो की, या प्रकरणी कारवाई करण्यात दुर्लक्ष करणाऱ्या पोलीस अधिकाऱ्यावर शासन काय कारवाई करणार आहे ? कारण संबंधित पोलिसांनी या आरोपीला घटना घडल्यानंतर दोन-तीन दिवस हालचाल करण्यास सवलत दिली. सर्वांसमोर आरोपी फिरत असताना सुध्दा त्याला अटक केली गेली नाही. त्यामुळे ज्या अधिकाऱ्यांनी या

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

प्रकरणी कारवाई करण्यात दुर्लक्ष केले त्याला निलंबित केले पाहिजे. महोदय, 13 वर्षाच्या अल्पवयीन मुलीवर अशाप्रकारे अत्याचार होत असेल आणि कारवाई करण्यात दिरंगाई करणाऱ्या संबंधित पोलीस अधिकाऱ्यावर कारवाई होत नसेल तर राज्यात चांगला संदेश जाणार नाही.

श्री.देवेंद्र फडणवीस : सभापती महोदय, या आरोपीवर ज्या कायद्यान्वये गुन्हा दाखल केला आहे त्या बाबत सर्वोच्च न्यायालयाने काही मार्गदर्शक तत्त्वे दिलेली आहेत. त्या मार्गदर्शक तत्त्वानुसार आरोपीला अगोदर नोटीस द्यावी लागते. त्या मार्गदर्शक तत्त्वानुसार अशा प्रकरणात जर आरोपीला अटक करावयाची असेल तर Reason to be recorded in writing करून अटक करावी लागते. या मार्गदर्शक तत्त्वानुसार पोलिसांनी कारवाई केली आहे. तरी सुध्दा या प्रकरणी पोलीस अधिकाऱ्यांनी दिरंगाई केली आहे काय, या बाबत चौकशी करण्यात येईल. चौकशीमध्ये जर ते दोषी आढळले तर त्यांच्यावर कडक कारवाई करण्यात येईल. कोणत्याही अधिकाऱ्यांकडून सरकार अशा गोष्टी खपवून घेणार नाही. मी एवढेच सांगतो की, या प्रकरणी कारवाई करण्यासाठी ज्या ज्या गोष्टी आवश्यक आहेत त्या करण्यामध्ये पोलिसांनी तसूभरही गडबड केली असेल तर त्यांच्यावर कारवाई करण्यात येईल.

प्रा.जोगेंद्र कवाडे : सभापती महोदय, दिनांक 20 मार्च रोजी 13 वर्षाच्या मुलीचा विनयभंग करण्याचा घृणास्पद प्रकार घडला. या प्रकरणी पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे. परंतु आरोपीला अटक करण्यात चालढकल केली आहे. जेणेकरून आरोपीला अटक करण्यापूर्वी न्यायालयातून अंतरिम जामीन मिळावा. मीरा-भाईंदर महानगरपालिकेचा नगरसेवक असलेल्या एका आरोपीला पोलीस पाच दिवस शोधू शकले नाहीत. वर्तमानपत्रात बातमी आली आहे की, तो नगरसेवक भारतीय जनता पक्षाचा आहे. महोदय, घटना घडल्यानंतर हा आरोपी पाच दिवस फरार होता. हा फरार आरोपी मुंबईत एका मंत्र्यांच्या घरात होता, अशी सर्वत्र चर्चा आहे. महोदय, माननीय मुख्यमंत्र्यांनी सांगितले की, सदरहू आरोपीला नोटीस दिली होती. महोदय, इतर घटनांमध्ये गुन्हा दाखल झाल्यानंतर तातडीने कारवाई केली जाते. परंतु या प्रकरणातील आरोपी विशिष्ट राजकीय पक्षाचा असल्यामुळे त्याच्यावर पोलिसांनी मेहेरबानी केली आहे की काय, असा प्रश्न आमच्यासमोर निर्माण झाला आहे. या निमित्ताने मी विचारु इच्छितो की, या प्रकरणी

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

प्रा.जोगेंद्र कवाडे....

सीआरपीसी (41) (a) नुसार कारवाई का करण्यात आली नाही ? हे प्रकरण न्यायप्रविष्ट आहे. या घटनेतील आरोप सत्ताधारी पक्षाचा नगरसेवक आहे. याच पोलीस स्टेशनचे रेकॉर्ड आहे की, भाजपाच्या एका नगरसेविकेने चर्मकार समाजाच्या गटई कामगार महिलेशी अत्यंत अभद्र व्यवहार केला, जातीवाचक शिवीगाळ केली म्हणून तिच्यावर गुन्हा दाखल करण्यात आला. परंतु या विषयी पुढे काहीच कारवाई झाली नाही. आपण अगोदर राज्यातील कायदा व सुव्यवस्थेच्या बाबतीत खूप चर्चा केली. या निमित्ताने मी स्पेसिफिक विचारतो की, घटनेतील आरोपी कोणत्याही पक्षाचा असो त्याच्यावर कठोर कारवाई करण्याबाबत शासन आदेश देईल काय ? तसेच ज्या पोलीस अधिकाऱ्यांनी आरोपीला अशाप्रकारे पळवाट शोधून दिली त्या अधिकाऱ्यावर कारवाई करणार काय ?

नंतर श्री.कांबळे...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. देवेंद्र फडणवीस : सभापती महोदय, कोणत्याही माननीय मंत्र्यांच्या घरामध्ये आरोपी असल्याबद्दल कोणतीही तक्रारही नाही, कोणताही पुरावा नाही, कोणतीही चर्चा नाही. उगीच माननीय मंत्र्यांना पिंजऱ्यात उभे करण्याची आवश्यकता नाही असे मला वाटते. भाजपचा किंवा कोणत्याही पक्षाचा असो, त्यांनी असा गुन्हा केला असेल तर .... सकृतदर्शनी .... (अडथळा)

श्री. माणिकराव ठाकरे : सभापती महोदय, संशय असण्याचे कारण नाही. सीसीटीव्हीमध्ये आले आहे.

श्री. देवेंद्र फडणवीस : सभापती महोदय, सीसीटीव्हीमध्ये कोणते फुटेज आहे हे सांगितले तर आरोपीला मदत होईल. त्यामुळे मी येथे ते सांगत नाही. माझ्याकडे सीसीटीव्हीचे फुटेज आहे. मी सांगितले तर आरोपीलाच मदत होईल. मुलीला मदत होत नाही. त्यामुळे मी हे सांगत आहे. आपण सर्वांनी मुलीच्या बाजूने असले पाहिजे. सन्माननीय सदस्यांनी कलम 41(ए) बाबत सांगितले. मी कलम 41(ए) काय आहे ते सन्माननीय सदस्यांच्या निदर्शनास आणून देतो.

सभापती महोदय, कलम 41(ए) मध्ये असे नमूद केले आहे की, "41A. Notice of appearance before police officer. - (1) The police officer shall, in all cases where the arrest of a person is not required under the provisions of sub-section (1) of section 41, issue a notice directing the person against whom a reasonable complaint has been made, or credible information has been received, or a reasonable suspicion exists that he has committed a cognizable offence, to appear before him or at such other place as may be specified in the notice." (गोंधळ) सन्माननीय सदस्यांनी या संदर्भात शंका व्यक्त केल्यामुळेच मी हे सांगितले. सदर प्रकरणी कुठेही तसूभरही चूक केली का याची चौकशी केली जाईल आणि तसूभरही चूक असेल तर कारवाई करण्यात येईल.

श्री. माणिकराव ठाकरे : सभापती महोदय, माझा पॉईंट ऑफ ऑर्डर आहे. सीआरपीसीच्या कलम 41(1)(ए) मध्ये काय आहे ते माननीय मुख्यमंत्र्यांनी सांगितले आहे, त्यांनी कलम 41(ए) मध्ये काय ते सांगितले पाहिजे.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. देवेंद्र फडणवीस : सभापती महोदय, मी सन्माननीय सदस्यांना कलम 41(ए) वाचून दाखविले आहे. अमरेश कुमार विरूध्द बिहार राज्य या प्रकरणाच्या संदर्भातील मार्गदर्शक तत्वे कलम 41(ए) मध्ये सर्वोच्च न्यायालयाने नमूद केली आहेत आणि तीच मी वाचून दाखविली आहेत. मी ते सन्माननीय सदस्यांकडे पाठवितो.

..3

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

पृ.शी. : महाराष्ट्र राज्य शेती महामंडळाकडील शिल्लक जमिनी खाजगी लोकांना कसण्यासाठी देण्यात येणे.

मु.शी. : महाराष्ट्र राज्य शेती महामंडळाकडील शिल्लक जमिनी खाजगी लोकांना कसण्यासाठी देण्यात येणे यासंबंधी ॲड. रामहरी रूपनवर, वि.प.स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना

ॲड. रामहरी रूपनवर (नामनियुक्त) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने माननीय महसूल मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे अशी विनंती करतो.

"महाराष्ट्र राज्य शेती महामंडळ ही कंपनी कायद्याखाली नोंदणीकृत सरकारच्या मालकीची संस्था असून शासनाने सन 1961 साली खाजगी साखर कारखानदार मालक यांनी खरेदी केलेल्या व शेतकऱ्यांनी खंडाने दिलेल्या सर्व जमिनी सरकारने ताब्यात घेऊन हे महामंडळ निर्माण केलेले असणे, यासर्व जमिनी मिळून महाराष्ट्रातील 14 मळ्यावर जवळपास 80 हजार एकर क्षेत्र होणे, आता त्यापैकी सिलिंग मर्यादेपर्यंत पूर्वीचे खंडकरी जमीन मालक यांना जमिनी सुप्रीम कोर्टाच्या आदेशाने परत देण्यात आलेल्या असणे, सध्या जवळपास 50 हजार एकर क्षेत्र महामंडळाकडे शिल्लक राहणे, या सर्व जमिनी वहिवाटी खाली असून पाटपाण्याची सोय असणे, परंतु शासनाने जाणीवपूर्वक मागील 8 - 10 वर्षे जमिनीमध्ये पिके न घेणे, त्यामुळे सदर क्षेत्रात वेड्या बाभळी उगवून जमिनी पड असणे, सदर जमिनींना पाणी देणे बंद झाल्याने परिसरातील शेतकऱ्यांच्या विहिरी आटल्या असून पाण्याचा प्रश्न गंभीर बनला असणे, शेती महामंडळाचे धरणातील हक्काचे पाणी इतरत्र वळविल्यामुळे शेती महामंडळ परिसरातील लोकांवर फार मोठा अन्याय होणे, आतातर सरकारने महामंडळाच्या मालकीच्या जमीनी टेंडर काढून भाडेपट्टयाने खाजगी लोकांना कसणेसाठी देण्याचे सुरू करणे, हे पुर्ण चुकीचे असल्याने स्थानिक जनता व पूर्वीचे जमीनमालक यांच्यामध्ये तीव्र नाराजी निर्माण होणे, कामगारांचा मोठा प्रश्न शिल्लक असणे, याबाबत शासनाने नवीन कृषी विद्यापीठ निर्माण करुन त्यांना या जमिनी वहिवाटीस द्याव्यात अशी मागणी होत असणे, त्यामुळे

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ॲड. रामहरी रूपनवर...

जमिनीवर नवनवीन प्रयोग व पिके घेऊन कृषी क्षेत्रात क्रांतीकारी निर्णय बदल शासनामार्फत शेतकऱ्यांस पाहण्यास मिळतील, परंतु शासनाचे याबाबतचे धोरण पूर्णपणे चुकीचे असून शासनाने याबाबत भूमिका स्पष्ट करण्याची आवश्यकता, लोकांच्या मागणीचा व स्थानिक परिस्थिती पाहून त्वरित निर्णय होणे अपेक्षित असून त्यासाठी सरकारने कृषी विद्यापीठ किंवा तत्सम नवीन योजना आणून सर्व जमीन वहिवाट करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने केलेली वा करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

श्री. संजय राठोड (महसूल राज्यमंत्री) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती सन्माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

उप सभापती : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

(**प्रेस** : येथे सोबतचे निवेदन छापावे.)

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ॲड. रामहरी रूनवर : सभापती महोदय, माझी लक्षवेधी सूचना महसूल विभागाच्या संदर्भात आहे. राज्यात शेती महामंडळाची एकूण 85 हजार एकर जमीन होती, त्यापैकी 35 हजार एकर जमीन मूळ खंडकऱ्यांना देण्यात आली. आता 50 हजार एकर जमीन सरकारच्या मालकीची असून महामंडहळ अंगीकृत व्यवसाय म्हणून आहे. पूर्वीच्या खंडकऱ्यांच्या जमिनी सरकारने ताब्यात घेतल्या. भारत हा कृषीप्रधान देश आहे. देशामध्ये कृषी विकास झाल्याशिवाय इतर विकास होणार नाही. सरकारने स्वत:च्या मालकीची शेती करावी, त्यासाठी उच्च तंत्रज्ञान वापरावे, ते आसपासच्या शेतकऱ्यांपर्यंत पोहचवावे आणि आपल्या शेतीमध्ये सुधारणा करावी हा महामंडळाच्या स्थापनेचा उद्देश होता. परंतु सरकारने या उद्देशालाच बगल दिली आहे.

सभापती महोदय, शासनाने सन 2008 पासून 85 हजार एकर जमीन पडीक ठेवली आहे. तेथील कॅनलचे पाणी दुसरीकडे नेले. परिणामी ती जमीन भिजणे बंद झाल्यामुळे त्या परिसरातील सर्वांच्या विहिरींना पाणी कमी आले, कॅनल बंद झाल्यामुळे पिण्याच्या पाण्याचा प्रश्न नव्याने निर्माण झाला. सरकारच्या चुकीने असणारी व्यवस्थाच बंद पडल्यामुळे अनेक प्रश्न निर्माण झाले.

सभापती महोदय, शासनाने महामंडळाकडे शिल्लक राहिलेली 50 एकर जमीन विद्यापीठ, जेल या नवीन उपक्रमांसाठी वापरावी, उच्च तंत्रज्ञान उभारून शेती करावी अशी लोकांची मागणी आहे. सरकारचे त्याबाबत काय धोरण आहे ?

सभापती महोदय, महामंडळाने त्यांच्याकडील जमिनी वाटायला काढल्या आहेत. पैसे देईल त्याला 2-10 एकर जमिनी वाटत आहेत. माझे म्हणणे असे आहे की, कोल्हापूरच्या माणसाला सोलापूरची जमीन देण्यापेक्षा स्थानिकांना जमीन देणार का ? खंडकरी जमीन मालकाला जमिनी दिल्या आहेत. तेथील 90 टक्के काम पूर्ण झाले आहे, तेथे प्रांत नाही, मोजणी करून जमीन दिलेली नाही, पाटाच्या पाण्याचे नियोजन नाही. माननीय मंत्री या संदर्भात एक बैठक घेऊन सर्व प्रश्न सोडविणार आहे का ?

श्री. संजय राठोड : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी अतिशय महत्त्वाचा मुद्दा मांडला आहे. कपंनी कायदा, 1956 नुसार शेती महामंडळाची सन 1963 मध्ये स्थापना झाली.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. संजय राठोड...

पुणे, अहमदनगर, सातारा, सोलापूर, कोल्हापूर, नाशिक, औरंगाबाद येथे शेती महामंडळाचे 14 मळे आहेत, येथे जवळपास 85637 एकर शेती महामंडळाची होती. सन 1971 मध्ये शासनाने खंडकऱ्यांना 14261 एकर जमीन दिली होती. रस्ते, कॅनल, योजना अशा विविध उपक्रमांसाठी जवळपास 1650 एकर जमीन शासनाकडे होती आणि शिल्लक जमीन 69724 एकर होती. सन 2003 मध्ये खंडकऱ्यांना शेती महामंडळाची 25734 एकर जमीन दिली गेली. आता एकूण शिल्लक जमीन 43950 एकर आहे. पूर्वी शेती महामंडळाने संयुक्त शेती करण्याच्या दृष्टीने निविदा प्रणालीद्वारे 9750 एकर जमीन दिली आहे. शेती महामंडळाला आतापर्यंत तोटा होत होता. शेती महामंडळाला आता जवळपास 18 कोटी रुपयांचे उत्पन्न या माध्यमातून मिळाले आहे. पूर्वी तोट्यात असलेले महामंडळ सन 2014 मध्ये फायद्यात आले आहे. उर्वरित 34000 एकर जमीन निविदा प्रक्रियेद्वारे दिली जाणार आहे. शासनाचे किंवा शेती महामंडळाचे धोरण आहे की, शिल्लक जमिनीवर अतिक्रमण होऊ नये, उत्पन्न वाढावे, स्थानिक लोकांना रोजगार मिळावा आणि शेतीची उत्पादकता वाढावी. सन्माननीय सदस्यांनी सांगितले की, कृषी विद्यापीठासाठी जमिनीची मागणी आहे. मी सांगू इच्छितो की, शासनाकडे अशी कोणतीही मागणी आलेली नाही. सन्माननीय सदस्यांनी असेही विचारले की, ही जमीन खंडकऱ्यांना देणार का ? सभापती महोदय, शासनाने निविदा प्रक्रियेचे धोरण स्वीकारले आहे आणि त्यानुसारच कार्यवाही होणार आहे. सन्माननीय सदस्यांनी बैठकीच्या संदर्भात देखील उल्लेख केला आहे. सन्माननीय सदस्यांची सूचना अतिशय योग्य आहे. शासन या संदर्भात नक्की बैठक घेणार आहे.

ॲड. रामहरी रूपनवर : सभापती महोदय, माननीय मंत्र्यांनी आता दिलेले तोंडी उत्तर आणि छापील उत्तर यामध्ये तफावत आहे. छापील उत्तरात स्पष्ट म्हटले आहे की, शिल्लक राहिलेली जमीन खाजगी व्यक्ती किंवा संस्थांना देता येणार नाही. परंतु आता जमिनीचे वाटप खाजगी व्यक्तींनाच सुरू आहे. शासन असे कसे काय करू शकते ? शासनाच्या मालकीची जमीन असल्यामुळे शासनानेच वहिवाट केली पाहिजे. उच्च तंत्रज्ञान वापरून इतर शेतकऱ्यांना त्या संदर्भात मार्गदर्शन केले पाहिजे. शासन मालकीची शेती असली पाहिजे हा उद्देश शेती महामंडळ स्थापन करताना होता. परंतु त्या उद्देशालाच तिलांजली दिली आहे.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. संजय राठोड : सभापती महोदय, महामंडळ तोट्यात चालले होते. महामंडळाच्या जमिनींवर सातत्याने अतिक्रमण होत होते. सन्माननीय सदस्यांनीच म्हटले आहे की, तेथे बाभळीची झाडे उगवली आहेत. मी एवढेच सांगू इच्छितो की, शासनाने व शेती महामंडळाने निविदा प्रक्रियेद्वारे कसण्यासाठी जमीन देण्याचे धोरण स्वीकारले आहे.

(नंतर श्री. रोझेकर ....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.संजय राठोड.....

सन्माननीय सदस्यांनी बैठक बोलाविण्याची विनंती केली आहे. अशा प्रकारची बैठक घेण्यात येईल आणि त्या माध्यमातून सन्माननीय सदस्यांच्या सूचनांचा विचार करण्यात येईल, तपासून त्या स्वीकारण्यात येतील.

उप सभापती : शेती महामंडळाशी संबंधित एक प्रकरण माझ्याकडे आले आहे. नगर जिल्ह्यातील कोपरगाव येथील श्री.सुधीर निकम यांची जमीन शेती महामंडळाने काही वर्षांपूर्वी घेतली होती. अन्य शेतकऱ्यांच्या घेतलेल्या जमिनी परत करण्यात आल्या आहेत. परंतु, श्री.निकम यांना शिर्डी येथे भूखंड देण्यात येईल, असे सांगण्यात आले होते. तो भूखंडही त्यांना दिलेला नाही. शेती महामंडळाने श्री.निकम यांना असे कळविले आहे की, वितरणासाठी भूखंड उपलब्ध नाही. मात्र, वितरणासाठी भूखंड उपलब्ध आहेत व त्याबाबतची कागदपत्रे श्री.निकम यांनी मला दाखविलेली आहेत. एकीकडे शेती महामंडळ जमिनींच्या अशा व्यवहारांमुळे तोट्यात आले आहे. शेती महामंडळाच्या अशा धोरणामुळे महामंडळ तोट्यात जाण्याऐवजी खड्डयात जावयास लागले आहे. जर हे महामंडळ खड्ड्यात जाण्यापासून वाचवायचे असेल तर मंत्री महोदयांनी या विषयात गांभीर्याने लक्ष घालावे. तसेच, राज्यमंत्री महोदय आयोजित करणार असलेल्या बैठकीत श्री.निकम यांच्या प्रकरणाचाही अंतर्भाव करावा.

श्री.संजय राठोड : सभापती महोदय, होय.

प्रा.जोगेंद्र कवाडे : सभापती महोदय, महाराष्ट्र राज्य शेती महामंडळ ही व्यापारी तत्त्वावर निर्माण झालेली शासकीय कंपनी आहे. सन्माननीय सदस्यांनी विचारलेल्या प्रश्नाचा रोख याकडे होता की, सरकारकडे देखील काही शेती असली पाहिजे. महामंडळाकडे जवळपास 50 हजार हेक्टर जमीन शिल्लक आहे. राज्यमंत्री महोदयांनी सांगितले की, 43,950 एकर सुपीक जमीन महामंडळाकडे शिल्लक आहे. उजनी धरणाच्या बाजूला शेती महामंडळाची शेकडो एकर जमीन आहे. ती देखील विशिष्ट लोकांना वाटली गेली आहे. गरजू लोकांना मात्र शेतजमीन मिळत नाही. शेती महामंडळ आज बरखास्त होण्याच्या मार्गावर आले असल्याचे शेतकरी बांधव सांगत आहेत. शेतकऱ्यांच्या जमिनी शेती महामंडळाने घेतल्या असल्या तरी आज शेती महामंडळाला या शेतजमिनींची आवश्यकता नाही. अशी सर्व जमीन शासन शेतकऱ्यांना परत करणार आहे का आणि उर्वरित शेतीवर सामूहिक शेतीचा प्रयोग करणार आहे का ?

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.संजय राठोड : सभापती महोदय, शेती महामंडळ तोट्यात होते, ते आता फायद्यात येऊ लागले आहे. त्यामुळे ते बरखास्त होणार नाही.

सभापती महोदय, उत्पन्न मिळविण्यासाठी शेत जमीन निविदेव्दारे देण्यात येत आहे. असे असले तरी मालकी शासनाचीच राहणार आहे. खंडकऱ्यांना जमिनी देण्याचे शासनाचे धोरण आहेच. ती कार्यवाही सुरूच आहे. परंतु, खाजगी लोकांना मालकी तत्त्वावर ही शेतजमीन देता येत नाही. अशा प्रकारचे धोरण या शासनाने स्वीकारल्यामुळे हे महामंडळ तोट्यातून फायद्यात येऊ लागले आहे आणि भविष्यात ते फायद्यात आलेले आपल्याला दिसेल.

सभापती महोदय, यापूर्वीच मी सांगितल्याप्रमाणे आयोजित करण्यात येणाऱ्या बैठकीत सन्माननीय सदस्यांच्या काही सूचना असतील तर त्या देखील स्वीकारू.

श्री.महादेव जानकर : सभापती महोदय, शेती महामंडळाच्या जमिनीच्या संदर्भातील हा विषय आहे. बुलढाणा आणि माळशिरस येथे देखील शेती महामंडळाची जमीन आहे. माझ्या पाहुण्यांची 200 एकर जमीन महामंडळाने घेतली आहे. आता त्यांचा मुलगा इंजिनिअर असून तो त्या जमिनीचा मोबदला शासनाकडे मागत आहे. परंतु, त्याला मोबदला दिला जात नाही. प्रस्थापितांना मात्र मोबदला दिला जात आहे. या संदर्भात मंत्री महोदय काही खुलासा करतील का ?

श्री.संजय राठोड : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी काही स्पेसिफिक तक्रार आमच्याकडे पाठविली तर तपासून त्यावर कार्यवाही करता येईल.

डॉ.नीलम गोऱ्हे : सभापती महोदय, राज्यात अनेक गरजू शेतकरी आहेत, हे मान्य केले तरी आपणही एक उदाहरण दिले आहे आणि सन्माननीय सदस्य श्री.महादेव जानकर यांनीही एक उदाहरण दिले आहे. प्रश्न असा आहे की, शेती महामंडळाने खंडकऱ्यांना शेती दिलेली आहे. त्यांची परिस्थिती आज काय आहे आणि त्यांना कमी भावामध्ये जमीन देणे योग्य आहे किंवा नाही, याचे पुनर्विलोकन शासन करणार आहे का ?

सभापती महोदय, अनेक वेळा सरकारी उपक्रमांसाठी शासनाला जमिनीची आवश्यकता असते. त्यासाठी शेती करणाऱ्या शेतकऱ्यांकडून जमीन घेतली जाते, भूसंपादन केले जाते. तो

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

डॉ.नीलम गो-हे.....

प्रश्न फार मोठा आहे. त्यामुळे शासनाचे विविध प्रकल्प, औद्योगिक विकास, यासाठी शेती महामंडळाची जमीन देण्याबाबत शासन विचार करणार आहे का ? ज्यामधून संपूर्ण तालुक्याचा किंवा जिल्ह्याचा विकास होऊ शकेल.

श्री.संजय राठोड : सभापती महोदय, सन्माननीय सदस्या डॉ.नीलम गो-हे यांनी अतिशय महत्त्वाचा मुद्दा या ठिकाणी उपस्थित केला आहे. यापूर्वीच निविदेव्दारे एकूण 9750 हेक्टर जमीन कसण्यासाठी दिलेली आहे. सन 2003 मध्ये सुमारे 35734 एकर जमीन दिलेली आहे. सन्माननीय सदस्यांनी केलेली सूचना तपासून घेण्यात येईल. मालेगाव एम.आय.डी.सी.साठी जमीन मिळावी, अशा प्रकारचा एक प्रस्ताव आमच्याकडे प्राप्त झाला आहे. तशाच प्रकारची सूचना सन्माननीय सदस्यांनी केली आहे. निश्चितपणे त्या सूचनेचा विचार शासन करील.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

पृ.शी. : माध्यमिक शाळा शिक्षकांना वैयक्तिक मान्यता देणे

मु.शी. : माध्यमिक शाळा शिक्षकांना वैयक्तिक मान्यता देणे यासंबंधी सर्वश्री ***दत्तात्रय सावंत, अनिल सोले, आनंदराव पाटील, नागो गाणार, प्रकाश गजभिये, श्रीकांत देशपांडे, विजय सावंत,*** ,वि.प.स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

श्री.दत्तात्रय सावंत (पुणे विभाग शिक्षक) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय शिक्षण मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

"सोलापूर जिल्ह्यातील सन २०१० सालापासून माध्यमिक शाळेतील ५४६ शिक्षकांच्या वैयक्तिक मान्यता शिबीर घेऊनही न देणे, तत्कालीन सक्षम अधिकाऱ्यांची चौकशी होणे, दुसऱ्या सक्षम अधिकाऱ्यांचे निलंबन होणे, सध्याच्या सक्षम अधिकाऱ्यांनी वरिष्ठ कार्यालयाचे मार्गदर्शन मागविण्यात वेळ घालविणे त्यामुळे संबंधित ५४६ शिक्षकांना मान्यता नसल्याने वेतनापासून वंचित रहावे लागणे, परिणामी या शिक्षकांवर उपासमारीची वेळ येणे, शिक्षकांच्या मनात प्रशासन व शासन यांच्याविषयी असंतोष निर्माण होणे, प्रशासनाचा डोळेझाकपणा यावर शासनाने त्वरित करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

श्री.विनोद तावडे (शालेय शिक्षण मंत्री) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती सन्माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

उप सभापती : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

(प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे)

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.दत्तात्रय सावंत : सभापती महोदय, सन 2010 मध्ये महाराष्ट्रामधील सर्व जिल्ह्यांमध्ये प्रतिवर्षी शिबिरे घेतली जात होती. त्याप्रमाणे सोलापूर जिल्ह्यात सुध्दा शिबिरे घेतली गेली व त्या ठिकाणी आलेल्या माध्यमिक शिक्षकांना वैयक्तिक मान्यता देण्याचे काम सुरु झाले आहे. त्या वेळपासून नंदूरबार, अकोला व वाशिम या जिल्ह्यातून 700 ते 800 किलो मीटरवरुन सोलापूर जिल्ह्यात आलेल्या अनुसूचित जमातीच्या लोकांचे मान्यतेचे प्रस्ताव प्रलंबित ठेवले गेले. ज्यांना मान्यता दिली ती आर्थिक हातमिळवणी करुन दिली गेली. ज्या अनुसूचित जमातीतील शिक्षकांना आर्थिक अडचणीमुळे मागणी पूर्ण करता आली नाही त्यांची प्रकरणे प्रलंबित राहिली आहेत. तत्कालीन शिक्षणाधिकाऱ्यांची या संदर्भात चौकशी करण्यात आली, त्यांची बदली झाली, काहींना निलंबित केले गेले आणि त्या वेळपासून या मान्यता तशाच प्रलंबित ठेवल्या गेल्या आहेत. या सर्व फाईल्स सिल केल्या होत्या. आता त्या पुन्हा उघडण्यात आल्या आहेत. त्यांना समायोजनेचा पर्याय दिला जात आहे. समायोजनेचे काम सन 2014 पासून सुरु झाले आहे. परंतु, या मान्यता सन 2010 पासून प्रलंबित आहेत. या सर्व फाईल पुन्हा ओपन करुन त्यांना तत्काळ मान्यता देणार आहात का आणि ज्या अधिकाऱ्यांनी एवढी वर्षे ही प्रकरणे प्रलंबित ठेवली आहेत, त्यांची चौकशी करणार आहात का ?

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी मांडलेला मुद्दा खरा आहे. एकूण 600 प्रस्तावांपैकी 206 प्रस्तावांना मान्यता दिलेली आहे. काही अधिकाऱ्यांनी भ्रष्टाचार केल्याच्या तक्रारी प्राप्त झाल्यानंतर त्यांची चौकशी करण्यात आली. चुकीच्या पध्दतीने मान्यता दिल्यामुळे 48 मान्यता रद्द करण्यात आल्या होत्या. 158 मान्यता योग्य असल्याचे लक्षात आले. त्यामुळे त्या नियमित केल्या आहेत. उरलेले 396 प्रस्ताव अद्याप प्रलंबित आहेत. त्याबाबत कार्यवाही सुरु केली आहे. आमच्या सर्व सहकारी सन्माननीय सदस्यांच्या आग्रहास्तव संच मान्यतेला आम्ही स्थगिती दिली आहे.

यानंतर श्री.वि.खर्चे.....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.विनोद तावडे...

आता यांना आम्ही मान्यता देऊ, परंतु संच मान्यतेला स्थगिती असल्यामुळे या शिक्षकांना कोठे पाठवावे, त्यांचे समायोजन कसे करावे, हा त्यातील महत्वाचा प्रश्न आहे, मला या शिक्षकांना लवकरात लवकर योग्य ठिकाणी पाठवायचे आहे. संच मान्यता करण्यास सन्माननीय सदस्यांनी परवानगी दिली तर ही कार्यवाही लगेच करण्यात येईल असे माझे म्हणणे आहे.

श्री.रामनाथ मोते : सभापती महोदय, मंत्री महोदयांनी सांगितले आहे ही, 206 शिक्षकांना मान्यता दिल्या आहेत. एकूण प्रस्तावापैकी जवळपास 396 प्रस्ताव प्रलंबित ठेवण्यात आले आहेत. 6 फेब्रुवारी, 2012 चा शासन निर्णय अतिशय स्पष्ट आहे, मान्यतेचे शिबीर ज्या ठिकाणी घेण्यात येते, तेथे गैरप्रकार होऊ नये म्हणून किंवा विनाकारण मान्यता प्रलंबित राहू नये म्हणून ज्या दिवशी शिबीर असेल त्याच दिवशी सायंकाळी कितीही उशीर झाला, रात्रीचे 12 वाजले तरी मान्य असेल तर मान्यता आदेश देण्यात यावा. अमान्य असेल तर का अमान्य केले, याचे कारण देण्यात यावे, अशी यादी नोटीस बोर्डवर सर्वसामान्य जनतेच्या माहितीसाठी लावायची आहे. अशी पध्दत अवलंबिण्यात आली नाही. म्हणून या मान्यता प्रलंबित राहिल्या आहेत. ज्या अधिकाऱ्यांनी शासन निर्णयाचे उल्लंघन केले मान्यता प्रलंबित ठेवल्या,त्या अधिकाऱ्यांवर शासन काय कारवाई करणार ?

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी जे सांगितले ते खरे आहे, जे नियम व निकष आहेत ते पाळले पाहिजे, ते पाळले नाहीत तर संबंधितांवर नियमानुसार कारवाई करणे स्वाभाविक आहे, अशा अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई करावी ते नियमात सांगितले आहे. अशा अधिकाऱ्यांसाठी कोणतीही पळवाट न ठेवता नियमानुसार कारवाई करण्यात येईल.

श्री.विक्रम काळे : सभापती महोदय, आम्ही प्रश्न विचारला की, मंत्री महोदय सातत्याने गुणवत्तेची चर्चा करतात. मंत्री महोदयांनी जे उत्तर दिले त्यामध्ये अधिकाऱ्यांची चूक दिसून येत आहे. शिक्षकांच्या पदांना मान्यता देण्यासाठी अधिकारी शिक्षकांकडून लाखो रुपये घेतात. या गोष्टींना आळा घालण्यासाठी आपण सांगितले की, या खात्याचा मंत्री झाल्यापासून मी कारभार पारदर्शक करणार आहे. आपल्या भूमिकेचे आम्ही स्वागत करतो. शिक्षकांच्या मान्यतेचा प्रस्ताव सादर केल्यावर सात किंवा 15 दिवसांचा कालावधी ठरवून शाळेवर ऑनलाईन मान्यता मिळेल असे धोरण ठरविण्यात येणार आहे काय ? या प्रकरणात जे दोषी अधिकारी आहेत, त्यांच्यावर कोणती ठोस कारवाई करण्यात येईल हे बाणेदारपणे सांगण्यात येईल काय ?

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी बाणेदार प्रश्न विचारला आहे. सन्माननीय सदस्य श्री.रामनाथ मोते यांनी जो प्रश्न विचारला तोच दुसरा प्रश्न विचारण्यात आला आहे. जे अधिकारी दोषी असतील त्यांच्यावर ठोस कारवाई करण्यात येईल. अशा प्रकारची अनियमितता करण्याची कोणाचीही हिंमत होणार नाही अशा प्रकारे कारवाई करण्यात येईल. अशी अनियमितता करण्यासाठी मदत करण्याची देखील कोणाची हिंमत होणार नाही, याची देखील काळजी घेण्यात येईल.

श्री.नागो पुंडलिक गाणार : सभापती महोदय, सोलापूर येथे जे घडले त्याच्या विरुध्द नागपूर जिल्ह्यात घडले आहे. सोलापूर येथे शिबीर घेऊन मान्यता देण्यात आल्या नाहीत. नागपूर येथे शिबीर न घेता मान्यता देण्यात आल्या आहेत. 27 शाळांमधील 89 प्रकरणे निकाली काढण्यात आले. सोमेश्वर नेताम नावाचे शिक्षणाधिकारी होते, त्यांच्या घरी लाचलुचपत प्रतिबंधक खात्याने धाड टाकली तेव्हा 49 लाख रुपये सापडले होते. 27 शाळांतील 89 प्रकरणात निर्णय घेण्यात आला. माझा प्रश्न असा आहे की, या गंभीर प्रकरणाची दखल घेऊन शासन कारवाई करणार आहे काय ?

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी दिलेली माहिती खरी आहे असे गृहीत धरुन ताबडतोब या प्रकरणाची चौकशी करुन कारवाई करण्यात येईल. सन्माननीय सदस्य श्री.विक्रम काळे यांनी ऑनलाईन मान्यता देण्याचा प्रश्न उपस्थित केला होता. श्री.विक्रम काळे साहेबांना मी सांगू इच्छितो की, आपण शासनाला असे सुचवावे की, ऑनलाईन पेक्षा गतिमान पध्दतीने कामे करावी, म्हणजेच यापुढे संस्थांनी शिक्षकांची भरती करायची नाही. शिक्षकांचे पगार शासन देते. राज्य सरकारकडून शिक्षकांची भरती करण्यास आपली मान्यता आहे काय ? मी सन्माननीय सदस्य श्री.विक्रम काळे यांचे अभिनंदन करतो, तुम्ही ही सूचना केली व ती मान्य केली. यापुढे शिक्षकांची भरती राज्य स्तरावर करण्यात येईल. संस्थांना पैसे खाण्याची संधी द्यावयाची नाही.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

पृ.शी. : ***मैत्राह वायू (कृष्णा) प्रा.लि. या कंपनीने शासनाचे मुद्रांक शुल्क बुडविणे***

मु.शी. : ***मैत्राह वायू (कृष्णा) प्रा.लि. या कंपनीने शासनाचे मुद्रांक शुल्क बुडविणे*** यासंबंधी सर्वश्री अमरसिंह पंडित, अनिल भोसले, धनंजय मुंडे, जयवंतराव जाधव, सतिश चव्हाण, वि.प.स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

श्री.अमरसिंह पंडित (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय महसूल मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

"मैत्राह वायू (कृष्णा) प्रा.लि. या कंपनीने दिनांक २७ जून व ११ डिसेंबर, २०१३ रोजी अहमदनगर सब रजिस्ट्रार कार्यालयात रु.५८३.८५ कोटी कर्जाकरिता गहाणखत व दुरुस्ती गहाणखत करणे, रु.५८३.८५ कोटी कर्जाच्या सुरक्षिततेसाठी मौजे वाळकी, ता. अहमदनगर येथील १३०.८७ चौ.मी. एवढ्या क्षेत्राचा भूखंड गहाण ठेवणे, गहाणखत इंग्लिश फॉर्ममध्ये असणे, गहाणखतासाठी केवळ वीस लाख रुपयांचा मुद्रांक शुल्क अदा करणे, मुंबई मुद्रांक अधिनियमातील तरतुदीनुसार या व्यवहारासाठी रु.२९ कोटी चा मुद्रांक शुल्क आवश्यक असणे, मैत्राह वायू (कृष्णा) प्रा.लि. ही कंपनी आणि मुद्रांक शुल्क अधिकारी यांनी संगनमत करुन २९ कोटी रुपयांचे मुद्रांक शुल्क बुडवून शासनाची फसवणूक करणे, या व्यवहाराची चौकशी करुन मुद्रांक शुल्क वसुलीची कार्यवाही करण्याची मागणी लोकप्रतिनिधींनी करणे, मा.मंत्री, महसूल यांनी सभागृहात याप्रकरणी दोषीविरुध्द कारवाईबाबत आश्वासित करणे, नियमाप्रमाणे रु.२९ कोटी रुपयांच्या वसुलीसाठी शासनाने अद्याप कोणतेही प्रयत्न न करणे, तक्रारदाराने याकामी संबंधित विभागाकडे सतत पाठपुरावा करुन वसुली व दोषीविरुध्द कारवाईची मागणी करणे, या मागणीकडे शासनाने केलेले अक्षम्य दुर्लक्ष, यामुळे शासनाचे झालेले सुमारे २९ कोटी रुपयांचे आर्थिक नुकसान, याबाबत शासनाने करावयाची उपाय योजना व शासनाची प्रतिक्रिया."

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.संजय राठोड (महसूल राज्यमंत्री) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती सन्माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

उप सभापती: निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

(प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे)

...5...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.अमरसिंह पंडित : सभापती महोदय, माझा प्रश्न असा आहे की, इंग्रजी भाषेत गहाणखत केले जाते. रजिस्ट्रार यांच्या नियमानुसार गृहीत धरले जाते की, त्यांनी जमिनीचा ताबा घेतला आहे. मुद्रांक शुल्क अधिनियमातील कलम 40 अ नुसार गहाणखत रकमेच्या पाच टक्के मुद्रांक शुल्क भरणे आवश्यक आहे. या प्रकरणात नियमानुसार 29 कोटी रुपयांचे मुद्राक शुल्क भरुन घेणे आवश्यक होते. या ठिकाणी फक्त 20 लाख रुपये मुद्रांक शुल्क भरुन घेण्यात आले आहे. मैत्राय वायू यांना कोणत्या कारणामुळे सूट देण्यात आली आहे, यासंदर्भातील कशा प्रकारे परिगणना करण्यात आली आहे ? लक्षवेधी सूचनेच्या निवेदनात 543 कोटी रुपयांचे गहाणखत बँकेकडे नाही. याबाबत बँकेला विचारण्याचे काही कारण नाही. मुद्रांक शुल्काचा संबध शासनाशी आहे. 29 कोटी रुपये राज्य शासनाला येणे होते. परंतु त्यापैकी फक्त 20 लाख रुपये कसे काय भरुन घेण्यात आले आहे. 29 कोटी रुपये वसूल करण्यात येतील काय याबाबत मंत्री महोदय खुसाला करतील काय ? आणि जे दोषी आहेत त्यांच्यावर शासन तातडीने कारवाई करणार आहे काय ?

श्री.संजय राठोड : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.अमरसिंह पंडित यांनी अतिशय महत्वाचा मुद्दा लक्षवेधी सूचनेच्या माध्यमातून उपस्थित केला आहे. मुद्रांक शुल्क कमी आकारल्याची तक्रार सन्माननीय सदस्य यांनी दिनांक 17/11/2014 रोजी केली होती. त्यानंतर या प्रकरणी दोन गहाणखत दस्तांची नोंद झाली आहे.

या नंतर श्री.बोरले...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.संजय राठोड.....

हे गहाणखत जवळपास 583 कोटी रुपये किंमतीचे आहे. परंतु, हे गहाणखत विनाताबा आहे आणि त्यामध्ये ताबा दिलेला नाही. ताबा दिलेला नसेल तर एखाद्या दस्ताचे जास्तीत जास्त 10 लाख रुपये आपण घेऊ शकतो आणि त्या प्रमाणे दोन दस्तांचा 20 लाख रुपये महसूल घेतला गेलेला आहे. सन्माननीय सदस्य श्री.अमरसिंह पंडित यांच्याकडून तक्रार प्राप्त झाल्यानंतर या संपूर्ण प्रकरणाची चौकशी आयजीआर स्टॅम्प, पुणे यांच्याकडे सुरु आहे. मागील आठवड्यात अंतिम सुनावणी होणार होती. परंतु, आयजीआर स्टॅम्प, पुणे यांची पीएमओ कार्यालयात बदली झाल्यामुळे ही अंतिम सुनावणी आता दिनांक 20.4.2015 रोजी होणार आहे. आपण उपस्थित केलेला मुद्दा महत्वाचा आहे. खऱ्या अर्थाने त्यांच्याकडून 29 कोटी घ्यावयाचे होते. परंतु, त्यांच्याकडून 20 लाख रुपयेच घेतले गेलेले आहेत. ते दोषी आढळून आले तर शासन उर्वरित रक्कमेचा महसूल निश्चित जमा करुन घेईल. यामध्ये जर अधिकारी/कर्मचाऱ्यांनी जाणीवपूर्वक काही केले असेल, ते दोषी असतील तर चौकशी करुन त्यांच्यावर निश्चितपणे कारवाई केली जाईल.

श्री.अमरसिंह पंडित : सभापती महोदय, मंत्री महोदय एक महिन्याच्या आत चौकशी करुन त्याचा अहवाल मागवून घेणार आहेत काय ?

श्री.संजय राठोड : सभापती महोदय, त्यांच्याकडून 29 कोटी रुपये घ्यावयाचे होते आणि 20 लाख रुपयेच घेतले गेले या संदर्भातील सुनावणी दिनांक 20.04.2015 रोजी होणार आहे. परंतु, यामध्ये जर कर्मचारी दोषी आढळून आले तर त्याची देखील चौकशी एका महिन्यात करण्यात येईल आणि ते दोषी आढळून आले तर त्यांच्यावर देखील कारवाई करण्यात येईल.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

पृ.शी. : राज्यातील अनुदानित निवासी अपंग शाळेतील विद्यार्थ्यांसाठी परिपोषण अनुदान न मिळणे

मु.शी. : राज्यातील अनुदानित निवासी अपंग शाळेतील विद्यार्थ्यांसाठी परिपोषण अनुदान न मिळणे यासंबंधी डॉ.सुधीर तांबे, वि.प.स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

डॉ.सुधीर तांबे (नाशिक विभाग पदवीधर) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय सामाजिक न्याय मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

"राज्यात सुमारे 700 अनुदानित निवासी अपंग विद्यार्थ्यांसाठी (अंध, मूकबधिर, मतिमंद, अस्थिव्यंग) शाळा चालू असणे, गेल्या 2 वर्षांपासून सदर शाळेतील विद्यार्थ्यांसाठी परिपोषण अनुदान न मिळाल्यामुळे व काही ठिकाणी केवळ 20 टक्के एवढे अल्प अनुदान मिळणे, त्यामुळे या सेवाभावी संस्थांची प्रचंड आर्थिक ओढाताण होणे, अपंग विद्यार्थ्यांकडे शासनाने प्रचंड दुर्लक्ष करणे, त्यामुळे विद्यार्थी पालक व संस्था चालकांमध्ये मोठया प्रमाणात असंतोष निर्माण होणे, तसेच शिक्षकांना अपुऱ्या निधी अभावी वेतन देखील वेळेवर न मिळणे, शिक्षकांची त्यामुळे आर्थिक कोंडी होऊन त्याची उपासमार घडणे, यावर शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

श्री.दिलीप कांबळे (सामाजिक न्याय राज्यमंत्री) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती सन्माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

उप सभापती : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

(प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे)

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

डॉ.सुधीर तांबे : सभापती महोदय, हा अत्यंत महत्वाचा प्रश्न आहे. राज्यात अपंग, अंध, मूकबधिर मुलांसाठी 700 अनुदानित शाळा आहेत आणि 400 ते 500 शाळा विनाअनुदानित आहेत. मागील दोन वर्षापासून या शाळेतील विद्यार्थ्यांच्या परिपोषणाचा खर्च सेवाभावी संस्थांना दिला गेलेला नाही किंवा काही शाळांना फक्त 20 टक्के खर्च देण्यात आलेला आहे. शासनाकडून दोन-दोन वर्षे परिपोषणाचा खर्च मिळाला नाही तर त्या संस्थांची खूप आर्थिक ओढाताण होते. खरे म्हणजे, ते अपंग विद्यार्थी आहेत. आपण अपंग विद्यार्थ्यांकडे प्राधान्याने लक्ष दिले पाहिजे. परंतु, मला असे वाटते की, अपंगांच्या प्रश्नांकडे थोडे दुर्लक्ष होत आहे. माझा प्रश्न असा आहे की, मागील दोन वर्षापासून अपंग विद्यार्थ्यांच्या परिपोषणाची जी थकीत रक्कम आहे ती आपण त्वरित देणार आहात काय ? तसेच, शिक्षकांचे वेतन देखील वेळेवर होत नाही. शिक्षकांचे वेतन वेळेवर होणार आहे काय ? आता शिक्षण हक्क कायदा लागू झालेला आहे. इयत्ता आठवी पर्यंत मोफत शिक्षण देणे कायद्यानुसार बंधनकारक आहे. ज्या विनाअनुदानित शाळा अपंग विद्यार्थ्यांना शिक्षण देतात त्या अपंगांच्या विनाअनुदानित शाळांना आपण त्वरित अनुदान देणार आहात काय ?

श्री.दिलीप कांबळे : सभापती महोदय, सन 2011-12, 2012-13 आणि 2013-14 या तीन वर्षात टप्प्याटप्प्याने थोडे फार अनुदान मग परिपोषण अनुदान असेल किंवा शिक्षकांच्या पगाराच्या संदर्भातील अनुदान असेल ते कमी दिले गेलेले आहे, हे खरे आहे. येत्या शैक्षणिक वर्षापासून ज्या अनुदानित मान्यताप्राप्त संस्था आहेत त्या सर्व संस्थांचे शंभर टक्के अनुदान दिले जाईल. तसेच, शिक्षकांचा पगार वेळेवर होईल काय, असा प्रश्न उपस्थित करण्यात आलेला आहे. सर्वसामान्य शाळांपेक्षा या विशेष शाळेतील जे शिक्षक आहेत ते खूप चांगले काम करतात. त्यांना विद्यार्थ्यांना थोडा जास्त वेळ द्यावा लागतो. म्हणून अशा शाळेतील शिक्षकांचा पगार वेळेवर होईल. परवा सन्माननीय सदस्य श्री.विक्रम काळे यांनी सांगितले की, सन्माननीय सदस्यांचा पगार 1 तारखेला ट्रेझरीतून बँकेत जमा होतो. त्याच धर्तीवर या शिक्षकांचा पगार बँकेत जमा होईल, अशा प्रकारची तरतूद करील.

डॉ.सुधीर तांबे : सभापती महोदय, मंत्री महोदयांनी दोन्ही प्रश्नांची उत्तरे सकारात्मक दिलेली आहेत, त्याबद्दल मी आपला आभारी आहे. परंतु, माझा तिसऱ्या क्रमांकाचा प्रश्न अनुत्तरित

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

डॉ.सुधीर तांबे.....

राहिलेला आहे. शिक्षण हक्क कायद्यानुसार इयत्ता आठवी पर्यंत मोफत शिक्षण देणे बंधनकारक आहे. ज्या विनाअनुदानित शाळा अपंगांसाठी काम करतात त्या प्राथमिक शाळा आहेत. त्यांना त्वरित अनुदान सुरु करण्यात येणार आहे काय ?

श्री.दिलीप कांबळे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य डॉ.सुधीर तांबे यांनी महत्वाचा प्रश्न उपस्थित केलेला आहे. सन्माननीय सदस्य श्री.विक्रम काळे त्या संदर्भात अनेक वर्षापासून पाठपुरावा करीत आहेत. त्यांनी 123 आणि 32 शाळांच्या संदर्भातील विषय उपस्थित केलेला आहे. मी सांगू इच्छितो की, या सर्व शाळांच्या संदर्भातील तपासणी अहवाल प्राप्त झालेला आहे आणि या संदर्भात उच्चस्तरीय समितीची बैठक देखील झालेली आहे. शासन स्तरावरुन या सर्व शाळांना लवकरात लवकर अनुदान देण्याची तरतूद करण्यात येईल.

श्री.हेमंत टकले : सभापती महोदय,.....

श्री.दिलीप कांबळे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.हेमंत टकले साहेबांचा प्रश्न मला माहिती आहे. त्यामुळे तुम्ही प्रश्न विचारण्यापूर्वी मी उत्तर देतो. सर्व 123 शाळांना आणि उर्वरित 32 शाळांना येत्या शैक्षणिक वर्षाच्या आत अनुदान देण्याबाबतचा शासन निर्णय आम्ही येत्या महिन्याभरात काढू.

श्री.संदिप बाजोरीया : सभापती महोदय, यवतमाळ जिल्ह्याचे पालकमंत्री आणि माननीय सामाजिक न्यायमंत्री श्री.बडोले साहेबांना मी पत्र दिलेले आहे. एका पक्षाचे कार्यकर्ते यवतमाळ जिल्ह्यात बोगस अनुदानित शाळा चालवित आहेत. त्यांचे नाव श्री.मिलींद रामटेके असे आहे. दिग्रस हा माननीय पालक मंत्र्यांचा मतदारसंघ आहे. दिग्रस, बोरिअडत आणि यवतमाळ येथे अपंगांच्या शाळा आहेत आणि ते मागील सहा महिन्यांपासून विनाविद्यार्थी अनुदान घेत आहेत. या संदर्भात मी मंत्री महोदयांना पत्र देखील दिलेले आहे. आपण त्यांच्यावर 15 दिवसात कारवाई करणार आहात काय ?

श्री.राजकुमार बडोले : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी या संदर्भात पत्र दिलेले आहे. त्या संदर्भात तपासणी करुन कारवाई करण्यात येईल.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.विक्रम काळे : सभापती महोदय, माननीय श्री.राजकुमार बडोले आणि माननीय श्री.दिलीप कांबळे साहेबांनी या खात्याचा पदभार स्वीकारल्यानंतर खऱ्या अर्थाने सामाजिक न्याय मिळण्याचे काम होईल असे मला वाटते.

उप सभापती : सन्माननीय सदस्य श्री.विक्रम काळे यांनी नेमका प्रश्न विचारावा.

श्री.विक्रम काळे : सभापती महोदय, राज्यमंत्री महोदयांनी सकारात्मक उत्तर दिलेले आहे. ते माननीय मंत्री श्री.बडोले साहेबांकडे बघून उत्तर देतात, हे विशेष आहे. राज्यमंत्री महोदयांना मंत्री महोदयांविषयी आदर आहे.

उप सभापती : सन्माननीय सदस्य श्री.विक्रम काळे यांनी सामाजिक न्याय मंत्री आणि राज्यमंत्री महोदयांचे कौतुक केलेले आहे. आम्ही येथे सकाळपासून काम करतो. परंतु तुम्ही आमच्या विषयी कधी बोलला नाही.

श्री.विक्रम काळे : सभापती महोदय, आम्ही आपले विशेष आभारी आहोत. आपण आम्हाला नेमके प्रश्न विचारण्याची संधी देता त्यामुळे मंत्री महोदयांकडून चांगली उत्तरे मिळतात. सभापती महोदय, काल लक्षवेधी सूचना चर्चेला आली होती. मंत्री महोदयांनी त्या लक्षवेधी सूचनेला उत्तर देताना सांगितले की, मंत्रिमंडळाने 92 शाळांना अनुदान देण्याचा निर्णय घेतलेला आहे. मग निर्णय घेतल्यानंतर शासन निर्णय निर्गमित करण्यासाठी वेळ का लागत आहे ?

श्री.दिलीप कांबळे : सभापती महोदय, कालच या संदर्भातील शासन निर्णय निर्गमित करण्यात आलेला आहे.

श्री.विक्रम काळे : सभापती महोदय, उर्वरित ज्या शाळा राहिलेल्या आहेत त्या शाळांना अनुदान देण्याबाबत येणाऱ्या शैक्षणिक वर्षाच्या अगोदर निर्णय घेऊन शासन आदेश काढणार आहे काय ?

श्री.दिलीप कांबळे : सभापती महोदय, आपण मघाशी सन्माननीय सदस्य श्री.विक्रम काळे यांना सांगितले की, त्यांनी नेमका प्रश्न विचारावा.

यानतर श्री.भोगले.....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.दिलीप कांबळे.....

सभापती महोदय, या संदर्भातील निर्णय सरकार घेणार आहे. याची नेमकी माहिती घेऊन तपासून निर्णय घेण्यात येईल.

श्री.हरिसिंग राठोड : सभापती महोदय, अपंग शाळांची मागील वर्षी तपासणी झाली होती. त्यात अ व ब वर्ग शाळांचा समावेश आहे. 132 अपंग शाळा माननीय मुख्यमंत्र्यांनी जाहीर केल्या होत्या, त्यातील 38 शाळा मागील वर्षी अ वर्गात असताना आता ब वर्गात समाविष्ट होण्याची कारणे काय आहेत? त्यांनाही अनुदान मिळावे. मी काल मंत्री महोदयांना भेटलो होतो व त्यांनी निर्णय घेऊ असे म्हटले आहे.

श्री.दिलीप कांबळे : सभापती महोदय, मंत्री महोदयांनी दालनामध्ये जे सांगितले तेच मी सभागृहात सांगू इच्छितो. या संदर्भात शासन योग्य तो निर्णय घेईल.

...2...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

पृ.शी.: स्वामित्वधनाच्या दरामध्ये झालेला बदल

मु.शी.: स्वामित्वधनाच्या दरामध्ये झालेला बदल यासंबंधी माननीय महसूल राज्यमंत्र्यांचे निवेदन

श्री.संजय राठोड (महसूल राज्यमंत्री) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने नियम 46 अन्वये पुढील निवेदन करतो :-

नि वे द न

(प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे)

..3...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

(सभापतीस्थानी तालिका सभापती श्री.रामनाथ मोते)

पृ.शी./मु.शी. : रत्नागिरी व सिंधुदुर्ग जिल्हयातील समुद्रात परप्रांतीय मच्छीमारांची होत असलेली घुसखोरी याबाबत श्री.अनिल तटकरे, वि.प.स. यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना

श्री.विजय देशमुख (मत्स्यव्यवसाय विकास राज्यमंत्री) : सभापती महोदय, नियम 93 अन्वये दिलेल्या सूचनेला अनुलक्षून, आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सन्माननीय सदस्यांना अगोदरच वितरित केलेल्या असल्याने मी निवेदन क्रमांक 127 सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

तालिका सभापती : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

(प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे)

..4...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.अनिल तटकरे : सभापती महोदय, मी शासनाला धन्यवाद देतो. ज्या गंभीर सूचना केल्या होत्या त्या सूचना शासनाने मान्य केलेल्या आहेत. मी दोन महत्वाचे प्रश्न विचारु इच्छितो. परप्रांतीयांच्या नौका पकडण्यात आल्या, त्यांच्याकडून दंडापोटी किती रक्कम वसूल झाली व लिलावाची जी मासळी जप्त करण्यात आली ती किती किंमतीची होती? भाडयाने ज्या बोटी घेण्यात आल्या त्यांचा वेग कमी असून परप्रांतीयांच्या बोटींचा वेग अधिक असल्यामुळे परप्रांतीयांच्या बोटी पकडणे शक्य झाले नाही याची कबुली दिली आहे. पुन्हा भाड्याने बोटी घेणार असल्याचे निवेदनात नमूद केले आहे. या बोटी परप्रांतीयांच्या बोटीपेक्षा वेगवान असतील काय?

श्री.विजय देशमुख : सभापती महोदय, परप्रांतीयांची घुसखोरी रोखण्यासाठी सध्या भाडे तत्वावर नौका घेत आहोत. घुसखोरी करणाऱ्या नौका मोठया व वेगवान असल्यामुळे पकडणे शक्य झाले नाही, हे खरे आहे. येणाऱ्या मासेमारी हंगामात अधिक इंजिन क्षमता असलेल्या उच्च दर्जाच्या वेगवान नौका तसेच उच्च प्रशिक्षित मनुष्यबळ उपलब्ध करुन घेण्याची कार्यवाही करण्यात येणार आहे.

श्री.माणिकराव ठाकरे : सभापती महोदय, हा विषय सुरक्षेशी निगडित आहे. कोस्टल एरियामध्ये गस्त घालण्याकरिता भाडे तत्वावर बोटी घेतल्या जातात, त्या योग्यप्रकारे काम करु शकत नाहीत असा अनुभव आहे. त्या निकृष्ट दर्जाच्या असतात. या संदर्भात सभागृहात वारंवार चर्चा झालेली आहे. मागील एक महिन्याच्या काळात या बोटींच्या गस्तीसाठी किती फेऱ्या झाल्या? या बोटी एकाच ठिकाणी उभ्या ठेवायच्या किंवा गरज पडेल तेव्हा फेऱ्या मारायच्या, विशिष्ट अंतरावर फिरत रहायचे याबाबत निकष ठरले आहेत काय?

श्री.विजय देशमुख : या नौका 12 कि.मी.अंतरावर सातत्याने गस्त घालत असतात. गस्त घालत असताना परप्रांतीय नौका दिसून आल्यास त्या अडवून त्यांची तपासणी केली जाते. 2014-15 मध्ये एकूण 3619 नौका तपासण्यात आल्या आहेत. त्यापैकी 6 परप्रांतीय नौका आढळल्या असून त्यांच्यावर कारवाई करण्यात आली. हे खरे आहे की, भाड्याने घेतलेल्या नौकांचा वेग कमी असतो, त्यामुळे परप्रांतीय नौका कमी प्रमाणात पकडल्या जातात. येणाऱ्या मासेमारी हंगामात नवीन नौका घेण्याचा प्रस्ताव आहे.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

नंतर 2आय.1...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.भाई गिरकर : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.माणिकराव ठाकरे यांनी संरक्षणासंबंधातील मुद्दा उपस्थित केला आहे. कोकणातील देवगड, मालवण, विजयदुर्ग, वेंगुर्ला या बंदरांमध्ये केरळच्या यांत्रिकी बोटी येऊन मासेमारी करीत आहेत. त्यामुळे पारंपरिक पद्धतीने मासेमारी करणाऱ्यांवर उपासमारीची पाळी येते. तेव्हा यांत्रिक पद्धतीने मासेमारी करणाऱ्या बोटींवर कारवाई करण्यात येणार आहे काय ?

श्री.विजय देशमुख : सभापती महोदय, होय. आताच सन्माननीय सदस्यांनी किती तास गस्त घालण्यात येते अशी विचारणा केली होती. यासंबंधी मी सांगू इच्छितो की, गस्ती नौका 8 तास गस्त घालतात.

.....

<u>सभागृहाच्या कामकाजासंबंधी.</u>

श्री.अनिल तटकरे : सभापती महोदय, मला सभागृहाच्या कामकाजासंबंधी माहिती जाणून घ्यायची आहे. आपण कामकाज करीत असताना भेदभाव का करीत आहात ?

तालिका सभापती : मी सन्माननीय सदस्य श्री.अनिल तटकरे यांना सांगू इच्छितो की, आपण माननीय सभापतींवर हेत्वारोप करू नये. मी आसनावर आल्यानंतर आपले नाव एकदा नव्हे तर दोन-तीन वेळा पुकारले होते. मी आपणास संधी दिलेली आहे. कृपा करून आपण खाली बसावे.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

पृ. शी./ मु.शी. :मौजे ओमळी घडसेवाडी, ता.चिपळूण, जि.रत्नागिरी येथील विहीर ढासळल्यामुळे ग्रामस्थांवर पिण्याच्या पाण्यापासून वंचित राहण्याची वेळ येणे, याबाबत ॲड.निरंजन डावखरे, वि.प.स. यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना

श्री.बबनराव लोणीकर (पाणी पुरवठा व स्वच्छता मंत्री) : सभापती महोदय, नियम 93 अन्वये दिलेल्या सूचनेला अनुलक्षून, आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सन्माननीय सदस्यांना अगोदरच वितरित केलेल्या असल्याने मी निवेदन क्रमांक 95 सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

तालिका सभापती : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

(प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे)

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ॲड.निरंजन डावखरे : सभापती महोदय, माननीय मंत्री महोदयांच्या लेखी निवेदनाने माझे समाधान झाले आहे.

तालिका सभापती : ठीक आहे. आता विशेष उल्लेखाच्या सूचना घेण्यात येतील.

.....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

पृ.शी./मु. शी. : कांदा चाळीची योजना अनुदाना अभावी प्रलंबित असणे याबाबत श्री.जयवंतराव जाधव, वि.प.स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना

श्री.जयवंतराव जाधव (नाशिक स्थानिक प्राधिकारी संस्था) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखाची सूचना मांडतो.

"कांदा साठवणुकीसाठी शासनाने राष्ट्रीय कृषी विकास योजनेअंतर्गत कांदा चाळीची योजना सुरु केलेली आहे, कांदा साठवणुकीसाठी नाशिक जिल्हयातील 5000 शेतकऱ्यांचे प्रस्ताव 29 कोटी अनुदानाअभावी प्रलंबित आहेत, सन 2014-15 मध्ये नाशिक जिल्हयातील कांदा चाळीसाठी मंजूर असलेल्या 4 कोटी 55 लाख अनुदानामधून 55 लाख अनुदानामधून 602 लाभार्थ्यांना लाभ देण्यात आलेला आहे, अनुदान कमी असल्यामुळे अजून 5000 शेतकऱ्यांचे प्रस्ताव जिल्हा कृषी तंत्रज्ञान व्यवस्थापन (आत्मा) कार्यालयाकडे पडून असणे, कांदा चाळी अभावी कांद्याचे नुकसान होणार असल्याने शेतकऱ्यांनी नुकतेच आत्मा कार्यालयासमोर कांदा भाकर आंदोलन केले, तरी शासनाने कांदा चाळीचे प्रलंबित अनुदान तातडीने मंजूर करावे, अशी मागणी ह्या विशेष उल्लेखाच्या सूचनेद्वारे मी करीत आहे."

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

पृ.शी./मु. शी. : अलिबाग तालुक्यातील भिसे व मेढा स्वराज्य योजना निधी अभावी बंद असणे याबाबत श्री.अनिल तटकरे, वि.प.स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना

श्री.अनिल तटकरे (रायगड तथा,रत्नागिरी,तथा सिंधुदुर्ग स्थानिक प्राधिकारी संस्था) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्ले□ाची सूच□ा मांडतो.

"अलिबाग तालुक्यातील मेढा शहरातील दोन हजाराच्या लोकसंख्येला 15 वर्षापूर्वी टँकरने पाणीपुरवठा करण्यात येणे, सन 1984 मध्ये रोहे एमआयडीसी जलवाहिन्यांवर पाणी पुरवठा करण्यात येणे, मात्र ती फसल्याने महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाने 74 लाखाची भिसे व मेढा ग्रामपंचायत अशी संयुक्तिक दुसरी योजना स्वराज्य योजना नागोठणे आरसीएफ जलवाहिनीवर राबविण्यात येणे, मात्र निधी अभावी ते काम पूर्ण न होणे, परिणामी सद्य:स्थितीत नागरिकांचे होत असलेले हाल याबाबत सदर योजनेस निधी देऊन सदर योजनेचे काम तातडीने पूर्ण करण्यात यावे, अशी शिफारस मी ह्या विशेष उल्लेखाद्वारे शासनास करीत आहे."

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

पृ.शी./मु. शी. : यवतमाळ जिल्ह्यातील दारव्हा नगरपरिषदेची हद्दवाढ झाल्याने नागरिकांना सोयी-सुविधा न मिळणे याबाबत श्री.माणिकराव ठाकरे,वि.प.स.यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना

श्री.माणिकराव ठाकरे (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्ले□ची सूच□ मांडतो.

"यवतमाळ जिल्हयातील दारव्हा नगरपरिषद हद्दवाढ झालेल्या भागात लोकांना सोयीसुविधा उपलब्ध व्हाव्यात यासाठी दारव्हा नगरपरिषदेने तीन वर्षात या प्रकल्पाची विभागणी केली, त्यानुसार प्रथम वर्षाला लागणाऱ्या सोयीसुविधांचा नगरपरिषद, दारव्हा यांनी प्रशासकीय मंजुरी घेतली. हद्दवाढ झालेल्या भागातल्या लोकांना नगरपरिषद दारव्हा तर्फे सर्व सोयीसुविधा त्यात रस्ते, नाला, पिण्याच्या पाण्याच्या जलवाहिन्या, सामाजिक सुविधा उपलब्ध करुन देण्यासाठी बऱ्याच निधीची आवश्यकता असून या भागातील सोयीसुविधा उपलब्ध करुन देण्यासाठी निधीच्या मागणीसाठी 8.5 कोटींचा प्रस्ताव सादर केला असणे, परंतु सदरचा प्रस्ताव मार्च,2014 पासून प्रलंबित असल्याने हद्दवाढ झालेल्या नागरिकांना सोयीसुविधा अद्यापपर्यंत मिळालेल्या नसल्याने त्यांच्यात निर्माण झालेली नाराजीची भावना, यासाठी शासनाने त्वरित निधीची पूर्तता करण्याबाबत मी सभागृहात विशेष उल्लेख सूचना मांडीत आहे."

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

पृ.शी./मु. शी. : कॅन्सर व डायबिटीस या आजारांवरील औषधांच्या किंमतीत झालेली वाढ याबाबत श्री.हेमंत टकले, वि.प.स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना

श्री.हेमंत टकले (विधान सभेने निवडलेले) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्ले□ाची सूच□ा मांडतो.

सभापती महोदय, आज सन्माननीय सदस्य श्री.माणिकराव ठाकरे यांनी नियम 289 अन्वये दिलेल्या प्रस्तावाच्या सूचनेमध्ये हा विषय मांडला होता. तोच विषय या विशेष उल्लेखाच्या सूचनेमध्ये देखील आहे. सरकारने एकूण 509 औषधांच्या किंमती वाढविलेल्या आहेत. त्यात अल्फा इंटरफेरॉन या इंजेक्शनचा देखील समावेश आहे. मुळात हे इंजेक्शन महाग आहेच. पण अशा औषधांच्या किंमती वाढविण्याचा प्रकार झालेला आहे. वाढती महागाई आणि उत्पादन खर्च यामुळे किंमती वाढविल्या गेल्याचे कारण सांगण्यात आले आहे. पण औषधांच्या किंमती वाढविल्यामुळे कॅन्सर, डायबिटीस इत्यादी आजारांवरील औषधांच्या किंमतीत वाढ होणार आहे. त्याचे नोटिफिकेशन 1 एप्रिल पासून लागू झाले आहे. यातील बहुतांशी औषधे कदाचित आता उपलब्ध होणार नाहीत. आता ही औषधे मार्केटमधून गायब होत असल्याचेही उघडकीस आलेले आहे. त्यामुळे आपल्या राज्यातही लाखो रुग्णांना औषधे मिळण्यास संकटांना सामोरे जावे लागणार आहे. राज्याच्या आरोग्य खात्याने व अन्न व औषधे खात्याने एकत्रितपणे या अत्यंत महत्त्वाच्या औषधांच्या पुरवठ्याबाबत वेळीच दक्षता घेऊन पुढाकार घ्यावा आणि पुढील काळात औषधांचा पुरवठा वेळवर मिळण्यासाठी कार्यवाही करावी तसेच गरीब रुग्णांना सवलतीच्या दरात ही औषधे कशा प्रकारे उपलब्ध करून देता येतील याचा विचार करून योग्य ती पावले उचलावित अशी मी विशेष उल्लेखाद्वारे मागणी करतो.

.....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

पृ.शी./मु. शी. : मुलुंड पूर्व येथील म्हाडा कॉलनी येथे रोड-रोमिओ करीत असलेली अश्लील शेरेबाजी याबाबत प्रा.जोगेंद्र कवाडे, वि.प.स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना

प्रा.जोगेंद्र कवाडे (नामनियुक्त) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्ले□ाची सूच□ मांडतो.

प्रा.जोगेंद्र कवाडे,

"मुलुंड पूर्वेकडील म्हाडा कॉलनीतील साईनाथ चौक, मुक्ती टॉवर, किलबिल स्कूलसमोर आणि सरदार तारासिंह वाचनालय येथे कॉलनीत न राहणाऱ्या गुंड प्रवृत्तीच्या टिंगलटवाळी करणाऱ्या टोळक्यांमुळे तसेच रोड-रोमिओच्या अश्लील शेरेबाजीला कंटाळून रात्री-अपरात्री महिलांना घराबाहेर पडणे कठीण झाल्याची धक्कादायक बाब माहे फेब्रुवारी, 2015 च्या पहिल्या आठवडयात उघडकीस येणे, कॉलनीचे प्रवेशद्वार असलेल्या मुक्ती टॉवर व साईनाथ चौक येथे 10 ते 15 जणांचे टोळके रस्त्यावरुन जाणाऱ्या महिलांची छेडछाड काढून अश्लील शेरेबाजी करणे, ज्येष्ठ नागरिकांना अडवून नाहक त्रास देत असणे, याच चौकात अनधिकृतपणे शाकाहारी/मांसाहारी खाद्यपदार्थाची दुकाने थाटल्यामुळे या दुकानांमध्ये येणाऱ्या टपोरी मुलांकडून अनेकवेळा अर्वाच्य भाषेत संभाषण करणे, याबाबत मुलुंड म्हाडा कॉलनी सोसायटीज असोसिएशन लि. तसेच म्हाडा कॉलनी सार्वजनिक गणेशोत्सव मंडळाने उपायुक्त व नवघर पोलीस स्थानकातील वरिष्ठ पोलीस निरीक्षकांना लेखी स्वरुपात निवेदन दिल्यानंतर संबंधित ठिकाणी पोलीस पॉईंट लावण्यात येईल व बीट मार्शलची फेरी सुरु करत असल्याचे आश्वासन देणे, आश्वासन देऊनही पोलीस पॉईंट अथवा बीट मार्शलची फेरी सुरु करण्यात न येणे, अनधिकृत खाद्यपदार्थांची दुकाने हटविण्याबाबत तसेच रोड रोमिओंवर वचक ठेवण्यात स्थानिक पोलिसांना आलेले अपयश, तसेच या रोडरोमिओंना स्थानिक लोकप्रतिनिधींचे असलेले संरक्षण, परिणामी एखादी दुर्घटना घडल्याशिवाय स्थानिक पोलीस कोणतीही कारवाई करणार नसल्याची म्हाडावासियांमध्ये निर्माण झालेली भावना, त्यामुळे त्यांच्यात निर्माण झालेला असंतोष व भीतीचे वातावरण, अनधिकृत खाद्यपदार्थाची दुकाने तातडीने हटविण्याबाबत तसेच रोडरोमिओवर वचक ठेवण्याकरीता मी सभागृहात विशेष उल्लेख सूचना उपस्थित करीत आहे."

....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

पृ.शी./मु. शी. : नागपूर पिवळी नदी परिसर येथील औद्योगिक वसाहतीमध्ये प्राथमिक सुविधा निर्माण करणे याबाबत याबाबत प्रा.अनिल सोले, वि.प.स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना

प्रा.अनिल सोले (नागपूर विभाग पदवीधर) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्ले□ाची सूच□ा मांडतो.

"नागपूर स्थित पिवळी नदी परिसर येथील मोठी औद्योगिक वसाहत आहे. हया वसाहतीतील कारखानदार विविध कराद्वारे करोडो रुपये शासनाला देत असतात. मात्र शासनातर्फे हया वसाहतीमध्ये प्राथमिक सुविधा उपलब्ध करुन देण्यात आलेल्या नाहीत, हया वसाहतीतील कारखानदारांच्या शिष्टमंडळाने दिलेल्या निवेदनावर मी स्वत: हिवाळी अधिवेशनात दि.15 डिसेंबर, 2014 रोजी उपस्थित केलेल्या तारांकीत प्रश्न क्र.2305 प्रश्नाच्या उत्तरात मा.मुख्यमंत्री यांनी 5 करोड रुपये मूलभूत सोयीकरीता घोषित केलेले आहेत व नागपूर सुधार प्रन्यासामार्फत हे कार्य करण्याची आश्वासन दिले आहे. तीन महिने कालावधी लोटल्यानंतरही नागपूर सुधार प्रन्यासातर्फे अद्याप कुठलीही कार्यवाही न होणे, त्यामुळे त्या परिसरातून नागरिकांना अत्यंत हलाखीच्या परिस्थितीला सामोरे जावे लागणे, तरी शासनाने ही कामे तातडीने सुरु करावी अशी मागणी मी या विशेष उल्लेखाद्वारे करीत आहे."

.....

यानंतर श्री.जुन्नरे...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

पृ.शी./मु. शी. :शासनाने स्वस्त धान्य दुकानात एपीएल केशरी कार्डधारकांना धान्य उपलब्ध करुन देण्याबाबत श्रीमती शोभा फडणवीस, वि.प.स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना

श्रीमती शोभा फडणवीस (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्ले□ाची सूच□ मांडते.

"राज्यात ए.पी.एल. कार्डधारकांना माहे डिसेंबर, 2014 पासून स्वस्त धान्य दुकानातून धान्य मिळत नसणे, राज्यात मोठया प्रमाणात केशरी कार्डधारक असून ते गरीब कुटुंबातील असूनही त्यांचे नावे अन्न व सुरक्षा योजना मध्ये समाविष्ट नसणे, त्यामुळे सदर कुटुंब योजनेच्या धान्यापासून वंचित राहणे, त्यामुळे गरीब लाभधारक कुटुंबाची होत असलेली उपासमार, शासनाने स्वस्त धान्य दुकानात ए.पी.एल. केशरी कार्डधारकांना धान्य उपलब्ध करुन देण्याची आवश्यकता, शासनाचे याकडे होत असलेले दुर्लक्ष, शासनाने यावर त्वरित कारवाई करावी यासाठी मी हा विशेष उल्लेख देत आहे."

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

पृ.शी./मु. शी. :विदर्भातील पाटबंधारे विभागातील नकाशे व संकल्पचित्रे मंजूर करण्याचे अधिकार नागपूर येथे उघडण्याबाबत श्री.मितेश भांगडिया,वि.प.स.यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना

श्री. मितेश भांगडिया (वर्धा-चंद्रपूर-गडचिरोली स्थानिक प्राधिकारी संस्था) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्ले□ाची सूच□ा मांडतो.

"विदर्भातील पाटबंधारे विभागातील सर्व संकल्पचित्रे तांत्रिकदृष्टया मंजूर करण्याकरिता नाशिक येथे पाठविली जातात. या संकल्प चित्र मंजुरीच्या कामांकरिता स्थानिक अभियंता वा जबाबदार अधिकाऱ्यांना देखील प्रत्येक वेळी नाशिक येथे प्रवास करावा लागतो. ज्या प्रवासाचा लाखो रुपयांचा भुर्दंड शासनाला द्यावा लागतो. तसेच या मंजूर कामाकरिता नाशिक येथे गेलेला संबंधित जबाबदार अधिकारी आपल्या मुख्यालयापासून दूर राहिल्यामुळे त्याच्या तेथील कामावर देखील त्याचा विपरीत परिणाम होतो. विदर्भातील पाटबंधारे विभागातील सर्व नकाशे व संकल्पचित्रे मंजूर करण्याकरिता एक कार्यालय नागपूर येथे उघडल्यास प्रवासाकरिता होणारा प्रचंड खर्च वाचेल. तसेच संकल्पचित्रे तांत्रिकदृष्ट्या मंजूर करण्याकरिता लागणारा वेळ वाचून संकल्पचित्रे मंजुरीची कामे जलदगतीने पूर्ण होतील. याबाबत शासनाने तातडीने कार्यवाही करावी अशी मी विशेष उल्लेखाद्वारे विनंती करीत आहे."

...3..

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

पृ.शी./मु. शी. : सावित्रीबाई फुले व महात्मा फुले यांना भारतरत्न पुरस्कार देण्याबाबत श्री.विक्रम काळे,वि.प.स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना

श्री. विक्रम काळे (औरंगाबाद विभाग शिक्षक) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्ले□ाची सूच□ा मांडतो.

"सभापती महोदय, या राज्यामध्ये पहिली मुलींची पहिली शाळा सुरु झाली, तेव्ह आम्हाला सामाजिक क्रांती बघायला मिळाली. आज ग्रामीण भागातील वाडी-तांड्यावर सुध्दा मोठया प्रमाणात अनेक शाळांमध्ये मुलांपेक्षा मुलीं जास्त प्रमाणात शिक्षण घेताना दिसतात. सामाजिक क्रांतीच्या जनक सावित्रीबाई फुले यांचे शिक्षणातील महान कार्य राज्यातील जनतेला माहीत आहे. त्याच बरोबर महात्मा ज्योतिबा फुले यांचे कार्य सुध्दा महाराष्ट्रातील सबंध जनतेला माहीत आहे. या थोर व्यक्तिमत्वाचा उचित सन्मान व्हावा यादृष्टीने येणाऱ्या भावी पिढीला त्यांची माहिती व त्याचे कार्य माहीत व्हावे या उद्देशाने क्रांती ज्योती सावित्रीबाई फुले व महात्मा ज्योतिबा फुले यांना मरणोत्तर भारतरत्न पुरस्काराने सन्मानित करण्यासाठी महाराष्ट्र शासनाने केंद्रशासनाकडे शिफारस करावी, अशी मागणी मी या विशेष उल्लेखाद्वारे करीत आहे."

सभापती महोदय, या ठिकाणी सामाजिक न्याय मंत्री उपस्थित असून सावित्रीबाई फुले व महात्मा ज्योतिबा फुले यांना भारतरत्न पुरस्कार देण्याच्यासंदर्भात महाराष्ट्र शासनाने केंद्र शासनाकडे शिफारस करावी अशी विनंती मी आपल्या माध्यमातून मंत्री महोदयांना करीत आहे.

श्री. दिलीप कांबळे (सामाजिक न्याय राज्यमंत्री) : सभापती महोदय, नोंद घेण्यात आली आहे.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

पृ.शी./मु. शी. :राज्यातील आर्थिकदृष्ट्या दुर्बल व अविकसित आदिवासी विद्यार्थ्यांना पुरविण्यात येणारे साहित्य निकृष्ट दर्जाचे असल्याबाबत श्री.संजय दत्त,वि.प.स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना

श्री. संजय दत्त (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्ले□ाची सूच□ा मांडतो.

"राज्यातील आर्थिकदृष्ट्या दुर्बल व अविकसित आदिवासी विद्यार्थ्यांना चांगल्या गुणवत्तेच्या वह्या, लेखन साहित्य व प्रश्नसंच मिळावेत, ज्यामुळे आदिवासी विद्यार्थी इतर खुल्या विभागातील विद्यार्थ्यांशी स्पर्धा करु शकतील, त्याचप्रमाणे त्यांच्या बरोबरीच्या गुणवत्तेनुसार वह्या, लेखन साहित्य व प्रश्नसंच आदिवासी विद्यार्थ्यांना उपलब्ध होण्यासाठी शासनाच्या प्रचलित धोरणानुसार आदिवासी विद्यार्थ्यांचे शैक्षणिक स्तर उंचावण्यासाठी आदिवासी विकास विभागामार्फत शासकीय आश्रमशाळा व वसतिगृहातील आदिवासी विद्यार्थ्यांसाठी आदिवासी विकास महामंडळातर्फे मोफत वह्या, लेखन साहित्य व प्रश्नसंच पुरवण्यासाठी दरवर्षी आदिवासी विकास विभागातील आयुक्तांच्या माध्यमातून ई-निविदा काढण्यात येते. सन २०१५-१६ साठीच्या सर्व वह्या लेखन साहित्य व प्रश्नसंच पुरविण्यासाठी ई-निविदा, दिनांक १ मार्च, २०१५ रोजी वर्तमानपत्रात जाहिरात प्रसिध्द करुन शासनाच्या अधिकृत वेबसाईटवर भरण्यासाठी उपलब्ध केलेली आहे. परंतु सर्व साहित्यांचा गुणवत्तेशी खेळ करीत, गुणवत्तेला पूरक तसेच निविदा भरण्यासाठी निविदाधारक सक्षम असल्याबाबतचे सर्व अटी व शर्ती बदलण्याचा घाट घालून त्याचप्रमाणे मूळ निविदांमध्ये शुद्धिपत्राच्या रुपाने बदल घडवून आणून तसेच निविदेची २१ दिवसांची मुदत आणखीन वाढवून देण्याचे काम करण्यात येणे, यामध्ये आर्थिकदृष्ट्या दुर्बल व अविकसित आदिवासी विद्यार्थ्यांना पुरविण्यात येणाऱ्या साहित्यांची गुणवत्ता घसरवून अति निकृष्ट दर्जाचे साहित्य आदिवासी विद्यार्थ्यांना देणार असल्याचे व या प्रकरणात मोठे गौडबंगाल होणार असल्याचे जनमानसात होत असलेली चर्चा, त्यामुळे त्यांच्यात पसरलेली तीव्र असंतोषाची भावना याबाबत मी सभागृहात विशेष उल्लेखाची सूचना मांडीत आहे."

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

पृ.शी./मु. शी. : रायगड जिल्हयातील क्रीडा संकुलात पाणी पुरवठा व विद्युत पुरवठा सुरळीत करण्याबाबत ॲड. निरंजन वसंत डावखरे,वि.प.स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना

ॲड.निरंजन वसंत डावखरे (कोकण विभाग पदवीधर) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्ले□ाची सूच□ मांडतो.

"सभापती महोदय, रायगडमध्ये क्रीडा संकुल बांधण्यासाठी सन १९८५ साली अलिबाग तालुक्यातील नेहुली येथील १० एकर जागा संपादित करण्यात आली. सन २००१ रोजी क्रीडा धोरणानुसार राज्यातील प्रत्येक जिल्ह्यात जिल्हा क्रीडा संकुल बांधण्याचा निर्णय शासनाने घेतला. सन २००३ साली काढलेल्या सरकारी अध्यादेशानुसार रायगड जिल्हा क्रीडा संकुलासाठी ४ कोटी रुपये व सन २००९ मध्ये आणखी ४ कोटी ९८ लाख रुपये देखील मंजूर करण्यात आले. या रकमेतून पहिल्या टप्प्यातील इनडोअरचे व दुसऱ्या टप्प्यातील आऊटडोअरचे काम देखील पूर्ण झ ाले आहे. परंतु त्या ठिकाणी पाणीपुरवठा नसल्याने इनडोअरचे काम पूर्ण होऊनही त्याचा वापर होत नाही. तसेच इमारतीची रंगरंगोटी, विद्युतीकरण, पाणीपुरवठा आदी कामे शिल्लक राहिल्याने क्रीडा संकुलाचा खेळाडूंसाठी वापर होत नसल्याने खेळाडूंमध्ये निराशा झाली आहे. तरी खेळाडूंना सराव करता यावा, रायगड जिल्ह्यातील खेळाडूंच्या गुणांना वाव मिळावा, त्यांना राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय पातळीवर खेळण्याची संधी मिळावी, याकरिता क्रीडा संकुलाच्या ठिकाणी पाणीपुरवठा व विद्युतपुरवठा सुरळीत होण्याच्यादृष्टीने कार्यवाही करण्यात यावी, एवढीच मागणी या विशेष उल्लेखाच्या माध्यमातून शासनाकडे करीत आहे.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

पृ.शी./मु. शी. : वैभववाडी तालुक्यातील (जि.सिंधुदुर्ग)आर्चिणे ग्रामपंचायतीपासून 5 कि.मी.अंतरावर असलेल्या धनगरवाडी गावासाठी रस्ता करण्याबाबत श्री. रामराव वडकुते,वि.प.स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना

श्री. रामराव वडकुते (नामनियुक्त) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्ले□ाची सूच□ा मांडतो.

"सभापती महोदय, वैभववाडी तालुक्यातील (जि.सिंधुदुर्ग) आर्चिणे ग्रामपंचायतीपासून ५ कि.मी.अंतरावर धनगरवाडा वस्ती आहे. या अंतरापैकी मोईनवाडी-कासारवाडी पर्यंत बारमाही रस्ता आहे. मात्र येथून पुढे ३ कि.मी. अंतरावर धनगर समाजाची वस्ती असून कासारवाडी पर्यंतची संपूर्ण पायवाट ही जंगल भागातील असून खाच खळग्यांची आहे. सन २००० मध्ये ग्रामपंचायतीच्या दप्तरी नोंद असून किरकोळ रस्ता दुरुस्त केला मात्र त्यानंतर गत १५ वर्षात कोणत्याही योजनेतून रस्त्यासाठी एकही पैसा खर्च करण्यात आलेला नाही. रस्त्याविना जनतेची परवड सुरु असल्याने सदर रस्त्यासाठी तातडीने निधी उभारुन धनगरवाडी गावासाठी रस्ता करण्यात यावा, अशी शिफारस मी या विशेष उल्लेखाद्वारे शासनास करीत आहे."

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

पृ.शी./मु. शी. : शेतकरी व शेतमजूरांना प्रती महिना 2000 रुपये पेन्शन सन 2015 पासून लागू करण्याबाबत श्री. प्रकाश गजभिये, वि.प.स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना

श्री. प्रकाश गजभिये (नामनियुक्त) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्ले□ाची सूच□ मांडतो.

"सभापती महोदय, महाराष्ट्र राज्य हे प्रगतिशील राज्य असून राज्यातील 80 टक्के शेतकरी व शेतमजूर हा शेतीव्यवसायावर अवलंबून आहे. 80 टक्के शेतकरी हा कोरडवाहू शेतीवर उदरनिर्वाह करीत असतो. परंतु त्यातून उत्पन्न होईल याची हमी नाही. तरी सुध्दा उत्पादन वाढविण्यासाठी मेहनतीने कष्टाने घाम गाळून शेतीची मशागत करतो.राज्याच्या विकासात हातभार लावून राज्याला प्रथम क्रमांकावर आणण्याचा प्रयत्न करतो. परंतु राज्यात अवकाळी पाऊस, दुष्काळ, नैसर्गिक आपत्ती व गारपिटीमुळे शेतकरी प्रचंड आर्थिक संकटात सापडलेला आहे. शेतकऱ्याजवळ उत्पन्नाचे दुसरे साधन नसल्यामुळे शेतकऱ्यांमध्ये नैराश्याचे वातावरण निर्माण झाले आहे. त्याच्यावर असणाऱ्या कर्जामुळे डोक्यावर ताण पडणे, आर्थिक तंगीमुळे मुला-मुलींचे शिक्षणाची गैरसोय होणे, पिकाची होणारी हानी तसेच कापूस,ऊस,गहू या अन्नधान्याला हमी भाव न मिळणे, त्यामुळे शेतकऱ्यांना आत्महत्येशिवाय दुसरा पर्याय नसणे, यामुळे राज्यात शेतकऱ्यांच्या आत्महत्येचे सत्र जलदगतीने वाढत असल्यामुळे शेतकऱ्याला जीवन जगणे कठीण झाले आहे. म्हणून राज्यातील शेतकरी व शेतमजुरांना किमान रु. 2000 प्रती महिना पेन्शन देण्याची योजना सन 2015 पासून सुरु करावी अशी मागणी मी या विशेष उल्लेखाद्वारे करीत आहे."

यानंतर श्री. अजित.....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

पृ.शी./मु.शी. : टेंभुर्णी ग्रामपंचायतीचे स्थांतर नगरपालिकेमध्ये करणे याबाबत श्री.महादेव जानकर वि. प. स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना

श्री. महादेव जानकर (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्ले□ाची सूच□ा मांडतो.

"टेंभुर्णी, ता.माढा जि.सोलापूर हे पुणे-हैद्राबाद रोडवरील गाव आहे. हे संत सावता महाराजांचे हे गाव आहे. त्या ठिकाणी ग्रामपंचायत आहे. या ग्रामपंचायतीचे स्थांतर नगरपालिकेमध्ये करावे अशी तेथील लोकांची मागणी आहे. तेव्हा या मागणीचा शासनाने विचार करावा अशी मी विनंती करतो.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

पृ.शी./मु.शी.: राष्ट्रपती पदक मिळालेल्या पोलीस अधिकारी आणि अंमलदारांना आगाऊ वेतनवाढ तसेच नि:शुल्क प्रवास करण्याची सवलत देणे याबाबत प्रा.जोगेंद्र कवाडे,वि.प.स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना

प्रा.जोगेंद्र कवाडे (नामनियुक्त) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्ले□ाची सूच□ा मांडतो.

भारत सरकार तसेच राज्य सरकारकडून प्रजासत्ताक आणि स्वातंत्र्यदिनी भारतातील सर्व पोलीस दलातील अधिकारी आणि अंमलदारांना त्यांच्या अतिविशिष्ट सेवेबद्दल व उल्लेखनीय कामगिरीबद्दल पोलीस पदक देऊन सन्मानित केले जाते. इतर राज्यांमध्ये अशाप्रकारे पदक मिळालेल्या पोलीस अधिकाऱ्यांना आणि अंमलदारांना एक आगाऊ वेतनवाढ, एस.टी. मधून नि:शुल्क प्रवास करण्याची सवलत देण्यात येते. आपल्या राज्यात आदर्श शिक्षक पुरस्कार मिळालेल्या शिक्षकांना राज्यात नि:शुल्क प्रवासाची सवलत आणि रोख एक लाख रुपयांचा पुरस्कार देण्यात येतो. त्याचप्रमाणे राज्यातील ज्या पोलीस अधिकारी आणि अंमलदारांना राष्ट्रपती पदक मिळालेले आहे त्यांना एक आगाऊ वेतनवाढ, योग्य पदस्थापना, एस.टी.ची नि:शुल्क सवलत देण्याबाबत राज्य सरकारने सहानुभूतीपूर्वक सकारात्मक भूमिका घेऊन त्यांना प्रोत्साहन देण्याच्या दृष्टीने कार्यवाही करावी अशी आग्रहाची विनंती मी शासनाकडे करीत आहे.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

पृ.शी./मु.शी. : परभणी जिल्ह्यातील पाथरी तालुक्यातील चिंबादेशमुख गावातील 10 शेतकऱ्यांना सिलिंगची जमीन मिळणे याबाबत श्री.हरिसिंग राठोड, वि.प.स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना

श्री. हरिसिंग राठोड (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखाची सूचना मांडतो.

"परभणी जिल्ह्यामध्ये पाथरी तालुक्यात चिंबादेशमुख गाव आहे. त्या ठिकाणी 10 शेतकऱ्यांना सिलिंगची जमीन मिळाली होती. ती जमीन गट क्रमांक 31 वर आहे. त्या गावातील दबंग लोकांनी त्या जमिनीचा अजून ताबा सोडलेला नाही. त्यामुळे ती जमीन त्या शेतकऱ्यांच्या ताब्यात आलेली नाही म्हणून ते शेतकरी जिल्हाधिकारी कार्यालयासमोर उपोषणास बसले आहेत." या ठिकाणी महसूल विभागाचे सन्माननीय राज्यमंत्री देखील उपस्थित नाहीत. "ज्या शेतकऱ्यांना सिलिंगमध्ये जमीन मिळालेली आहे ती त्यांना देणे आवश्यक आहे. त्यासाठी शासनाने जिल्हाधिकाऱ्यांना त्वरित त्या 10 शेतकऱ्यांची भेट घेऊन त्यांचा प्रश्न मार्गी लावण्याचा प्रयत्न करावा, अशाप्रकारचे आदेश द्यावेत अशी विनंती मी शासनास करीत आहे."

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

पृ.शी./मु.शी. : सांगली जिल्हा परिषदेमध्ये पाणी पुरवठा विभागाकडून साहित्याची गरज नसताना करण्यात आलेली खरेदी याबाबत श्री. जयंत प्र.पाटील,वि.प.स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना

श्री.जयंत प्र.पाटील (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्ले□ाची सूच□ा मांडतो.

सांगली जिल्हा परिषदेमध्ये ग्रामीण पाणी पुरवठा विभागाकडून 10 लाख 78 हजार रुपयांची साहित्याची गरज नसताना ते खरेदी करुन जत पंचायत समितीमधून संबंधित साहित्याची देयके मंजूर करण्यात आल्याचा प्रकार निदर्शनास आला आहे.

जिल्हा परिषदेच्या माध्यमातून विविध साहित्याच्या खरेदीकरिता सन 2008-2009 पासून वापरात असलेल्या निविदेत बदल न करता त्या तशाच सुरु ठेवण्यात आलेल्या आहेत. जुन्या निविदेनुसार साहित्य घेण्यात येऊनही ते चालू दर सूचीपेक्षा 25 टक्के जादा दराने खरेदी केल्याची बाब उघडकीस आली आहे.

सन 2008-2009 पासूनच्या निविदेला मुदत वाढ न देता तसेच जिल्हा परिषदेचे मुख्य लेखा व वित्त अधिकारी आणि मुख्य कार्यकारी अधिकारी यांची मान्यता न घेता वर्षानुवर्षे तीच निविदा पुढे चालू ठेवण्याचा प्रकार उघडकीस आला आहे.

पुढील 5 ते 7 वर्षासाठी लागणारे साहित्य गरज नसताना खरेदी करण्यात आल्याचे उघडकीस आले आहे. हातपंपाला निधी उपलब्ध करण्यात आला असताना हातपंप खरेदी न करता विद्युत बोअरपंपाचे साहित्य खरेदी केल्याची बाब निदर्शनास आली आहे. या प्रकारात मोठ्या प्रमाणात गैरप्रकार झाला असल्याचे उघडकीस आले आहे. याबाबत शासनाने तातडीने चौकशी करुन दोषींविरुध्द कारवाई करण्यात यावी, यासाठी मी हा विशेष उल्लेख मांडत आहे.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

पृ. शी./मु.शी. : अपंगाच्या राष्ट्रीय क्रीडा स्पर्धेत चमकदार कामगिरी करणाऱ्या राष्ट्रीय स्तरावरील अपंग खेळाडूस सरकारी नोकरीत सामावून घेणे याबाबत डॉ.निरंजन डावखरे, वि. प. स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना

ॲड.निरंजन डावखरे (कोकण विभाग पदवीधर) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखाची सूचना मांडतो.

"दिल्लीत नुकत्याच झालेल्या अशिया क्रिकेट स्पर्धेत भारतीय संघ अजिंक्य ठरला. या संघात महाराष्ट्रातील नालासोपारा येथील अपंग खेळाडू कैलाश घाणेकर याचा समावेश होता. त्यांनी फंलदाजी आणि गोलंदाजीमध्ये चांगली कामगिरी केली. कैलास घाणेकर एका कंपनीत नोकरीत असून त्याला क्रिकेटच्या प्रॅक्टीससाठी वारंवार सुटी घ्यावी लागल्यामुळे कंपनीने त्यास नोकरीवरून कमी केले आहे. अपंगाच्या राष्ट्रीय क्रीडा स्पर्धेत चमकदार कामगिरी करणाऱ्या राष्ट्रीय स्तरावरील अपंग खेळाडूवर नोकरी नसल्यामुळे उपासमारीची वेळ आली आहे. त्याने स्पर्धेत केलेल्या उज्ज्वल कामगिरीची दखल घेऊन राज्य शासनाने विशेष बाब म्हणून सरकारी नोकरीत सामावून घेऊन त्याला दिलासा व प्रोत्साहन देण्याची आवश्यकता आहे. या बाबत शासनाने तातडीने योग्य ती कार्यवाही करून या गोष्टीची दखल घ्यावी, एवढी मागणी मी या विशेष उल्लेखाद्वारे शासनास करीत आहे."

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

पृ. शी./मु. शी.: "आदर्श शिक्षक पुरस्कार" मिळालेल्या शिक्षकांना दोन आगाऊ वेतनवाढी देणे याबाबत श्री.विक्रम काळे, वि. प. स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना

श्री. विक्रम काळे (औरंगाबाद विभाग शिक्षक) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्ले□ाची सूच□ा मांडतो.

"आदर्श शिक्षक पुरस्कार" मिळालेल्या शिक्षक्ांना दोन आगाऊ वेतनवाढी देण्यात येत होत्या. पण सहाव्या वेतन आयोग लागू झाल्यापासून अशा वेतनवाढी देण्याचे बंद केलेले आहे. आपण देखील या विषयासंबंधी नागपूरच्या अधिवेशनात प्रश्न विचारला होता त्यावेळी मंत्री महोदयांनी उत्तर देताना सांगितले होते की, या वेतनवाढी सुरु करण्याबाबत तातडीने निर्णय घेण्यात येईल. नागपूरचे अधिवेशन संपले. आता हे अधिवेशन उद्या संपत आहे. परंतु अजून त्या संदर्भात शासन निर्णय काढण्यात आलेला नाही. माननीय मंत्र्यांनी "आदर्श शिक्षक पुरस्कार" मिळालेल्या शिक्षकांना एक लाख रुपये जाहीर केले, परंतु त्यापूर्वीच्या दोन वेतनवाढी देणे आवश्यक होते. न्यायालयाच्या निकालाप्रमाणे शासन निर्णय निर्गमित करावा अशी विनंती मी शिक्षण मंत्री श्री.विनोद तावडे यांना करीत आहे.

तालिका सभापती : सभागृहाची बैठक आता मध्यंतरासाठी स्थगित होत आहे.

(सायंकाळी 4.47 ते 5.05 पर्यंत मध्यंतर)

यानंतर श्री.बोर्डे...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

(मध्यंतरानंतर)

(सभापतीस्थानी तालिका सभापती श्री.रामनाथ मोते)

धनगर समाजाला आरक्षण देण्याबाबत माहितीचा मुद्दा

श्री.रामराव वडकुते : सभापती महोदय, आम्ही दिनांक 23 मार्च, 2015 रोजी म.वि.प. नियम 289 अन्वये प्रस्तावाच्या सूचनेच्या माध्यमातून धनगर समाजाला आरक्षण देण्याबाबतचा विषय सभागृहात उपस्थित केला होता. त्या दिवशी सभागृहाची बैठक अनेक वेळा स्थगित केली गेली. तद्नंतर या विषयावर सभागृहात चर्चा झाली. शिवाय त्याच दिवशी धनगर समाजाने आरक्षण मिळण्यासाठी मोठ्या प्रमाणावर मोर्चा आयोजित केला होता. माननीय मुख्यमंत्र्यांनी सभागृहात सांगितले होते की, या विषयावर चर्चा करण्याची सरकारची तयारी आहे. महोदय, उद्या अधिवेशन संपत आहे. आम्हाला जनता विचारत आहे की, माननीय मुख्यमंत्री या विषयी काही जाहीर करणार आहेत की नाहीत ? महोदय, माननीय मुख्यमंत्री स्मित हास्य करून सर्वांचे प्रश्न सोडवितात. कधी वेळ पडली तर रेटून बोलून विरोधकांना बोलू देत नाही. धनगर समाजाला आरक्षण देण्याच्या विषयावर चर्चा करण्याचे माननीय मुख्यमंत्र्यांनी सांगितले होते. महोदय, हे अधिवेशन संपण्यापूर्वी या विषयावर चर्चा होणार आहे की नाही किंवा या विषयावर सरकारकडून उत्तर मिळणार आहे की नाही, या बाबतची माहिती आम्हाला समजली पाहिजे.

श्री.धनंजय मुंडे : सभापती महोदय, ज्यावेळी हा विषय नियम 289 अन्वये उपस्थित केला होता त्यावेळी माननीय पीठासीन अधिकाऱ्यांनी सरकारने या विषयी निवेदन करावे, असे निदेश दिले होते. सभागृहात दिलेल्या निदेशानुसार सरकारने निवेदन केले पाहिजे. महोदय, या विषयी सरकारची नेमकी भूमिका काय आहे, हे सभागृहाला समजले पाहिजे.

ॲड.रामहरी रूपनवर : सभापती महोदय, या विषयी मी....

श्री.देवेंद्र फडणवीस : सभापती महोदय, या निमित्ताने एवढेच सांगतो की, माननीय सभापतींनी जे निदेश दिलेले आहेत त्याचे तंतोतंत पालन केले जाईल.

ॲड.रामहरी रूपनवर : सभापती महोदय,....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

तालिका सभापती (श्री.रामनाथ मोते) : मी सन्माननीय सदस्यांना सांगू इच्छितो की, माननीय मुख्यमंत्र्यांनी अतिशय स्पष्टपणे सांगितले आहे की, माननीय सभापतींनी दिलेल्या निदेशानुसार या विषयी निवेदन करण्यात येईल. त्यामुळे हा विषय आता संपला आहे.

आता म.वि.प. नियम 259 अन्वये दिलेल्या अंतिम आठवडा प्रस्तावावरील चर्चा सुरु होईल. सन्माननीय विरोधी पक्ष नेत्यांनी अंतिम आठवडा प्रस्ताव मांडावा.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

पृ.शी.: बृहन्मुंबई, ठाणे, कल्याण-डोंबिवली, औरंगाबाद या महानगरपालिका क्षेत्रामध्ये विविध नागरी समस्यांमुळे जनतेचे अतोनात हाल होणे

मु.शी.: बृहन्मुंबई, ठाणे, कल्याण-डोंबिवली, औरंगाबाद या महानगरपालिका क्षेत्रामध्ये विविध नागरी समस्यांमुळे जनतेचे अतोनात हाल होणे, या विषयावर सर्वश्री धनंजय मुंडे, माणिकराव ठाकरे, सुनील तटकरे, हेमंत टकले, जयंत प्र.पाटील, संजय दत्त, अमरसिंह पंडित, अशोक ऊर्फ भाई जगताप, चंद्रकांत रघुवंशी, जयवंतराव जाधव, राजेंद्र मुळक, अनिल भोसले, हरिसिंग राठोड, शरद रणपिसे, श्रीमती विद्या चव्हाण, ॲड.जयदेव गायकवाड, ॲड.हुस्नबानू खलिफे, सर्वश्री रामराव वडकूते, प्रकाश गजभिये, डॉ.सुधीर तांबे, वि.प.स. यांचा प्रस्ताव

श्री.धनंजय मुंडे (विरोधी पक्ष नेता) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने म.वि.प. नियम 259 अन्वये पुढील प्रस्ताव मांडतो.

"बृहन्मुंबई, ठाणे, कल्याण-डोंबिवली, औरंगाबाद या महानगरपालिका क्षेत्रामध्ये विविध नागरी समस्यांमुळे जनतेचे होत असलेले अतोनात हाल, वाढत्या लोकसंख्या, शहरांना घातलेल्या अनधिकृत झोपडपट्टयांचा विळखा, या सर्वांमुळे महानगरपालिकेच्या यंत्रणेस मूलभूत नागरी सुविधा पुरविण्यात अपयश येणे, शासकीय व महानगरपालिकेच्या जमिनीवर होत असलेले अतिक्रमण, जीर्ण झालेल्या पाण्याच्या पाईपलाईन वारंवार फुटणे, वीज पुरवठ्याचे प्रश्न, गरिबांना परवडणाऱ्या घरांची उपलब्धता नसणे, बृहन्मुंबई मनपा क्षेत्रात झोपडपट्टी पुनर्वसन योजनेचे अपयश, म्हाडा संक्रमण शिबिरातील घुसखोरी, विकास नियंत्रण नियमावली 33 (5) अन्वये पुनर्विकास करण्यात येणाऱ्या इमारतींना अतिरिक्त एफ.एस.आय. देण्यापोटी प्राप्त होणाऱ्या सदनिकांऐवजी विकासकाच्या फायद्याचे प्रिमियम स्वीकारण्याचे धोरण स्वीकारणे, परिणामी परवडणाऱ्या घरांच्या सुमारे 5-7 हजार सदनिकांना म्हाडा मुकणे, या निर्णयास विरोध करणाऱ्या प्रामाणिक अधिकाऱ्यांची म्हाडातून 4-6 महिन्यात बदली करणे, म्हाडाच्या भूखंडावरील झोपडपट्टयांचा पुनर्विकास म्हाडा मार्फत करण्याचा निर्णय बदलवून विकासकांच्या हितापोटी तो एस.आर.ए. मार्फत करण्याचा निर्णय घेणे, त्यामुळे 40-50 हजार परवडणाऱ्या घरांना म्हाडा मुकणे, स्ट्रक्चर प्रोटेक्शनच्या पॉलिसीला

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.धनंजय मुंडे....

शासनाने मान्यता देऊनसुध्दा दिनांक 1 जानेवारी, 2000 नंतर परिशिष्ट-2 मधील संरक्षण पात्र झोपडी विकत घेणाऱ्याच्या नांवे हस्तांतरित होत नसल्याने लाखो झोपडीधारकांवर अन्याय होत असणे, धारावी/बी.डी.डी.चाळींचे रखडलेले पुनर्वसन, नव्याने प्रसिध्द केलेल्या विकास आराखड्यामुळे निर्माण झालेली परिस्थिती, एलईडी लाईट बसविण्यामधील व नाईट लाईफचा वाद, शहरातील बिघडलेले सामाजिक स्वास्थ्य, बोजवारा उडालेली कायदा व सुव्यवस्था, मुंबईच्या महापौरांचे फोनवरील टक्केवारी संदर्भातील संभाषण, राज्यात मुंबई महानगरपालिकेत सर्वाधिक भ्रष्टाचार असून महापालिकेच्या सर्वच विभागात त्याची कीड लागलेली आहे अशा प्रकारचे वक्तव्य महासंचालक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग यांचेकडून करण्यात येणे, ठाणे महानगरपालिका क्षेत्रामध्ये मेट्रोचे सर्वेक्षण होऊनही कार्यवाही अपूर्ण असणे, क्रीडा संकुल कार्यान्वित नसणे, ठाणे परिसरात कॅन्सर हॉस्पिटल उभारण्याची मागणी दुर्लक्षित असणे, ठाणे शहरासाठी सी.सी.टी.व्ही योजना प्रलंबित असणे, ठाणे मनपाची कमकुवत आर्थिक परिस्थिती असतानाही कचरा सल्लागार नेमण्यासाठी लाखोंचा खर्च करणे, कल्याण-डोंबिवली महापालिका कार्यक्षेत्रात मोठ्या प्रमाणावर आरक्षित भूखंड ताब्यात न घेताच व तेथे अतिक्रमण असताना देखील त्याचा टीडीआर हस्तांतरित करणे, आयरे गावात नदी व सीआरझेडने बाधित भूखंडावर अनाधिकाराने एफएसआय मंजूर करुन मोठ्या प्रमाणावर भ्रष्टाचार करणे, अस्तित्वात असलेल्या दफन भूमीवर व कुळांच्या जमिनीवर आधुनिक कत्तलखाना बीओटी तत्वावर उभारण्याच्या नावाखाली 350 कोटीपेक्षा अधिक रुपयांचा भ्रष्टाचार करणे, कल्याण-डोंबिवली परिवहन सेवेच्या 12 आरक्षित भूखंडावर सर्वसमावेशक आरक्षणाच्या नावाखाली विकासकांना देऊन करोडो रुपयांचा भ्रष्टाचार करणे, महानगरपालिका क्षेत्रात 15 हजार चौ.फु.जागा जाहिरात फलकांसाठी नाममात्र 2.74 कोटी रुपयांना भाड्याने देणे, प्रत्यक्षात संबंधित एजन्सीने 45-50 चौ.फू. जागेचा वापर करणे, यात कोट्यवधी रुपयांचा भ्रष्टाचार झाल्याची शक्यता असणे, कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेत शासनाचे स्पष्ट आदेश असताना देखील गेली पाच वर्ष सफाई कामगारांच्या जागा अनुकंपा तत्त्वावर न भरण्यात येणे, औरंगाबाद मनपा कार्यक्षेत्रामध्ये पिण्याच्या पाण्याचा मूलभूत प्रश्न असल्याने हाती घेण्यात आलेली समांतर पाणी पुरवठा योजना, प्रशासकीय दुर्लक्षामुळे मनपाच्या कारभारात अनियमितता व सुमारे 400 कोटींचा भ्रष्टाचार असणे, शहारातील भूखंड खाजगी विकासकाच्या घशात जाणे, औरंगाबाद मनपा

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.धनंजय मुंडे....

मध्ये मोठ्या प्रमाणात भ्रष्टाचार असणे, पथदिवा निविदा, गटार योजना निविदा इत्यादी निविदांमध्ये नियमांचा भंग होणे, एकंदरीत राज्याच्या शहरी भागामध्ये नागरी समस्यांनी उग्र रुप धारण करणे, ग्लोबल वॉर्मिंग तथा हवामानातील बदलांमुळे मोसमी पाऊस अनियमित झाल्याने या नागरी भागांमध्ये पिण्याचे पाणी उपलब्ध करण्याचा प्रश्न गंभीर बनणे, भविष्यात या शहरांमध्ये गंभीर पिण्याच्या पाण्याची टंचाई निर्माण होण्याची शक्यता असणे, शहरांचे भविष्यातील नियोजन करताना पर्यावरण बदलाची नोंद घेण्याची गरज, या सर्व बाबी विचारात घेऊन शासनाने आवश्यक उपाययोजना राबविण्याची गरज असताना शासनाचे त्याकडे होणारे दुर्लक्ष, शासकीय यंत्रणांना मूलभूत नागरी सुविधा उपलब्ध करण्यात येत असलेले अपयश, त्यामुळे या महानगरांमध्ये राहणाऱ्या नागरिकांमध्ये निर्माण झालेला असंतोष, या प्रकरणी शासनाने करावयाची कारवाई व उपाययोजना विचारात घेण्यात यावी."

नंतर श्री.कांबळे....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. धनंजय मुंडे ....

सभापती महोदय, मुंबई, ठाणे, कल्याण, डोंबिवली, औरंगाबाद या क्षेत्रांत विविध नागरी समस्या असल्यामुळे जनतेचे अतोनात हाल होत आहेत. महानगरांतील लोकसंख्या, अनधिकृत झोपड्यांचा विळखा आणि त्यामुळे मनपाच्या यंत्रणेस मूलभूत नागरी सुविधा पुरविण्यात येत असलेले अपयश हे अतिशय गंभीर विषय आहेत. नियम 259 अन्वये आम्ही सदनात हे विषय चर्चेला आणत आहोत. विधानसभेच्या निवडणुका होऊन 4 महिने झाले आहेत. मुंबई मनपाच्या हद्दीत भाजपचे 15 आमदार आहेत.

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, माझी हरकत आहे. संभाजीनगर मनपाच्या निवडणुकीच्या संदर्भातील आचारसंहिता सुरू असल्यामुळे या प्रस्तावावर चर्चा करता येईल का हा प्रश्न आहे. सन्माननीय सदस्य ॲड. अनिल परब यांची वांद्रे वसाहतीच्या संदर्भातील लक्षवेधी सूचना होती. परंतु तेथे विधानसभा निवडणुकीच्या संदर्भातील आचारसंहिता सुरू असल्यामुळे लक्षवेधी सूचना घेता आली नाही. मुंबई, ठाणे, कल्याण, डोंबिवली महानगरपालिका इत्यादी मनपांचा प्रस्तावामध्ये उल्लेख आहे. सभापती महोदय, आता आपणच या संदर्भातील निर्णय द्यावा. चर्चेला माझी काही हरकत नाही.

श्री. धनंजय मुंडे : सभापती महोदय, अंतिम आठवडा प्रस्ताव दिला त्या दिवशी देखील आचारसंहिता लागली होती. आचारसंहितेच्या संदर्भातील सर्व नियम सन्माननीय सदस्यांना माहीत आहेत. आम्ही या प्रस्तावावर चर्चा करीत असताना घोषणा करणार नाही. तेथील लोकांचे मतपरिवर्तन होईल आणि लगेच 25 वर्षांची सत्ता उलथून तेथे आमच्या विचाराने लढत असलेले विजयी होतील असे काही नाही.

श्री. दिवाकर रावते (बसून) : त्यामुळे मी उत्तर देण्यास बांधील नाही असे मला म्हणायचे होते.

..2

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. धनंजय मुंडे : सभापती महोदय, उत्तर देण्यास मी बांधील नाही असे माननीय मंत्री म्हणू शकत नाहीत. प्रस्तावात आलेल्या सर्व बाबींच्या संदर्भात उत्तर अपेक्षित असते. माननीय मंत्री उत्तर देणार नसतील तर अंतिम आठवडा प्रस्तावाला काय अर्थ आहे ? विरोधी पक्षाने 4-5 मनपांच्या नागरी सुविधांच्या बाबतीत, कारभाराच्या बाबतीत प्रस्ताव आणला आहे. आचारसंहितेचे नाव काढून प्रस्तावाला उत्तर देण्यास कुचराई होणार असेल तर ते योग्य नाही. माननीय मंत्र्यांनी उत्तर दिले नाही तर अंतिम आठवडा प्रस्तावाला सरकारकडून न्याय दिला गेला असे म्हणता येणार नाही.

सभापती महोदय, मुंबईत विधानसभेच्या निवडणुकीत भाजपचे 15 आणि शिवसेनेचे 14 आमदार निवडून आले. महाराष्ट्रातील जनतेची निवडणुकीमध्ये मतदान करून फसवणूक झाली. मुंबईतील जनतेची सुध्दा फसवणूक झाली आहे. मुंबई ही एक महानगरी आहे. मुंबईवर अनेक चांगली गाणी, कविता करण्यात आल्या आहेत. मुंबईचे नागरीकरण सबंध जगाला वेगळे समीकरण देणारे आहे. जगात मुंबईसारखी अनेक महत्त्वाची शहरे आहेत. मुंबईची एक वेगळी ओळख जगात आहे. कारण मुंबईमध्ये जंगल आहे. मोठ्या राज्याच्या राजधानीत, देशाच्या आर्थिक राजधानीत मुंबईत जंगल आहे आणि असे असणारी हाताच्या बोटावर मोजण्याएवढी शहरे आहेत त्यामध्ये मुंबई आहे. मुंबईवर अनेक गोष्टींचा भार पडत आहे. भविष्यात मुंबईचे काय होईल हा प्रश्न मुंबईत राहणाऱ्यालाच नव्हे तर जगात मुंबईचा विचार करणारे जे कोणी असतील त्या सर्वांच्या मनात येत आहे. महानगरांची किंवा मोठ्या शहरांची अनियंत्रित वाढ होत आहे. नागरी समस्यांच्या आधारे असलेली शहरे म्हणून आता मुंबई, ठाणे, डोंबिवली, औरंगाबाद, कल्याण, नवी मुंबई ही शहरे ओळखली जाऊ लागली आहे. राज्यातील महत्त्वाची, नावाजलेली शहरे आहेत, त्यांचे महत्त्व सुध्दा अनन्यसाधारण आहे. आज ही शहरे केवळ नागरी समस्यांची शहरे म्हणूनच ओळखली जात आहेत. एकीकडे आपण तेथे वातानुकूलित टोलेजंगी बहुमजली इमारती पाहत आहोत, त्यामध्ये

..3

श्री. धनंजय मुंडे ....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

जिम्नॅशिअम, उद्याने, स्विमिंग पूल इत्यादी सुविधा मिळत आहेत आणि दुसरीकडे पिण्याच्या पाण्याचे दुर्भिक्ष आहे, सांडपाण्याची दुरवस्था आहे, वाढत असलेल्या झोपडपट्ट्या असे महानगराचे चित्र आपल्यासमोर आहे. महानगरात असलेल्या सत्ताधाऱ्यांनी 24 तास पाणी, कॉंक्रिट रस्ते, वाहतूक व्यवस्थेमध्ये सुधारणा, चांगली उद्याने, नाट्यगृहे, मनोरंजनाची चांगली साधने, सांडपाण्याची व्यवस्था, शहराची सुरक्षितता अशी सबंध विकास करण्याची स्वप्ने दाखविली. परंतु दुर्दैवाने त्यापैकी एकही स्वप्न पूर्ण झाले नाही ही वस्तुस्थिती आहे. शहराच्या विकासास आवश्यक नियोजन हवे असते. सत्ता कोणाचीही असो स्थानिक स्वराज्य संस्थेमध्ये असणाऱ्या सत्ताधारी पक्षाकडून नियोजन व्यवस्थित होणे आवश्यक असते. आपण सर्वांनी मिळून मोठी महानगरे वाचविली पाहिजेत. आज या संदर्भातील विचार झाला पाहिजे. मी सदनातील सर्व पक्षांच्या सन्माननीय सदस्यांना विनंती करतो की, चर्चेत सर्वांनी एकत्र येऊन महानगरांच्या विकासासंबधी योग्य पावले उचलावीत. शासनाने देखील याचा सकारात्मक विचार करावा आणि त्या दृष्टीने लक्ष घालावे. सभापती महोदय, आपण आज 21 व्या शतकात वावरत आहोत.

(नंतर श्री. रोझेकर ....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.धनंजय मुंडे.....

जसजशा उच्च प्रतीच्या साधनसुविधा आपल्याला मिळू लागल्या आहेत, तसतसे जग लहान होत चालले आहे. जग किती लहान झाले आहे, हे आपल्याला सर्वप्रथम मोठ्या महानगरांमधून दिसावयास लागते आणि मग ग्रामीण भागात त्याचे परिणाम दिसू लागतात. आज ही सर्व महानगरे बकाल होत चालली आहेत. परवडणाऱ्या घरांच्या कमतरतेमुळे झोपडपट्टी वाढत चालली आहे. रोज नव्याने येत असलेल्या लोंढ्यांमुळे मुंबईची काय अवस्था होईल, याची चिंता मुंबईत आल्यानंतर प्रत्येक माणसाच्या मनात निर्माण होते. या महानगरांच्या मूलभूत समस्या सोडविण्यासाठी मोठ्या प्रमाणावर निधीची आवश्यकता आहे. सुदैवाने, मी मुद्दाम म्हणतो आहे की, सुदैवाने, या राज्यात आणि देशात एकाच पक्षाची सत्ता आहे. सुदैवाने जे पक्ष सत्तारूढ आहेत, त्याच पक्षाची महानगरपालिकेमध्ये सत्ता आहे. फक्त भीती एवढीच आहे की, अर्थसंकल्पात झाले तसे या शहरांच्या विकासाच्या संदर्भात राज्य आणि केंद्र शासनाकडून होऊ नये. या काळजीपोटीच अंतिम आठवडा प्रस्तावाच्या माध्यमातून आम्ही या महानगराचा विषय सभागृहापुढे मांडला आहे. आपण पाहिले असेल की, जी खाती मित्रपक्ष शिवसेनेकडे आहेत, त्या खात्यांसाठी अर्थसंकल्पात जेवढी तरतूद करणे गरजेचे होते, जेवढा नियतव्यय देणे आवश्यक होते, तेवढी तरतूद आणि नियतव्यय त्या खात्यांना दिलेला नाही. हे आम्ही म्हटले नाही तर सत्तारूढ पक्षातील मित्रपक्षाच्या सन्माननीय सदस्यांनी अर्थसंकल्पीय चर्चेदरम्यान म्हटले आहे. हे त्यांच्या मनातील दुखणे आहे, या त्यांच्या मनातील वेदना आहेत आणि त्या आम्ही केवळ येथे उदधृत करीत आहोत.

सभापती महोदय, मुख्यमंत्री महोदय माझे भाषण मन लावून ऐकत आहेत. त्यामुळे हा विषय ते गांभीर्याने घेतील अशी माझी अपेक्षा आहे. अधिवेशन संपल्यानंतर ते परदेश दौऱ्यावर जाणार आहेत आणि त्याचा फायदा आपल्या राज्याला होणार आहे.

सभापती महोदय, जगातील इतर देशांची उदाहरणे मी मुद्दाम आपल्या माध्यमातून त्यांच्यासमोर मांडणार आहे. एका आंतरराष्ट्रीय कंपनीने जगातील सर्व शहरांच्या विकासाबाबत सर्वेक्षण केले. चीनमध्ये नागरी विकासासाठी दरडोई 116 डॉलर एवढा खर्च केला जातो, अमेरिकेमध्ये 292 डॉलर आणि दुर्दैवाने भारतामध्ये नागरी सुविधांसाठी दरडोई 16 डॉलर एवढाच खर्च केला जातो. त्याचाच परिणाम म्हणून शहरे मोठी होत गेली आणि सुविधा मात्र कमी झाल्या आहेत.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.धनंजय मुंडे.....

सभापती महोदय, पुढील पन्नास वर्षात राज्यातील शहरांचा विस्तार कसा आणि केवढा होईल, असा प्रश्न आपल्या सर्वांच्याच मनात निर्माण होत असेल. शहरांमध्ये रस्ते, वीज, पाणी, घरे या सुविधांची पूर्तता कशी करायची, असा प्रश्न आज आमच्यासमोर आहे. परंतु, आवश्यक तेवढा निधी उभारुन नियोजनबध्द पध्दतीने त्या निधीचा विनियोग केला तर ही शहरे वाचू शकतील, अन्यथा, या शहराचे भविष्य अंधकारमय आहे, एवढे नक्की.

सभापती महोदय, मुंबई शहराची लोकसंख्या 1 कोटी 27 लक्ष एवढी झाली आहे. खरी चिंता काय आहे ? या लोकसंख्येपैकी 54 टक्के लोकसंख्या झोपडपट्टीमध्ये राहते. भारताची आर्थिक राजधानी असलेले हे शहर माणसांची प्रचंड गर्दी, प्रदूषण, वाहनांची कोंडी, वाहतूक व्यवस्था, रेल्वे व्यवस्था, सांडपाणी, कचऱ्याची विल्हेवाट आणि सन्माननीय श्री.दिवाकर रावते साहेब सर्वात महत्त्वाचे म्हणजे या मुंबई शहरातून हरवत चाललेला मराठी माणूस या समस्या चिंता करण्यासारख्या आहेत. त्यामुळे राज्य शासन किंवा महानगरपालिका या समस्यांच्या ओझ्याखाली असल्याचे आपल्याला पहावयास मिळत आहे. अशीच परिस्थिती कायम राहिली तर हे मुंबई महानगर 20 वर्षानंतर राहण्यायोग्य राहील की नाही, असा प्रश्न माझ्याच नाही तर आपल्या सर्वांच्या मनात निर्माण झाल्यावाचून राहणार नाही.

सभापती महोदय, आज मुंबई महानगरीचा सर्वात मोठा आणि महत्त्वाचा प्रश्न कोणता असेल तर तो मोकळ्या जागांचा आहे. कोणत्याही शहराच्या नियोजनात खुल्या जागा, खेळांची मैदाने यांना अनन्यसाधारण महत्त्व आहे, हे कुणीही नाकारु शकणार नाही. मुंबई महानगरपालिका विकास नियंत्रण नियमावली व महाराष्ट्र नगररचना अधिनियम, 1960 मधील तरतुदीनुसार या प्रयोजनाकरिता 10 टक्के क्षेत्र राखून ठेवणे बंधनकारक आहे, असा कायदा आहे आणि तो कोणालाही डावलता येत नाही. मूळात खुल्या जागा, मोकळ्या जागा आणि मैदाने यांचे जतन करण्याची जबाबदारी महानगरपालिकेची आहे. या मोकळ्या जागांवर अतिक्रमण होऊ नये, आरक्षण जाऊ नये, ज्या आरक्षित जागा आहेत, त्यांचा आरक्षित उपयोगासाठी जसे, मोठी मैदाने,

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

09-04-2015 (असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही) NN-3

SRR/ AKN/ AKN/ MMP/ KTG/ प्रथम श्री.मंगेश..... 17:20

श्री.धनंजय मुंडे.....

लहान मैदाने, बगिचे, जॉगिंग ट्रॅक, हिरवळ यासाठी विकास करण्याची जबाबदारी मुख्यत्वेकरुन मुंबई महानगरपालिकेची आहे. सध्या ही जबाबदारी पार पाडली जात आहे, यावर माझाच नाही तर मुंबईमधील सर्वसामान्य नागरिकांचाही विश्वास नाही. मागील अनेक वर्षांपासून ज्यांच्या हातात महानगरपालिकेची सत्ता आहे आणि जे आजही सत्तेत आहेत, त्यांना या सर्व सुविधा देण्यात अपयश आलेले आहे, ते अपयशी ठरले आहेत, असे म्हटले तर ते वावगे ठरु नये.

सभापती महोदय, आपण आजची परिस्थिती बघितली तर मुंबई शहरात दरडोई 1 चौ.मी.पेक्षा कमी खुली जागा उपलब्ध आहे. ही परिस्थिती कशामुळे निर्माण झाली आहे, एवढी वर्षे महानगरपालिकेत कोण सत्तेवर आहे, कोणाच्या दुर्लक्षामुळे हे झाले आहे, कदाचित महानगरपालिकेचे पदाधिकारी जबाबदार नसतील पण अधिकारी जबाबदार नाहीत, अधिकारी जबाबदार असतील तर पदाधिकाऱ्यांना याची माहिती नाही, असे कसे होऊ शकते ? काही का असेना, अनेक वर्षांपासून महानगरपालिकेत जे सत्तेत आहेत, तेच मोकळ्या जागा नसणे, अतिक्रमणे असणे, अनेक जागा विकासकांच्या ताब्यात जाणे, याला जबाबदार आहेत, हे आपल्याला विसरुन चालणार नाही.

सभापती महोदय, मी सुरुवातीलाच सांगितले की, जोहन्सबर्ग नंतर जंगल असणारे मुंबई हे शहर आहे. अशी शहरे जगभरात हाताच्या बोटावर मोजण्याएवढीच आहेत. सुदैवाने मुंबईत जंगल आहे. निसर्गाची कृपा लाभलेल्या या शहराच्या या फुप्फुसांवर मात्र आज मुंबई महानगरपालिका आणि शासनाचा डोळा आहे. मुंबईच्या गोरेगाव येथील जंगलाबाबत मुख्यमंत्री महोदयांनी वेळोवेळी भूमिका स्पष्ट केली आहे. आम्ही मुंबई शहराची ही फुप्फुसे अबाधित ठेवू, कोणाचीही वाकडी नजर त्याकडे पडू देणार नाही, अशी भूमिका त्यांनी घेतली आहे. अपेक्षा एवढीच आहे की, त्यांनी या आपल्या निर्णयावर ठाम रहावे. अन्यथा, या मुंबईची अवस्था अत्यंत वाईट होईल आणि ही मुंबई 20 वर्षात नाही तर फक्त 10 वर्षातच उद्ध्वस्त होईल.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

सभापती महोदय, आपण मुंबईसाठी काय करीत आहोत ? काही विकासकांच्या हितासाठी आपण मुंबईतील बोरिवली येथील नॅशनल पार्कच्या बफर झोनची परिसीमा 10 किलोमीटरवरून

...4....

09-04-2015 (असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही) NN-4

SRR/ AKN/ AKN/ MMP/ KTG/ प्रथम श्री.मंगेश..... 17:20

श्री.धनंजय मुंडे.....

8.5 कि.मी.वर आणीत आहोत. अशा प्रकारचा एक कट रचला जात आहे आणि ही गांभीर्याने विचार करण्यासारखी गोष्ट आहे. हे कुणासाठी चालले आहे ? सुदैवाने, निसर्गाच्या कृपेने मुंबई शहरामध्ये बोरिवली नॅशनल पार्कच्या माध्यमातून आपल्याला जंगल मिळाले आहे आणि आपण मात्र त्या जंगलाच्या बफर झोनची परिसीमा कमी करावयास निघालो आहोत.

यानंतर श्री.वि.खर्चे...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.धनंजय मुंडे...

सभापती महोदय, मुख्यमंत्री महोदयांनी याबाबीकडे लक्ष द्यावे. हा प्रस्ताव केंद्र सरकारकडे सादर केल्याची माहिती माझ्याकडे आहे. असे असेल तर मुंबईला माय म्हणणाऱ्या आईचा गळा दाबल्यासारखे होईल. ही अतिशय दुर्दैवाची गोष्ट आहे. मुंबईच्या नियोजित विकास आराखड्याबाबत आज चर्चा सुरु आहे. या नियोजित विकास आराखड्यात तिवरे, ना विकास क्षेत्र, पानथळ जागा, मिठागरे, आरे कॉलनी हे सर्व भाग बिल्डरांना बक्षीस म्हणून देण्याचा प्रयोग भविष्यात होणार आहे. मुंबईतील पर्यावरण ऱ्हासाची सुरुवात येथूनच होणार आहे. पुरेशा मोकळ्या जागा व पायाभूत सुविधा नसताना नियोजित विकास आराखड्यात आठ एफएसआय वाढवून देण्याची शिफारस करण्यात आली आहे. शासन मुंबईत मोठे रस्ते करु शकत नाही, मुंबईतील सांडपाणी व कचऱ्यासाठी वेगळी व्यवस्था निर्माण करु शकत नाही. मुंबईसाठी लागणाऱ्या पिण्याच्या पाण्याची वेगळी व्यवस्था करु शकत नाही. असे असताना मुंबईत मजल्यांवर मजले चढविण्यासाठी आठ एफएसआय देण्याची शिफारस नियोजित विकास आराखड्यात करण्यात आली आहे. आठ एफएसआय देण्याचा कायदा केला जात आहे. हे शासन हवा विकत आहे. हवा विकत असताना जमिनीवर राहणाऱ्या माणसाचा विचार केला जात नाही. या प्रस्तावाच्या निमित्ताने सरकारने या विकास आराखड्याबाबत पुनर्विचार करावा अशी माझी विनंती आहे. हवा विकण्यापेक्षा व एफएसआय वाढवून देण्यापेक्षा आहे त्या परिस्थितीत मुंबईला सुविधा देण्यासाठी राज्य व केंद्र सरकारने एकत्रित येऊन मदत करण्याची भूमिका घेण्याची गरज आहे.

सभापती महोदय, मुंबई महानगरपालिका क्षेत्रात झोपडपट्टी पुनर्वसन योजना राबविण्यात अपयश आले आहे. मुंबई शहरातील 60 टक्के लोकसंख्या झोपडपट्टीत राहते. आज मुंबई शहरात 1250 अधिसूचित व घोषित झोपडपट्टया आहेत. त्यापैकी 400 झोपडपट्यांच्या जागेवर झोपडपट्टी पुनर्वसन योजना मंजूर करण्यात आली आहे. त्यापैकी फक्त 125 ते 130 योजना पूर्ण झाल्या आहेत, याची कारणे काय आहेत ? विकास नियंत्रण नियमावली 33(5) अन्वये पुनर्विकास करण्यात येणाऱ्या इमारतींसाठी वाढीव एफएसआय देण्यापोटी प्राप्त होणाऱ्या सदनिकेऐवजी विकासकाच्या फायद्याचे प्रिमिअम स्वीकारण्याचे धोरण शासनाने घेतले आहे. विकास नियंत्रण नियमावली 33(5) अन्वये पुनर्विकास करण्यात येणाऱ्या धोकादायक इमारतींसाठी अतिरिक्त

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.धनंजय मुंडे...

एफएसआय देण्यापोटी संबंधित विकासकाकडून सदनिका घेण्याचे धोरण आघाडी शासनाचे होते. या धोरणामुळे सरकारकडे घरांची उपलब्धता होणार होती, ती घरे परवडणाऱ्या दरात मुंबई व परिसरात राहणाऱ्या सामान्य माणसाला शासनाच्या वतीने म्हाडामार्फत देण्यात यावी असा निर्णय आघाडी शासनाचा होता. परवडणारी घरे म्हणून ती ओळखली जात होती व ती वितरित करण्यात येत होती. म्हाडाच्या संक्रमण शिबिरात 40 वर्षापासून अनेक मुंबईकर खितपत पडले आहेत. त्या मुंबईकरांसाठी या योजनेच्या माध्यमातून घरे उपलब्ध होऊ शकत होती. मुंबईतील बिल्डरांनी जाणीवपूर्वक सुरुवातीपासून या तरतुदीस विरोध केला. या विरोधाच्या मागे प्रमुख कारण आर्थिक स्वरूपाचे व लक्ष्मीदर्शनाचे आहे. त्यावेळी आघाडी शासनाने ठामपणे निर्णय घेतला होता की, बिल्डरांना प्रिमिअम द्यावयाचा नाही. प्रिमिअमच्या बदल्यात बिल्डरांकडून घरे बांधून घ्यावयाची. ती घरे शासनाच्या वतीने म्हाडामार्फत मुंबईतील सामान्य माणसाला परवडणारी घरे म्हणून देण्याची योजना होती. या धोरणाला आताच्या सरकारने तिलांजली दिली आहे.

सभापती महोदय, मुख्यमंत्री महोदयांच्या ही बाब लक्षात का आली नाही, याचे उत्तर या सरकारकडून मिळणे अपेक्षित आहे. नवीन सदनिकेऐवजी तेवढ्या क्षेत्रफळाचा प्रिमिअम रेडीरेकनरच्या आधारे घेण्याचे धोरण शासनाने स्वीकारले आहे. वरळी भागात प्रति स्क्वेअर फूट 22 हजार रुपये रेडीरेकनर नुसार दर असेल आणि बिल्डरांनी 22 हजार रुपये प्रति स्क्वेअर फूटप्रमाणे सरकारकडे प्रिमिअम जमा केल्यावर तेवढे क्षेत्रफळ बिल्डर वरळीत 70 हजार प्रति स्क्वेअर फूटप्रमाणे विकणार, म्हणजे एका स्क्वेअर फूटामागे 48 ते 50 हजार रुपये बिल्डरांना देण्याचे धोरण शासनाने का स्वीकारले या प्रश्नाचे उत्तर मुख्यमंत्री महोदयांकडून आम्हाला अपेक्षित आहे.

सभापती महोदय, सरकारने प्रिमिअम घेण्याचे नवीन धोरण आणले आहे. या धोरणाला एका कर्तव्यदक्ष अधिकाऱ्याने विरोध केल्यामुळे बिल्डरांनी या अधिकाऱ्याच्या विरोधात लॉबी तयार करून त्या अधिकाऱ्याची सहा महिन्यात बदली करण्यास भाग पाडले आहे. वित्त मंत्री महोदयांनी त्यांच्या अर्थसंकल्पीय भाषणात असे सांगितले होते की, आम्ही वाटेल ती किंमत मोजू पण चांगल्या अधिकाऱ्यांना प्रोत्साहन देऊ, त्यांच्या पाठीमागे सरकार उभे राहील. सामान्य माणसाचा

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

(सभापतीस्थानी तालिका सभापती श्री.प्रकाश बिनसाळे)

श्री.धनंजय मुंडे...

विचार करणारा एखादा अधिकारी प्रामाणिकपणे धोरण राबवित असेल आणि त्याचा फायदा शासनाला व सामान्य माणसाला होत असेल तर ते काम सरकारने केले पाहिजे. अशा अधिकाऱ्याची सहा महिन्यात बदली केली जाते यामागे शासनाचा काय उद्देश आहे तो दिसून येतो. या शासनाने लोकांना अशी स्वप्ने दाखविली होती की, हम अच्छे है, और अच्छे दिन आनेवाले है. हे कोठेही दिसून येत नाही. मुंबईच्या विषयावर आज चर्चा करण्यात येत आहे. सर्व नागरिकांना या चर्चेच्या उत्तरातून मुख्यमंत्री महोदयांकडून सविस्तर माहिती जाणून घेण्याची अपेक्षा आहे.

सभापती महोदय, एक बाब मी जबाबदारीने सांगतो की, प्रिमिअम स्वीकारण्याच्या धोरणामुळे पाच ते सात हजार परवडणाऱ्या घरांना मुंबईकर माणूस मुकला आहे. याबाबत शासनाने विचार करावा. शासनाने बिल्डरांचा विचार करु नये. सामान्य माणसांसाठी चांगले धोरण आणावे. आघाडी शासनाने केलेले धोरण वाईट होते काय ? तर मुळीच ते धोरण वाईट नव्हते. प्रिमिअम ऐवजी घर घेण्यात येत होते. ज्या घरांची उपलब्धता होत होती ती घरे म्हाडाच्या माध्यमातून मुंबईतील सामान्य माणसाला मिळावे असाच प्रयत्न होता. यामध्ये जो बदल करण्यात आला तो सामान्य नागरिकाच्या हिताचा नाही. याबाबत मुख्यमंत्री महोदयांनी पुनर्विचार करावा, अशी मी विनंती करतो.

या नंतर श्री.बोरले..

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.धनंजय मुंडे.....

सभापती महोदय, म्हाडाच्या भूखंडावरील झोपडपट्टयांचा पुनर्विकास म्हाडामार्फत करण्याचा निर्णय बदलून कोणाच्या हितासाठी तो पुन्हा एसआरए मार्फत करण्याचा निर्णय घेण्यात आला ? म्हाडाचा अर्थ काय आहे ? महाराष्ट्र हाऊसिंग डेव्हलपमेंट ॲथॉरिटी, असा म्हाडाचा अर्थ आहे. जो त्यांचा अधिकार आहे, ज्या उद्देशाने म्हाडाची निर्मिती केली गेली तोच अधिकार तुम्ही त्यांच्याकडून काढून घेतला. आता म्हाडा म्हाडाच्या जागेत डेव्हलपमेंट करु शकत नाही. तो प्रोजेक्ट एसआरएकडे द्यावयाचा ? मग बिल्डर, बिल्डरची फाईल, एसआरए, एसआरएचे सीईओ, मंत्री हे सर्व पुन्हा येईल. म्हाडाने जर म्हाडाच्या जागेत डेव्हलपमेंट केली तर कोणाकडेच जाण्याची गरज नाही. तो अधिकार त्यांचाच आहे आणि ती फाईल देखील कोणाकडे मूव्ह करण्याची गरज नाही. मी सांगू इच्छितो की, म्हाडाच्या जमिनीवर वसलेल्या झोपड्यांचा पुनर्विकास बिल्डरांनी न करता तो स्वतः म्हाडानेच करावा, हा निर्णय आघाडी सरकारने घेतला होता. परंतु, मुख्यमंत्री महोदय, आता हा निर्णय बदलण्यात आलेला आहे आणि तो निर्णय का बदलण्यात आला याचे कारण आपण स्पष्ट करावे. खरोखर यामुळे मुंबईमध्ये नेमका कोणता बदल होणार आहे, यामुळे मुंबईतील नागरिकांना कोणत्या सुविधा मिळणार आहेत, हे आम्हाला मुख्यमंत्री महोदयांच्या उत्तराच्या भाषणातून ऐकावयाचे आहे.

सभापती महोदय, म्हाडा ही प्रामुख्याने गृहनिर्माण क्षेत्रात काम करणारी संस्था आहे. त्या अनुषंगाने या संस्थेकडे तांत्रिक व कुशल मनुष्यबळ उपलब्ध आहे. या संस्थेकडे मनुष्यबळ आहे, टेक्निकल स्टाफ देखील आहे. या संस्थेकडे सर्व गोष्टी उपलब्ध आहेत. मी जबाबदारीपूर्वक सांगतो की, फक्त बिल्डरच्या फायद्यासाठी हा निर्णय बदलण्यात आलेला आहे. म्हाडाच्या जागेत एसआरए मार्फत काम व्हावे, त्या इमारती एसआरए मार्फत बांधण्यात याव्यात, हा फक्त बिल्डर लॉबीकरिता घेतलेला निर्णय आहे. हा निर्णय बिल्डर लॉबीसाठी घेण्यात आलेला आहे, का मुंबईतील जनतेकरिता घेण्यात आलेला आहे, हे देखील आम्हाला कळले पाहिजे. आज मुंबईच्या विषयांवर चर्चा आहे. हा निर्णय बिल्डर लॉबीच्या अर्थपूर्ण दबावापुढे झुकून या शासनाने सत्तेत आल्या नंतर सर्वप्रथम या योजना म्हाडाकडून काढून घेऊन बिल्डरांच्या घशात घालण्याचा प्रयत्न

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.धनंजय मुंडे.....

केलेला आहे. हा विषय अनेक दिवसांपासून अडकून पडलेला होता. आज मुंबई शहरात या विषयी चर्चा सुरु आहे, बिल्डर लॉबीमध्ये या विषयी चर्चा सुरु आहे. स्वाभाविकपणे कोणी तरी समोर आल्यानंतर या संदर्भात सर्वंकष चर्चा होत असेल. ज्यावेळी सभागृह सुरु असते त्यावेळी असा विषय सभागृहात चर्चेला येतो. जर असे काही झाले असेल तर आता देखील वेळ गेलेली नाही. आपण तो निर्णय बदलू शकता. आमची हीच अपेक्षा आहे की, मुख्यमंत्री महोदयांनी हा निर्णय बदलावा आणि मुंबईकरांच्या हिताचा निर्णय घ्यावा. म्हाडाच्या जागेवर म्हाडानेच बांधकाम करावे. कारण, तीच आपली अधिकृत संस्था आहे आणि त्या अधिकृत संस्थेमार्फतच कामे केली पाहिजेत. गृहनिर्माण योजना राबविण्यासाठी म्हाडा असमर्थ आहे असे शासनाने कोठे तरी म्हटल्याचे मी ऐकले आहे. म्हाडा असमर्थ आहे, तर का असमर्थ आहे, हे शासनाने सांगावे. राज्यातील महाराष्ट्र हाऊसिंग डेव्हलपमेंट ॲथॉरिटी असमर्थ असेल आणि फक्त बिल्डरच बांधकाम करण्यासाठी समर्थ आहेत असा जावई शोध शासनाने लावला असेल तर याबाबत विचार होणे आवश्यक आहे.

सभापती महोदय, स्ट्रक्चर प्रोटेक्शन पॉलिसीला शासनाने मान्यता देऊन दिनांक 01.01.2000 नंतर परिशिष्ट-दोन मधील संरक्षण पात्र झोपडी विकत घेणाऱ्याच्या नावे हस्तांतरित होत नसल्याने आज लाखो झोपडीधारकांवर अन्याय होत आहे. एक साधा निर्णय आहे. सन 2000 पूर्वी ज्या झोपड्या आपण नियमानुसार अधिकृत ठरविल्या आणि त्या झोपड्या एसआरएमध्ये आल्या. त्यांना आपण एसआरएच्या नियमानुसार एसआरए योजनेच्या माध्यमातून तेवढे अधिकृत क्षेत्र देण्याचे ठरविले. उदाहरणार्थ माझी झोपडी आहे. नियमानुसार ती झोपडी 2001 मधील आहे. परंतु, माझ्या वेगवेगळ्या अडचणींमुळे मी ती झोपडी कोणाला विकली तर आता या निर्णयामुळे ती झोपडी ज्याला विकली त्याला झोपडपट्टी पुनर्विकास योजनेच्या माध्यमातून फायदा मिळणार नाही. ती झोपडी डिमॉलिश केली जाणार आहे. आपल्याला हा निर्णय बदलावा लागेल, याबाबतीत पुनर्विचार करावा लागेल. आघाडी शासनाने मुंबईतील झोपडपट्ट्यांमध्ये वास्तव्य करणाऱ्या लाखो झोपट्टीधारकांना दिलासा देण्यासाठी स्ट्रक्चर प्रोटेक्शन पॉलिसीला मान्यता दिली होती. त्यामध्ये

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

(सभापतीस्थानी तालिका सभापती श्री.रामनाथ मोते)

श्री.धनंजय मुंडे.....

सन 2000 पूर्वीची पात्र झोपडपट्टी सन 2000 नंतर विकत घेणाऱ्या झोपडपट्टीधारकास पुनर्वसन योजनेचा लाभ मंजूर करून देण्यात आला होता. त्याचे नाव परिशिष्ट-दोन मध्ये समाविष्ट करण्याचा शासन निर्णय देखील त्यावेळी निर्गमित करण्यात आला होता. तथापि, आता जेथे एसआरए योजना मंजूर होऊन परिशिष्ट-दोन तयार झाले आहे अशा दिनांक 01.01.2000 पूर्वीच्या संरक्षण पात्र झोपड्या दिनांक 01.01.2000 नंतर विकत घेणाऱ्यांची नावे परिशिष्ट-दोन मध्ये समाविष्ट केली जात नाहीत. हे नुकसान आहे. हे कोणासाठी चालले आहे ? माझी झोपडी आहे आणि मी माझ्या अडचणींमुळे ती झोपडी विकली असेल तर ती झोपडी तोडल्यानंतर ती जागा रिकामी राहते आणि ती जागा बिल्डरांना देण्यात येते. यामुळे भविष्यात लाखो झोपडपट्टीधारकांना या योजनेचा लाभ मिळणार नाही.

सभापती महोदय, धारावी झोपडपट्टीचा पुनर्विकास आणि बीडीडी चाळीचे रखडलेले पुनर्वसन व नव्याने प्रसिद्ध केलेल्या विकास आराखड्यामुळे निर्माण झालेली परिस्थिती. मुंबईतील वरळी येथील बीडीडी चाळीमध्ये वास्तव्य करणाऱ्या लोकांच्या दृष्टीकोनातून हा अत्यंत महत्वाचा प्रश्न आहे. मुंबई शहरातील वरळी येथील अत्यंत मोक्याच्या ठिकाणी 92 एकर जमिनीवर या चाळी वसलेल्या आहेत. या चाळींची निर्मिती सन 1920-30 च्या दरम्यान करण्यात आलेली आहे. या चाळींची निर्मिती होऊन आता 85 ते 90 वर्षे झालेली आहेत. आता या चाळींची अत्यंत दुरवस्था झालेली आहे. मुख्यमंत्री महोदय आपण विदर्भातील नागपूर येथील आहात. आज जरी आपल्याला मुंबईकर म्हटले जात नसले तरी माझी मुख्यमंत्री महोदयांना विनंती आहे की, धारावी झोपडपट्टीचा पुनर्विकास व बीडीडी चाळींचे पुनर्वसन करण्याची गरज आहे. तेथील रहिवाशी 180 फूटाच्या घरात वास्तव्य करीत आहेत. आपल्या स्वतःच्या मालकीची किमान राहण्याएवढी घरे त्यांना मिळाली पाहिजेत आणि बीडीडी चाळींच्या पुनर्विकासाच्या बाबतीत शासनाची काय भूमिका आहे, हे मुख्यमंत्री महोदयांनी आपल्या उत्तराच्या भाषणात स्पष्ट करावे.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.धनंजय मुंडे.....

सभापती महोदय, अधिवेशनाच्या सुरुवातीचा आठवडा दिव्यांमुळे खूप गाजला आणि मुंबईच्या नेकलेसवर अगोदर पिवळे दिवे लावले होते, नंतर तेथे पाढरे दिवे लावण्यात आले. तेथे एलईडी लाईट बसविण्याचा निर्णय घेण्यात आला. तो निर्णय कोणी करावयाचा ? खरे तर 74 व्या घटना दुरुस्तीनंतर महानगरपालिका क्षेत्रात पायाभूत सुविधा पुरविणे, दिवाबत्ती या सारख्या बाबी संबंधित महानगरपालिकेने करावयाच्या आहेत. मुंबईतील रस्त्यांवरील सोडीयम व्हेपर दिवे बदलून तेथे एलईडी लाईट बसविण्याची संकल्पना चांगली किंवा वाईट या संदर्भात मतमतांतर आहे.

यानंतर श्री.भोगले.....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.धनंजय मुंडे.....

क्षणभर योजना चांगली आहे असे गृहीत धरु मुंबई शहरामध्ये महानगरपालिका अस्तित्वात आहे, राज्य शासनाचे मुख्यालय आहे, एमएमआरडीए ही संस्था कार्यरत आहे. असे असताना एलईडी दिवे थेट केंद्र सरकारमार्फत बसविण्याचा अट्टाहास का झाला हे कळले नाही. 74 व्या घटना दुरुस्तीनुसार या संस्थांना अधिकार दिलेले आहेत. शेवटी दिव्यातून दिवे लावावेत असा काही प्रकार झाला आहे का? या संदर्भात निविदा प्रक्रिया केव्हा पार पाडण्यात आली, कोणत्या नियमांच्या आधारे काम देण्यात आले, कोणत्या संस्थेला, कंपनीला किंवा पुरवठादाराला काम देण्यात आले, सदरचे काम देत असताना पारदर्शकता पाळण्यात आली का या बाबींचा खुलासा अंतिम आठवडा प्रस्तावाच्या निमित्ताने माननीय मुख्यमंत्र्यांकडून अपेक्षित आहे.

सभापती महोदय, दोन राजकीय पक्ष सत्तेत असताना त्यापैकी एका पक्षाने या विषयामध्ये काहीतरी काळेबेरे झाले आहे असा आरोप करणे योग्य आहे का? मुंबईची जनता या संदर्भात काय विचार करीत असेल? मुंबईच्या जनतेने या दोन्ही पक्षांवर भरभरुन प्रेम केले. मुंबई शहरात एका पक्षाच्या पारडयात 15 आणि एका पक्षाच्या पारड्यात 14 जागा बहाल केल्या. परंतु दिवे लावायचे भांडण कशासाठी चालले आहे? मुंबईच्या जनतेचे एकच म्हणणे आहे, दिवे कुणीही लावावेत, पांढरे लावा किंवा पिवळे लावा, परंतु चांगले दिवे लावावेत ही त्यांची अपेक्षा आहे.

सभापती महोदय, नाईट लाईफचा विषय अधिवेशन सुरु झाल्यापासून उपस्थित झाला आहे. आज मुंबईकरांना आपले डे लाईफ नीटपणे जगता येत नाही ही वस्तुस्थिती आहे. कोणीही छातीवर हात ठेवून सांगावे की, मुंबईची जनता आपले डे लाईफ आनंदाने उपभोगत आहे. मुंबईकरांना डे लाईफ नीटपणे जगता येणे शक्य नसताना नाईट लाईफची संकल्पना मांडणे कितपत योग्य आहे? ही कल्पना चांगली की वाईट हा चर्चेचा विषय होऊ शकतो. आज महानगरपालिकेमध्ये युतीची सत्ता आहे. नागरिकांना दैनंदिन सोयी सुविधा काय दिल्या जातात, दिवस नीट जगता यावा यासाठी काय दिले हे पाहून नंतर नाईट लाईफचा आग्रह धरला पाहिजे. नाईट लाईफला मान्यता दिल्यानंतर कायदा व सुव्यवस्थेच्या दृष्टीने काय परिणाम होणार आहे हा वेगळा चर्चेचा विषय आहे.

सभापती महोदय, आज मुंबई शहरामध्ये महिला व मुलींच्या सुरक्षेबाबत काय उपाययोजना केल्या आहेत हा महत्वाचा प्रश्न आहे. काल एक दुर्दैवी घटना घडली, त्या संदर्भात आम्ही नियम

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.धनंजय मुंडे.....

289 अन्वये प्रस्तावाची सूचना दिली होती. मुंबईहून कळवा येथे जाणाऱ्या पत्रकार महिलेवर लोकलमध्ये अत्याचार करण्यात आले. आज मुंबईमध्ये महिला सुरक्षित नाहीत. मग नाईट लाईफ कसे सुरक्षित असू शकते? एवढा जर शासनाला आत्मविश्वास असेल तर नाईट लाईफ सुरु करण्याबाबत शासनाची भूमिका काय आहे हे सभागृहामध्ये स्पष्ट केले पाहिजे. मुंबईतील महिलांच्या सुरक्षिततेबाबत न्या.धर्माधिकारी समितीने गंभीरतेने उहापोह करुन अनेक शिफारशी केलेल्या आहेत. त्याबाबत विचार न करता नाईट लाईफचे धोरण ठरवित आहात. न्यायालयाने देखील त्याबाबत आक्षेप घेतले आहेत. त्या आक्षेपांचा नाईट लाईफ सुरु करीत असताना राज्य सरकारला विचार करावा लागेल.

सभापती महोदय, मुंबई शहरामध्ये डेंग्यू या आजाराचा मोठया प्रमाणात फैलाव झाला. दुर्दैवाने शासनाने आणि मुंबई महापालिकेने योग्य प्रकारे नियोजन न केल्यामुळे अनेक रुग्ण दगावले. मात्र मुंबई महापालिकेने लक्ष्मी दर्शनाची संधी सोडली नाही. सदर रोगावर नियंत्रण ठेवण्यासाठी करण्यात आलेल्या औषध खरेदीमध्ये फार मोठा भ्रष्टाचार झाला. ज्या कंपनीला इतर राज्यांनी काळ्या यादीत टाकले आहे, त्याच कंपनीला मुंबई महापालिकेकडून औषध पुरवठयाचे आदेश दिले गेले. या कंपनीला आदेश देण्याचे कारण काय होते? अशा प्रकारे रुग्णांच्या टाळूवरचे लोणी खाण्याचा प्रकार मुंबई महापालिकेने केला हे विसरुन चालणार नाही.

सभापती महोदय, मुंबईच्या रस्त्यांवरील भूमिगत सुविधांसाठी चर खोदले जातात. गेल्या वर्षी सदरचे काम 48 टक्के कमी दराने मंजूर करण्यात आले होते. त्याकरिता 71 कोटी रुपयांची तरतूद केली होती. यावर्षी पुन्हा त्याच कामावर 278 कोटी रुपये खर्च करण्यात येत आहेत. मुंबईतील रस्त्यांच्या बदलाबाबत उच्च न्यायालयाने सुध्दा मुंबई महापालिकेतील सत्ताधाऱ्यांवर व महापालिकेच्या प्रशासनावर ताशेरे ओढले आहेत. एकीकडे 48 टक्के कमी दराने निविदा मंजूर करायची आणि स्थायी समितीसमोर एस्केलेशनने दरामध्ये वाढ करण्याचा प्रकार महापालिकेमध्ये झाला आहे.

सभापती महोदय, मुंबई महापालिकेच्या बेस्ट या उपक्रमामध्ये घोटाळ्यांनी कळस गाठला आहे. किंगलाँग बस खरेदी घोटाळा, वीज चोरी घोटाळा, पवन ऊर्जा घोटाळा, केएलसी सिस्टीम

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.धनंजय मुंडे.....

घोटाळा, वीज मीटर खरेदी घोटाळा, जाहिरात कंत्राट घोटाळा अशा प्रकारच्या अनेक घोटाळ्यामधून बेस्ट उपक्रमाला देशोधडीला लावण्यात आले. महानगरपालिकेच्या घोटाळयांबाबत केव्हा तरी स्वतंत्र चर्चा घेण्यात यावी. तो विषय वेगळा आहे. 'महापालिकेत इतक्या मोठया प्रमाणावर भ्रष्टाचार आहे, तो नष्ट केल्यास मुंबईतील प्रत्येक नागरिकास स्वस्त दरात घर उपलब्ध करुन देता येईल' असे विधान राज्याच्या लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या प्रमुखांनी केले. आरोप करणे सोपे आहे. परंतु हा आरोप नसून ही वस्तुस्थिती आहे.

सभापती महोदय, मुंबई महापालिकेच्या महापौरांचे भ्रमण दूरध्वनीवरुन केलेले संभाषण आपल्यापैकी अनेकांनी टीव्ही चॅनेलच्या माध्यमातून ऐकले. आजही सोशल मीडियावर, व्हॉटस् ॲपवर ते संभाषण फिरत आहे. आम्ही या विषयाबाबत नियम 289 अन्वये प्रस्तावाची सूचना दिली होती. परंतु तो विषय चर्चेला येऊ शकला नाही. मुंबई महापालिकेच्या महापौरांनी कामाच्या टक्केवारी संदर्भात इतर पक्षाच्या गटनेत्यांबरोबर दोन पाहिजे की चार पाहिजे, चार पाहिजे की सहा पाहिजे याबाबत उघडपणे चर्चा करावी हे कितपत योग्य आहे? एका बाजूला सार्वजनिक सोयी सुविधांचा अभाव असताना अशा प्रकारे टक्केवारीची विभागणी केली जात असताना मुंबईकर नागरिक हतबलतेने पाहण्यापलीकडे काही करु शकत नाही.

सभापती महोदय, आपल्या स्थानावरुन सरकारला या विषयाबाबत निवेदन करण्याचे निर्देश दिले गेले होते. उद्या अर्थसंकल्पीय अधिवेशनाचा शेवटचा दिवस असून सायंकाळी 4.00 ते 5.00 वाजेपर्यंत सभागृहाची बैठक संपणार आहे.

नंतर आरआर.1..

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.धनंजय मुंडे....

आज पर्यंत सरकारच्यावतीने निवेदन आलेले नाही. त्यामुळे आपण निदेश द्यावेत किंवा नाही हे ठरविण्याची वेळ आलेली आहे. आपल्या निदेशाचे पालन सरकारकडून होत नसेल तर कशासाठी हे अधिवेशन चालले आहे ? कशासाठी हा सर्व खर्च चालला आहे.

तालिका सभापती : सभागृहाची वेळ 6.00 वाजेपर्यंत होती. पुढील निर्देश येईपर्यंत सभागृहाचे कामकाज सुरू राहील.

श्री.धनंजय मुंडे : सभापती महोदय, आपल्या आदेशाचे पालन केले जात नाही, यास काय म्हणावे असा प्रश्न आमच्या मनात निर्माण होतो. सरकारच्यावतीने निवेदन करायला पाहिजे होते. पण ते अद्याप पर्यंत केले गेले नाही. असे असेल तर मग या सदनाचा उपयोग काय ? आम्ही विधान परिषदेमध्ये नियमाने प्रश्न उपस्थित करतो. त्या प्रश्नाला आपण निदेश देऊन देखील न्याय मिळत नसेल तर मग या चर्चेला अर्थ राहणार नाही. तेव्हा आपण सरकारला पुन्हा निदेश दिले पाहिजेत.

सभापती महोदय, कल्याण-डोंबिवली महापालिका कार्यक्षेत्रात मोठ्या प्रमाणावर आरक्षित भूखंड आहे. तो ताब्यात घेतलेला नाही. त्यावर अतिक्रमण असताना देखील त्याचा टीडीआर हस्तांतरित करण्यात आलेला आहे. यात मोठा भ्रष्टाचार झालेला आहे. मौजे वालधुनी स.नं.60 येथील सुमारे 1,50,000 चौ.फूट जागा महानगरपालिकेची असून ती जागा ताब्यात घेण्यात आलेली नाही. त्या जागेवर अतिक्रमणे असतानाही टीडीआर देऊन मोठा भ्रष्टाचार झाला आहे. या जागेवर झोपड्या व बुद्धविहार असून ती जागा गेल्या 20 वर्षापासून भन्ते यांच्या ताब्यात आहे. असे असतानाही सदर जागेचा टीडीआर विकासकाला देऊन त्याचा वापरही करण्यात आला. मुळात जागेला कंपाऊंड बांधून अतिक्रमण मुक्त स्वरूपात लेव्हल व भरणी करून जागा विकासासाठी उपलब्ध करून दिल्यानंतरच टीडीआर देणे अपेक्षित आहे. पण तसे झाले नाही.

आयरे गावात नदीवर व सीआरझेडने बाधित भूखंडावर अनाधिकाराने एफएसआय मंजूर करून मोठया प्रमाणावर भ्रष्टाचार करण्यात आला आहे. श्री.दशरथ पाटील यांच्या मालकीची मौजे आयरे येथील स.नं.9अ, हि.नं.1 पैकी 5110 चौ.मी जमीन स्वतःची दाखवून मे.महावीर

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.धनंजय मुंडे...

एंटरप्रायझेस या विकासकाने महापालिकेला हाताशी धरून बालाजी गार्डन या प्रकल्पाला मंजुरी मिळविली. तसेच, देय नसताना सीआरझेड मधील 5790 चौ.मी.क्षेत्र देखील विकासकाने महापालिकेच्या संगनमताने वापरले. या कामाला थांबविण्याचे आदेश देऊनही या इमारतीला पूर्णत्त्वाचा दाखला दिला गेला. त्यामुळे 8 पैकी 3 इमारती अनधिकृत ठरत आहेत. यात मोठा भ्रष्टाचार झाला आहे व संगनमताने लोकांची फसवणूक झाली आहे. यात पोलीस कर्मचारी व मंत्रालयीन कर्मचाऱ्यांना देखील सदनिका मिळाल्या आहेत.

सभापती महोदय, अस्तित्त्वात असलेल्या दफन भूमीवर व कुळांच्या जमिनीवर आधुनिक कत्तलखाना बीओटी तत्त्वावर उभारण्याच्या नावाखाली 350 कोटी पेक्षा अधिक रूपयांचा भ्रष्टाचार झालेला आहे. कल्याण शहरात अत्याधुनिक कत्तलखाना बीओटी तत्त्वावर बांधण्याकरिता 30 वर्षांची निविदा काढण्यात आली. या निविदेसाठी कल्याण शहरातील एक जागा निश्चित करण्यात आली. ती जागा महापालिकेच्या मालकीची नाही असे तहसीलदार व महसूल खात्याने कळवूनसुद्धा निविदा काढण्यात आली. सदर जागा मुस्लीम दफनभूमीची व खाजगी मालकीची असून देखील निविदाधारकास कंत्राट देऊन अधिकारी व पदाधिकाऱ्यांनी मलिदा गोळा केला व निविदाधारकास कामच करता न आल्याने त्याची फसवणूक केली. हा सर्व कारभार महानगरपालिकेच्या अधिकाऱ्यांनी केला आहे. तेव्हा आपण त्यांच्यावर कोणती कारवाई करणार आहात ? यात 350 कोटी रूपयांचा भ्रष्टाचार झालेला आहे. यात अर्थपूर्ण व्यवहार झालेला आहे. अशाच प्रकारे एमआयडीसीकडून क्रीडांगणासाठी मिळालेल्या जागेवर महापालिकेने बीओटी तत्त्वावर शॉपिंग सेंटर व मॉल बांधल्यामुळे आयुक्तांसह महापालिकेवर एमआरटीपी अंतर्गत गुन्हे दाखल करण्याची वेळ आली होती. पण एमआयडीसीला काही रक्कम देऊन हे प्रकरण मिटविण्यात आले.

कल्याण रेल्वे स्टेशनजवळ प्रवाशांच्या सोयीसाठी बस डेपो व थांबे असणे गरजेचे आहे. त्यामुळे विकास आराखड्यात स्टेशनजवळ जागा आरक्षित ठेवण्यात आली होती. परिवहन सेवेसाठी असलेली जागा सर्व समावेशक आरक्षणाचे नावे खाजगी विकासकाला, परिवहन सेवेला न विचारता देण्यात आली. त्यामुळे कल्याण स्टेशन जवळ रस्त्यावरच बसगाड्या उभ्या राहतात. त्यामुळे वाहतूक कोंडी होते.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.धनंजय मुंडे....

शासनाचे स्पष्ट आदेश असताना देखील कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेत गेली पाच वर्ष सफाई कामगारांच्या जागा अनुकंपा तत्त्वावर भरण्यात आलेल्या नाहीत.

कल्याण डोंबिवली महानगरपालिकेने बीएसयुपीमध्ये फार मोठा घोटाळा केला आहे. केंद्र शासनाकडून सुमारे रुपये 3500 कोटी अनुदान मिळवून कल्याण डोंबिवली महानगरपालिकेच्या हद्दीत बीएसयुपी योजना राबविण्यात आली. ज्या ठिकाणी योजना राबविण्यात आल्या त्या जागा महानगरपालिकेच्या आहेत असे दाखवून हे अनुदान मिळवण्यात आले. प्रत्यक्षात यापैकी बऱ्याच जागा महानगरपालिकेच्या मालकीच्या नाहीत किंवा त्यांच्या ताब्यातही नाहीत. केंद्र सरकारला खोटी माहिती देऊन व फसवणूक करून हा निधी मिळविला आहे. त्यामुळे आता कित्येक प्रकल्प बंद आहेत, रखडलेले आहेत. त्यातच भरीस भर म्हणजे लाभार्थींच्या याद्या बनवण्यातही खोटी व बोगस नावे असल्यामुळे आजतागायत एकाही लाभार्थ्याला ताबा देता आलेला नाही. एकाही लाभार्थ्याला या योजनेमधून घरकुल मिळालेले नाही. हा 3500 कोटी रुपयांचा घोटाळा आहे.

ठाणे महानगरपालिका क्षेत्रात मेट्रोचे सर्वेक्षण होऊन देखील कार्यवाही अपूर्ण आहे. ठाणे शहरांतर्गत वाहतूक प्रकल्प उभे केले जातील अशी घोषणा महानगरपालिकेच्या निवडणुकीच्या वेळी शिवसेनेने केली होती. मी आपल्या वचननाम्याचा विषय येथे बोलत आहे. मेट्रो प्रकल्पाला राज्य शासनाने हिरवा कंदील दाखवताच ..... (अडथळा).... आज आपण भूमिपूजन करून नारळ फोडत आहात. पण आम्ही अगोदर एक्सरसाईज केल्यामुळे आता आपण फिटनेसचा फायदा घेत आहात. ...(अडथळा).....

सभापती महोदय, म्हाडाच्या प्रश्नांसंबंधी देखील माननीय मुख्यमंत्र्यांना उत्तर द्यावे लागेल. एसआरएमध्ये बदल का करण्यात आला आहे ? या सर्व मुद्यांना त्यांना उत्तर द्यावे लागेल. आम्ही उगाचच कोणावर आरोप करायचे म्हणून करीत नाही. आज सामान्य माणसांच्या मनात जे काही प्रश्न निर्माण व्हायला लागले आहेत ते प्रश्न या सदनाचा सदस्य म्हणून मी येथे नियमाने मांडत आहे. यावर उत्तर देण्याचा अधिकार माननीय मुख्यमंत्र्यांना आहे. त्यांनी या प्रश्नांना जरूर उत्तरे द्यावीत. त्याबद्दल आमचे काहीच म्हणणे नाही. प्रत्येक वेळी आपण म्हणता की, हे आपलेच आहे,आपलेच आहे. ते आम्ही मान्य करतो. त्यामुळेच आम्ही 15 वर्षे राज्य केले.

यानंतर श्री.जुन्नरे...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. धनंजय मुंडे .....

तुम्ही 1995 ते 1999 या काळातच सत्तेमध्ये होता परंतु 1999 ते 2014 पर्यंत तुम्ही सत्तेत येऊ शकला नाहीत. महाराष्ट्राच्या जनतेने काँग्रेस आणि राष्ट्रवादी काँग्रेसला सलग तीन निवडणुकीत सत्तेत आणले होते. मला हे या ठिकाणी बोलावयाचे नव्हते परंतु तुमच्यामुळे मला बोलावे लागले आहे. आता महाराट्राच्या जनतेने तुम्हाला सत्ता दिली आहे. मुख्यमंत्री म्हणून तुम्हाला तुमच्या पक्षाने निवडले आहे. शिवसेना सत्तेत नंतर आली. सत्तेत आल्यापासून चार महिन्याच्या काळात जेवढया चुका तुम्ही केल्या तेवढया चुका आमच्याकडून 15 वर्षाच्या काळात झाल्या नव्हत्या. 15 वर्षे आम्ही सत्तेत होतो त्यामुळे काही गोष्टी आमच्या हातून घडल्या असतील. परंतु एक गोष्ट तुम्ही विसरु नका की, तुम्ही महाराष्ट्रातील जनतेला हा विश्वास दिला होता की, 15 वर्षाच्या काळात हे चांगले वागले नाही परंतु आम्ही यांच्यापेक्षा चांगले वागवून दाखव असे बोलल्यामुळे महाराष्ट्रातील जनतेने तुमच्यावर विश्वास ठेवला. आता जनतेला तुमचे अच्छे दिन की, बुरे दिन काय आहे याचा चांगला अनुभव येत आहे. ठाणे महानगरपालिकेचा विषय काढला की, बोलताना मला अडथळे आणले जातील हे मला माहीत होते. विकास करण्याची, निर्णय घेण्याची जबाबदारी एकटया कुणाचीही नाही हे मी अगोदरच सांगितले होते. ठाणे परिसरात कॅन्सर हॉस्पिटल उभारण्याची मागणी आहे परंतु ती सुध्दा दुर्लक्षित आहे. या सरकारने कॅन्सर हॉस्पिटलच्या संदर्भात मदत केली तर हॉस्पिटल होईल, परंतु हे मदत करतील का, केली तर किती करतील आणि केलीच तर पाच वर्षात कॅन्सर हॉस्पिटल उभे राहू शकेल काय ? आजही ठाणे शहरातील सीसीटीव्हीचा विषय प्रलंबित आहे. सन्माननीय मुख्यमंत्र्यांनी या विषयात लक्ष घातले तर ठाणे महानगरपालिकेचा हा प्रश्न सुध्दा मार्गी लागू शकतो. ठाणे महानगरपालिकेची आर्थिक परिस्थिती काय आहे याची आपल्या सर्वांना माहिती आहे. ठाणे महानगरपालिकेची आर्थिक परिस्थिती कमकुवत असताना विधानसभेची आचारसंहिता लागण्यापूर्वी 500 कोटी रुपयांची कामे स्थायी समितीसमोर आणण्यात आली. यामध्ये कळवा खाडीवर नवा पूल, कौसा येथे 100 खाटांचे रुग्णालय, अशा काही महत्वाकांक्षी प्रकल्पाचा समावेश आहे. मात्र जमा खर्चाचे नियोजन नसल्याने यापैकी एकाही प्रकल्पाच्या बाबतीत विशेष काहीही प्रगती झालेली नाही.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. धनंजय मुंडे .....

सभापती महोदय, ठाणे शहरातील कचऱ्याची विल्हेवाट लावण्यासाठी कचरा सल्लागार नेमण्यात आला. त्यावर लाखोंचा खर्च करण्यात आला. परंतु कचरा जिथल्या तिथेंच आहे. सल्लागार मात्र पैसे घेऊन गायब झाला असून त्याचा ठावठिकाणा लागलेला नाही.

सभापती महोदय, निवडणुकीच्या पूर्वी पक्षाच्या नेत्यांनी सांगितले होते की, ठाणे शहरात जागतिक दर्जाचे मत्स्यालय तसेच हेलियम बलून सारखे प्रकल्प उभारण्याचे आश्वासन मागण्याच्या निवडणुकीच्या तोंडावर शिवसेनेच्या नेत्यांनी दिले होते.

श्री. भाई गिरकर : सभापती महोदय, सन्माननीय विरोधी पक्ष नेते जवळ जवळ सव्वातासापासून अंतिम आठवडा प्रस्तावावर बोलत आहेत. परंतु इतरही सन्माननीय सदस्यांना या चर्चेच्या निमित्ताने विचार मांडावयाचे आहेत. सन्माननीय विरोधी पक्ष नेते आणखी किती वेळ बोलणार आहेत ?

तालिका सभापती : सन्माननीय विरोधी पक्ष नेत्यांनी आपले विचार थोडक्यात पूर्ण करावे.

श्री. धनंजय मुंडे : सभापती महोदय, मी केवळ पाच मिनिटे बोलणार आहे. परंतु हा अंतिम आठवडयाचा प्रस्ताव आहे. अंतिम आठवडयाचा प्रस्ताव किती वेळेत संपवावयाचा असतो याला देखील काही नियम आहेत.

सभापती महोदय, औरंगाबाद शहर हे ऐतिहासिक शहर असून या शहराला एक स्वतःचा इतिहास आहे. मात्र निवडणुका जवळ आल्या की, इतिहासाचे दाखले देत औरंगाबाद शहराचा भूगोल व नागरिकशास्त्र बदलण्याचा प्रयत्न केला जातो. पूर्वी 1995 मध्ये सत्तांतर झाल्यानंतर औरंगाबादचे नाव संभाजीनगर करण्यात आले होते. गेल्या 25 वर्षापासून औरंगाबाद महानगरपालिकेवर शिवसेना व भाजपाची सत्ता आहे. या महानगरपालिकेत अनेक करण्यासारख्या गोष्टी बाजूला ठेवून केवळ शहराचे नाव बदलून या शहरातील सर्वसामान्याचे प्रश्न सुटणार आहेत काय ? या शहराच्या विकासासाठी महानगरपालिकेची निवडणूक सुरु आहे. सरकारला निवेदन करताना अडचणी येतील असे प्रश्न मी या ठिकाणी उपस्थित करणार नाही. औरंगाबाद शहराची लोकसंख्या मागील 20 वर्षात प्रचंड प्रमाणात वाढली आहे. औरंगाबाद शहरात मराठवाडयातून, उत्तर महाराष्ट्रातून त्याच बरोबर महाराष्ट्राच्या बाहेरचे लोक सुध्दा मोठया संख्येने आलेले आहेत.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. धनंजय मुंडे .....

औरंगाबाद शहरात दोन मोठया एमआयडीसी असल्यामुळे शहराची फार मोठी वाढ झाली आहे. औरंगाबाद शहराला पिण्याच्या पाण्याची अतिरिक्त व्यवस्था करण्यासाठी औरंगाबाद महानगरपालिका क्षेत्रामध्ये पिण्याच्या पाण्याचा मूलभूत प्रश्न असल्याने हाती घेण्यात आलेली समांतर पाणी पुरवठा योजना प्रशासकीय दुर्लक्षामुळे, जमिनीच्या संपादनाच्या प्रश्नामुळे बारगळली आहे. पीपीपी तत्वावर समांतर जलवाहिनी प्रकल्पाला मान्यता मिळाल्यानंतर 1 सप्टेंबर, 2014 पासून महानगरपालिकेने या योजनेचे काम औरंगाबाद सिटी वॉटर युटिलिटी कंपनीकडे हस्तांतरित केली आहे. या कंपनीचे संचालक कोण आहेत, भागधारक कोण आहेत ? याची माहिती या सदनाला मिळण्याची आवश्यकता आहे. या विषयाच्या संदर्भात चार पाच दिवसापासून टीव्हीवरुन माहिती दिली जात आहे. या ठिकाणच्या पाणीपट्टीमध्ये 10 टक्के वाढ करण्यात आलेली आहे. या ठिकाणच्या पाणीपट्टीत एकंदर 3 हजार कोटी रुपयांची वाढ केली गेली आहे. यामध्ये 1800 कोटी रुपये महानगरपालिकेला व 1200 कोटी रुपये समांतर योजनेतील कंपनीला दिले जाणार आहे. पाणीपट्टीत 10 टक्के वाढ करुन ते पैसे या कंपनीला देण्यात आलेले आहेत. या कंपनीची आर्थिक स्थिती काय आहे, कंपनीचे भागभांडवल किती आहे ? ही कंपनी एवढी मोठी योजना औरंगाबाद शहराला पाणी पुरवठा करु शकणार आहे काय ? या कंपनीचे भाग भांडवल किती आहे ? या सर्व गोष्टी संशयास्पद आहेत. याच कपंनीला हे काम का मिळाले हे सुध्दा स्पष्ट होण्याची आवश्यकता आहे. समांतर जलवाहिनीची योजना पूर्ण करण्यासाठी पाणी पट्टीमध्ये 10 टक्के वाढ करण्यात आली. या अधिकच्या गोळा केलेल्या रक्कमेचा आकडा कोट्यवधी रुपयांमध्ये आहे. परंतु तो नेमका किती आहे, त्याचा वापर कोठे होतो ? याची सुध्दा माहिती या सभागृहाला मिळणे आवश्यक आहे. सन्माननीय मंत्री श्री. रावते साहेब औरंगाबाद शहराला संभाजीनगर म्हणतात. आज त्या औरंगाबाद शहराच्या रस्त्याची अतिशय बिकट परिस्थिती झाली आहे. आमच्या विभागाची राजधानी म्हणून आम्ही औरंगाबादला ओळखतो. औरंगाबादच्या लेण्यामुळे संपूर्ण जगातील पर्यटक तेथे येत असतात. या ठिकाणचे पथदिवे 24-24 तास बंद असतात. याची दखल वर्तमानपत्र आणि टेलिव्हिजनने घेतली आहे. औरंगाबाद शहरातील पथ दिवे काही दिवस पूर्णपणे बंद असतात. परंतु या पथदिव्यावर मात्र वेगळा खर्च केला जातो.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. धनंजय मुंडे .....

सभापती महोदय, या अंतिम आठवडा प्रस्तावाच्या निमित्ताने आम्ही औरंगाबाद शहराच्या निमित्ताने काही सूचना आणि प्रश्न उपस्थित केले आहेत. या विषयावर आम्ही विचार मांडत असताना या निमित्ताने काही गोष्टीचा आम्ही संदर्भ दिला असला तरी उद्देश एवढाच आहे की, या महानगराचा गेल्या 20 वर्षाचा विचार करुन अंतिम आठवडयाच्या उत्तरात आम्ही ज्या सूचना केल्या त्या सूचनांचा विचार शासनाने करण्याची आवश्यकता आहे. या महानगराचा विकास करण्यासंबंधी शासनाने योग्य ते पाऊल उचलावे. आम्ही या ठिकाणी ज्या भ्रष्टाचाराच्या बाबतीत उल्लेख केला त्यासंदर्भात आम्हाला आपल्याला पुरावे सुध्दा देता येतील. त्यामुळे या भ्रष्टाचाराच्या संदर्भात मुख्यमंत्र्यांनी वेगवेगळया चौकशा लावून हा विषय जनतेसमोर आणावा असा प्रश्न मी या प्रस्तावाच्या निमित्ताने उपस्थित करतो.

यांनतर श्री. अजित....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.धनंजय मुंडे.....

सभापती महोदय, मी सभागृहात उपस्थित नसताना माननीय मुख्यमंत्री म्हणाले होते की, विरोधी पक्ष नेते ऐकीव गोष्टीवर बोलतात. मी या ठिकाणी सांगू इच्छितो की, मी सांगितलेल्या गोष्टी ऐकीव नाहीत. त्या लिहून आणलेल्या असल्या तरी सत्य आहेत. माननीय मुख्यमंत्री विरोधी पक्षात असताना जे संदर्भ देऊन बोलायचे, त्याच सर्व गोष्टी आज आम्ही वापरत आहोत. याचा अर्थ ऐकीव होत नाही. मी भाषणात उपस्थित केलेल्या मुद्यांना माननीय मुख्यमंत्र्यांनी न्याय द्यावा अशी मागणी करून माझे भाषण पूर्ण करतो. जय हिंद ! जय महाराष्ट्र !

प्रस्ताव प्रस्तुत झाला.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.हरिसिंग राठोड (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, माननीय विरोधी पक्ष नेत्यांनी नियम 259 अन्वये राज्यातील विविध महानगरपालिकेच्या कारभारासंबंधी मांडलेल्या अंतिम आठवडा प्रस्तावावर माझे विचार मांडण्यासाठी मी उभा आहे.

सभापती महोदय, मुंबई हे आंतरराष्ट्रीय दर्जाचे शहर आहे. या आंतरराष्ट्रीय शहरात मी 37 वर्षापूर्वी आलो होतो, त्यावेळी या शहरात असलेल्या इमारतीं मोठ्या आवडीने न्याहाळत होतो. त्यावेळी मुंबई शहर हे खूप सुंदर दिसत होते. मुंबई शहर ही देशाची व राज्याची आर्थिक राजधानी आहे. या मुंबई शहराला भेट देण्यासाठी देश आणि विदेशातून पर्यटक मोठ्या संख्येने येत असतात. मुंबई शहराचा एक नावलौकिक आहे. माझा एक मित्र आर्किटेक्ट आहे. श्री.रणजित नाईक असे त्याचे नाव आहे. आपण हे नाव ऐकले असेल. आम्ही त्यांच्या कार्यालयामध्ये तासन्तास चर्चा करीत असू आणि प्रामुख्याने ती चर्चा मुंबईतील झोपडपट्टीबद्दल असायची. तो मला नेहमी म्हणायचा की, मुंबई शहरात सर्वात मोठा प्रश्न झोपडपट्टीचा आहे. त्यावेळी विकास आराखडा तयार करण्यासाठी नियमावली एक बदल करावयाचा होता.त्या नियमावलीनुसार एस.आर.ए.योजना आली. नियमावली बदल करीत असताना तो तासन्तास लेक्चर द्यायचा. त्याचा अभ्यास करण्यासाठी तो परदेशात देखील जाऊन आला. मुंबई शहरात एस.आर.ए.योजना राबविण्याची कल्पना त्याची होती. त्यांची ही कल्पना माननीय शिवसेनाप्रमुख श्री.बाळासाहेब ठाकरे यांनी उचलून धरली. माननीय बाळासाहेब ठाकरे यांनी मुंबईतील झोपडपट्टीच्या जागी इमारती उभ्या राहिल्या पाहिजेत अशी संकल्पना मांडली.

सभापती महोदय, आपण झोपडपट्टीधारकांकडून कोणताही कर वसूल करु शकत नाही. त्यामुळे त्यांना सुविधाही देऊ शकत नाही आणि आजही तीच परिस्थिती आहे. सरकारने एसआरए योजना व्यवस्थितरित्या राबविल्यास राज्यावर जे 3 हजार कोटी रुपयांचे कर्ज आहे ते आपण फेडू शकू. परंतु या योजनेमध्ये थोडा बदल करण्याची आवश्यकता आहे. बिल्डरने झोपडपट्टीच्या जागेवर एसआरए योजनेद्वारे इमारत बांधायची आणि त्याद्वारे जो अतिरिक्त 2.5 एफएसआय मिळेल तो त्यांनी मार्केटमध्ये विकायचा अशी ही योजना आहे. या योजनेमध्ये सरकारचा देखील हिस्सा ठेवल्यास राज्यावरील कर्जाचा डोंगर थोड्याफार प्रमाणात कमी होईल. सरकारच्या तिजोरीमध्ये काही रक्कम जमा होईल. ..3..

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.हरिसिंग राठोड....

सभापती महोदय, मुंबई शहरात जे अनेक प्रश्न निर्माण झालेले आहेत त्यामध्ये सर्वात महत्वाचा प्रश्न झोपडपट्टीचा आहे. झोपडपट्टीमुळे मुंबई शहर बकाल झाले आहे. झोपडपट्टीमुळे सर्वत्र गंदगी आणि दुर्गंधी दिसत आहे.

सभापती महोदय, या मुंबई शहरात 25-30 वर्षापूर्वी फिरत असताना या शहराचा इतका विकास होईल असे वाटले नव्हते. परंतु मागील दहा-पंधरा वर्षात तत्कालीन सरकारने अनेक माध्यमातून विकास घडवून आणलेला आहे. वरळी येथील सेतूपूल बांधला. त्या पुलास स्व.राजीव गांधी यांचे नाव दिलेले आहे. त्या शिवाय पूर्वद्रुतगती उड्डाणपूल बांधला. पूर्वी मला वाहनाने मंत्रालयात येण्यासाठी दीड तास लागत होता, परंतु पूर्व द्रुतगती उड्डाणपूलामुळे मी एका तासात पोहोचतो. माझा अर्धा तास वाचलेला आहे. मागील दहा-पंधरा वर्षात मुंबईचा चांगला विकास झालेला आहे.

सभापती महोदय, आपणास मुंबई शहर अजून सुंदर करता येईल. देशाच्या पातळीवर हे शहर सुंदर आहेच. पण जगाच्या पातळीवर नोंद होईल असे सुंदर शहर करण्यासाठी चांगल्या नियोजनाची आवश्यकता आहे.

सभापती महोदय, तत्कालीन मुख्यमंत्री स्व.वसंतराव नाईक यांनी नवी मुंबई निर्माण केली. त्यावेळी नवी मुंबई शहर निर्माण केली नसती तर तो संपूर्ण लोड मुंबई शहरावर आला असता. वसंतराव नाईक यांनी ती दूरदृष्टी दाखविली होती. तशीच दूरदृष्टी आजच्या राज्यकर्त्यांनी दाखविली तर मुंबई, पुणे, औरंगाबाद या शहरांचा सुयोग्य विकास निश्चितपणे होईल असे मला वाटते.

सभापती महोदय, आज सर्वच ठिकाणी भ्रष्टाचार होत आहे. महानगरपालिकांमध्ये मोठ्या प्रमाणात भ्रष्टाचार होत आहे. या ठिकाणी माननीय विरोधी पक्ष नेत्यांनी जे सांगितले त्यामध्ये काही चूक नाही. नवीन सरकार सत्तेवर आल्यानंतर मंत्रिमंडळातील काही मंत्रीगण ज्यांच्या ताब्यात महानगरपालिका आहे त्या पक्षाची मंडळी भुकेलेली होती असे म्हणतात. मागील पंधरा-वीस वर्षापासून या महानगरपालिकांमध्ये मोठ्या प्रमाणावर भ्रष्टाचार वाढलेला आहे. महानगरांचा विकास केवळ महानगरपालिकाच करु शकत नाही तर शासनाची सुद्धा तेवढीच जबाबदारी आहे.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

यानंतर श्री.बोर्डे..

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.हरिसिंग राठोड....

महोदय, परवा मी सेंट जॉर्जेस रुग्णालयात गेलो होतो. त्या रुग्णालयाची इमारत विस्तीर्ण स्वरुपाची आहे. परंतु त्या ठिकाणी कोणत्याही सुविधा नाहीत. त्या ठिकाणी रुग्णांवर उपचार करण्यासाठी पुरेशी साधने नाहीत. मुंबईमध्ये कॅन्सरग्रस्त रुग्णांवर उपचार करण्यासाठी टाटा मेमोरियल हॉस्पिटल आहे. देशभरातून कॅन्सरग्रस्त रुग्ण उपचारार्थ या रुग्णालयात येतात. याशिवाय मुंबईमध्ये जे.जे.समूह रुग्णालय आहे. त्या रुग्णालयाकडे सुध्दा मोठ्या प्रमाणावर जागा उपलब्ध आहे. या रुग्णालयांतील पुरेशी जागा लक्षात घेता सरकारला त्या ठिकाणी काम करण्यास वाव आहे.

महोदय, या ठिकाणी आधुनिक रुग्णालय सुरु करण्याचे पूर्वी जाहीर करण्यात आले होते. परंतु त्या कामामध्ये पुढे कोणतीही प्रगती झाली नाही किंवा त्यासाठी तरतूद सुध्दा केली नाही. मागच्या सरकारने जी काही कामे केली ती खरोखरच कौतुकास्पद आहेत. मागच्या सरकारने केलेल्या गोष्टींना सांभाळण्याचे आणि पुढे नेण्याचे काम विद्यमान सरकारला करावे लागणार आहे. कारण याच उदात्त हेतूने राज्यातील जनतेने त्यांच्या हातामध्ये राज्याचा कारभार दिलेला आहे.

सभापती महोदय, आजच्या घडीला छोटीमोठी नोकरी करणारा सर्वसामान्य माणूस मुंबईमध्ये स्वत:चे घर घेण्याचे स्वप्न पूर्ण करु शकत नाही. त्यामुळे सर्वसामान्य माणसाला परवडणाऱ्या किंमतीत घर उपलब्ध करुन देणे गरजेचे आहे. पूर्वी म्हाडाच्या माध्यमातून मोठमोठ्या कॉलनी उभ्या राहिल्या. पूर्वीच्या काळात स्वस्त दरात म्हणजेच 5-10 लाख रुपयांमध्ये मुंबईत घर मिळत होते. पण आज 50 लाख रुपयांच्या खाली कुठेही घर उपलब्ध नाही. अशा परिस्थितीत स्वत:चे घर घेण्याचे स्वप्न सर्वसामान्य माणूस बघू शकत नाही. महोदय, मी विचारु इच्छितो की, अशा परिस्थितीत सर्वसामान्यांसाठी असलेल्या सरकारच्या योजना कोठे गेल्या ? आजच्या काळात पती-पत्नी दोघेही नोकरी करीत असले तरी त्यांच्यासाठी मुंबईमध्ये स्वत:चे घर घेणे ही अशक्यकोटीतील गोष्ट झाली आहे. म्हणून सर्वसामान्य माणसांसाठी सरकारने म्हाडाच्या माध्यमातून योजना आखल्या पाहिजे, जेणेकरुन गरीब माणसाला स्वत:चे घर घेता येईल.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.हरिसिंग राठोड....

सभापती महोदय, मुंबई, पुणे या सारख्या शहरांमध्ये मोक्याच्या आणि किंमतीच्या जागा झोपडपट्टयांनी व्यापलेल्या आहेत. त्या जागा खाली करून त्या विकसित करण्यासाठी विकासकाला दिल्या जातात. परंतु यामध्ये विकासकाला 50 टक्के फायदा होतो. त्यामुळे अशा योजना सरकारने स्वतःच राबवून, हा पैसा सरकारच्या तिजोरीत कसा येईल या दृष्टिकोनातून राज्य सरकारने विचार केला तर राज्यावरील 3 लाख कोटी रुपयांचे कर्ज फेडता येऊ शकेल आणि गोरगरिबांना सुध्दा घरे उपलब्ध करून देता येतील, एवढेच या निमित्ताने सांगतो.

सभापती महोदय, आपण मला बोलण्याची संधी दिल्याबद्दल आपले मनापासून आभार मानतो व माझे भाषण संपवितो.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

राज्य सरकारच्या वतीने अधिवेशन काळात कोणतीही बाब सभागृहाबाहेर जाहीर करण्यापूर्वी सभागृहात जाहीर करण्याबाबत

श्री.शरद रणपिसे : सभापती महोदय, माननीय सांस्कृतिक कार्य मंत्र्यांनी दोन दिवसांपूर्वी मल्टीप्लेक्समध्ये मराठी सिनेमा प्राईम टाईममध्ये दाखविण्याचे जाहीर केले होते. परंतु आता त्यांनी चॅनेलवर असे सांगितले की, प्राईम टाईम विरहित जी वेळ असेल त्या वेळेमध्ये.....सभापती महोदय, अधिवेशन सुरु असताना अशा प्रकारच्या घोषणा सभागृहात केल्या पाहिजेत. त्यामुळे आपण या बाबतीत शासनाला सूचना दिल्या पाहिजेत.

तालिका सभापती : आज सकाळीच या बाबतीत चर्चा झाली. ज्या घोषणा विधानसभेमध्ये करण्यात आलेल्या आहेत त्या घोषणा या सभागृहात सुध्दा करण्याचे माननीय मुख्यमंत्र्यांनी मान्य केले आहे. त्यामुळे अधिवेशन संपण्यापूर्वी विधानसभेमध्ये करण्यात आलेल्या घोषणा या सभागृहात सुध्दा करण्यात येतील.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

पृ.शी.: बृहन्मुंबई, ठाणे, कल्याण-डोंबिवली, औरंगाबाद या महानगरपालिका क्षेत्रामध्ये विविध नागरी समस्यांमुळे जनतेचे अतोनात हाल होणे

मु.शी.: बृहन्मुंबई, ठाणे, कल्याण-डोंबिवली, औरंगाबाद या महानगरपालिका क्षेत्रामध्ये विविध नागरी समस्यांमुळे जनतेचे अतोनात हाल होणे, या विषयावर सर्वश्री धनंजय मुंडे, माणिकराव ठाकरे, सुनील तटकरे, हेमंत टकले, जयंत प्र.पाटील, संजय दत्त, अमरसिंह पंडित, अशोक ऊर्फ भाई जगताप, चंद्रकांत रघुवंशी, जयवंतराव जाधव, राजेंद्र मुळक, अनिल भोसले, हरिसिंग राठोड, शरद रणपिसे, श्रीमती विद्या चव्हाण, ॲड.जयदेव गायकवाड, ॲड.हुस्नबानू खलिफे, सर्वश्री रामराव वडकूते, प्रकाश गजभिये, डॉ.सुधीर तांबे, वि.प.स. यांचा प्रस्ताव

(चर्चा पुढे सुरु.....)

श्री.भाई गिरकर (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, माननीय विरोधी पक्ष नेत्यांनी म.वि.प. नियम 259 अन्वये अंतिम आठवडा प्रस्ताव मांडलेला आहे. त्या प्रस्तावावर त्यांनी आपले विचार व्यक्त केलेले आहेत.

महोदय, मी सभागृहाच्या निदर्शनास आणून देतो की, 1970 च्या दशकात मुंबई शहरातील रस्ते पाण्याने धुतले जात होते. एवढेच नव्हे तर मुंबईचे रस्ते ब्रशिंग करून साफ केले जात होते. पूर्वी मुंबईमध्ये टांग्याने वाहतूक होत होती. आम्हाला कोकणात गावी जावयाचे असेल तर टांग्याने भाऊच्या धक्क्यापर्यंत यावे लागायचे व तेथून बोटीने कोकणात जाता येत होते. पूर्वी सुंदर असलेली माझी मुंबई मात्र आज बकाल झालेली आहे. महोदय, मला या विषयामध्ये राजकारण आणायचे नाही. या प्रस्तावावर बोलत असताना मी केवळ काही सूचना करणार आहे.

सभापती महोदय, 1970 च्या दशकापासून आतापर्यंतची मधली साडेचार वर्षे आणि आताचे चार महिने सोडले तर, एका विशिष्ट पक्षाचे सरकार राज्यात आणि देशात सत्तेवर होते. 1970 च्या दशकानंतर मात्र मुंबईची दुरवस्था होत गेली. 1974 मध्ये झोपडपट्टयांना गलिच्छ वस्ती म्हणून मान्यता देण्यात आली. त्यामुळे ज्या झोपडपट्टया होत्या त्यांना कायम केले गेले. 1974

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.भाई गिरकर....

नंतर पुन्हा 1985 मध्ये सुध्दा असेच झाले. पूर्वी मुंबई शहरात झोपड्या नव्हत्या. 1974 मध्ये झोपड्यांना मान्यता दिल्यानंतर खऱ्या अर्थाने मुंबईमध्ये झोपड्यांचा विळखा निर्माण झाला.

महोदय, या ठिकाणी सन्माननीय सदस्यांनी सांगितले की, मुंबईतील झोपड्यांना सोयी सुविधा दिल्या जात नाही. या निमित्ताने मी सांगतो की, मुंबईतील 6 खासदारांचा प्रत्येकी 5 कोटी रुपये विकास निधी, प्रत्येक आमदारांचा प्रत्येकी दोन कोटी रुपये विकास निधी आणि 227 नगरसेवकांचा निधी, हा सर्व पैसा झोपडपट्टयांतील रहिवाशांच्या पाणी, रस्ते, शौचालये यासारख्या मूलभूत सोयी सुविधांवर खर्च करावा लागतो. झोपडपट्टयांवर खर्च करण्यात आलेला हा पैसा वाचला असता तर तो मुंबईतील विकास कामांवर खर्च करता आला असता. 1974 मध्ये झोपडपट्टयांना मान्यता देऊन, या मुंबई शहराला बकाल करण्यात आले. मी सभागृहाच्या निदर्शनास आणून देतो की, वांद्र्याला तीन-तीन माळ्यांच्या झोपड्या उभ्या राहिलेल्या आहेत. या सर्व गोष्टींना जे सरकार जबाबदार आहे त्या सरकारने कायदे आणि नियम पाळले असते तर या मुंबईची इतकी दुरवस्था झाली नसती. अगोदरच्या सरकारने केलेल्या या कामांमुळे चार महिन्यापूर्वी सत्तेत आलेल्या या सरकारवर मोठी कठीण परिस्थिती आलेली आहे.

सभापती महोदय, मुंबईच्या प्रश्नांबाबतचा अभ्यास करण्यासाठी अफझलपूरकर समिती गठीत करण्यात आली होती. मुंबई शहरात जुन्या चाळींचा, बीआयटी चाळींचा, बीडीडी चाळींचा, म्हाडा वसाहतींचा आणि गावठाणांचा सुध्दा प्रश्न आहे. मुंबईमध्ये 100 वर्षांपूर्वीची गावठाणे आहेत.

नंतर श्री.कांबळे.....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. भाई गिरकर ....

जुन्या म्हणजे मोडकळीस आलेल्या चाळी आहेत. मुंबई शहरातील गावठाणे, कोळीवाडे, सहकारी गृहनिर्माण संस्था यांच्या संदर्भात युती शासनाच्या काळात अफझलपूरकर समिती नेमली होती. मुंबईतील मूळ निवासी कोळीवाड्यातील कोळी, गावठाणात राहणारा पाचकळशी समाज आहे. बीआयटी चाळी, बीडीडी चाळी 100 वर्षांपूर्वी बांधलेल्या होत्या. जुन्या मोडकळीस आलेल्या चाळींची दुरवस्था झाली आहे. मुंबई शहरातील, उपनगरांतील चाळींचा एकत्रित विकास करण्यासाठी अफझलपूरकर समितीची स्थापना झाली होती. मी त्या समितीवर सदस्य होतो. माननीय मंत्री श्री. दिवाकर रावते साहेब, श्री. प्रकाश महेता हेही समितीवर सदस्य होते. विरोधी पक्षातीलही काही सन्माननीय सदस्य त्या समितीवर सदस्य होते. सन 2002 ला अफझलपूरकर समितीचा अहवाल आला. परंतु दुर्दैवाने सन 2002 नंतर समिती बासनात गुंडाळली गेली. समितीचा अहवाल स्वीकारून मुंबईचा विकास केला पाहिजे होता, मूळ रहिवाशांना, बीआयटी, बीडीडी चाळींतील लोकांना सुविधा देऊन चाळींची पुनर्बांधणी केली पाहिजे होती. परंतु तसे करण्यात आले नाही. त्यामुळे मुंबईच्या बकालपणात अधिक भर पडली.

सभापती महोदय, धारावी आशियातील मोठी झोपडपट्टी, सर्व्हिस झोन समजला जातो. गिनिज वर्ल्ड बुकमध्ये धारावीचे नाव होईल अशी आपण आत्मप्रौढी मांडत गेलो. आता धारावी नंतर कांदिवली पूर्व, पश्चिम मुलुंड येथे धारावीला लाजवतील अशा झोपडपट्ट्या तयार झाल्या आहेत. झोपडपट्ट्या कशा वाढल्या हे सर्वांना माहीत आहे.

सभापती महोदय, केंद्र सरकारच्या रेल्वेच्या, बीपीटीच्या जागेवर झोपडपट्टया आहेत, जिल्हाधिकाऱ्यांच्या जमिनींवर झोपडपट्ट्या आहेत. सन्माननीय सदस्य श्री. किरण पावसकर यांनी देखील अनेक वेळा हा विषय मांडला आहे. मुंबई मनपाने ठरविले तर एकही झोपडपट्टी निर्माण करता आली नसती. झोपडी बांधण्यास सुरूवात केली की मुकादमाला समजते, ज्युनिअर इंजिनिअर, सब इंजिनिअर यांना समजते. मुंबई मनपा तत्संदर्भात सांगते की, आम्ही झोपड्या तोडायला लावू. परंतु आम्हाला पोलीस संरक्षण मिळत नाही. म्हाडाच्या जागेवर झोपड्या असतील तर म्हाडा म्हणते की आमचा याच्याशी काही संबंध नाही. मुंबई महानगरपालिका म्हणते की, ती म्हाडाची जागा

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. भाई गिरकर ....

आहे, जिल्हाधिकाऱ्यांची जागा आहे. सभापती महोदय, सर्वांच्या आपसातील भांडणामुळे आणि त्यांना पोलीस संरक्षण न दिल्यामुळे झोपडपट्टया वाढत गेल्या, त्या निष्कासित केल्या नाहीत. अनेक झोपडपट्ट्यांचे खंड निर्माण झाले आहेत. माझी सूचना आहे की, शासनाने सर्व यंत्रणांच्या माध्यमातून यावर विचार केला पाहिजे. मुंबई मनपा, जिल्हाधिकारी, बीपीटी, म्हाडा यांच्या जागांवर पुन्हा अनधिकृत बांधकाम झाले तर ते निष्कासित करण्याच्या संदर्भात कार्यवाही व्हावी. आम्ही या संदर्भात अनेक वेळा मागणी केली आहे. मी तत्कालीन माननीय मुख्यमंत्री विलासराव देशमुख यांच्याकडे सन 2002 ला मागणी केली होती की, नवीन झोपडपट्टी झाली किंवा झोपडे तयार झाले तर तेथील सहायक आयुक्त किंवा वरिष्ठ पोलीस निरीक्षक यांना जबाबदार धरले पाहिजे आणि असे केले तर एकही अनधिकृत बांधकाम मुंबई शहरात होणार नाही.

सभापती महोदय, कुठेही अनधिकृत बांधकाम सुरू झाले तर वायरलेस गाडी जाते, बीट पोलीस जातो, सर्व यंत्रणा जाते. सत्ताधारी पोखरल्यामुळेच हे सर्व चालले आहे. केवळ पोलीस निरीक्षक, वॉर्ड अधिकारी यांनाच नाही तर जे लोकप्रतिनिधी अनधिकृत बांधकामांना संरक्षण देतील त्यांना सुध्दा निष्कासित केले पाहिजे, त्यांच्यावर देखील कारवाई केली पाहिजे. आपण असे केले तरच मुंबई वाचणार आहे नाही तर मुंबई वाचणार नाही. झोपडपट्टीदादांमुळे झोपडपट्टया निर्माण झाल्या आहेत. अनेकांनी मतांच्या लालसेपोटी झोपडपट्ट्या निर्माण केल्या आहेत. अनेकांनी सामाजिक बांधिलकी म्हणून समाज वाढला पाहिजे म्हणून झोपडपट्ट्या निर्माण केल्या आहेत. झोपडपट्ट्यांतील लोकांना मतदानाचे कार्ड, रेशन कार्ड दिले गेले, सर्व पुरावे दिले गेले, सर्व सुविधा दिल्या गेल्या, लोकप्रतिनिधींनी तेथे फंड वापरले. सर्वांनीच मिळून हे केले आहे. मी कोणत्याही एका पक्षाला दोष देत नाही. मतदानाचे अड्डे वाढविण्याचा प्रकार या माध्यमातून झाला आहे. माझी सूचना आहे की, अफझलपूरकर समितीच्या अहवालावर त्वरित कार्यवाही झाली पाहिजे. मुंबई शहरातील अनधिकृत बांधकाम थांबवणार नाही तोपर्यंत येथे काहीही होणार नाही.

सभापती महोदय, सन्माननीय विरोधी पक्षनेत्यांनी सन 2000 चा विषय मांडला. सन 2000 ची पात्रता, अपात्रता कोठून आली ? मी आपल्या माहितीसाठी सांगतो की, युती शासन गेल्यानंतर आघाडी सरकार आले. न्यायालयात कोणी तरी लिटिगेशन फाईल केले होते. तत्कालीन माननीय

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

09-04-2015 (असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही) VV.3

MSK/ पूर्वी श्री. बोर्डे 18:40

श्री. भाई गिरकर ....

मुख्यमंत्र्यांनी ॲफिडेव्हिट केले की, आम्ही सन 1995 नंतर एकही झोपडी वाढू देणार नाही, अनधिकृत बांधकाम वाढू देणार नाही. त्यामुळे सन 2000 ची मागणी आली. झोपड्यांच्या संदर्भात सन 2000 पर्यंत मान्यता द्यावी असे सांगितले गेले, न्यायालयात ॲफिडेव्हिट सादर करण्यात आले होते की, सन 1995 नंतर एकही झोपडे वाढू देणार नाही. मग 2 जाहिरनाम्यात सांगितले की आम्ही सन 2000 पर्यंतच्या झोपड्यांना मान्यता देऊ. निवडून आल्यावर एका जाहिरनाम्याच्या संदर्भात सांगितले गेले की, ती छापील चूक झाली आहे. पुन्हा दुसऱ्यांदा निवडणूक आली. पुन्हा जाहिरनाम्यात दिले गेले की, आम्ही सन 2000 पर्यंतच्या झोपडीला मान्यता देऊ. मग त्या जाहिरनाम्याच्या संदर्भात सांगितले गेले की, जाहिरनाम्यातील सर्वच पाळयचे नसते. सन 2000 च्या मुद्यावर 3 निवडणुका काँग्रेस व राष्ट्रवादी काँग्रेस यांनी जिंकल्या. आता सन 2000 पर्यंतच्या झोपड्यांना मान्यता दिली गेली. दिनांक 7 नोव्हेंबर, 2006 ला नवीन धोरण येणार होते, त्यानंतर एसआरए बंद करून सन 2007 ला नवीन धोरण येणार होते. एसआरए योजना बंद करून नवीन धोरण आणण्याच्या संदर्भात गाजावाजा झाला. अनेक एसआरए झोपडपट्टीवाले म्हणाले की, आम्ही करार दिले आहेत. मी 50 हजार लोकांचा मोर्चा घेऊन आझाद मैदानावर आलो. मी तत्कालीन माननीय मुख्यमंत्री विलासराव देशमुख यांना भेटलो आणि या संदर्भात विनंती केली. एसआरए योजना सर्वात चांगली योजना आहे. एसआरए योजना प्रामाणिकपणे राबविली तर मुंबई एसआरए योजनेमुळे झोपडीमुक्त होऊ शकते. एसआरए योजना सुरू राहिली पाहिजे. सन 2000 पर्यंतच्या झोपड्यांना मान्यता दिली पाहिजे असे सांगितले गेले होते. सन 1995 पूर्वीच्या झोपडीला पात्र ठेवा. एसआरए योजनेचा नियम आहे की, झोपडी 10 वर्षानंतर विकली तर त्यासाठी ट्रान्सफर पॉलिसी वापरावी लागते. मी म्हटले की, आता सन 2008 आले आहे, जवळजवळ 13 वर्षे झाली आहेत, कितीतरी झोपड्या विकल्या गेल्या असतील. मूळ कायद्यातील तरतुदीप्रमाणे झोपडी 10 वर्षांनी विकता येईल. तुम्ही म्हणता की, झोपडी सन 1995 च्या पूर्वीची असली पाहिजे, त्यानंतरचा रहिवासी असला तरी चालेल, त्याला पात्र धरण्यात येईल. आपण नंतर ते केले. तत्कालीन माननीय मुख्यमंत्री श्री. पृथ्वीराज चव्हाण साहेबांनी ते ॲफिडेव्हिट बदलून केले, त्यांनी म्हटले की, सन

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

09-04-2015 (असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही) VV.4

MSK/ पूर्वी श्री. बोर्डे 18:40

श्री. भाई गिरकर ....

2000 पर्यंत पात्र-अपात्र खरेदी केले त्याला करण्यात येईल. सन 2000 पर्यंत असणाऱ्याला पात्र करू. आपले सरकार असताना जीआर निघाला नाही. मी काल मागणी केली की, जीआर काढावा, आता ते झाले आहे. एसआरए योजनेमध्ये लोकांना अपात्र ठरवून बाहेर काढत आहेत, नोटीसा देत आहे. आपण त्यांना वाचवा. एसआरए योजना आघाडी शासनाने आणली आहे. तत्संदर्भात नवीन धोरण आणलेले नाही. सन 2007 मध्ये नवीन धोरण येणार होते. परंतु ते काही आले नाही. आघाडी शासनाने एसआरए योजना पुढे चालू ठेवली हे चांगले केले आहे.

(नंतर श्री. रोझेकर ....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.भाई गिरकर.....

म्हाडामध्ये उपाध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक म्हणून श्री.टी.चंद्रशेखर यांची नियुक्ती झाल्यानंतर त्यांनी असे सांगितले की, म्हाडाचे प्लॉट म्हाडाच डेव्हलप करील, आम्ही हे प्लॉट कुणाला देणार नाही. त्यामुळे त्यावरील विकास थांबला. मात्र, श्री.टी.चंद्रशेखर यांची म्हाडातून अन्यत्र बदली झाल्या नंतर म्हाडाच्या प्लॉटचा विकास करण्यास एस.आर.अे.ला शासनाने परवानगी दिली. ती पूर्वीच्याच शासनाने दिली होती, या शासनाने दिलेली नाही. श्री.टी.चंद्रशेखर यांची बदली झाल्याबरोबर तत्कालीन शासनाने ही परवानगी दिली आणि मग सुरळीत सुरु झाले. एस.आर.अे.मध्ये भ्रष्टाचार आहे, याबद्दल वाद नाही. माझ्यापेक्षा सन्माननीय सदस्य श्री.किरण पावसकर याबद्दल सभागृहाला अधिक माहिती देऊ शकतील. त्यांना त्याबाबतची चांगली माहिती आहे. त्या ठिकाणी अनेक राजकारणीच बिल्डर झाले आहेत. त्यामध्ये कोणकोण राजकारणी आहेत, हे तुम्हीच शोधा. परंतु, एस.आर.अे.चे तंतोतंत आणि प्रामाणिकपणे पालन केले असते तर मुंबई झोपडपट्टीमुक्त झाली असती आणि अनधिकृत बांधकामे राहिली नसती, ही वस्तुस्थिती आहे.

सभापती महोदय, काही सूचना करुन मी थांबणार आहे. मुंबईमध्ये वाहतुकीची फार मोठी समस्या आहे. सन 2017 मध्ये जेवढी वाहने मुंबईत अपेक्षित आहेत, तेवढ्या वाहनांना आपण सन 2012 मध्येच परवानगी देऊन टाकली आहे. त्यामुळे वाहनांची गर्दी झाली असली तरी रस्ते मात्र तेवढेच आहेत. पूर्वी आम्ही टांग्याने फिरु शकत होतो. आता सायकलीही गेल्या आहेत. त्यामुळे सन 2012 मध्ये जेवढी वाहने मुंबईला पेलवणारी आहेत, तेवढीच परवानगी दिली असती तर आज जी वाहतुकीची समस्या निर्माण झाली आहे, ती निर्माण झाली नसती. माझी अशी मागणी आहे की, शासनाने तातडीने मुंबईतील वाहनांचे सर्वेक्षण करावे आणि रस्त्यांची उपलब्धता, प्रदूषण या सर्व बाबी लक्षात घेऊन किती वाहने मुंबईत असली पाहिजेत, याबाबतचा निर्णय घ्यावा व तो कठोरपणे अंमलात आणावा.

सभापती महोदय, मुंबईमध्ये जलवाहतूक सुरु झाली आहे. मेट्रो-2 प्रकल्प गुंडाळण्यात आला असून मेट्रो-3 प्रकल्पाला मान्यता देण्यात आली आहे. मेट्रो-2 प्रकल्प चारकोप ते बांद्रा असा होता आणि त्याचे कारशेड गोरेगाव येथे होणार होते. गोरेगाव येथील कारशेडला विरोध

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.भाई गिरकर.....

होत असल्यामुळे हा प्रकल्पच स्थगित करण्यात आला आहे. मला असे निदर्शनास आणून द्यावयाचे आहे की, दहिसर येथे गणपत पाटील नगरमध्ये कारशेडसाठी जागा उपलब्ध आहे. त्यामुळे मेट्रो-2 प्रकल्प दहिसरपर्यंत वाढविला आणि दहिसर येथे कारशेड तयार केले तर हा प्रकल्पही आपल्याला कार्यान्वित करता येऊ शकेल. या दृष्टीने शासनाने विचार करावा.

सभापती महोदय, मुंबईच्या ज्या वसाहतींचा उल्लेख मी केला आहे, त्यांचे सर्वेक्षण शासनाने करावे. मागील सरकारने गेल्या 20-25 वर्षात कोणतेही नियोजन केले नाही. त्यामुळे पीएपीची घरे शासनाच्या ताब्यात येऊ शकली नाहीत. लालुभाई कंपाऊंड सारख्या अनेक चाळी पडावयास आल्या आहेत. माहूल येथील ट्रॅन्झिट कॅम्प मोडकळीस आला आहे. मुंबईची अवस्था बकाल झाली आहे. मी मुख्यमंत्री महोदयांना अशी विनंती करतो की, पीएपीची घरे तातडीने ताब्यात घ्यावीत. हिरानंदानी सारख्या विकासकांना 70 पैसै, 50 पैसे दराने जागा देण्यात आल्या आहेत. परंतु, त्यांनी शासनाला घरे दिलेली नाहीत. हा चुकीचा निर्णय घेतलेला आहे. पीएपीची घरे ताब्यात घेतली पाहिजेत, ती बिल्डरांकडे तशीच राहिली आहेत. साधारणपणे 15000 घरे ताब्यात येणे गरजेचे होते. यामुळेच मुंबई बकाल झाली आहे, मुंबईची दुरवस्था झाली आहे. यास जे जबाबदार आहेत त्यांच्यावर कारवाई केली पाहिजे, अशा प्रकारची मागणी करतो आणि ही मुंबई पुन्हा सुंदर झाली पाहिजे, अशी अपेक्षा व्यक्त करुन थांबतो.

...3....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

डॉ.नीलम गोऱ्हे (विधानसभेने निवडलेल्या) : सभापती महोदय, अंतिम आठवडा प्रस्तावावर माझे विचार व्यक्त करण्यासाठी मी उभी आहे. या अंतिम आठवडा प्रस्तावामध्ये मुंबई बरोबरच आणखीही काही विषय आहेत. यामध्ये औरंगाबाद शहराचा देखील उल्लेख करण्यात आला आहे. महाराष्ट्रामध्ये मोठ्या प्रमाणावर नागरीकरण होत आहे. मुंबई, ठाणे, कल्याण, डोंबिवली, पुणे, पिंपरी-चिंचवड या महानगरपालिकांचे प्रश्न महत्त्वाचे आहेत.

तालिका सभापती : ही चर्चा आता मी येथे थांबवतो आहे. सन्माननीय सदस्या डॉ.नीलम गोऱ्हे या ऑनलेग राहतील.

सभागृहाची बैठक मी आता स्थगित करीत आहे. उद्या शुक्रवार दिनांक 10 एप्रिल, 2015 रोजी सकाळी 10.30 ते 12.30 या वेळेत सभागृहाची विशेष बैठक भरेल. या विशेष बैठकीत अंतिम आठवडा प्रस्तावावरील उर्वरित चर्चा व मंत्र्यांचे उत्तर घेण्यात येईल. त्यानंतर दुपारी 12.00 ते 12.30 या वेळेत डॉ.केळकर समितीच्या अहवालावर उर्वरित चर्चा व मंत्र्यांचे उत्तर घेण्यात येईल. सभागृहाची नियमित बैठक दुपारी 1.00 वाजता पुन्हा भरेल.

(सभागृहाची बैठक सायंकाळी 6.57 वाजता स्थगित झाली.)

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION